मिरा-भाईंदर महानगरपालिका

लेखा परीक्षण अहवाल

2012-2013

सह संचालक, मनपा लेप,उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरिक्षा, नवी मुंबई
रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी 2012-2013 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा 2012-13 या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.स्था-18/ब/मिराभाईंदरले.प.12-13/ 92

सह संचालक (मनपालेप),
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
7 वा मजला, रायगड भवन,
सी.बी.डी. (बेलापुर),
नवी मुंबई, 400 614.
दि. ___/___/_____
19/1/2016

प्रति,
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका,
मिरा-भाईंदर.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण या कार्यालयाचे श्री.अभिजित पिसाळ, सहाय्यक संचालक (मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांच्या पथकाने दि. 20/07/2015 ते 18/12/2015या कालावधीत पुर्ण केले असून लेखापरिक्षण अहवाल तयार केला आहे.

श्री. सिताराम काळे, उपसंचालक, (मनपालेप), उप विभाग-2, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी दि. 08/01/2016 रोजी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेशी सदर अहवालाबाबत चर्चा करून अंतिमीकरण केले. लेखापरीक्षण कालावधी मध्ये खालील अधिकारी व पदाधिकारी कार्यरत होते.

नाव	पदनाम	कालावधी
श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे	महापौर	दि. 01/04/2012 ते दि. 27/08/2012
श्रीम. कॅटलीन ऍन्थोनी परेरा	महापौर	दि. 28/08/2012 ते दि. 31/03/2013
श्री. विक्रम कुमार	महापालिका आयुक्त	दि. 01/04/2012 ते दि. 28/01/2013
श्री. सुरेश काकाणी	महापालिका आयुक्त	दि. 29/01/2013 ते दि. 31/03/2013

अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी 2012-2013 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा 2012-13 या वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.स्था-18/ब/मिराभाईंदरले.प.12-13/ 92

सह संचालक (मनपालेप),
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
7 वा मजला, रायगड भवन,
सी.बी.डी. (बेलापुर),
नवी मुंबई, 400 614.
दि. ____/____/_____
19/1/2016

प्रति,
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका,
मिरा-भाईंदर.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण या कार्यालयाचे श्री.अभिजित पिसाळ, सहाय्यक संचालक (मनपालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांच्या पथकाने दि. 20/07/2015 ते 18/12/2015या कालावधीत पुर्ण केले असून लेखापरिक्षण अहवाल तयार केला आहे.

श्री. सिताराम काळे, उपसंचालक, (मनपालेप), उप विभाग-2, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी दि. 08/01/2016 रोजी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेशी सदर अहवालाबाबत चर्चा करून अंतिमीकरण केले. लेखापरीक्षण कालावधी मध्ये खालील अधिकारी व पदाधिकारी कार्यरत होते.

नाव	पदनाम	कालावधी
श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे	महापौर	दि. 01/04/2012 ते दि. 27/08/2012
श्रीम. कॅटलीन ऍन्थोनी परेरा	महापौर	दि. 28/08/2012 ते दि. 31/03/2013
श्री. विक्रम कुमार	महापालिका आयुक्त	दि. 01/04/2012 ते दि. 28/01/2013
श्री. सुरेश काकाणी	महापालिका आयुक्त	दि. 29/01/2013 ते दि. 31/03/2013

अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण.....1

I PART I : भाग १.....3

मागील लेखा परीक्षण अहवाल.....3

PART II.....10

कलम ९ अ खालील आक्षेप.....11

1 महानगरपालिकेचे 2012-13 च्या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे सादर करणे व आर्थिक स्थिती बाबत.....12

2 अंदाजपत्रकातील तरतूदीपेक्षा जादा /कमी झालेल्या खर्चा बाबत.....14

3 महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्याकडील प्रलंबित असलेल्या अग्रीम समायोजना बाबत.....18

4 कर्ज निवारण निधी बाबत.....19

5 शासकीय अनुदानाच्या अखर्चीत रक्कमाबाबत.....21

6 लेखा विभागातील लेखापरिक्षणास आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.....22

7 सर्वसाधारण रोखवहीचा मार्च 2013 अखेरचा बँक ताळमेळ प्रलंबित असल्याबाबत.....26

8 आयकराची रक्कम उशिरा भरल्याबाबत व रोखपालाकडून जमानत किंवा प्रतिभूती न घेतलेबाबत.....29

9 महानगरपालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कर आकारणीच्या नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध न झालेबाबत.....30

10 मालमत्ता कर संकलन विभागात सर्व प्रभागामधुन (प्रभाग क्र.01 ते 06 रोखीने / धनादेशाने जमा होणाऱ्या रक्कमांच्या संकलनातील अनियमिततेबाबत.....31

11 कर संकलन विभागात कर निर्धारण आकारणी नोंदवही न ठेवली नसल्याबाबत.....32

12 कर संकलन विभागामध्ये आकारणी झालेल्या नस्तीची मागणी नोंदवहीला नोंदी न झाल्याबाबत.....33

13 प्रभाग क्र.03 घोडबंदर प्रभागातील अनधिकृत मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कराची आकारणी कमी केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.....35

14 उत्तन विभाग झोन क्र.टी अनधिकृत मोबाईल टॉवरवरील मालमत्ता कराची आकारणी कमी केल्याने झालेल्या रु.2,44,553/- एवढया आर्थिक नुकसानाबाबत.....37

15 मालमत्ता कराचा भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे दंडात्मक शुल्काच्या व मालमत्ता कराच्या वसुलीबाबत.....38

16 कनकिया मालमत्ता कर विभागाकडील नवीन कर निर्धारणातील अनियमितताबाबत.....39

17 मोबाईल टॉवर मालमत्ता कर वसुलीची नवीन कर निर्धारणाची प्रकरणे उपलब्ध करण्यात आली नसल्याबाबत.....43

18 कर संकलन प्रभागाकडून रोखीने जमा होणाऱ्या करांच्या रक्कमा लेखा विभागात भरणा केल्याची चलने लेखा परिक्षणास उपलब्ध न केल्याबाबत.....46

19 शहरातील मोकळया जागेवरील कराची वसुली न केल्याबाबत. 47
20 विकास आराखडयाची अंमलबजावणी व आरक्षित जागा संपादनाबाबत 51
21 2012-13 च्या लेखा परीक्षणासाठी नस्ती व अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत....52
22 मिरारोड (पूर्व) विभागातील गटारात व नाल्यात बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या एम.एस. करणे कामातील अनियमितता 54
23 सी.आय. (एस ॲन्ड एस) टायटन पाईप (LA-Class) आणि समकक्ष ISO/B.S. स्टॅन्डर्डप्रमाणे 100 मि.मी. ते 500 मि.मी.व्यास पाण्याचा पाईप पुरवठा करणे कामातील अनियमितता....57
24 भाईंदर (पूर्व) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका सुचवेल तो इतर जलकुंभ येथुन मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टॅकरद्वारे पाणी पुरवठा करणे कामातील अनियमितता....59
25 पाणी पुरवठा व मलनिस्सा:रण विभागाने नवीन नळ जोडणी व अनधिकृत नळ जोडणी नियमित करण्यासाठी वसुल केलेल्या शुल्काबाबत. 61
26 पाणी पुरवठा विभागानेकिरकोळ दुरुस्तीसाठी पुरविलेल्या बिडाचे पाईपच्या (सी.आय) नोंदी मोजमाप नोंदवहीमध्ये घेतल्या नसल्याबाबत....63
27 अतिक्रमण विभागास भाडे तत्वावर पुरविण्यात आलेल्या डंपरच्या प्रदानाबाबत. 64
28 विद्यार्थ्यांना सकस आहार पुरविणेबाबत....67
29 महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत प्रशिक्षणावरील खर्चातील अनियमितता. 69
30 बालवाडी शाळेच्या मुलामुलींसाठी गणवेश, स्कुल बॅग,पाटी व छोटा स्टील डबा पुरवठा करणे या खर्चातील अनियमितता 76
31 महिला व बालकल्याण विभागाच्या मंजुर अर्थसंकल्पीय तरतूद खर्च न करण्यात आल्यामुळे वर्ष अखेर अखर्चित राहिलेल्याबाबत 79
32 सुवर्ण जयंती शहरी योजनेची वर्ष 2012-13 मधील विहीत उद्दीष्टये साध्य झालेली नसल्याबाबत तसेच प्राप्त अनुदान अखर्चित राहिल्याबाबत....82
33 अंध व अपंग कल्याण योजनेअंतर्गत केलेल्या रु.5000/- खर्चाचे प्रमाणक लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत....83
34 रस्ते दुरुस्ती व सुधारणा कामातील अनियमितता. 84
35 रस्ता मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे कामांतील अनियमितता. 86
36 सामाजिक आर्थिक व जातनिहाय जणगणनेचे अभिलेखे उपलब्ध न केल्याबाबत....88
37 देयके मंजूर करतांना बांधकाम विभागातील मोजमाप पुस्तकाबाबत विहित कार्यवाही केली नसल्याबाबत.... 89
38 अग्नीशमन विभागाकडून देण्यात येणाऱ्या ना हरकत प्रमाणत्राच्या अनुषंगाने वसूल करण्यात येणा-या कॅपीटेशन फीच्या 10% दरवाढीला शासनाची मंजूरी नसतांना वाढीव दराने कॅपीटेशन फी वसुलीबाबत 90
39 अग्निशमन दलाकरीता 39 मीटर उंच एरियल लॅडर प्लॅट फॉर्म (टी.टी.एल) वाहन खरेदीतील अनियमितता.91
40 विधी अधिकारी व संगणक चालक यांनी केलेल्या परतीच्या विमान प्रवासाच्या रकमेचे अतिप्रदानाबाबत. 94
41 विधी विभागाने अभियोक्त्याची पॅनलवर नेमूण केली नसताना मानधनाचे नियमबाह्य प्रदानाबाबत. 96
42 पावसाळयापुर्वी कच्चे/पक्के नाले सफाई करणे बाबत. 97
43 पल्स पोलिओ मोहिमेसाठी मंडप, टेबल व खुर्च्या यांचा पुरवठा करण्यासाठी केलेल्या खर्चाबाबत....99
44 मनपा प्राथमिक शाळांकरिता फर्निचर खरेदीवरील खर्चाबाबत. 101
45 महानगरपालिकेस विविध प्रकारचे नमुने फॉर्म, रजिस्टर ई. छपाई करून पुरवठा करणेबाबत 104
46 अभ्यास दौऱ्याकरिता अग्रीमाचे समायोजन प्रलंबित असल्याबाबत. 106
47 संगणक विभागातील संगणकासाठी टोनर खरेदीच्या अनियमिततेबाबत. 107
48 स्थानिक संस्था करासंदर्भातील अभिलेख/माहिती/विवरणपत्र उपलब्ध न केल्याबाबत. 109

कलम ९ ब खालील आक्षेप....112

49 उद्याने सुशोभिकरणाचे खर्चातील अनियमितता. 113
50 उद्याने सुशोभिकरण करणे करीता माती व शेणखत खरेदीतील अनियमितता. 115
51 उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाने ठेका पध्दतीने मजूर घेवून त्यांचेव्दारे उद्यान विभागाची कामे करुन घेतल्याबाबत....117
52 अधिकृत व अनधिकृत मोबाईल टॉवर्स बाबत. 121
53 बाजार फी/ लायसन्स फी वसुली करीता करण्यात आलेल्या लिलावाच्या करारनाम्यामधील त्रुटी बाबत....123
54 बाजार लिलाव /बाजार फी वसुलीतील अनियमितता. 125
55 मालमत्ता हस्तांतरणापोटी फी आकारणी करुन वसुल न केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानाबाबत 127
56 मालमत्ता कर संकलन विभागामध्ये इमारत, खोल्या, घरे ,झोपडया मिळकतीमध्ये होणारी वाढ अथवा घट याबाबतच्या नोंदवहया न ठेवल्याबाबत. 129
57 कर संकलन विभागाने विहीत नमुन्यातील मागणी नोंदवही ठेवली नसल्याबाबत 130
58 कर संकलन विभागातील कर वसुलीच्या थकबाकी रक्कमाबाबत. 132
59 कुत्र्यांचे निर्बिजीकरण/लसीकरणाकरीता केलेल्या प्रदानातील अनियमितता तसेच कोंडवाडे जमा रक्कम लेख्यात कमी घेतल्याबाबत. 133
60 घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2000 अन्वये प्रभाग निहाय वॉर्ड साफसफाई करणे बाबत. 135
61 आरोग्य विभगातील साठा नोंदवहीतील अनियमिततेबाबत. 139
62 2012-2013 या वित्तिय वर्षात महापालिकेने अदा केलेली विद्युत देयके लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबात. 145
63 विज आकार शुल्कासहित विद्युत देयकाचे प्रदान झाल्याबाबत. 146
64 संगणक विभागातील अनियमिततेबाबत. 148
65 लेखनसामुग्री व स्टेशनरी खरेदीतील अनियमितता. 151
66 कर्मचा-यांची पदोन्नतीच्या दिनांकास चुकीची वेतन निश्चिती केल्याने झालेल्या अतिप्रदाना बाबत. 153
67 भ्रमणध्वनी सेवेसाठी पुरवठादारास केलेल्या प्रदानाबाबत. 156
68 अंशराशीकरण रकमेची चुकीची परीगणना व आश्वासित प्रगती योजनेचा चुकीचा लाभ दिल्याने अतिप्रदान. 159

69 वेतन देयकातील वजातीचे लेखांकनाच्या अनियमततेबाबत. 161
70 भविष्य निर्वाह निधीच्या गुंतवणूकीवर मिळालेल्या व कर्मचा-यांना दिलेल्या व्याजामधील तफावती बाबत.162
71 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबडेकर भवन येथील मंगल कार्यालयाकडून कमी दराने भाडे वसूली/ अनामत रक्कमेच्या परताव्या बाबत. 164
72 महानगरपालिका क्षेत्रात 90 होर्डिंग्ज उभारण्यासाठी दिलेल्या ठेक्यासंदर्भात निविदा प्रक्रिया विहित वेळेत राबविली नसल्याने महानगरपालिकेला झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत. 166
73 पाणीपट्टी जमा रकमेबाबत व पाणी आकार मागणी नोंदवही ठेवली नसलेबाबत. 169
74 पाणीपट्टी कर वसुलीच्या न वटलेल्या धनादेशांबाबत दंडात्मक शुल्काची वसुली न केल्याबाबत. 171
75 विधी विभागाकडून नवीन संगणकीय आज्ञाप्रणाली विकसित करणेसाठी केलेल्या करारनाम्यानुसार करावयाच्या प्रदानापेक्षा जादा झालेल्या प्रदानाबाबत. 175
76 अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे लेखापरीक्षणामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततांबाबत. 176
77 महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत केलेल्या कामातील अनियमितता. 178
78 गटार बांधणे/सुधारणा करणे कामातील खर्चातील अनियमितता. 181
79 भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.119 येथे क्रिडा संकूल बांधणे. 182
80 खासदार निधीतुन प्रभाग क्र.74 मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे कामातील अनियमिततेबाबत..... 184
81 आमदार/खासदार निधीतून केलेल्या कामातील अनियमिततेबाबत..... 185
82 शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे. (BSUP) 187
83 अतिक्रमण विभागास ठेका पध्दतीने मजूर पुरवठा करण्यावरील खर्चातील अनियमिततांबाबत 190
84 अतिक्रमण विभागास जे.सी.बी. (मशीन) पुरवठयासाठी केलेल्या खर्चाबाबत. 193
85 अतिक्रमण व अनधिकृत बांधकामधारकांकडून वसूल केलेल्यारकमेच्या अनियमिततेबाबत. 194
86 सुवर्णजयंती योजनेच्या बँक खात्यामध्ये जमा झालेल्या व्याजाच्या रक्कमेचा विनीयोग न केल्याबाबत. 196
87 सुवर्ण जयंती रोजगार हमी योजनेंतर्गत मजुर कर्ज प्रकरणाची रक्कम बँकेकडे अनावश्यक गुंतून राहिल्याबाबत. 198
88 परिवहन विभागातील JNNURM योजने अंतर्गत खर्चातील अनियमिततेबाबत. 199
89 परवाना विभागाने परवानाव नुतनीकरण शुल्क न वसूल केलेबाबत. 201
90 महापालिकेसाठी आवश्यक असलेल्या सुरक्षा रक्षकांचा पुरवठा करण्यासाठी खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी नियुक्त करण्यात आल्याबाबत. 202
91 व्दितीय नोंद पध्दतीने लेखे ठेवणेसाठी सनदी लेखापालास महानगरपालिकेने केलेल्या प्रदानातील अनियमिततेबाबत. 207

कलम ९ क खालील आक्षेप 209

निरंक 210

कलम ९ ड खालील आक्षेप 212

92 उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाचे कामकाजातील अनियमितताबाबत. 213
93 गुंतवणुका व त्यावर मिळालेल्या व्याजाबाबत. 215
94 रा.म.क्र.08 वरील काशिमिरा जनता नगर येथील कब्रस्तानमध्ये पाथवे तयार करणे कामातील अनियमितता. 217
95 घोडबंदर रस्ता वर्सोवा नाका ते पुलापर्यंत पुन:पृष्टीकरण करणे कामातील अनियमितता. 218
96 घोडबंदर येथील रेतीबंदर ते मॉडर्न पर्यंतचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. 220
97 पल्स पोलिओ मोहिमेंतर्गत अदा केलेल्या अग्रिम रकमांचे समायोजन विलंबाने केल्या बाबत. 222
98 सार्व. आरोग्य विभागाच्या - पावतीसाठा नोंदवहीतील अनियमिततेबाबत. 223
99 अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणे निष्काषित करणेकामी आलेल्या खर्चाच्या वसूलीबाबत. 224
100 नागरी सुविधा केंद्रातील अनियमिततेबाबत. 227
101 महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत निराधार/विधवा/घटस्फोटित मुलींच्या विवाहाकरिता अर्थसहाय्याबाबत. 231
102 नविन नळजोडणी शुल्कापोटी जमा रकमांचे अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आले नसल्याबाबत 231
103 जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत मिरा भाईंदर शहराचे भुयारी गटार योजना प्रकल्पावरील खर्चाबाबत. 233
104 दुरध्वनी देयके विलंबाने प्रदान केल्यामुळे रु.870/- एवढी जादा रक्कम प्रदान केल्याबाबत. 237
105 प्रवासभत्ता देयकाच्या अनियमिततेबाबत. 239

लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र 243

विवरणपत्रे व जोडपत्रे 244

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण

विभाग	९अ	९ब	९क	९ड
इतर				100
आयुक्तालय				
सामान्य प्रशासन		66, 67, 68, 69, 70		104, 105
नगर सचिव		71		
शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम	34, 35, 36, 37	77, 78, 79, 80, 81, 82		94, 95, 96
शहर अभियंता आणि विद्युत विभाग		62, 63		
पाणी पुरवठा व मल निसा:रण	21, 22, 23, 24, 25, 26	73, 74		102, 103
लेखा विभाग	1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8	91		93
नगर रचना	19, 20	52		
जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर	48			
कर निर्धारण व संकलन	9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18	53, 54, 55, 56, 57, 58		
आरोग्य	42, 43	59, 60, 61		97, 98
नागरी वाहतूक		88		
माहिती आणि जनसंपर्क		72		
विधी विभाग	40, 41	75		
भांडार	44, 45	65		
परवाना व मंडई विभाग	46	89		
सुरक्षा विभाग		90		
अनधिकृत बांधकाम प्रतिबंध	27	83, 84, 85		

विभाग				
संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान	47	64		
महिला व बालकल्याण विभाग	28, 29, 30, 31, 32, 33	86, 87		101
अग्निशमन विभाग	38, 39			
प्रभाग कार्यालये		76		99
उद्यान विभाग		49, 50, 51		92

Part II

भाग एक

गंभीर अनियमितता

कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

1 महानगरपालिकेचे 2012-13 च्या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे सादर करणे व आर्थिक स्थिती बाबत..

लेखा विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 08

लेखा शीर्ष : लेखा शाखा मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या 2012-13 या वित्तीय वर्षाच्या मत्ता व दायित्व विवरणपत्रातील (नमुना नं.29) आकडेवारी महानगरपालिकेच्या संबंधित अभिलेख्याशी जुळत नाही. मार्च 2013 अखेरचे न वटलेल्या धनादेशाची रक्कम रु. 3321.48 लक्ष एवढी आहे. मत्ता व दायित्व आणि वार्षिक जमा-खर्च यांचे अवलोकन करता पाणी पुरवठा, उद्यानविद्या व साफसफाईची सेवा स्वयंधारीत नाही. महानगरपालिकेचे वार्षिक लेखे स्थायी समितीकडे वेळेवर सादर केले नाहीत.

मीरा भाईंदर महानगरपालिकेची स्थापना दिनांक 28/02/2002 रोजी झाली आहे. महापालिकेने 2012-2013 च्या लेखापरीक्षणास दफ्तरी अभिलेखे सदर केले आहेत, त्यानुसार लेखापरीक्षण करण्यात आले. 2012-2013 च्या मत्ता व दायित्व विवरणपत्राचे (नमुना नं.29) अवलोकन केले असता मत्तेचे अधिक्य रुपये 10565.32 लक्ष आहे. मीरा भाईंदर महानगरपालिकेची एकंदरीत आर्थिक स्थिती चांगली असल्याचे दिसून येत आहे. वार्षिक जमा-खर्च 2012-13 चे अवलोकन करता मार्च 2013 अखेरची शिल्लक रक्कम रु.21909.93 लक्ष इतकी आहे. विभागाचे प्राप्त अनुपालन पत्र क्र.161 दि.08/10/2015 अन्वये, तसेच लेखा विभागाची रोखवही, नोंदवहया, मत्ता व दायित्व, वार्षिक जमा-खर्च व अंदापत्रकाची तपासणी केली असता महानगरपालिकेच्या 2012-13 या वित्तीय वर्षाअखेरच्या आर्थिक स्थितीबाबतचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या 2012-13 या वित्तीय वर्षाच्या मत्ता व दायित्वानुसार थकित अग्रीम रक्कम रु.69.84 लाख आहे तर अग्रिम नोंदवहीनुसार 1993-94 पासून मार्च 2013 अखेर रक्कम रु.56.89 लाख एवढी थकित अग्रीम रक्कम दिसून येत आहे. मत्ता व दायित्व तसेच अग्रीम नोंदवही यानुसार येणारी दि.31.03.2013 अखेरची थकित अग्रिम रक्कम यामध्ये रक्कम रु.12.95 लाख एवढी तफावत आहे.याबाबत सयुक्तिक खुलासा प्राप्त झाला नाही. तसेच 1993-94 पासून मार्च 2013 अखेरपर्यंतच्या रक्कम रु.56.89 लाख एवढ्या अग्रीम रक्कमेचे अद्याप समायोजन करण्यात आलेले नाही.

2.) मत्ता व दयित्व विवरणपत्रानुसार परतफेड न केलेल्या कर्जाची रक्कम रु.8442.88 दिसत आहे. तरी अंदाजपत्रकानुसार (मुळ) सदरची रक्कम रु.8752.10 लाख एवढी दिसत आहे. तसेच कर्ज नोंदवहीनुसार सदर रक्कम 11042.02 लाख रुपये एवढी दिसत आहे. मत्ता व दायित्व विवरणपत्र आणि कर्ज नोंदवहीनुसार परतफेड न केलेल्या कर्जाची रक्कम यामध्ये रक्कम रु.2289.92 लाख एवढी तफावत आहे. तसेच मेगासिटी फिरता निधी कर्जाची रक्कम रु.3475.55 लाख एवढया रकमेचा समावेश मत्ता व दायित्व विवरणपत्रामध्ये केल्याचे दिसून

येत नाही. तसेच श्री.छत्रपती शिवाजी महाराज मार्ग बनवण्याच्या कामासाठी घेण्यात आलेल्या कर्जाची रक्कम रु.8.76 लाख रक्कमेच्या नोंदी कर्ज नोंदवहीत दिसून आलेल्या नाहीत. याबाबत संयुक्तिक खुलासा प्राप्त झाला नाही. मनपाने कर्ज निवारण निधी, हा स्वतंत्र निधी स्थापन केलेला नाही.

3.) मत्ता व दायित्व विवरणपत्रानुसार गुंतवणूकीची रक्कम रु.8637.23 लाख एवढी असून सदरची रक्कम गुंतवणूक नोंदवहीनुसार रु.8776.28 लाख एवढी आहे. दोन्ही रक्कमांमध्ये रक्कम रु.139.05 लाख एवढी तफावत आहे.

4.) मिरा भाईंदर महानगरपालिकेचे 2010-11,2011-12 व 2012-13 या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे स्थायी समितीस सादर करण्याबाबतची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	वित्तीय वर्ष	प्रशासनाने वार्षिक लेखे स्थायी समितीकडे सादर केलेल्याचा दिनांक(अनुपालनानुसार)	स्थायी समितीने मंजूरी दिल्याचा ठराव क्र. व दिनांक(अनुपालनानुसार)	शेरा
1	2010-11	30/05/2011	51. 04/08/2011	मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 106(3) नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर मागील वर्षाच्या लेख्यावरचा अहवाल/वार्षिक लेखे स्थायी समिती पुढे सादर करून मंजूरी घेणे आवश्यक.
2	2011-12	20/05/2012	07. 05/01/2013	
3	2012-13	19/06/2013	45. 28.06.2013	

वरील स्थिती पाहता मागील तीन आर्थिक वर्षात महानगरपालिकेचे वार्षिक लेखे स्थायी समितीकडे उशिरा सदर केले आहेत.

5.) गुंतवणूक नोंदवहीनुसार (गुंतवणूक रजिस्टर क्र.04) भविष्य निर्वाह निधीची दि.31.03.2013 अखेरची गुंतवणूकीची रक्कम रु.1712.02 लाख असून मत्ता व दायित्व विवरणपत्रात मत्तेच्या अनु.क्र.07 नुसार रु.1662.09 लाख आहे. दोन्ही नोंदीमध्ये रक्कम रु.49.93 लाख एवढी तफावत आहे.

6) कर विभागाने ठेवलेल्या मागणी वसुली थकबाकीच्या नोंद्वहीनुसार मालमत्ता कराची थकबाकी रु.3782.87 लक्ष आहे. व पाणीपट्टी कराची थकबाकी रु. 283.90 लक्ष अशी असून वसूल न झालेली मालमत्ता व पाणीपट्टी विभागाच्या कराची एकूण रक्कम रु. 4066.77 लक्ष इतकी आहे. परंतु महानगरपालिकेचे 2012-13 च्या मत्ता व दयित्व विवरणपत्रानुसार (नमुना नं.29) वसूल न झालेल्या कराची एकूण रक्कम रु. 64.40 लक्ष आहे. म्हणजेचविभागाच्या संबंधित नोंद्वहीनुसार असलेली आकडेवारी व मनपाचे 2012-13 च्या मत्ता व दायित्व विवरणपत्रानुसार (नमुना नं.29) दाखवलेली आकडेवारी यात रक्कम रु.4002.37 लक्ष इतका फरक आहे. त्यामुळे मत्तेची नेमकी स्थिती निश्चित करता येत नाही.

7) मार्च 2013 अखेर न वटलेल्या धनादेशाची रक्कम रु. 3321.48 लक्ष एवढी आहे.

8) मत्ता व दायित्व आणि वार्षिक जमा-खर्च यांचे अवलोकन करता पाणी पुरवठा , उद्यानविद्या व साफसफाईची सेवा स्वयंधारीत नाही.

करांची नियमित वसुली, मालमत्त्याच्या भाड्याचे दर नुतीनीकरण, प्रचलित बाजारभावांचा विचार करून उत्पन्नाचे स्त्रोत वाढवण्याचा प्रयत्न केल्यास महानगरपालिका उत्पन्नात वाढ होऊन कर्जाचे दायित्व कमी होण्यास मदत होईल.

DGPAGPM8503 (Ref No : 101, Hmm No : 27)

2 अंदाजपत्रकातील तरतूदीपेक्षा जादा /कमी झालेल्या खर्चा बाबत.

लेखा विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष :00 मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे 2012-13 या वित्तीय वर्षात अपेक्षित उत्पन्नापेक्षा किंवा अंदाजपत्रकातील तरतूदीपेक्षा 25 बाबींसाठी कमी जमा झाली आहे आणि मंजूर अंदाजपत्रकातील तरतूदीपेक्षा प्रत्यक्षात 26 बाबींवर कमी खर्च झाला असून 02 बाबींवर जादा खर्च झालेला आहे. जादा केलेल्या खर्चास महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम क्र.28 नुसार अर्थसंकल्पीय शीर्षकाखाली तरतूद केलेल्या रकमेपेक्षा जादा खर्च करता येणार नाही, तथापि नियम क्र.30 अन्वये पुनर्नियोजन करून जादा खर्चासाठी तरतूद करता येईल. परंतु त्याप्रमाणे तरतूद केलेली नाही.

मिरा भाईदर मनपाच्या 2012-2013 या वित्तीय वर्षाच्या वार्षिक लेखे, अंदाजपत्रकाचे अवलोकन केले असता खालील प्रपत्रात नमुद केल्यानुसार महानगरपालिकेला अंदाजपत्रकीय तरतूदीतील अपेक्षित उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न प्राप्त झाले आहे.

<u>वित्तीय वर्ष 2012-13 जमा बाजू</u>

1) जमा बाजु (रक्कम रु.लाखात)

अ.क्र.	जमा बाबीचा तपशील	2012-13 सुधारित तरतूद (रु.)	2012-13 मधील प्रत्यक्ष जमा (रु.)	कमी जमा (तफावत रु.)
1	मालमत्ता कर	6076.00	4388.59	1687.41
2	मोकळया जागेवरील कर	900.00	734.83	165.17
3	उपकर	100.00	5.92	94.08
4	स्थानिक संस्था कर	13000.00	9371.88	3628.12
5	करमणूक कर	27.00	2.72	24.28
6	टिडीअर पासूनचे उत्पन्न	100.00	20.72	79.28
7	नोटीस फी	40.00	12.88	27.12
8	कारखाने/दुकाने/हॉटेल/इतर परवाने	160.00	22.99	137.01
9	शहर स्वच्छंता आराखडा अनुदान	595.00	-	595.00

10	19 वी पशुगणना अनुदान	1.00	-	1.00
11	ॲनिमल वेलफेअर	11.64	-	11.64
12	स्थानिक संस्था कर दंडात्मक वसुली	10.00	0.01	9.99
13	भुईभाडे /मार्केट/मैदान/इतर भाडे	30.00	7.36	22.64
14	मो.सेवा/ऑप्टीकल फॉयवर व टॉवर भाडे	200.00	57.66	142.34
15	शिक्षण कर	1537.00	1105.94	431.06
16	नागरी दालितवस्ती पाणीपुरवठा व स्वच्छंता योजना	35.00	-	35.00
17	एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह विनियोजन कर्ज निधी	900.00	-	900.00
18	अन्न व मलप्रवा निधी	1800.00	-	1800.00
19	अंदाजपत्रक "अ" मधून हस्तांतरण (पाणीपुरवठा)	1510.86	1204.37	306.49
20	अग्निशमन निरिक्षण शुल्क	65.00	12.42	52.58
21	अंग्नी सुरक्षा निधी	1225.00	-	1225.00
22	अंध व अंपग उपायोनेसाठी मनपाकडून हस्तांतरण	96.00	8.21	87.79
23	निर्मल अभियान अनुदान	120.00	57.24	62.76
24	BSUP योजना 1)कैंद्र/राज्य शासन अनुदान 2)लोक वर्गणी 3)मनपा हिस्सा	 1000.00 1356.00 425.00	 - - -	 1000.00 1356.00 425.00
25	राजीव आवाज योजना 1)कैंद्र/राज्य शासन अनुदान 2)मनपा हिस्सा	 25.00 20.00	 - -	 25.00 20.00
	एकुण	31365.50	17013.74	14351.76

करांच्या बाबतीत मागील वर्षाची थकबाकी, वसुली व चालू मागणी यांचा विचार करुन जमेचे अंदाज वर्तवणे आवश्यक असताना सदर बाबी विचारात घेण्यात न आल्याने करांची जमा कमी झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जमेचे अंदाजपत्रकातील अंदाज चुकीचे वर्तविले गेले आहेत. शासकीय अनुदानाच्या बाबतीत(वरील तक्त्यातील मुद्दा क्र. 23, 24, 25 मध्ये रक्कम रु. 2463.77/- कमी प्राप्त) संबंधित

वर्षामध्ये पुर्ण वार्षिक तरतूद प्राप्त करण्यासाठी अधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

वित्तीय वर्ष 2012-13 खर्च बाजू

2) जादा खर्च बाजू (रक्कम रु.लाखात)

अ.क्र	जादा खर्च बाबींचा तपशील	सुधारित तरतूद (रु.)	2012-13 मधील प्रत्यक्ष खर्च (रु.)	जादा खर्च (तफावत रु.)
1	स्थायी अस्थापना - पाणीपुरवठा विभाग	237.82	243.42	5.60
2	निवृत्ती वेतन व उपदानि (अग्शिमन विभाग)	15.00	22.03	7.03
	एकुण	252.82	265.45	12.63

उपरोक्त 2 बाबींवर तरतूदीपेक्षा रक्कम रु.12.63 लाख एवढा जास्त खर्च केला आहे. सदरच्या जादा केलेल्या खर्चास महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम क्र.28 नुसार अर्थसंकल्पीय शीर्षकाखाली तरतूद केलेल्या रकमेपेक्षा जादा खर्च करता येणार नाही, तथापि नियम क्र.30 अन्वये पुनर्नियोजन करून जादा खर्चासाठी तरतूद करता येईल. परंतु त्याप्रमाणे तरतूद केलेली नाही.

3) कमी खर्च बाजू (रक्कम रु.लाखात)

अ.क्र.	कमी खर्च बाबीचा तपशील	सुधारित तरतूद (रु.)	2012-13 मधील प्रत्यक्ष खर्च (रु.)	कमी खर्च (तफावत रु.)
1	कर्मचारी गणवेश व पावसाळी साहित्य (सामान्य प्रशासन)	10.00	-	10.00
2	अंदापत्रक छपाई/स्टेशनरी	10.00	1.02	8.98
3	सभाकक्ष व अधिकारी कक्ष वर्ग खर्च	20.00	0.14	19.86
4	स्थायी आस्थापना (कर विभाग)	475.68	315.41	160.27
5	आरोग्य पेट्रोल इंधन/वाहन दुरुस्ती	29.00	3.53	25.47
6	पदाधिकारी/अधिकारी वाहन प्रतिपूर्ती भत्ता	25.00	7.46	17.54
7	स्थायी आस्थापना (रुग्णालये व दवाखाने)	1222.75	289.93	932.82
8	औषधे खरेदी	100.00	40.90	59.10

9	सार्व.स्मशानभूमी व दफनभूमी दुरूस्ती	50.00	10.05	39.95
10	सार्व.सभागृह /नगर भवन साहित्य	15.00	0.49	14.51
11	विल आयोग निधीतून बांधकामे	205.00	-	205.00
12	सार्व.वाचनालेय पुस्तक खरेदी	10.00	0.15	9.85
13	प्रभाग समिती क्र.01 (अस्टबीन खरेदी)	365.00	69.04	295.96
14	घसारा निधी	50.00	-	50.00
15	सौर उर्जा निधी	96.00	-	96.00
16	स्माशानभूमी/दफन भूमी वीजबील	10.00	0.88	9.12
17	घनकचरा प्रक्रिया/ बिहेवार	150.00	59.31	90.69
18	आरोग्य विभाग साहित्य व वाहन	10.00	1.82	8.18
19	शववाहीका / I.C.U रुग्णवाहीका खरेदी	20.00	-	20.00
20	धोबी घाट बांधणे	35.00	-	35.00
21	JNNURM केंद्र/राज्य अनुदान	2500.00	1453.83	1046.17
22	विकास आराखडयात जागा संपादन	100.00	34.11	65.89
23	नरग भूमापन	100.00	17.69	82.31
24	PCL पवडर व क्लीरिन गॅस	20.00	1.63	18.37
25	पाण्याची थकी/इसारा बांधकाम (पाणीपुरवठा)	150.00	25.64	124.36
26	कर्मचारी गणवेश व बक्षिसे (अग्शिमन विभाग)	30.00	-	30.00
	एकुण	5808.43	2333.03	3475.40

सुधारित तरतूदीपेक्षा रक्कम रु.3475.40 लाख एवढा कमी खर्च केला आहे. शेवटच्या त्रिमाहीत (जाने ते मार्च) अगोदरच्या तिन्ही तिमाहितील (एप्रिल ते डिसेबंर) रक्कमेच्या दुप्पटीपेक्षा अधिक रक्कमेने तरतूद केल्याने शेवटच्या तिमाही कालावधीत तरतूदीपेक्षा खूपच कमी खर्च झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे खर्चाचे योग्य नियोजन करुन तरतूदीप्रमाणे खर्च करण्यात आला नाही. सबब वरील अर्धसमास ज्ञापन क्र.25, दि.01/09/2015 अन्वये विचारणा केली होती. परंतु संयुक्तीक अनुपालन सादर करण्यात आलेली नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 60, Hmm No : 25)

3 महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्याकडील प्रलंबित असलेल्या अग्रीम समायोजना बाबत.

अग्रीम रक्कमा

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 5688860.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 5688860.00/-

प्रलंबित अग्रीम रक्कम रु.5688860/- इतके आहे. पहिले अग्रीम थकीत असताना दुसरे अग्रीम दिले आहे. प्रतीनियुक्तीचे अधिकारी मुळ सेवेत गेले आहेत. परंतु अदयापही अग्रीम समायोजन केले नाही. सेवानिवृत्त व मयत कर्मचाऱ्याच्या नावांवर अग्रीम थकबाकी दिसुन येते. पल्स पोलिओसाठी पहिल्या अग्रीमाचे समायोजन होण्यापुर्वी पुन्हा अग्रीम दिले आहे.

महानगरपालिकेने अधिकारी व कर्मचा-यांना निरनिराळया कामासाठी त्यांच्या विभागाच्या मागणीनुसार आयुक्तांचे मंजुरीने वेळोवेळी अग्रीम दिल्याचे दिसून येते. लेखा शाखेने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा सहिंता 1971 मधील नियम 189 नुसार नमुना क्र.147 मध्ये ठेवलेल्या अग्रीम नोंदवहीतील नोंदी व्यवस्थित व वेळीच घेतल्याचे दिसून येते. परंतु अग्रीम समायोजन प्रलंबित असलेबाबत या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.46 दि.15/09/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्याचा खुलासा पत्र क्र.48 दि.24/09/2015, प्राप्त दि.28/09/2015 अन्वये केला असुन, तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) अधिकारी व कर्मचाऱ्याना कामासाठी दिलेल्या अग्रीमाची नोंदवही तपासली असता 1993-94 पासूनच्या अग्रीम रक्कमांचे मार्च 13 अखेर पर्यत रक्कम रु.56,88,860/- समायोजन झालेले नाही. दि.31/03/2013 अखेर एकुण 76 अधिकारी / कर्मचाऱ्यांकडे अग्रीमाची रक्कम रु.56,88,860/- थकीत असल्याचे दिसून येते. सदरची रक्कम त्वरीत संबंधीताच्या वेतन भत्त्यातून वसुल करुन अनुपालन लेखा परीक्षणास दाखवावे.

2) पाणी पुरवठा विभागातील प्रतिनियुक्तीचे अधिकारी त्याच्या सेवेचा कालावधी संपल्यावर त्यांच्या विभागास परत गेले आहेत, अशा अधिकाऱ्यांना दिलेल्या अग्रीमाचे समायोजन मार्च-2013 अखेर पर्यंत झालेले नाही. प्रलंबित अग्रीमाचा तपशिल दर्शविणारे विवरणपत्र क्र.5 अहवालासोबत जोडले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा सहिंता 1971 मधील नियम 189 नुसार दिलेल्या अग्रीमाची वसुली तात्काळ किंवा अग्रीम दिल्याचे तारखे पासून तीन महिन्याच्या आत करावयाची आहे. अशा प्रकरणी संबंधिताचे विभागास कळवुन वसुली करणे आवश्यक आहे परंतु अशी वसुली विभागाने केली नाही.

3) विवरणपत्र क्र.5 सोबत जोडलेल्या यादीतील काही अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्त झाले किंवा मयत झाले आहे. अशांचे बाबत निवृत्ती वेतनातुन वसुली करणे अपेक्षित होते. परंतू तशी वसुली संबंधित विभागाने केली नाही. कर्मचारी / अधिकारी यांच्या सेवाविषयक बाबी म्हणजे निवृत्ती वेतन, परसेवा याबाबत सामान्य प्रशासन व आस्थापना विभागाचे नियंत्रण असते. कर्मचारी निवृत्त होताना "ना देय - ना वसुली" बाबतचा दाखला विभागाकडून दिला जातो. परसेवेतील अधिकारी स्वत:च्या विभागाकडे परत जाताना त्यांना अंतिम वेतन प्रमाणपत्र दिले जाते. अशा वेळी विभागाने वसुलीची बाब कळविली नसल्याने थकबाकी शिल्लक राहिली. परंतु या बाबीकडे गांभीर्याने पाहिलेले नाही.

4) मनपा वैद्यकीय अधिकारी यांना वारंवार अग्रीम दिल्याचे दिसुन येते. पल्स पोलिओ सारख्या राष्ट्रीय कार्यक्रमासाठी शासनाकडुन अनुदान प्राप्त होते. अशा कामासाठी मनपाने अग्रीम दिले असुन त्यांचे समायोजन संबंधीताने केले नाही. अशी प्रलंबित समायोजनाची रक्कम रू.3076880/- आहे. उद्यान अधिक्षक, आरोग्य अधिकारी, तसेच सार्वजनिक निवडणुक कामासाठी, फर्निचर उपकरणे खरेदीसाठी, एल.बी.टी. साठी वेळोवेळी रक्कमांचे प्रदान केले आहे. पहिले अग्रीम दिल्यानंतर, त्याची वसुली झाल्याशिवाय दुसरे अग्रीम देय नाही, असे असतांना एकूण 76 अधिकरी / कर्मचाऱ्याना वारंवार अग्रीम दिल्याचे विवरवण पत्र क्र.5 नुसार दिसून येते.

वसुल प्रात्र रक्कम रु. 56,88,860/-

DATPMVM6001 (Ref No : 7, Hmm No : 46)

4 कर्ज निवारण निधी बाबत.

कर्ज निवारण निधी

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 153962922.00 /-

महानगरपालिकेने कर्ज निवारण निधी स्थापन केला नाही. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 150 नुसार निधीची वार्षिक तपासणी लेखा परीक्षा कार्यालयाला करता आली नाही व सदर कलमातील अ.क्र.05 व 06 नुसार आवश्यक ते प्रमाणपत्र देता आले नाही. कर्जाच्या दायित्व रक्कमेचे प्रदान मनपाने

वेळोवेळी मनपा फंडातून केले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 मधील कलम 109 व 112 नुसार कर्ज निवारण निधी स्थापन करणे आवश्यक आहे. महापालिकेने घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी मनपाने आवश्यक तेवढे अंशदान या निधीस दिले पाहिजे. कलम 109 नुसार राज्य शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय मनपाला कोणतेही कर्ज घेता येणार नाही. ज्या कामासाठी निधी स्थापन केला, त्या कारणाखेरीज अन्य कारणासाठी निधीचा वापर करता येणार नाही. कर्जाची पुर्णपणे परतफेड होईपर्यंत या निधीतील रक्कम अन्य प्रयोजनासाठी वापरता येणार नाही. या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.48 दि.15/09/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र.164/2015-16 दि..08/10/2015 अन्वये केला असुन, तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) महानगरपालिकेने कर्ज निवारण निधी हा स्वतंत्र निधी स्थापन केलेला नाही.

2) कलम115 नुसार निधीची वर्षिक तपासणी संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालयाकडुन करावयाची आहे. परंतु सदरचा निधी स्थापन केला नसल्याने महापालिकेच्या स्थापनेपासुन वार्षिक तपासणी झालेली नाही. सबब सदर कलमातील अ.क्र.05 व 06 नुसार लेखा परीक्षा कार्यालयाला आवश्यकते प्रमाणपत्र देता आले नाही.

3) महानगरपालिकेने MMRDA कडून दिर्घ मुदतीसाठी कर्ज घेतले होते. MMRDA ने ठरवुन दिलेला कर्ज हप्ता (मुद्दल + व्याज) वेळोवेळी भरणा केल्याचे संबंधित नोदवहीवरून दिसून येते. दि.31/03/2013 अखेर स्थिती पुढील प्रमाणे आहे.

(रु.कोटीत)

अ.क्र.	कर्जाचा तपशील	प्राप्त कर्ज	परतफेड कर्ज	शिल्लक कर्ज
1	50 MLD पा.पु	62.29	36.91	25.38
2	छत्रपती शिवाजी	20.00	11.24	08.76
3	D.P.ROAD (मंजुर कर्ज 23.35)	23.35	3.26	20.09
4	भुयारी गटार योजना (मंजुर कर्ज 226.00)	66.94	02.00	64.94
	एकुण	172.58	53.41	119.17

महानगरपालिकेने कर्जाची परतफेड वेळोवेळी मनपा जनरल फंडातून केली आहे. उदा. प्रमाणक क्र.1328 व 1329 दि.31/12/2012 रु.8,46,64,163/- MMRDA यांना डिसेंबर2012 पर्यंत कर्ज परतफेडीचे प्रदान केले आहे. विभागाने केलेला खुलासा व MMRDA यांच्याकडील पत्र क्र. MMRDA/LR/201/2012-13 Dt.25/01/2013 अन्वये 2012-13 पर्यंत कर्ज परतफेडीच्या हप्त्याची रक्कम MMRDA यांना प्राप्त झाल्याचे दिसून येते.

मनपाने कर्ज निवारण निधीची स्थापना केली नाही. परंतु कर्जाची परतफेड नियत दिनांकास केली

आहे. तथापी अधिनियमातील तरतुदीनुसार कर्ज निवारण निधी स्थापन करुन त्यातुन प्रदान केले नाही.

DATPMVM6001 (Ref No : 9, Hmm No : 48)

5 शासकीय अनुदानाच्या अखर्चीत रक्कमाबाबत.

अखर्चीत रक्कमा

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 938068000.00 /-

महापालिकेला शासकीय योजनेसाठी वेळोवेळी मिळालेल्या अनुदानाच्या रक्कमेतुन वेळीच खर्च न केल्याने अखर्चीत रक्कम रू93,80,68,000/- इतकी आहे.

वित्तीय वर्ष2012-13 चे लेखा परीक्षण करताना महापालिकेने ठेवलेल्या रोखवहया तपासता दि.31/03/2013 अखेर शासकीय अनुदनाच्या पुढील दर्शविलेल्या रक्कमा अखर्चीत असल्याचे दिसून आले.

अ.क्र.	योजनेचे नांव	एकुण अखर्चीत अनुदानाची रक्कम (रु.लाखात)
1	13 वा वित्त आयोग	302.56
2	दलित वस्ती सुधार योजना	66.88
3	आमदार / खासदार निधी	286.10
4	निर्मल एम.एम.आर	45.52
5	BSUP	3577.14
6	JNNURM	2066.14
7	नगरोत्थान	3036.34
एकुण		9380.68

याबाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.53 दि.19/09/2015 रोजी निर्गमित केले होते. बांधकाम विभागाने दि.18/11/2015 रोजी केलेला खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.

निरनिराळया शासकीय योजनासाठी महापालिकेला शासनाकडुन वेळोवेळी अनुदान मिळाले आहे. 13वा

वित्त आयोग, दलित वस्ती सुधार योजना, आमदार/खासदार निधी, निर्मल MMR, नगरोत्थान इ. योजनांसाठी प्राप्त अनुदानाचा वापर दोन वर्किंग सझनमध्ये करावयाचा आहे. BSUP, JNNURM करीता प्राप्त अनुदानाचा वापर पाच वर्षाकरीता करावयाचा आहे. हा कालावधी दि.31/03/2013 अखेर संपलेला आहे. मा.अव्वर सचिव, नम-1, नगर विकास विभाग, नवी दिल्ली यांचेकडील कार्यालयीन आदेश क्र.K14012/46/2012/NURM-1 Dt.07/03/2013 अन्वये अनुदान प्राप्त झाल्यानंतर अनुदानाच्या रक्कमा दिलेल्या मुदतीत विकास कामासाठी खर्च करावयाचा आहेत. दि.31 मार्च 2013 अखेर अशा शासकीय अनुदानाची एकुण रक्कम रु.9380.68 लक्ष अखर्चीत राहिल्याचे दिसुन येते. प्राप्त अनुदानाचा वापर दि.31/03/2013 अखेर पर्यंत केला नाही. त्यामुळे सदरचे अनुदान शासनाला अन्य कामासाठी वापरता आले नाही. तसेच महापालिकेने ठरविलेली विकास कामे वेळत पुर्ण झाली नाहीत. बांधकाम विभागाने केलेल्या खुलाश्यानुसार सदरील विकास कामांचा खर्च पुढील वर्षात झालेचे कळविले आहे. एकंदरित बांधकाम विभाग / पाणीपुरवठा विभागाच्या नियोजनाचा अभाव असल्याने दिसुन येते. तसेच काम विलंबाने झाल्याने होणाऱ्या वाढीव खर्चाची जबाबदारी महापालिकेवर राहणार आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष नोडल एजन्सी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र. MH/मुआ/उमुअ/परि/न.क्र.148/1165/13 दि.18/06/2013 अन्वये कळविलेले आहे.

DATPMVM6001 (Ref No : 10, Hmn No : 53)

6 लेखा विभागातील लेखापरिक्षणास आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 13029880.50/-

जमा पावती पुस्तक क्र. 6422 लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. दैंनदिन जमा झालेली महसूली जमा पुढील दिवशी चलनाव्दारे बँकेत भरणा करणे आवश्यक असताना प्रत्यक्ष जमेपेक्षा कमी अधिक प्रमाणा बँकेत भरणा केल्याचे दिसून येते. जमा रक्कम उशिरा भरल्यामुळे मिळणा-या व्याजास मुकावे लागले. जमा रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत न भरता अंशत: रक्कम मध्यवर्ती सहकारी बँकेत भरणा केली आह.तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीचे न वटलेले (सात धनादेशाची रक्कम रु.62719/-)अदाएगीचे धनादेश रद्द करुन जमेस घेणे आवश्यक असताना तसे केल्याचे दिसून आले नाही.

लेखा विभागातील जमा रक्कमेची सर्वसाधारण रोख नोदवही, पोटकिर्द व पावती पुस्तके तपासली असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.26 दिनांक 01.09.2015 अन्वये विचारणा केली असता विभागाकडील दिनांक 03.09.2015 रोजीचे दिनांक 17.10.2015 रोजी प्राप्त झालेल्या उत्तर विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) लेखाविभागातील जमेच्या पावती पुस्तकांची साठा नोंदवही तपासली असता एकूण 52 जमा पावती पुस्तके 2012-13 या कालावधीत लेखा विभागास प्राप्त झाली असुन त्यापैकी पावती पुस्तक क्र. 6422 लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

2) जमा केलेली रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत भरणा न करता अंशत: रक्कम मध्यवर्ती सहकारी बँकेत भरणा केल्याचे आाढळून आले. उदाहरणदाखल मार्च 2013 चे महसूली जमेचे/भरणा रक्कमेचे विवरणपत्र खालीलप्रमाणे दर्शविले आहे.

अ.क्रं.	दिनांक	जमा रक्कम रु.	इंडियन बँकेत जमा केलेली रक्कम	दि ठाणे जि.म.स.बँकलि.	तफावत (कमी जास्त भरणा)
1	1.3.2013	4416522	निरंक	3249680	(-)1166842
2	2.3.2013	3339148	1900000	294620	(-)1144528
3	4.3.2013	2474367	3270270	2132556.67	(+)2928460
4	5.3.2013	3277845	2000000	809680	(-)468165
5	6.3.2013	2767740	3180540	निरंक	(+)412800
6	7.3.2013	2934989	2724250	निरंक	(-)210739
7	8.3.2013	2434921	निरंक	2988140	(+)553219
8	11.3.2013	761235	2543800	निरंक	(+)1782565
9	12.3.2013	6365582	5031370	निरंक	(-)1334212
10	13.3.2013	34103512	2107260	निरंक	(-)1303091
11	14.3.2013	5933588	5877810	निरंक	(-)55778
12	15.3.2013	2373722	निरंक	3479590	(+)1105868
13	16.3.2013	3808350	निरंक	1686580	(-)2121770
14	18.3.2013	2653285	4485620	निरंक	(+)1832335
15	19.3.2013	3902588	3238040	निरंक	(-)664548
16	20.3.2013	3468660	3422010	निरंक	(-)46650
17	21.3.2013	3545581	3634770	निरंक	(+)89189
18	22.3.2013	2486463	निरंक	3217400	(+)730937
19	25.3.2013	1449269	2515710	निरंक	(+)1066441
20	26.3.2013	4939536	1881160	निरंक	(-)3058376
21	28.3.2013	3855918	2000000	5049490	(+)3193572

22	30.3.2013	5128761	निरंक	3335620	(-)1793141
23	31.3.2013	12579034.5	निरंक	निरंक	(+)12579034.50
	एकूण	88307475	49812610	26243357	12251508

तरी उपरोक्तप्रमाणे माहे 31 मार्च 2013 महिन्यातील प्रत्यक्ष जमेपेक्षा रु.327527 नी बॅकेत कमी रक्कम भरणा केली आहे. तसेच 31मार्च 2013 रोजीची जमा रक्कम रु.12579034.50 पुढील दिवशी बॅकेत भरणा करणे आवश्यक असतांना पुढील तारखाना भरणा केल्याचे आढळून आले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे:-

अ,क्रं.	दिनांक	इंडियन बॅकेत जमा केलेली रक्कम रु.
1	2.4.2013	6758000
2	2.4.2013	514930
3	3.4.2013	1944390
4	4.4.2013	405290
5	5.4.2013	275070
6	6.4.2013	1205900
7	8.4.2013	340800
8	10.4.2013	3550000
	एकूण रु.	14994380

31मार्च 2013 रोजीची जमा रक्कम रु.12579034.50 पुढील दिवशी भरणे आवश्यक असतांना पुढील महिन्यातील 10 तारखेपर्यंत भरणा केली आहे जमा रक्कम उशिरा भरल्यामुळे मिळणा-या व्याजास मुकावे लागले आहे. मात्र विभागांने दिलेल्या खुलाशामधील विवरणपत्रानुसार 31 मार्च 2013 रोजीची जमा रक्कम रु.12579034.50 ऐवजी रु.14994380 एवढी रक्कम 31मार्च2013 रोजी भरल्याचे कळविले आहे, परंतु प्रत्यक्षात रोखवहीतील नोंदीनुसार वरील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे मार्च2013 ची महसूली जमा रक्कम रु.12579034.50 वर उल्लेखलेल्या वेगवेगळया तारखाना भरल्याचे दिसून येते.तसेच रु.2415346 एवढी रक्कम जादा भरणा केल्याचे (14994380 - 12579034 = 2415346) आढळून आले आहे. त्याबाबत प्राप्त खुलासा संयुक्तिक नाही.

3) इसारा/ सुरक्षा अनामत नोंदवहीची तपासणी केली असता, त्या अनुषंगाने युनियन बॅकेचे निवडक मार्च 2013 या महिन्याचे ताळमेळ पत्रक तपासले असता तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीचे न वटलेले अदागीचे धनादेश रद्द करुन जमेस घेणे आवश्यक असताना तसे केल्याचे दिसून आले नाही. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्रं.	धनादेश क्रं.	दिनांक	रक्कम रु.
1	490977	14.5.2012	5000
2	490986	14.5.2012	9000
3	235811	08.06.2012	1000
4	235812	08.06.2012	1000
5	235818	08.06.2012	1000
6	235890	09.7.2012	9870
7	235893	09.7.2012	50000
8	492114	12.9.2012	100000
9	492138	26.9.2012	24000
10	492144	03.10.2012	5000
11	492145	03.10.2012	24500
12	492165	03.10.2012	8000
13	492211	06.10.2012	2500
14	492223	06.10.2012	2500
15	492230	06.10.2012	2500
16	492236	06.10.2012	2500
17	492260	06.10.2012	2500
18	492296	06.10.2012	2500
19	492359	12.10.2012	2500
20	492367	18.10.2012	50000
21	492583	05.12.2012	19957
22	492584	12.12.2012	5000

23	284702	12.12.2012	57300
			388127
	2011-2012 मधील न वटलेल्या धनादेशाची रक्कम		62719
	एकूण रु.		450846

विभागाने सदर न वटलेले धनादेश रदद करुन जमेस घेण्याची कार्यवाही चालू आहे, ती पूर्ण करुन धनादेशाची रक्कम जमेस घेण्यात येईल असे कळविले आहे. सदरचा खुलासा संयुक्तिक नाही. तरी रु.450846 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. .

इसारा/अनामत रोखवही मधील माहे दिनांक 14.03.2013 अखेरची रोख रक्कम (Cash in Hand) रु.312402633.26 व अखेरची शिल्लक देखील रु.312402633.26 इतकी दर्शविण्यात आली आहे. तरी हाती रोख असलेली रक्कमेबाबत लेखापरीक्षणास अनुपालन सादर केलेले नाही.

7 सर्वसाधारण रोखवहीचा मार्च 2013 अखेरचा बँक ताळमेळ प्रलंबित असल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 5

मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ
आक्षेपाधीन रक्कम रु. 451940205.30/-

सर्वसाधारण रोखवहीमधील मार्च 2013 अखेरच्या शिल्लकेचा पासबुकातील शिल्लकेशी मेळ घेण्याकरीता भारतीय स्टेट बँक (10254419063), भारतीय स्टेट बँक (10254419074), व सिंडीकेट बँक या खात्याचे मार्च महिन्याचे बँकांचे विवरणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्याने सर्वसाधारण रोखवहीमधील मार्च 2013 अखेरच्या बँक ताळमेळाबाबत खात्री करता आली नाही.अदा केलेल्या धनादेशाच्या रक्कमेची नोंद रोखवहीत घेतलेली दिसत नाही. दि ठाणे जिल्हा मध्य.सह.बँकलि.(खाते क्रं.199) मध्ये (Operative) बचत खाते उघडण्यात आले असून (Flexi Fixed Deposit) न उघडल्यामुळे महापालिकेस जास्त मिळणा-या व्याजास मुकावे लागले आहे.बँक ऑफ बडोदा मधील खाते क्रं.31540200000130 व ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स मधील

खाते क्र. 08821010004710 चे माहे मार्च 2013 चे Flexy Fixed Deposit चे बँक विवरणपत्र लेखापरीक्षणास सादर केले नसल्यांने ताळमेळपत्रक तपासता आले नाही.

लेखाविभागातील सर्वसाधारण रोख नोदवही तील ताळमेळपत्रक तपासले असता आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापनपत्र क्रं.26 दिनांक 01.09.2015 अन्वये विचारणा केली असता विभागाकडून दिनांक 03.09.2015 चे दिनांक 17.10.2015 रोजी प्राप्त झालेल्या उत्तराचा विचार करता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)सर्वसाधारण रोखवहीशी संबधित मधील खाली नमूद केलेल्या बँकामध्ये मार्च 2013 अखेरची बँक पासबुक/ विवरणपत्रावरुन शिल्लक तपासली असता पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

अ.क्रं.	बँकेचे नांव व खाते क्र.	कॅशबुक प्रमाणे शिल्लक रुपये	पासबुकप्रमाणे बँकेतील शिल्लक रुपये
1	दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. (199)	31731213.31	46231470.86
2	भारतीय स्टेट बँक (10254419063)	93073624.00	उपलब्ध करण्यात आले नाही.
3	इंडियन बँक (446459897)	134667284.25	138016565.75
4	ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स (08821010004710)	17865107.26	74008515.81
5	सिंडीकेट बँक	1352709.81	उपलब्ध करण्यात आले नाही
6	आय सी आय सी आय बँक (002805004108)	543879.00	10052504.25
7	भारतीय स्टेट बँक (10254419074)	133774365.72	उपलब्ध करण्यात आले नाही.
8	भारतीय स्टेट बँक (10254419063)	38925217.00	उपलब्ध करण्यात आले नाही.
	हाती रोख शिल्लक	6805.17	उपलब्ध करण्यात आले नाही.

	एकूण:	451940205.3	

वरील आक्षेपातील भारतीय स्टेट बँक खाते क्र. 10254419063, 10254419074 व सिंडीकेट बँकेतील ठेवीचे विवरणपत्र सोबत सादर केल्याचे कळविले आहे,परंतु प्रत्यक्षात सदर बँकेचे विवरणपत्रानुसार ताळमेळ घेतल्याचे दिसत नाही, त्यामुळे सर्वसाधारण रोखवहीमधील एकत्रित शिल्लकेची (रु.451940205.3) लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही. त्याबाबत विभागाकडून प्राप्त झालेला खुलासा संयुक्तिक नाही.

2) Online Property Tax चे आय सी आय सी आय या बँकेतील खाते क्र. 002805004108 चे मार्च 2013 चे ताळमेळ विवरणपत्राचे लेखापरिक्षण केले असता दिनांक 31.03.2015 अखेर रोखवहीमधील शिल्लक रक्कम रु. 543879 व बँकेच्या पासबुकाप्रमाणे शिल्लक रु.10052504 अशी आहे,या दोहोमधील फरक रु.9508625.00 (धनादेश क्रं.316226 रु.1062294 व धनादेश क्रं.316227 रु.8446331) असा आहे. परंतु धनादेशपुस्तिका तपासली असता धनादेश क्र. 316228 रु.296133 ची रक्कम मिरा-भाईदर महानगरपालिका खाते क्रं. 48795 च्या नांवे अदा केल्याचे दिसते, मात्र सदर रक्कमेची नोंद रोखवहीमध्ये खर्चाच्या बाजूस दर्शविलेली नाही, Online Property Tax चे आय सी आय सी आय या बँकेतील खाते क्र.002805004108 चे मार्च 2013 चे ताळमेळाबाबतची 31.03.2015 अखेर रोखवहीमधील शिल्लक रक्कम रु.543879 व बँकेच्या पासबुकाप्रमाणे शिल्लक रक्कम रु.10052504 या दोहोमधील फरक रु.9508625 आहे. विभागाने सदरचा खर्च हा एका खात्यातून दुस-या खात्यात वर्ग करण्यात आला आहे. सदरच्या खर्चाची नोंद रोखहीमध्ये घेण्याचे नजरचुकीने राहून गेले आहे. सदरची नोंद आता घेण्यात येत आहे असे कळविले आहे. परंतु प्रत्यक्षात रु.296133 च्या खर्चाचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. तसेच धनादेशक्रं.316228 रु.296133 बाबतचा खुलासा सादर केलेला नाही व दिलेला खुलासा संयुक्तिक वाटत नाही.तरी रु.9508625 व रु.296133 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. (199) मध्ये (Operative) बचत खाते उघडण्यात आले असून (Flexi Fixed Deposit) न उघडल्यामुळे महापालिकेस जास्त मिळणा-या व्याजास मुकावे लागले आहे. दिनांक 31 मार्च 2013 अखेर बँकेतील शिल्लक रु.46231470.86 व सर्वसाधारण रोखवहीमधील शिल्लक रु. 31731213.31 अशी असून बँक ताळमेळ केल्याचे लेखापरीक्षणास आढळून आले नाही. दि ठाणे जिल्हा

मध्यवर्ती सह. बँक लि. (खाते क्र.199) मध्ये (Operative) दिनांक 31 मार्च 2013 अखेर बँकेतील शिल्लक रु.46231470.86 व सर्वसाधारण रोखवहीमधील शिल्लक रु. 31731213.31 असून विभागाने बँक ताळमेळ विवरणपत्र सोबत सादर केले आहे असे नमूद केलेले आहे परंतु प्रत्यक्षात ताळमेळ विवरणपत्र लेखापरीक्षणास सादर केलेले नसून बँक ताळमेळपत्रक म्हणून दिनांक 31.03.2015 रोजीची रोखवहीतील शिल्लक व बँकेतील शिल्लक रु.1826659.86 अशी दर्शविली आहे. विभागाने दिलेला खुलासा संयुक्तिक वाटत नाही.तरी रोखवही व बँकेचे पासबुक यामधील फरकाची रक्कम रु.14500257.55 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

4) बँक ऑफ बडोदा मधील खाते क्र.31540200000130 चे माहे मार्च 2013 चे बँक ताळमेळपत्रक तपासले असता बँक ताळमेळपत्रकामध्ये दि.31.03.2013 अखेर बँकेतील शिल्लक रु.1000883 अशी दर्शविली आहे परंतु प्रत्यक्षात बँक विवरणपत्रानुसार दि.31.03.2013 अखेरची रक्कम 28717883.50 अशी आहे. बँक ऑफ बडोदा मधील खाते क्रं.31540200000130 चे माहे मार्च 2013 चे बँक विवरणपत्र तपासले असता विभागाने सादर केलेल्या ताळमेळातील दर्शविलेली बँकेतील मुदत ठेवीच्या रक्कमेबाबतचे विवरणपत्र लेखापरीक्षणास सादर केले नसल्यांने दि.31.03.2013

रोजी पर्यंत प्राप्त झालेल्या व्याजाची खातरजमा करता आली नाही. Flexy Fixed Deposit बँक विवरणपत्र लेखापरीक्षणास सादर केले नसल्यांने विभागाने दिलेला खुलासा संयुक्तिक वाटत नाही. तरी रु.28717883.50 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

5) ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स मधील खाते क्र. 08821010004710 चे माहे मार्च 2013 चे बँक ताळमेळपत्रक तपासले असता बँक ताळमेळ पत्रकामध्ये दि.31.03.2013 अखेर बँकेतील शिल्लक रु.208515.81 अशी दर्शविली आहे परंतु प्रत्यक्षात बँक विवरणपत्रानुसार दि.31.03.2013 अखेरची रक्कम 74008515.81 अशी आहे. तरी सदर रु.7380000/- तफावतीबाबत लेखापरीक्षणास अनुपालन सादर केले नाही त्याबाबत विभागाकडून प्राप्त खुलासा संयुक्तिक नाही. तो पर्यंत रक्कम रु74008515.81 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DDDTKSM6801 (Ref No : 19, Hmm No : 26)

8 आयकराची रक्कम उशिरा भरल्याबाबत व रोखपालाकडून जमानत किंवा प्रतिभूती न घेतलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 1

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

ठेकेदाराकडून वसूल करण्यात आलेली आयकराची रक्कम रु.655824 उशिरा शासनखाती भरण्यात आली. व रोखपालाकडून जमानत किंवा प्रतिभूती घेतल्याचे दिसून येत नाही.

1) ठेकेदाराकडून वसूल करण्यात आलेली आयकराची रक्कम शासनखाती उशिरा भरण्यात आली, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे-

अ.क्रं.	आयकराची रक्कम रुपये	आयकर कपात केल्याचा दिनांक	आयकर भरल्याचा दिनांक	चलनक्रं.
1	17476	19.04.2012	29.05.2012	169
2	162466	29.10.2012	14.02.2013	193
3	475882	30.03.2013	07.05.2013	312
एकूण रु.	655824			

2) महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 मधील कलम 80 (अ) अन्वये रोखपाल तसेच ज्यांच्याकडे स्वायत्त संस्थेच्या वतीने रक्कमा जमा करणे, ताब्यात ठेवणे हे काम सोपविण्यात आले आहे.अशा कर्मचा-याकडून सक्षम प्राधिकायांने मंजूर केलेल्या नमुन्यात जमानत किंवा प्रतिभूती घेतल्याचे लेखापरीक्षणासआढळून आले नाही.याबाबातअर्धसमास ज्ञापन पत्र क्र.26 दिनांक 01.09.2015 निर्गमित करण्यात आले असता विभागाकडून दिनांक 03.09.2015 प्राप्त दिनांक 17.10.2015 अन्वये प्राप्त खुलासा संयुक्तिक नाही.

DDDTKSM6801 (Ref No : 20, Hmm No : 26)

9 महानगरपालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कर आकारणीच्या नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध न झालेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम 4 मधील तरतूदीनुसार लेखापरिक्षणास आवश्यक माहिती व अभिलेखे उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची आहे. तसेच लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध करणेबाबत उपरोक्त अधिनियमातील कलम 6 मधील तरतूदीनुसार अर्धसमास पत्रान्वये विभागास कळविण्यात आले असतांनाही मोबाईल टॉवर करनिर्धारणाची संख्या व त्याबाबतचे अनुषंगिक अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आले नाहीत.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय शासन पत्र क्र.टीपीएस 1806/प्र.क्र.563/06/न.वि.-13 दि.07/08/2007 अन्वये अधिकृत / अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1966 नुसार नोटीस बजावुन मालमत्ता कर वसुली करण्याबाबत आदेश आहेत. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या मोबाईल टॉवर्सच्या मालमत्ता कराच्या आकारणी वसुली, नवीन कर निर्धारण याबाबतच्या पडताळणीसाठी लेखा परीक्षणास खालील अभिलेखे उपलब्ध करण्यात आले नाहीत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.121 दि.1/12/2015 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून काहीही खुलासा प्राप्त झाला नाही.

1) महापालिका क्षेत्रातील अधिकृत / अनधिकृत मोबाईल टॉवरची संख्या

2) 2012-13 मध्ये मान्यता देण्यात आलेले मोबाईल टॉवर व नवीन कर निर्धारणाची प्रकरणे.

3) वर्ष 2011-12 मधील मोबाईल टॉवर्सच्या मालमत्ता कराची थकबाकी, वर्ष 2012-13 ची मागणी, वर्ष 2012-13 मधील प्रत्यक्ष वसुली, वर्षाअखेरचा एकूण थकबाकीचा तपशिल उपलब्ध करण्यात आला नाही.

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम 4 मधील तरतूदीनुसार लेखापरिक्षणास आवश्यक माहिती व अभिलेखे उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची आहे. तसेच लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध करणेबाबत उपरोक्त अधिनियमातील कलम 6 मधील तरतूदीनुसार अर्धसमास पत्रान्वये कळविण्यात आले असतांनाही सदर अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आले नसल्याने उपरोक्त माहीती अभावी लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

DATNDMM5801 (Ref No : 83, Hmm No : 121)

10 मालमत्ता कर संकलन विभागात सर्व प्रभागामधुन (प्रभाग क्र.01 ते 06 रोखीने / धनादेशाने जमा होणाऱ्या रक्कमांच्या संकलनातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 02

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

कर विभागाच्या मुख्यालयात प्रभाग कार्यालयाकडून प्राप्त होणाऱ्या रोखीच्या रकमां स्विकारताना भरणा चलनावर रक्कम स्विकारणाऱ्या कर्मचाऱ्याचे नाव पदनाम व मनपाचा शिक्का नोंदविण्यात आलेला नाही. प्रभागाकडून प्राप्त झालेल्या रक्कमांचे पावती पुस्तक, पोटकिर्द व भरणा चलनानुसार मुख्यालय स्तरावर एकत्रित केलेले चलन यांची कर विभागाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने मेळ घेतल्याचे आढळून आले नाही. यावरुन कर विभागाच्या कर निर्धारक व संकलक यांचे प्रभाग निहाय प्राप्त होणाऱ्या जमा रकमांच्या भरण्यावर नियंत्रण असल्याचे लेखा परीक्षणास आढळून आले नाही.

महानगरपालिका कर संकलन विभागाचे 2012-13 या वित्तीय वर्षाचे प्रभाग निहाय तसेच मुख्यालयाचे लेखा परीक्षण करतांना प्रामुख्याने खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) सर्व प्रभागामध्ये नित्य दैनंदिन जमा होणाऱ्या कर संकलनाच्या रोख / धनादेशान्वये प्राप्त रक्कमांची कर धारकाला अधिकृत विहीत नमुन्यातील पावती दिल्यानंतर सदर पावत्यांची नोंद खतावणी पोटकिर्दला घेण्यात येऊन दैनंदिन पोटकिर्दीप्रमाणे एकूण जमा रक्कमांचे दोन प्रतीत चलन तयार करण्यात येते. सदर

रक्कमा कर संकलन विभागात जमा केल्यानंतर चलनाच्या एका प्रतीवर रोख / धनादेशाची रक्कम स्विकारून अशी रक्कम स्विकारल्याबाबत प्रभाग कार्यालयास पोहोच दिली जाते. मुख्यालयातील लेखे व कागदपत्रे नोदवहया तपासण्यात आले असता निदर्शनास आले की, प्रभाग कार्यालयातून तसेच नागरी सुविधा केद्रांकडून जमा झालेले रोखीने / धनादेशाच्या रक्कमेचे कच्च्या नॉंदवहीत एकत्रिकरण करून त्याबाबतचे चलन लेखा शाखेकडे जमा करण्यात येते. प्रशासकीय प्रभागाकडील पोहोच चलनांच्या प्रतींची तपासणी केली असता सदर रक्कम चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांनी स्विकारली आहे. रोख व धनादेश स्वरूपात प्राप्त रक्कमा स्विकारतांना भरणा चलनावर महापालिकेचा शिक्का वापरण्यात आलेला नाही. अथवा रक्कम स्विकारणाऱ्या कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम नोंदवण्यात आलेले नाही. रोख रक्कम कोणत्या पदावरच्या कर्मचाऱ्याने स्विकारावी त्याबाबत कोणतेही प्राधिकृत आदेश देण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही. सबब, या प्रकरणात रोखीने रक्कम हाताळण्यात आल्याचे दिसून आल्याने यात गंभीर अनियमितता झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) प्रभाग कार्यालयातून प्राप्त होणाऱ्या रोखीच्या व धनादेशाच्या रक्कमा कर निर्धारक व संकलक यांच्या कार्यालयात जमा केल्या जातात. जमा केलेल्या रक्कमांचे एकत्रिकरण करून कर वसुलीचे एकत्रित चलन लेखा शाखेच्या रोखपालाकडे भरणा करण्यासाठी पाठविले जाते. प्रभागाकडून प्राप्त झालेल्या रक्कमांचे पावती पुस्तक, पोटकिर्द व भरणा चलनानुसार मुख्यालय स्तरावर एकत्रित केलेले चलन यांचा मेळ कर विभागाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने घेल्याचे आढळून आले नाही. यावरुन कर विभागाच्या कर निर्धारक व संकलक यांचे प्रभाग निहाय प्राप्त होणाऱ्या जमा रकमांच्या भरण्यावर नियंत्रण असल्याचे लेखा परीक्षणास आढळून आले नाही. त्यामुळे प्रभागाकडून प्राप्त झालेली रक्कम व लेखा शाखेकडे जमा झालेली रक्कम यामध्ये तफावत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त अनियमिततांबाबत अर्धसमास पत्र क्र.125 दि.11/12/2015 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा करण्यात आला नाही.

DATNDMM5801 (Ref No : 85, Hmm No : 125)

11 कर संकलन विभागात कर निर्धारण आकारणी नोंदवही न ठेवली नसल्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम क्र.74 नुसार मालमत्तेवरील कराची मागणी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम कलम 115 उपक्रम (1) मध्ये विहीत केल्याप्रमाणे नमुना क्र.43 नुसार कर निर्धारण सुची तयार केली पाहिजे. तसेच नियम क्र.75(1) नुसार कर निर्धारण सुचीतील

नोंदणीची मांडणी प्रथम प्रभागानुसार व त्यानंतर इमारती वा जमिन वा दोन्ही यांच्या अनुक्रमांकानुसार असली पाहिजे. तसेच प्रत्येक प्रभागासाठी वेगळे पुस्तक करण्यात यावे आणि सर्व प्रभागांच्या निर्धारणाचा गोषवारा या प्रभागाच्या निर्धारण सुचीमध्ये अथवा कर निर्धारणाच्या सारांश पुस्तकात दिला पाहिजे. परंतु लेखा परीक्षणाचे वेळी अशी कर निर्धारण आकारणी नोंदवही ठेवण्यात आली नसल्याचे दिसून आले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कर संकलन विभागाचे 2012-13 या वर्षाचे लेखा परीक्षण केले असता असे निदर्शनास आले की, विभागाने महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम क्र.74 नुसार मालमत्तेवरील कराची मागणी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम कलम 115 उपक्रम(1) मध्ये विहीत केल्याप्रमाणे नमुना क्र.43 नुसार कर निर्धारण सुची तयार केली पाहिजे. तसेच नियम क्र.75(1) नुसार कर निर्धारण सुचीतील नॉंदणीची मांडणी प्रथम प्रभागानुसार व त्यानंतर इमारती वा जमिन वा दोन्ही यांच्या अनुक्रमांकानुसार असली पाहिजे. तसेच प्रत्येक प्रभागासाठी वेगळे पुस्तक करण्यात यावे आणि सर्व प्रभागांच्या निर्धारणाचा गोषवारा या प्रभागाच्या निर्धारण सुचीमध्ये अथवा कर निर्धारणाच्या सारांश पुस्तकात दिला पाहिजे. परंतु लेखा परीक्षणाचे वेळी अशी कर निर्धारण आकारणी नोंदवही ठेवण्यात न आल्याचे दिसून आले. याबाबतचे समर्पक अनुपालन सादर करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.130दि.15/12/2015 अन्वये विभागास कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत साधार पुर्तता दर्शविण्यात आली नाही. तसेच सपर्मक खुलासा लेखा परिक्षण कालावधीत सादर करण्यात आला नाही.

उपरोक्त तरतूदीनुसार आकारणी नोंदवही न ठेवल्याने एकूण कराची मागणी कोणत्या आधारे निश्चित करून कराची वसुली करणेत आली, याचा मेळ लेखा परीक्षणात घेता आला नाही. त्यामुळे एकूण होणाऱ्या आकारणीनुसार मागणी निश्चित करून त्यानुसार करधारकांकडून कराच्या सर्व रक्कमा वसुली झाल्याची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही. आकारणी नोंदवही न ठेवणे नियमबाहय असून त्यामुळे गंभीर अनियमितता झाल्या असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

DATNDMM5801 (Ref No : 88, Hmm No : 130)

12 कर संकलन विभागामध्ये आकारणी झालेल्या नस्तीची मागणी नोंदवहीला नोंदी न झाल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 229561.00/-

कर संकलन विभागाच्या प्रभागांचे लेखा परीक्षणात आढळून आले की, मोठया प्रमाणात आकारणी केलेल्या नस्ती आढळून आल्या. परंतु अद्यापपर्यंत अशा नस्तींच्या मागणी नोंदवहीत नोंद घेऊन कर धारकांना देयके बजावुन घरपट्टी करांची वसुली करण्यात आलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक स्त्रोत मंदावले असून विकास कामे रखडलेली आहेत.

महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाचे 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण केले असता असे निदर्शनास आले की, बहुतांश प्रभागामध्ये इमारती, घरे, झोपडया यावर वार्षिक कर मुल्य निर्धारणानुसार कराची आकारणी करणेत आल्यानंतर महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 चे नियम क्र.76 नुसार निर्धारण सुची पुर्ण आणि अधिप्रमाणित झाल्यावर लगेच त्या वर्षासाठी नमुना क्र.47 मध्ये मागणी पुस्तक उघडण्यात आले पाहिजे. जेथे अनेक प्रभाग असतील तेथे प्रत्येक प्रभागासाठी मागणी पुस्तक ठेवुन प्रत्येक प्रभागाच्या मागण्या, संकलन, थकबाकी इ. गोषवारा देण्यात यावा. परंतु कर संकलन विभागाच्या प्रभागांचे लेखा परीक्षणात आढळून आले की, उदाहरणादाखल आकरणी केलेल्या एकूण 28 प्रकरणांमध्ये मागणी नोंदवहीत नोंद घेऊन कर धारकांना देयके बजावुन घरपट्टी करांची वसुली करण्यात आलेली नाही. अशा प्रकरणांची मालमत्ता कराची रक्कम रु.2,29,561/- एवढी आहे. मागणी नोंदवहीत नोंद घेऊन कर धारकांना देयके बजावुन घरपट्टी करांची वसुली करण्यात आलेली नसल्यामुळे मनपाचे आर्थिक स्त्रोत मंदावले असून विकासकामे रखडलेली आहेत. उदाहरणादाखल आकारणी झालेल्या परंतु कर वसुली न झालेल्या नस्तींचे विवरणपत्र सोबत परिशिष्ट क्र.—— अन्वये सोबत जोडले आहे.

यामध्ये असेही दिसून आले की, कर आकारणी करून मोठया प्रमाणात नस्ती कर संकलन मुख्यालय कार्यालयात पडून आहेत. परंतु मागणी नोंदवुन देयके बजावुन वसुली झालेली नाही. उपरोक्त विवरणपत्रात उदाहरणादाखल दर्शविलेल्या नस्तीची करवसुलीची रक्कम रु.2,29,561/- एवढी आहे. याबाबत आवश्यक खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.132 दि.16/12/2015 अन्वये कळविण्यात आल असता विभागाकडून लेखा परीक्षण कालावधीत काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरी वरील कर वसुली न झालेल्या प्रकरणांची रु.2,29,561/- एवढी रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.2,29,561/-

DATNDMM5801 (Ref No : 89, Hmm No : 132)

13 प्रभाग क्र.03 घोडबंदर प्रभागातील अनधिकृत मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कराची आकारणी कमी केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 02

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 5907664.00/-

अनधिकृत मोबाईल टॉवर्सवर आकारणी केलेल्या कराच्या रकमांची मागणी नोंदवहीला नोंद घेवून देयके बजावून वसुली केलेली नाही. त्यामुळे मनपा फंडाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

प्रभाग क्र.03 घोडबंदर प्रभागातील अनधिकृत मोबाईल टॉवरच्या नविन मालमत्ता कर आकारणीची नस्ती तपासणी करतांना आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.134 दि.18/12/2015 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत लेखा परिक्षणास खुलासा सादर करण्यात आला नाही. तरी खालील प्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

आकारणी नोटीस : जा.क्र.मनपा/कर/905/583/2011-12

मालमत्ता क्र. : ओ01003833800

मालमत्ताचे नाव : रितु पॅराडाइस को.ऑ.हौ.सो. या इमारतीच्या टेरेसवर आयडीया सेल्युलर मोबाईल लि. टॉवर उभारणे.

वार्षिक भाडेमुल्य : रू.4,03,200/-

आकारणी कालावधी : दि.01/02/2010 ते 31/03/2012 (26 महिने)

अनधिकृत / अनिवासी

अ. क्र.	कराचे नाव	आकारणी करावयाची रक्कम	आकारणी केलेली रक्कम	फरक
1	सामान्य कर 30%	रू.262080/-	रू.252672/-	रू.9408/-
2	वृक्षकर 1%	रू.8736/-	रू.8736/-	--
3	शासकीय शिक्षण उपकर 12%	रू.104832/-	रू.104832/-	--
4	रोजगार हमीकर 3%	रू.26208/-	रू.26802/-	--
5	शिक्षण कर 2%	रू.17472/-	रू.12768/-	रू.1704/-
6	अग्निशमन कर 1%	रू.8736/-	रू.8736/-	--
7	मलप्रवाह लाभ 8%	रू.69888/-	रू.32256/-	रू.37632/-
8	शास्ती 60%	रू.524160/-	रू.505344/-	रू.18816/-

	एकूण	रू.952171/-		रू. 67650/-

2) आकारणी नोटीस : जा.क्र.मनपा/कर/905/581/2011-12
मालमत्ता क्र. : ओ01002229100
मालमत्तेचे नाव : श्रम साफल्य को.ऑ.हौ.सो. या इमारतीच्या टेरेसवर
इंडस मोबाईल लि. यांचा मोबाईल टॉवर उभारणे.
वार्षिक भाडेमुल्य : रू.2,34,000/-
आकारणी कालावधी : दि.01/05/2010 ते 31/03/2012 (23 महिने)
अनधिकृत / अनिवासी

अ. क्र.	कराचे नाव	आकारणी करावयाची रक्कम	आकारणी केलेली रक्कम	फरक
1	सामान्य कर 30%	रू.134550/-	रू.130260/-	रू.4290/-
2	वृक्षकर 1%	रू.4485/-	रू.4485/-	--
3	शासकीय शिक्षण उपकर 12%	रू.53820/-	रू.53820/-	--
4	रोजगार हमीकर 3%	रू.13455/-	रू.13455/-	--
5	शिक्षण कर 2%	रू.8970/-	रू.6825/-	रू.2145
6	अग्निशमन कर 1%	रू.4485/-	रू.4485/-	--
7	मलप्रवाह लाभ 8%	रू.35880/-	रू.18720/-	रू.17610/-
8	शास्ती 60%	रू.269100/-	रू.260520/-	रू.8580/-
	एकूण	रू.524745/-		रू. 32625/-

उपरोक्त कर निर्धारण केलेल्या नस्तींचे लेखा परीक्षण केले असता वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे अनधिकृत मोबाईल टॉवर्सना कमी आकारणी केल्यामुळे मनपा फंडाचे रू.59,07,664/- एवढे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबाबत असे निदर्शनास आले की, वरील कर धारकांना आकारणी नोटीस बजाविण्यात आलेली आहे. परंतु मागणी नोंदवहीला नोंदी घेऊन आकारणीची रक्कम आजतागायत वसुल करण्यात आलेली नाही. वरील तक्ता क्र.01 नुसार आकारावयाची रक्कम रू.9,52,171/- प्रमाणे माहे मार्च-2015 अखेर पर्यंत एकूण 04 वर्षाची रक्कम रू.38,08,684/- व तक्ता क्र.02 नुसार आकारावयाची रक्कम रू.5,24,745/- प्रमाणे माहे मार्च-2015 अखेर पर्यंत एकूण 04 वर्षाची रक्कम रू.20,98,980/- अशी रक्कम रू.59,07,664/- वसुल केल्याचे लेखा परीक्षणात अनुपालन दाखविण्यात आले नाही. तरी वरीलप्रमाणे रक्कम रू.59,07,664/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रू.59,07,664/-
DATNDMM5801 (Ref No : 90, Hmm No : 134)

14 उत्तन विभाग झोन क्र.टी अनधिकृत मोबाईल टॉवरवरील मालमत्ता कराची आकारणी कमी केल्याने झालेल्या रु.2,44,553/- एवढया आर्थिक नुकसानाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 02

मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 244553.00/-

अनधिकृत मोबाईल टॉवरवरील नविन कर आकारणी करतांना कमी आकारणी केल्यामुळे मनपा फंडाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

उत्तन विभाग झोन क्र.टी अनधिकृत मोबाईल टॉवरवरील नविन कर आकारणीची नस्ती तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटीबाबत खुलासा सादर करण्यास विभागास अर्धसमास पत्र क्र.135 दि.18/12/2015 अन्वये कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षणास खुलासा प्राप्त झाला नाही. तरी खालील प्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) उत्तन प्रभागातील झोन क्र.टी मधील अनधिकृत मोबाईट टॉवर्सच्या आकारणी केलेल्या नस्तींचे लेखा परीक्षण केले असता मालमत्ता क्र.टी1003031000 यांना पत्र क्र.768 दि.10/03/2011 करधारक श्री. वकील मोहम्मद मुनीर शेख, किंग पॅलेस यांना आकारणी नोटीस बजाविण्यात आली असून सदर मोबाईल टॉवर अनधिकृत असल्याने त्यांचेवर आकारणी केलेली सामान्य कराची रक्कम रू.1,29,375/- यावरती 30% सामान्य कराची रक्कम यावरती दुप्पट शास्तीची रक्कम रू.77,625/- आकारणी करून वसुल करण्यात आलेली नाही. तरी सदर रक्कम रु.77625/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

2) मालमत्ता क्र.टी1002618500 तसेच आकारणी नोटीस क्र.748 दि.05/12/2011 अन्वये हॉटेल मॅक्सवेल कम हॉलीडे यांना आकारणी करण्यात आली असून सामान्य कराची 30% रक्कम रू.1,20,672/- यावरती मोबाईल टॉवर अनधिकृत असल्यामुळे दुप्पट शास्तीची रक्कम रू.2,41,344/- आकारणी आवश्यक असतांना या टॉवर वरती शास्तीची रक्कम रू.1,24,416/- आकारण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे फरकाची रक्कम रू.1,16,928/- कमी आकारण्यात आलेली आहे. तरी सदर रक्कम रु.116928/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.2,44,553/-
DATNDMM5801 (Ref No : 91, Hmm No : 135)

15 मालमत्ता कराचा भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे दंडात्मक शुल्काच्या व मालमत्ता कराच्या वसुलीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 05

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 1657606.00/-

कर निर्धारण व संकलन विभागास मालमत्ता कराचा भरणा करतांना प्राप्त झालेले धनादेश न वटल्यामुळे एकूण रु.1657606/- एवढी मालमत्ता कराची रक्कमेची थकीत राहिली आहे. न वटलेल्या धनादेशांसंदर्भात संबंधित मालमत्ता धारकांविरुध्द विभागाकडून Negotiable Instrument act चे कलम 138 अन्वये संबंधित कारवाई करण्यात आलेली नाही.

कर निर्धारण व संकलन विभागाच्या विविध प्रभागांतर्गत मालमत्ता कराच्या जमा रक्कमांबाबत पडताळणी करतांना विभागाकडून उपलब्ध केलेली नोंदवही, पुर्नभरणा पावत्या, पोटकिर्द व जमा पावत्या यांची तपासणी करता वर्ष 2012-13 मध्ये विभाग निहाय मालमत्ता कर भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे बँकेकडून परत पाठविण्यात आल्याचे आढळून आले आहे. सदर न वटलेल्या धनादेशांचा तपशिल सोबतच्या सहपत्र क्र.———मधील विवरणपत्रात दर्शविण्यात आला आहे. याबाबत खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.127 दि.14/12/2015 अन्वये विभागास कळविण्यात आले असता लेखा परिक्षण कालावधीत विभागाकडून काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे न वटलेल्या धनादेशांबाबत संबंधित मालमत्ता धारकांकडून दंडात्मक शुल्कासह मालमत्ता कराची रक्कम रोखीने वसुल करून मनपा लेख्यात भरणा करण्यात आल्याचे लेखा परीक्षणास आढळुन आले नाही. सदर न वटलेल्या धनादेशांच्या रक्कम रु.1657606/- संबंधित मालमत्ता धारकांकडून रोखीने भरणा करण्यात आल्याबाबत विभागाकडून पावती क्रमांक व दिनांकासह यासह साधार पुर्तता दर्शविण्यात आली नाही.

2) मालमत्ता कराचा भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे संबंधित मालमत्ता धारकास थकीत रक्कमेवर मुंबई प्रांतिक महानरगपालिका अधिनियम 1949 प्रकरण 8 मधील कलम 54 नुसार 10% दंड आकारण्याबाबत महापालिकेच्या धोरणामध्ये कर निर्धारक व संकलक यांच्याकडील परिपत्रक क्र.मनपा/कर/155/2011-12 दि.11/08/2011 अन्वये बदल करण्यात आला असून थकीत रक्कमेवर 10% दंड आकारण्या ऐवजी रू.100/- एवढा दंड आकारण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. कर वसुली धोरणातील विभाग स्तरावर केलेल्या बदलास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आली असल्याचे लेखा

परिक्षणात आढळून आले नाही.

3) कनकिया विभागाकडील कर वसुलीच्या न वटलेल्या धनादेशांचा तपशिल लेखा परीक्षणास मागणी करूनही उपलब्ध झाला नाही. त्यामुळे सदर विभागाकडील न वटलेल्या धनादेशांची पडताळणी करता आली नाही. तरी विवरणपत्रात दर्शविलेल्या विभागा व्यतिरिक्त इतर विभागाकडील न वटलेल्या धनादेशांची तपासणी करून अशा मालमत्ता धारकांकडून मालमत्ता कराची रक्कम दंडनिय शुल्कासह वसुल करण्यात आल्याबाबत लेखा परीक्षणास खात्री करून देण्यात यावी असे विभागास कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत खुलासा प्राप्त झाला नाही.

4) न वटलेल्या धनादेशांसंदर्भात संबधित मालमत्ता धारकांविरुध्द विभागाकडून Negotiable Instrument act चे कलम 138 अन्वये संबंधित कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रभागनिहाय न वटलेल्या धनादेशांमुळे मोठया प्रमाणात मालमत्ता कराची रक्कम थकीत असल्याचे दिसून येते.

5) वॉर्डनिहाय न वटलेल्या धनादेशांची रक्कम संबंधिताकडून तात्काळ रोखीने वसुल करण्यात आली नसल्याने अशा रक्कमा महानगरपालिकेस विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या नाहीत. सोबतच्या जोडपत्र क्र.——— मधील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार न वटलेल्या धनादेशांचा तात्काळ रोखीने भरणा न करण्यात आल्यामुळे मालमत्ता कराची थकीत रक्कम एकूण रू.16,57,606/- एवढी आहे. विवरणपत्रात नमुद विभागां व्यतिरिक्त इतर विभागाकडील न वटलेल्या धनादेशांचा समावेश केल्यास सदर रक्कम वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मालमत्ता कराच्या थकबाकीमध्ये वाढ झाली आहे. न वटलेल्या धनादेशांची रक्कम संबंधिताकडून तात्काळ रोखीने वसुल करण्याबाबत विभागाकडून कालमर्यादा निश्चित करण्याबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

वसुलपात्र रक्कम रू.16,57,606/-

FDSANMM7201 (Ref No : 95, Hmm No : 127)

16 कनकिया मालमत्ता कर विभागाकडील नवीन कर निर्धारणातील अनियमिततांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 10

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 3803525.00/-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267(अ) मधील तरतूदीनुसार अवैध इमारत किंवा इमारतीच्या अवैध भागास शास्ती आकारण्याची तरतूद आहे. ज्या इमारतीस बांधकाम परवानगी आहे.

तथापि, विकासकाने भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून न घेतल्यास अशा मालमत्तांना मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी रक्कम शास्ती म्हणुन वसुल करावयाची आहे. त्यानुसार उपरोक्त इमारतीची मालमत्ता कराची आकारणी करतांना दुप्पट दराने मालमत्ता कर आकारण्यात आलेला नाही. तसेच स्थायी समिती ठराव क्र.215 दि.01/03/2006 नुसार मिरा भाईदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार इमारतीचे बांधकाम पुर्ण केल्यानंतर भोगवटा दाखला घेणे आवश्यक असून भोगवटा दाखल्याशिवाय इमारत रहिवास व्याप्त करता येत नाही. भोगवटा दाखल्यापुर्वी इमारत रहिवास व्याप्त केल्यास आर्थिक दंड म्हणुन विकास आकाराप्रमाणे प्रती चौ.मीटर रू60/- रहिवास वापरासाठी, रू120/- प्रति चौ.मिटर वाणिज्य वापरासाठी, तसेच रू90/- प्रती चौ.मी. औदयोगिक वापरासाठी याप्रमाणे दंडाची आकारणी करावयाची आहे. त्यानुसार भोगवटा दाखला न घेतलेल्या इमारतींच्या बाबत आर्थिक दंडाची रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

कनकिया मालमत्ता कर विभागाकडील वर्ष 2012-13 मधील नवीन कर निर्धारणाच्या प्रकरणांची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत अर्धसमास पत्र क्र.131 दि.15/12/2015 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलास प्राप्त झाला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) आदेश इंन्टरप्रायझेस, आनंद पॅराडाईस इंद्रलोक, फेज, मिरारोड (पूर्व) या इमारतीस क्र.मिभामनपा/नर/396/2010-11 दि.28/04/2010 अन्वये बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात आले असून सदर इमारतीस जा.क्र.मनपा/156/192/2012-13 दि.21/05/2012 अन्वये कर आकारणी करण्यात आली आहे. इमारतीच्या वास्तुविशारदाच्या प्रमाणे पत्रानुसार सदर इमारतीचे 26830 चौ.फुट क्षेत्रास निवासी वापरासाठी रू.1.60 व अनिवासी वापरासाठी रू.3.00 प्रती चौ.फुट याप्रमाणे रू.4,94,165/- करयोग्य मुल्य विचारात घेऊन रू.2,41,453/- एवढी मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली आहे. विकासकाने सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 267(अ) मधील तरतूदीनुसार अवैध इमारत किंवा इमारतीच्या अवैध भागास शास्ती आकारण्याची तरतूद आहे. ज्या इमारतीस बांधकाम परवानगी आहे. तथापि, विकासकाने भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून न घेतल्यास अशा मालमत्तांना मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी रक्कम शास्ती म्हणुन वसुल करावयाची आहे. त्यानुसार उपरोक्त इमारतीची मालमत्ता कराची आकारणी करतांना दुप्पट दराने मालमत्ता कर आकारण्यात आलेला नाही. तरी रू.2,96,499/- एवढी शास्तीची रक्कम वसुलपात्र आहे.

स्थायी समिती ठराव क्र.215 दि.01/03/2006 नुसार मिरा भाईदर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार इमारतीचे बांधकाम पुर्ण केल्यानंतर भोगवटा दाखला घेणे आवश्यक असून भोगवटा दाखल्याशिवाय इमारत रहिवास व्याप्त करता येत नाही. भोगवटा दाखल्यापुर्वी इमारत रहिवास व्याप्त केल्यास आर्थिक दंड म्हणुन विकास आकाराप्रमाणे प्रती चौ.मीटर रू.60/- रहिवास वापरासाठी, रू.120/- प्रति चौ.मिटर वाणिज्य वापरासाठी, तसेच रू.90/- प्रती चौ.मी. औदयोगिक वापरासाठी याप्रमाणे दंडाची आकारणी करावयाची आहे. आनंद पॅराडाईस या इमारतीसाठी विकासकाने भोगवटा दाखला प्राप्त केलेला नसल्याने उपरोक्त ठरावानुसार सदर इमारतीचे भोगवटा दाखल्या

अभावी आर्थिक दंडाची रक्कम वसुल करण्यात आल्याचे आढळून आले नाही. तरी सदर इमारतीचे निवासी वापर विचारात घेवून 26830 चौ.फुट क्षेत्रफळासाठी रु.60/- प्रति चौ.मी.दराने रु.1,49,610/- एवढी आर्थिक दंडाची रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

2) साईस्नेहा कॉम्पलेक्स, रामदेव पार्क सी/डी या इमारतीस क्र. मिभा मनपा/नर/4577/10-11 दि.31/03/2011 अन्वये बांधकाम परवानगी देण्यात आली असून सदर इमारतीची कर आकारणी क्र. मनपा/कर/ 384/2012-13 दि.26/07/2012 अन्वये करण्यात आली आहे. वास्तुविशारदाच्या दाखल्यानुसार इमारतीच्या 24545 चौ.फुट क्षेत्रफळासाठी रू.1.60 प्रति चौ.फुट प्रमाणे निवासी वापरासाठी व रू.3.00 प्रति चौ.फुट प्रमाणे अनिवासी वापरासाठी रू.4,44,610/- एवढे करयोग्य म्हणुन विचारात घेवुन रू.2,16,059/- एवढे कर आकारणी करण्यात आली आहे. सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केले नसल्याने कलम 267(अ) नुसार सदर इमारतीस दुप्पट दराने मालमत्ता आकारणी करणे आवश्यक असतांना त्यानुसार आकारणी करण्यात आलेली नाही. तरी रू.2,66,000/- एवढी मालमत्ता करावरील शास्तीची रक्कम वसुलपात्र आहे.

तसेच भोगवटा प्रमाणपत्र घेण्यात आले नसल्याने व भोगवटा प्राप्त करण्यापुर्वी इमारत ठराव क्र.215 दि.01/03/2006 नुसार अधिक दंड म्हणुन विकास आकाराप्रमाणे रहिवासी वापरासाठी रू.60/- प्रतिचौ.मी. दराने वाणिज्य वापरासाठी तसेच रू.120/- प्रती चौ.मी. प्रमाणे तसेच औदयोगिक वापरासाठी रू.90/- प्रतीचौ.मी. प्रमाणे दंडाची आकारणी करण्यात आल्याचे लेखा परीक्षणास आढळून आले नाही. तरी सदर इमारतीचा 24545 चौ.फुट क्षेत्रफळ निवासी वापर विचारात घेवून रू.60/- प्रतिचौ.मी.प्रमाणे रु.1,36,868/- एवढी आर्थिक दंडाची रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

3) सद्गुरू कॉम्पलेक्स बिल्डींग क्र.01 ते04 मे.सद्गुरू बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स या इमारतीची क्र. मनपा/कर/275/73/12-13 दि.24/04/12 अन्वये कर आकारणी करण्यात आली आहे. वास्तुविशारदाच्या दाखल्यानुसार सदर इमारतीच्या 82260 चौ.फुट क्षेत्रफळासाठी निवासी रू.1.60 प्रति चौ.फुट, अनिवासी वापरासाठी रू.3.00/- प्रति चौ.फुट दराने रू.14,21,452/- एवढया करयोग्य मुल्य विचारात घेवुन रू.8,20,297/- एवढी कर आकारणी करण्यात आली आहे. सदर इमारतीस विकासकाने भोगवटा दाखला घेतलेला नाही. त्यामुळे कलम 267(अ) नुसार दुप्पट दराने मालमत्ता कराची आकारणी करणे आवश्यक असतांना त्यानुसार मालमत्ता कराची आकारणी केलेली नाही. तरी रू.8,52,871/- एवढी मालमत्ता करावरील शास्तीची रक्कम वसुलपात्र आहे.

तसेच विकासकाने इमारतीस भोगवटा दाखल्यापुर्वी इमारत रहिवास व्याप्त करण्यात आल्यामुळे स्थायी समिती ठराव क्र.215 दि.01/03/2006 नुसार आर्थिक दंड म्हणुन विकास आकाराप्रमाणे निवासी वापरासाठी रू.60/-, वाणिज्य वापरासाठी रू.120/- तसेच औदयोगिक वापरासाठी रू.90/- प्रतीचौ.मी. प्रमाणे दंडाची आकारणी करण्यात आल्याचे आढळून आले नाही. तरी 82260चौ.फुट क्षेत्रफळ निवासी वापर विचारात घेवून रु.4,58,698/- एवढी आर्थिक दंडाची रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

4) श्रीराम इन्क्लेव्ह ए/बी, मे.रत्नप्रिया डेव्हलपर्स या इमारतीस बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र क्र.मिभामनपा/नर/3710/2009-10 दि.16/01/2010 अन्वये देण्यात आले आहे. सदर इमारतीस जा.क्र.मनपा/कर/771/514/2012-13 दि.03/10/2012 अन्वये कर आकारणी करण्यात आली आहे. वास्तु विशारदाच्या दाखल्याप्रमाणे 41607 चौ.फुट क्षेत्रफळासाठी निवासी वापरासाठी रू.1.60 तसेच अनिवासी वापरासाठी रू.3.00 प्रती चौ.फुट या दराने रू.9,96,419/- एवढया करयोग्य मुल्यासाठी रू.5,01,631/- एवढी कर आकारणी करण्यात आली आहे. सदर इमारतीस विकासकाने भोगवटा दाखला घेतलेला नसल्याने कलम

267(अ) प्रमाणे दुप्पट दराने मालमत्ता कर आकारणी करणे आवश्यक असतांना त्यानुसार कर आकरणी करण्यात आलेली नाही. तरी रू.5,97,851/- एवढी मालमत्ता करावरील शास्तीची रक्कम वसुलपात्र आहे.

तसेच स्थायी समिती ठराव क्र.215 दि.01/03/2006 नुसार आर्थिक दंड म्हणुन विकास आकाराप्रमाणे रहिवासी वापरासाठी रू.60/- प्रति चौ.मी., वाणिज्य वापरासाठी रू.120/- प्रतिचौ.मी. दराने आर्थिक दंडाची वसुली करण्यात आलेली नाही. तरी 41607 चौ.फुट क्षेत्रफळासाठी निवासी वापर विचारात घेवून रक्कम रु.2,32,009/- एवढी आर्थिक दंडाची रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

5) राज होरीजन ए/बी, साई स्नेह कॉम्पलेक्स जवळ, मिरारोड या इमारतीची जा.क्र.मनपा/कर/2717 /527/12-13 दि.11/09/2012 अन्वये कर आकारणी करण्यात आली आहे. सदर इमारतीस विकासकाने भोगवटा दाखला घेतलेला नाही. वास्तुविशारदाच्या दाखल्यानुसार 64766 चौ.फुट क्षेत्रफळासाठी निवासी वापरास रू.1.60 प्रति चौ.फुट व अनिवासी वापरासाठी रू.3.00 प्रति चौ.फुट दराने रू.10,92,873/- एवढया करयोग्य मुल्यासाठी रू.5,24,591/- एवढया कराची आकारणी करण्यात आली आहे. परंतु भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केले नसल्याने कलम 267(अ) नुसार दुप्पट दराने मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली नाही. तरी रू.6,55,654/- एवढी मालमत्ता करावरील शास्तीची रक्कम वसुलपात्र आहे.

तसेच सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र न घेता इमारत रहिवास व्याप्त करण्यात आल्यामुळे स्थायी समिती ठराव क्र.215 दि.01/03/2006 नुसार आर्थिक दंड म्हणुन विकास आकाराप्रमाणे निवासी वापरासाठी रू.60/- प्रति चौ.फुट, वाणिज्य वापरासाठी रू.120/- प्रति चौ.फुट दराने आर्थिक दंडाची वसुली करण्यात आलेली नाही. तरी 64766 चौ.फुट क्षेत्रफळ निवासी वापर विचारात घेतल्यास रु.3,61,148/- एवढी आर्थिक दंडाची रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

6) सदर इमारतीतील सदनिका क्र.ए/101 क्षेत्रफळ 506, बी/101 क्षेत्रफळ 506 व बी/401 क्षेत्रफळ 506 या सदनिकांना ULC सदनिका असे नमुद करून कर आकारणी करण्यात आली आहे. सदर सदनिकांची आकारणी निवासी वापरासाठी रू.1.60 प्रति चौ.फुट दराने 506 चौ.फुट क्षेत्रफळासाठी रू.9715/- वजा 10% सवलत रू.971/- याप्रमाणे रू.8744/- एवढया करयोग्य मुल्यासाठी एका सदनिकेसाठी रू.4196/- याप्रमाणे वरील 03 सदनिकेसाठी वर्ष 2012-13 साठी दुप्पट शास्तीसह एकूण रू.28,326/- एवढा मालमत्ता कर वसुल करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कर आकारणी करण्यात आली नाही. तरी रू.28,326/- एवढी मालमत्ता करावरील शास्तीची रक्कम वसुलपात्र आहे. तसेच इतर विभागाकडील मालमत्ता कराच्या आकारणी करतांना ULC सदनिकांची मालमत्ता कराची आकारणी करण्यात आल्याबाबत साधार पुर्तता दर्शविण्यात आली नाही.

7) वरील इमारतीची कर आकारणीची प्रकरणे उदाहरणादाखल दिली असून मनपा क्षेत्रातील इतर इमारतीच्या कर आकारणीची पडताळणी करून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त नसलेल्या सदनिकांबाबत दुप्पट दराने आकारणी करण्यात आल्याबाबत तसेच भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त नसलेल्या इमारतीबाबत स्थायी समिती ठराव क्र.115 दि.01/03/2006 नुसार आर्थिक दंड वसुल करण्यात आल्याबाबत लेखा परीक्षणास साधार पुर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

8) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 267(अ) च्या तरतूदीनसार अवैध इमारत किंवा इमारतीच्या अवैध भागास शास्ती आकारणीची तरतूद आहे. विकासकाने/संबंधिताने भोगवटा दाखला महानगरपालिकेकडून प्राप्त करून न घेतल्यास अशा मालमत्तांना मालमत्ता कराची दुप्पट रक्कम शास्ती म्हणुन वसुल करणे आवश्यक आहे. तथापि, महानगरपालिकेकडील कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आयुक्त/90/2011-12 दि.31/05/2011 अन्वये इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे

असल्याबाबत इमारतीच्या वास्तुविशारदांनी प्रमाणित केल्यास भोगवटा दाखला न घेतलेल्या इमारतीस शास्तीची आकारणी करण्यात येवु नये, असे आदेश देण्यात आले आहेत. सदर आदेश अधिनियमातील उपरोक्त तरतूदीशी विसंगत आहे. यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आल्याबाबत लेखा परीक्षणास आढळून आले नाही.

10) भोगवटा दाखला न घेतलेल्या इमारती प्रकरणी शास्ती रक्कमेसह कर आकारणी करण्यात आली नसल्याने मालमत्ता करापोटी महापालिकेस प्राप्त होणाऱ्या महसुली उत्पन्नाचे मोठयाप्रमाणात नुकसान झाले आहे. तरी याबाबत आवश्यक धोरणात्मक निर्णय घेवून महसुली उत्पन्नाच्या वाढीसाठी आवश्यक उपाय योजना करणे आवश्यक आहे.

वसुलपात्र रक्कम रु.38,03,525/-

FDSANMM7201 (Ref No : 96, Hmm No : 131)

17 मोबाईल टॉवर मालमत्ता कर वसुलीची नवीन कर निर्धारणाची प्रकरणे उपलब्ध करण्यात आली नसल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 4641018.00/-

कर निर्धारण व संकलन विभागांतर्गत विविध प्रभाग कार्यालयाकडील मार्च-2013 मधील दैनंदिन जमा रक्कमांबाबत पडताळणी करतांना मोबाईल टॉवर मालमत्ता कर वसुलीचे नवीन कर निर्धारण करण्यात आले असल्याचे आढळून आले आहे. परंतू सदर नविन कर निर्धारण प्रकरणांच्या नस्ती संबंधित विभागाकडून लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आल्या नाहीत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेली मोबाईल टॉवर्सच्या मालमत्ता कराच्या आकारणी वसुली, नवीन कर निर्धारण याबाबतच्या पडताळणीसाठी मोबाईल टॉवर्स मालमत्ता कराच्या नविन कर निर्धारण मंजूरीच्या नस्त्या, मंजूरी आदेश, मागणी नोंदवहीतील नोंदी इ. अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करण्याबाबत कर निर्धारण व संकलन विभागास अर्धसमास पत्र क्र.121 दि.1/12/2015 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. कर निर्धारण व संकलन विभागांतर्गत विविध प्रभाग कार्यालयाकडील मार्च-2013 मधील दैनंदिन जमा रक्कमांची पडताळणी करतांना खाली नमुद केल्याप्रमाणे मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कराचे नवीन कर निर्धारण करण्यात आले असल्याचे आढळून आले आहे. परंतू सदर नविन

कर निर्धारण प्रकरणांच्या नस्ती संबंधित विभागाकडून लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आल्या नाहीत. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.133 दि.16/12/2015 अन्वये कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत खुलासा प्राप्त झाला नाही. नविन कर निर्धारण करुन करांच्या वसुलीच्या पावती क्रमांक, दिनांक कराच्या रकमांचा तपशिल पुढीलप्रमाणे :-

वॉर्ड क्र.02 तलाव रोड, कर विभाग

अ.क्र.	पा.क्र.	दि.	कर निर्धारण एकूण रक्कम रु.	कर धारकांचे नाव
1	416309	15/03/13	94115/-	जागृती अपार्ट मो.टॉवर (I Ward)
2	416311	31/03/13	266652/-	मे. पाटील ॲन्ड ब्रदर्स इंड इस्टेट (G Ward)
3	416312	31/03/13	278100/-	जेसल कॉम्प. मो.टॉवर (I Ward)
4	416313	31/03/13	262575/-	नर्मदा कुंज मो.टॉवर (I Ward)
5	416314	31/03/13	112860/-	हॉटेल निर्मल आनंद मो.टॉवर (G Ward)
6	416315	31/03/13	473388/-	निर्मल द्वार मो.टॉवर (G Ward)
7	416316	31/03/13	473388/-	रोलेक्स अपार्ट (G Ward)
8	416317	31/03/13	132739/-	रोलेक्स अपार्ट (G Ward)
9	416318	31/03/13	160380/-	इशा अपार्ट वोडाफोन (G Ward)
10	416319	31/03/13	45455/-	इंडस मोबाईल टॉवर हाऊस (G Ward)
11	416204	31/03/13	196350/-	दि शिवशक्ती दर्शन (H-2 Ward)
12	416205	31/03/13	236700/-	दि शिवशक्ती दर्शन (H-2 Ward)
13	416206	31/03/13	181950/-	कपुर टॉवर नं.4 (H-1 Ward)
14	416207	31/03/13	153900/-	कपुर टॉवर नं.4 (H-1 Ward)
15	416208	31/03/13	116420/-	पांडुरंग कृपा नालंदा कपुर टॉवर नं.4 (H-3 Ward)
16	416209	31/03/13	463404/-	मदर मेरी (H-3 Ward)

	एकूण (1)	3648376/-	

राई-मुर्धा, कर विभाग :

अ.क्र.	पा.क्र.	दिनांक	कर निर्धारण एकूण रक्कम रु.	कर धारकांचे नाव
1	457823	31/03/13	115425/-	मे. इंडस मो. टॉवर भाग्यश्री बंगलो (R Ward)
2	451824	31/03/13	153900/-	मे. इंडस मो. टॉवर भाग्यश्री बंगलो (R Ward)
3	451825	31/03/13	249900/-	मे. इंडस मो. टॉवर भाग्यश्री बंगलो (R Ward)
4	451826	31/03/13	232386/-	हिरा इस्टेट राई शिवनेरी
5	451827	31/03/13	2642641/-	हिरा इस्टेट राई शिवनेरी
6	451828	31/03/13	124245/-	मे. भारती इंन्फ्रा लक्ष्मी नारायण भवन
7	451829	31/03/13	9030/-	मे. भारती इंन्फ्रा. न्यु सालासर
	एकूण (2)		992642/-	
	एकूण (1)+(2)		4641018/-	

मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम 1931 मधील कलम 4 नुसार लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची आहे. तसेच उपरोक्त अधिनियमातील कलम 6 मधील तरतूदीनुसार अर्धसमास पत्रान्वये अभिलेख उपलब्ध करण्याबाबत कळविण्यात आले असतांनाही विभागाकडून मोबाईल टॉवरच्या नविन कर निर्धारणाची प्रकरणे व अनुषगिक अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आले नाहीत. त्यामुळे सदर नवीन कर निर्धारण विहीत दराने करण्यात आल्याबाबत तसेच त्यांची मालमत्तांच्या कर आकारणीची नोंद कर विभागाच्या मागणी नोंदवहीत नोंद घेण्यात आल्याबाबत पडताळणी करता आली नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु.46,41,018/-

FDSANMM7201 (Ref No : 97, Hmm No : 133)

18 कर संकलन प्रभागाकडून रोखीने जमा होणाऱ्या करांच्या रक्कमा लेखा विभागात भरणा केल्याची चलने लेखा परिक्षणास उपलब्ध न केल्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ
आक्षेपाधीन रक्कम रु. 8402564.00/-

प्रभाग निहाय दि.31/03/2013 रोजी मुख्यालयात प्राप्त मालमत्ता कराच्या जमा रक्कमांची चलने लेखा परीक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे प्रभागांकडून कर विभागाकडे रोखीने प्रत्यक्षात जमा झालेल्या रक्कमांचा रोख शाखेकडील जमा रक्कमांशी मेळ घेवुन एकूण जमा रकमांची खात्री करता आली नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागाच्या विविध प्रभागांकडून रोखीने व धनादेशाने प्राप्त होणाऱ्या रक्कमा चलनाद्वारे मध्यवर्ती कार्यालयात भरणा करण्यात येतात. मध्यवर्ती कार्यालयाकडून रक्कमा स्विकृत केल्याबाबत मुख्य कार्यालयाकडून प्रभागांना पोहोच दिली जाते. प्रभाग निहाय जमा रक्कमांचे कर विभागाकडून एकत्रिकरण करुन लेखा शाखेकडे जमा करण्यात येतात.

वर्ष 2012-13 चे प्रभाग निहाय जमा रक्कमांच्या चलनांची पडताळणी करता लेखा शाखेकडील चलन क्र.5373 दि.31/03/2013 अन्वये रू.22,96,906/- व चलन क्र.5378 दि.31/03/2013 अन्वये रू.61,05,658/- अशी एकूण रक्कम रू.84,02,564/- एवढी रक्कम लेखा शाखेकडे रोखवहीत जमा दर्शविण्यात आली आहे. परंतु दि.31/03/2013 रोजीची प्रभाग निहाय जमा रक्कमांची चलने लेखा परीक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे प्रभागांकडून रोखीने प्रत्यक्षात जमा झालेल्या रक्कमांचा रोख शाखेकडील जमा रक्कमांशी मेळ घेवून एकूण जमा रकमांच्या भरणा योग्य असल्याबाबत खात्री करता आली नाही. तरी मार्च-2013 मधील एकत्रित जमा रक्कमांचा रोख शाखेशी मेळ घेऊन लेखा परीक्षणास तसे अनुपालन दर्शविण्यात यावे असे विभागास अर्धसमास पत्र क्र.136 दि.18/12/2015 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यामुळे उपरोक्त चलनांअभावी मालमत्ता कराच्या दि.31/03/2015 रोजीच्या जमा रकमांची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही. त्यामुळे वरील रक्कम रू.84,02,564/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रू.84,02,564/-

FDSANMM7201 (Ref No : 98, Hmm No : 136)

19 शहरातील मोकळया जागेवरील कराची वसुली न केल्याबाबत.

मोकळया जागेवरील कर
लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 10

लेखा शीर्ष :नगर रचना मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 274880647.00 /-
वसूलपात्र रक्कम रु. 274880647.00/-

दि.01/04/2008 पुर्वी बांधकाम प्रारंभपत्र दिलेल्या जागावरील कर वसुलीबाबतची नोंदवही उपलब्ध झाली नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 74 व 76 नुसार - करनिर्धारण सूची नमुना नं.43 व मागणी पुस्तक नमुना क्र.47 मधील नोंदी परिपुर्ण नाहीत. थकबाकीधारक असलेल्या विकासकांना/ इमारतींना पाणी कनेक्शन कशी दिली आहेत, याचा शोध घेतला नाही. वसुलीसाठी विभागाने विशेष प्रयत्न केले नाहीत. मोकळया जागेवरील कराची बिले वेळेवर पाठविली नसून व्याजाची गणना केल्याचे दिसून येत नाही. नगररचना आणि कर निर्धारण व संकलक यांचा समन्वय (को-ऑर्डिनेशन) नसल्याचे दिसून येते. दि.31/03/2013 अखेर रक्कम रु.27,48,80,647/- वसुली थकीत आहे. मोकळया जागेवरील कराची वसुली 23% आहे. विभागाकडे पुरेसे अभिलेखे/ नोंदवहया नसल्याने बांधकाम परवानगी दिलेल्या सर्व मोकळया जागेवरील या कराची आकारणी केली असल्याची खात्री लेखा परिक्षणास करता आली नाही. मोकळया जागेवरील कराची वसुली होण्यापुर्वीच संबधित जागेवरील बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र (OC), इतर परवाने, पाणी कनेक्शन दिली आहेत.

महासभा ठराव क्र.08 दि.10/04/2008 अन्वये महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याचे दुष्टीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 129 व 132 नुसार शहरातील मोकळया जागेवर दि.01/04/2008 पासून कर लागु केला. ज्या जागेत बांधकाम प्रारंभपत्र दिले आहे, त्या दिनांकापासून मोकळी जागा कर आकारणीस पात्र असुन, जागेवरील अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र हे कर आकारणीस गृहीत धरले आहे. जमीनीचा दर सर्वे नंबर निहाय शासनमान्य रेडी रेकनर (दुय्यम निबंधक ठाणे 04 व 07 खरेदी विक्री दस्ताऐवज नोंदणी करताना शासनाने मुद्रांक शुल्कासाठी निश्चित केल्या नुसार) दरानुसार ठरविण्यास मंजूरी दिली आहे. जागेची किमंत निश्चित झाल्यावर त्याचे 5% वार्षिक भाडे ठरविण्यात आले आहे. वार्षिक भाडे रकमेतून 10% वैधानिक कपात वजा जाता येणारी रक्कम करपात्र मुल्य ठरविले आहे. करपात्र मुल्यावर दि.01/04/2008 पासून पुढील दराने मोकळया जागेवरील कर लागू केला आहे.

अ.क्र.	कराचे नांव	कराचे दर
1	मालमत्ता कर	28%

2	वृक्ष कर	01%
3	मनपा शिक्षण कर	01%
4	मनपा अग्निशमन कर	01%

मोकळया जागेवरील कराची वसूली परिणामकारक होण्यासाठी विकासकर्त्याने संपूर्ण कराचा भरणा केल्यानंतर त्यास प्रारंभपत्र, वापर परवाना देण्याची तरतूद केली आहे. भोगवटा दाखला दिल्यानंतर किंवा मालमत्ता कर लावल्यानंतर सदरच्या कराची आकारणी बंद करावयाची आहे. याबाबत मनपा आयुक्त यांनी आदेश क्र.84/2008-09 दि.24/09/2008 व आदेश क्र.153/2008-09 दि.22/12/2008 अन्वये प्रशासनास मार्गदर्शन केले आहे.

या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.28 दि.03/09/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र.2449 दि.14/09/2015 रोजी केला असून, तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) मा.आयुक्त यांचे दि.24/09/2008 चे आदेशातील अ.क्र.01 नुसार दि.01/04/2008 पूर्वी बांधकाम प्रारंभपत्र दिले आहेत, अशा जागांना दि.01/04/2008 पासून कर आकारणी करायची आहे. म्हणजेच 2008-09 पूर्वीच्या प्रकरणांत सुध्दा दि.01/04/2008 पासून आकारणी करायची आहे. परंतू विभागा कडील अभिलेख्यानुसार दि.01/04/2008 पुर्वी बांधकाम प्रारंभपत्र दिलेल्या जागांबाबतची नोंदवही उपलब्ध झाली नाही. त्यामुळे वसुलपात्र रक्कम निश्चित करता आली नाही.

) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 74 नुसार नमुना क्रमांक 43 मध्ये करनिर्धारण ूची तयार केली पाहिजे. परंतू मोकळया जागेवरील कराची आकारणी 2008-09 ते 2011-2012 पर्यंत ल्याचे बाबतची आकारणी यादी विभागाकडे उपलब्ध झाली नाही. तसेच 2008-09 ते 2011-12 र्यंतची मागणी नोंदवही उपलब्ध झाली नाही. तसेच 2012-2013 करीता विभागाने ठेवलेल्या आकारणी ादीतील नोंदी बरोबर असल्याची खात्री कर निर्धारक व संकलक तसेच नगररचनाकार / उप गररचनाकार यांनी केली नाही. आकारणी कायम केली नाही. त्यातील नोंदी बरोबर असल्याचे प्रमाणित ले नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 76 नुसार नमुना क्रमांक 47 मध्ये मागणी ुस्तक तयार करण्यात आले पाहिजे. 2012-13 करीता मागणी नोंदवही ठेवली आहे. परंतू 2011-12 ी मागणी नोंदवही नसल्याने थकबाकी पुढील वर्षाच्या (2012-13) मागणीत - मागील थकबाकी ्हणून घेतल्याची लेखा परीक्षणाची खातरजमा करता आली नाही. नियम 76(2) नुसार, "निर्धारण सूची रुन व मागील मागणी पुस्तकावरून, मागणीच्या नोंदी अचूकपणे अग्रेषीत केल्याची खात्री केली आहे", से प्रमाणपत्र प्राधिकृत अधिका-यांने स्वाक्षरीनिशी दिले पाहिजे. त्यानुसार 2012-13 च्या मागणी ोंदवहीत कर निर्धारण व संकलक यांनी प्रमाणित करुन स्वाक्षरी केली आहे. विभागाने केलेल्या ुलाशानुसार नमुना नं.43 मधील नोंदीचे काम सुरु केले असुन परिपुर्ण आकारणी करण्यात येत आहे, से कळविले आहे. म्हणेज सदरचे काम अपुर्ण आहे.

3) मा.आयुक्त यांचेकडील आदेश दि.24/09/2008 मधील अ.क्र.08 नुसार मोकळया जागेवरील कर भरल्याची पावती जोडल्या शिवाय ज्योत्याचा दाखला, सुधारित बांधकाम परवानगी, वापर परवाना, पाणी कनेक्शन दयायची नाहीत. मा.आयुक्तांचे आदेशानुसार प्रशासनाने अंमलबजावणी केली नाही. थकबाकीदार कोण आहेत, याची नोंदवही (मागणी)विभागाकडे नसल्याने सरसकट बांधकाम पुर्ण झाल्यानंतर इमारतींना पाणी कनेक्शन दिली, भोगवटा दाखला दिला आणि मालमत्ता कराची

आकारणी केली आहे.

) आयुक्त यांचेकडील आदेश दि.22/12/2008 क्र.07 नुसार - मोकळया जागेवरील कराची वसुली रिणामकारक करण्याचे दृष्टीने नगररचना विभागाने आवश्यक ती उपाययोजना करायची आहे. परंतू कबाकीची आकडेवारी पाहता वसुलीसाठी विभागाने विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. विभागाने लेल्या खुलाशानुसार प्रथम थकबाकी वसुल करुन त्यानंतर बांधकाम परवानगी देण्यात येते असे नमुद ले आहे. परंतु थकबाकीची रक्कम प्रतीवर्षी वाढत असल्याचे विभागाने सादर केलेल्या विवरणपत्र क्र.4 ुसार दिसुन येते.

010-11 अखेर थकबाकी रु.11,25,24,007/-

011-12 अखेर थकबाकी रु.17,70,72,239/-

012-13 अखेर थकबाकी रु.27,48,80,647/-

कंदरीत थकबाकी वसुल करण्यासाठी विभागाने प्रयत्न केलेले नाहीत.

) थकीत करावर व्याजाची आकारणी करायची आहे. कराचे बिल दिल्यानंतर 90 दिवसाचे मुदतीत रधारकाने देयकाची रक्कम भरली नाही. तर पुढील काळात प्रती महा 2% दराने व्याजाची वसुली रायची आहे. परंतू मोकळया जागेवरील कराची बिले वेळेवर न पाठविल्याने व्याजाशिवाय बीलांची ाकारणी केली आहे.

) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 08 कराधान नियम 20(1) नुसार आयुक्तांना ागू सरकारी वर्षातील करात फेरफार करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे मागील काळातील आकारणीत रफार करण्यासाठी किंवा कलम 152-1अ नुसार सूट देण्यासाठी शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे. गाबाबत विभागाने सुट दिली नाही व सुट देण्याचा प्रस्तावही शासनाकडे पाठविला नाही.

दाहरणार्थ - "मे.रोझ बिल्डर्स विकासक, मॅं. विद्या एस राव वास्तुविशारद- मौजे भाईंदर सर्वे .87/(487)/11,88(492)/2 या जागेवर दि.07/03/2011 पासून बांधकाम प्रारंभपत्र देण्यात आले.

क्षेत्रफळ	वजावट	बांधकाम क्षेत्र	मोकळी जागा	रेडी रेकनर दर
1700	375.59	1324.41	1324.41	13500

	जागेची किंमत	भाडे 5%	10% सुट	करयोग्य मुल्य
500-13500	6750000	337500	33750	303750
824-12150	10016582	500829	50082	450756
				754496

घरपट्टी 28%	वृक्षकर 1%	मनपा शिक्षण 1%	अग्निशमन1%	एकुण
211259	7545	7545	7545	233894

विभागाने दि.01/03/2011 पासून मोकळया जागेवर कर लावला. दि.01/04/2014 पासून मालमत्ता कर लागू केला. कर निर्धारक व संकलक यांचे पत्र क्र.552/352 दि.15/09/2014 अन्वये दि.01/04/2014 पासून मालमत्ता कराची आकरणी केली. परंतू विभागाने मोकळया जागेसाठी कर चालूच ठेवला. त्यामुळे मे.रोझ बिल्डर्स यांनी दि.15/11/2014 रोजीच्या पत्राने 2013-14 पर्यंत मोकळया जागेवरील कर भरल्याने पुढील काळासाठी दि.01/04/2014 पासून मोकळया जागेवरील कर बंद करण्याची मागणी केली आहे. म्हणजेच मनपाचे दोन विभाग नगररचना आणि कर निर्धारण व संकलक यांचा समन्वय (को-ऑर्डिनेशन) नसल्याचे दिसून येते.

7) विभागाने लेखा परीक्षणास सादर केलेला मागणी, वसुली व थकबाकीच्या विवरणपत्रा नूसार

दि.31/03/2013 अखेर मोकळया जागेवरील कराची रक्कम रु.27,48,80,647/- थकीत असल्याचे दिसून येते. सदर रक्कम संबधित विकासकाकडून/संबधिताकडून वसूल करुन महानगरपालिका फंडात जमा करणे आवश्यक आहे. विभागाने केलेल्या खुलाशानुसार थकबाकीची तात्काळ वसुली करुन घेण्यात येत आहे, असे नमुद केले आहे.वित्तीय वर्ष 2012-13 मधील एकूण मागणी र.35,65,86,849/- पैकी वसुल केलेली रक्कम रु.8,17,06,202/- असुन दि.31/03/2013 अखेर थकबाकी रु.27,48,80,647/- आहे. थकबाकीची रक्कम तात्काळ वसुल करावी.

8) मोकळया जागेवरील कराच्या थकबाकीचे विवरणपत्रानुसार वसुलीचे एकुण प्रमाण 23% आहे.

9) 2008-09 ते 2012-13 पर्यंत दिलेल्या बांधकाम परवानगीची संख्या व केलेल्या कर आकारणी धारकांची संख्या पुढील प्रमाणे.

सन	बांधकाम परवानगी दिलेली प्रकरण संख्या	मोकळया जागेवर कर आकारणी केल्याची संख्या	शेरा
2008-09 पुर्वीची	-	-	मोकळया जागेवरील कर दि.01/04/2008 पासून लावला. त्यापुर्वी बांधकाम परवानगी दिलेचे प्रकरणी
2008-09	107	80	सुध्दा दि.01/04/2008 पासून आकारणी करण्यास
2009-10	63	16	मंजूरी दिली आहे. बांधकाम परवानगी दिल्यानंतर
2010-11	99	-	काही वेळा जशी एखादी इमारत/विंग तयार होईल,
2011-12	69	152	त्या तारखेपासून भोगवाटा दाखला दिला जातो. त्यामुळे
2012-13	22	125	एका परवानगी प्रकरणात इमारतीनुसार कर आकारणी
			केल्याने कर आकारणी धारकांची संख्या जास्त आहे.
एकुण	360	373	

दि.01/04/2008 पूर्वीच्या काळात बांधकाम परवानगी दिली, व ज्यांनी दि.01/04/2008 पूर्वी भोगवाटा दाखला घेतला नाही, अशी प्रकरणे लेखा परीक्षणास अवगत केली नाहीत. तसेच नगर रचना विभागाने दिलेल्या बांधकाम परवानगीची नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे उपरोक्त बांधकाम परवानगी दिलेल्या प्रकरणांच्या संख्येपेक्षा कर आकारणी केलेल्या प्रकरणांची संख्या जास्त दिसत असली, तरी ती अधिकृत नाही. तसेच परवानगी दिल्यानंतर मोकळया जागेवरील कराची आकारणी करण्यासाठी कर निर्धारण व संकलन विभागाकडे कधी प्रस्ताव पाठविला, याची नोंदवही नसल्याने तपासून पहाता आले नाही. त्यामुळे नेमक्या कोणत्या विभागाच्या निष्काळजीपणाने कराची आकारणी उशीरा झाली, सबब व्याजाचे नुकसान झाले, याचीही खातरजमा करता येत नाही. विभागाकडे पुरेसे अभिलेखे / नोंदवहया नसल्याने बांधकाम परवानगी दिलेल्या सर्व मोकळया जागेवरील कराची आकारणी केली असल्याची खात्री करता आली नाही.

10) महानगरपालिका उत्पन्नाचा मोठा स्त्रोत असलेला विभाग- कर विभाग आहे. परंतू करपात्र सर्व मोकळया जागेवरील कराची आकारणी केली नाही, त्यामुळे वसुली झाली नाही. 2008-09 ते 2011-12 पर्यंत मागणी नोंदवही ठेवली नसल्याने वित्तीय वर्षाच्या सुरवातीस कराची बिले वास्तुविशारदास पाठवली

नाहीत. मोकळया जागेवरील कर व त्यावरील व्याजाची वसुलीचे प्रमाण 23% आहे. मोकळया जागेवरील कराची पूर्ण वसुली होण्यापुर्वीच संबधित जागेवरील बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र (OC), इतर परवाने, पाणी कनेक्शन दिले गेले. त्यामुळे मनपास येणे असलेल्या कराची रक्कम वसूल झाली नाही. एकंदरीत अंतर्गत तपासणी (Internal Checks), अंतर्गत लेखा परिक्षण(Internal Audit), अंतर्गत नियंत्रण (Internal Control) चा अभाव असल्याचे दिसून येते.

वसुलपात्र रक्कम रु.27,48,80,647/-

DATPMVM6001 (Ref No : 5, Hmm No : 28)

20 विकास आराखडयाची अंमलबजावणी व आरक्षित जागा संपादनाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 127 मधील तरतूदीनुसार 10 वर्षाच्या कालावधीत विहीत कार्यपध्दतीने जमीन संपादित न केल्यास आरक्षण व्यपगत होवू शकते. याकरीता शासनाने शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.टिपीबी-4305/1905/नवि11 दि.4 मे 2006 अन्वये नियोजन प्राधिकरणांना भुसंपादनाकरीता अर्थसंकल्पात खर्च करावयाच्या रकमेच्या किमान 20 टक्के अथवा विकास योजनेच्या अंमलबजावणी कार्यक्रमाप्रमाणे जागा संपादनाकरीता आवश्यक रकमेची तरतूद करण्याबाबत निर्देश दिले आहेत. परंतु 2012-13 मध्ये जमीन संपादनाकरीता अर्थसंकल्पात रु.100 लक्ष तरतूद करण्यात आली असून 2012-13 अखेर रक्कम अखर्चित राहिली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 नुसार विकास आरखडयातील आरक्षित्जागांचे संपादन करण्याचे दायित्व महानगरपालिकेचे आहे. विकास योजनेतील आरक्षित्जागांचे भुसंपादन करुन आरक्षणांचा विकास करणे महत्वाची बाब आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.33 दि.5/09/2015 अन्वयें माहिती देणेबाबत विचारणा करणेत आली होती. सदर प्राप्त माहितीनुसार यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखडयात विविध प्रयोजनांसाठी विकसित करावयाच्या 384 जागा (क्षेत्रफळ 498.18 हेक्टर) समाविष्ट आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

अ.क्र.	प्रकार	जागांची संख्या	क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये)

1	शासकीय		
निमशासकीय	28	175.51	
2	खाजगी जागा	356	322.67

मंजुर विकास योजनेनुसार एकूण आरक्षणांची संख्या 384 याप्रमाणे आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकमध्ये एकुण 19 महसुली गावांचा समावेश आहे. सदर पैकी मौजे उत्तन तारोडी, पाली, चौकी, डोंगरी या पाच गावांकरीता सन 2007 पासुन " विशेष नियोजन प्राधीकरण" म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) यांची नियुक्ती झालेली असून या पाच गावातील आरक्षणांची संख्या 52 आहे. त्याप्रामाणे उर्वरीत आरक्षणांची संख्या 332 आहे. यापैकी सी.आर.झेड. बाधीत आरक्षणांची संख्या 109 असुन उर्वरित शिल्लक असलेल्या आरक्षणांची संख्या 223 असून सदर आरक्षणांची माहिती खालील प्रमाणे

एकुण आरक्षणे	विकसीत	आगश: विकसीत	प्रगती पथावर	टीडीआर माध्यमातुन हस्तांतरीत झालेली	अविकसीत
223	48	17	15	108	35

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 127 मधील तरतूदीनुसार 10 वर्षाच्या कालावधीत विहीत कार्यपध्दतीने जमीन संपादित न केल्यास आरक्षण व्यपगत होवू शकते. याकरीता शासनाने शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.टिपीबी-4305/1905/नवि11 दि.4 मे 2006 अन्वये नियोजन प्राधिकरणांना भुसंपादनाकरीता अर्थसंकल्पात खर्च करावयाच्या रकमेच्या किमान 20 टक्के अथवा विकास योजनेच्या अंमलबजावणी कार्यक्रमाप्रमाणे जागा संपादनाकरीता आवश्यक रकमेची तरतूद करण्याबाबत निर्देश दिले आहेत. यापैकी 10 वर्षाच्या कालावधीपेक्षा जास्त अशी एकूण 35 प्रकरणे अविकसित असल्याचे दिसून आले. परंतु 2012-13 मध्ये जमीन संपादनाकरीता अर्थसंकल्पात रु.100 लक्ष तरतूद करण्यात आली असून 2012-13 अखेर रक्कम रु.100 लक्ष अखर्चित राहिली आहे. त्यामुळे वरील शासन निर्णय तसेच उक्त अधिनियमाचे काटेकोरपणे पालन झाल्याचे दिसून आले नाही.

DATNDMM5801 (Ref No : 92, Hmm No : 33)

21 2012-13 च्या लेखा परीक्षणासाठी नस्ती व अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 111064000.00/-

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियमातील कलम 6 नुसार अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही पाणी पुरवठा विभागाकडून रू1110.64 लक्ष एवढया खर्चाचे अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आले नसल्याने सदर खर्चाची पडताळणी करुन लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

अर्धसमास पत्र क्र.95 दि.15/10/2015 अन्वये लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध करण्याबाबत कळविण्यात आले असता अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही विभागाकडून खालील नमुद नस्ती व अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

(रुपये लाखात)

अ.क्र.	नस्तीचे नाव	खर्च
1	50 द.ल.लि.पाणी योजना कर्ज् परतफेड	रू.749.80
2	50द.ल.लि.पाणी पुरवठा योजना पुर्ण करणे (अर्धवट राहिलेले कामे)	रू.308.15
3	नवीन पाणी पुरवठा योजना (मनपा हिस्सा)	रू.52.69
	एकुण	रू.1110.64

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियमातील कलम 4 नुसार लेखा परिक्षणास अभिलेख् उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित प्राधिकरणाची आहे. तसेच महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियमातील कलम 6 नुसार अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही विभागाकडून उपरोक्तप्रमाणे रू.1110.64 एवढया खर्चाचे अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आले नसल्याने सदर खर्चाची पडताळणी करुन लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविता आले नाहीत. त्यामुळे वरीलप्रमाणे एकूण रु.11,10,64,000/- खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.11,10,64,000/-

DATNDMM5801 (Ref No : 77, Hmm No : 95)

22 मिरारोड (पूर्व) विभागातील गटारात व नाल्यात बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या एम.एस. करणे कामातील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 03

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 496686.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 34842.00/-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील 2011-12 मधील जिल्हा दरसुचीप्रमाणे प्रदानाची तपासणी केली असता व सादर केलेल्या दरपृथ्थकरण सुचीनुसार ठेकेदारास प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि दरपृथ:करण चुकीचे केल्याने पाईप अंथरणे व पुरवठा करणे याकामी रू34,842/- चे जादा प्रदान झाले आहे. निविदेतील स्पेसीफिकेशननुसार एकूण प्रदानापैकी ठेकेदाराची 15% रक्कम जोपर्यंत पाईपची हॅड्रॉलिक चाचणी तपासणी होईपर्यंत रोखुन ठेवण्यात आली नाही.

मिरारोड (पूर्व) विभागातील गटारात व नाल्यात बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या एम.एस. करणे कामातील अनियमितता.

अंदाजपत्रकीय रक्कम	:	रू. 2478500/-
प्रशासकीय मंजुरी	:	मा. आयुक्त दि. 27/05/2012
तांत्रीक मंजुरी	:	कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र. 28 दि.22/05/2012
निविदा मंजुरी सूचना	:	क्र. 16 (2012-13)
जाहिरात प्रसिध्दी	:	दै. फ्री प्रेस जर्नल व दै. परशुराम समाचार दि.24/05/2012
एकूण प्राप्त निविदा	:	03
ठेकेदाराचे नाव	:	मे. मानस कंन्स्ट्रक्शन (अंदाजपत्रकीय दराने (वाटाघाटीने)
कार्यादेश	:	मनपा/पा.पु./47 दि. 22/08/2012
कामाची मुदत	:	4 महिने
काम पुर्ण झाल्याची तारीख	:	दि. 18/12/2012
मोजमाप नोंदवही क्र.	:	773/ 1 ते 11
एकूण झालेला खर्च	:	रू. 2412308/-

लेखा शिर्ष	:	वितरण व्यवस्था व किरकोळ खरेदी

मिरारोड (पूर्व) विभागातील गटारात व नाल्यात बाधीत होणाऱ्या जलवाहिन्या एम.एस. करणे याकामासाठी दि. 24/05/2012 च्या दै.फ्री प्रेस जर्नल व दै.परशुराम समाचार या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या असुन प्राप्त तीन निविदापैकी सर्वात कमी दराची अंदाजपत्रकीय दराने (वाटाघाटीने) मे. मानस कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकृत करून त्यांना या कामाचे कार्यादेश देणेत आले आहेत. सदरचे काम विहीत मुदतीत पुर्ण झाले असून या कामावर झालेल्या एकूण खर्चाबाबत लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमिततांबाबत अर्धसमास पत्र क्र.109 दि.31/10/2015 अन्वये विभागास कळविण्यात आले असता विभागाकडून पत्र क्र.मनपा/पापु/1685 दि.1/12/2015 अन्वये खुलासा सादर करण्यात आला आहे. सदर खुलाश्याची पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) सदर कामाचे तांत्रीक अधिकारी यांनी मंजूर केलेले प्राकलन व त्याप्रमाणे प्रत्यक्ष झालेले कामाबाबत मोजमाप नोंदवहीतील मोजमापे तपासली असता बाब क्र. 5 नुसार आय.एस.आय. स्टॅन्डर्ड एम.एस. स्पेशलचे एकूण 12691.34 किलोग्रॅम पाईपचा पुरवठा केला असुन ठेकेदारास प्रती किलोग्रॅम रू.65.28 प्रमाणे रक्कम रू.828490/- एवढे प्रदान केलेले आहे. प्रदान केलेल्या दराबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील 2011-12 मधील जिल्हा दरसुचीप्रमाणे तपासणी केली असता व सादर केलेल्या दरपृथ्थ:करण सुचीनुसार ठेकेदारास प्रती किलोग्रॅम रू. 64/- प्रमाणे एम.एस. स्पेशल पुरवठा करणेकामी प्रदान करणे आवश्यक होते. परंतु या कामामध्ये (65.28-64) = रू.1.28 प्रती किलोग्रॅम प्रमाणे खालीलप्रमाणे जादा प्रदान झालेले आहे.

एकूण एम.एस. स्पेशल पुरवठा		12691.34कि.ग्रॅ. पुरवठा
जादा अदा झालेला दर		रू.1.28 प्रती कि.ग्रॅ.
	=	रू.12691.34 X रू.1.28
	=	रू.16245/-
जादा प्रदान वसुलपात्र रक्कम रू.16245/-		

विभागाने सादर केलेला खुलासा विचारात घेतला असून त्यांनी सादर केलेल्या दरपृथ:करणाच्या यादी नुसारच तपासणी केलेली आहे व त्यादराप्रमाणेच आक्षेप घेण्यात आलेला आहे. त्यामुळे रु.16,245/- एवढी रक्कम वसुलपात्र आहे.

2) या कामाचे मोजमाप नोंदवहीतील बाब क्र.6 नुसार पुरवठा झालेल्या एम.एस. स्पेशल पाईप अंथरणे कामी प्रती रनिंग मिटर (100 मि.मी., 150 मि.मी., 200 मि.मी., 250 मि.मी., 300 मि.मी., 350 मि.मी., 400 मि.मी. व्यास असलेले पाईप) खालीलप्रमाणे ठेकेदारास प्रदान झालेले आहे.

250 मि.मी व्यासापर्यंत पाईप	=	156.45 रनिंग मिटर X 550.50 दर प्रती रनिंग मिटर
	=	रू. 86907.98
250 मि.मी वरील व्यासापर्यंत पाईप	=	75 रनिंग मिटर X 6390.10 दर प्रती रनिंग मिटर

	=	रू.47932.50
एकूण झालेले प्रदान	=	86907.98 + 47932.50 = रू.134840/-

एकूण झालेले प्रदान व अदा झालेले दर याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील 2011-12 च्या दरसुचीनुसार खात्री केली असता दरपृथ्थ:करण करून खालीलप्रमाणे ठेकेदारास पाईप अंथरणेकामी प्रदान करणे आवश्यक होते.

जलवाहिनी प्रकार	जिल्हा दरसुची दर 2011-12	एम.एम.आरडी 10% जादा दर	एकूण रक्कम	जादा अदा दर
250 मि.मी. व्यासापर्यंत	429 + पा.क्र. 217(4.1)	42.9	471.9	550.50 - 471.90
				रू.78.60
250 मि.मी. व्यासावरील	505 + पा.क्र. 217(4.2)	50.5	555.5	639.10 - 555.5
				रू.84/-

जिल्हा दरसुचीनुसार जादा दर दिल्यामुळे खालीलप्रमाणे जादा प्रदान झालेले आहे.

250 मि.मी व्यासापर्यंत	=	156.45 रनिंग मिटर X 78.60 जादा दर
	=	रू. 12297/-
250 मि.मी व्यासावरील	=	75 रनिंग मिटर X 84 जादा दर फरक
	=	रू.6300/-
एकूण झालेले जादा प्रदान	=	12297 + 6300 = रू.18597/- (वसुलपात्र रक्कम)

वरीलप्रमाणे जादा प्रदानाची रक्कम रू.18597/- एवढी आहे. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्याची पडताळणी करता विभागाने केलेले दरपृथ:करण चुकीचे असल्यामुळे तसा आक्षेप घेण्यात आलेला आहे. त्यामुळे रू.18597/- वसुलपात्र व एकूण प्रदानाची रक्कम रु.1,34,840/- आक्षेपाधिन दर्शविण्यात येत आहे.

3) प्रस्तुत कामामध्ये पुरवठा केलेले पाईपचे प्रदान करणेपुर्वी निविदेतील स्पेसीफिकेशननुसार ठेकेदाराची एकूण प्रदानापैकी 15% रक्कम पाईपची हॅड्रॉलिक चाचणी तपासणी होईपर्यंत रोखुन ठेवणे आवश्यक होते. परंतु अशी चाचणी न करता ठेकेदारास देयकाची पुर्ण रक्कम अदा करणेत आलेली आहे.

आक्षेपाधिन रक्कम रू.4,96,686/-

वसुलपात्र रक्कम रू.34,842/-

23 सी.आय. (एस अॅन्ड एस) टायटन पाईप (LA-Class) आणि समकक्ष ISO/B.S. स्टॅन्डर्डप्रमाणे 100 मि.मी. ते 500 मि.मी.व्यास पाण्याचा पाईप पुरवठा करणे कामातील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 4903694.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4903694.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2900.00/-

लेखा संहिता 1971 मधील नियम क्र.167(2) नुसार एकूण अंदाजपत्रक तयार करून मुळ अंदाजामध्ये 10% पेक्षा वाढ होणार नाही अथवा वाढ होण्याच्या संभव असेल अथवा संकल्प चित्रात किंवा योजनेत मंजुरीसह तयार केले पाहिजेत, असे असतांना जिल्हा दरसुची पेक्षा 20% ते 24% जादा दराची निविदा नियमबाहयपणे स्विकारली आहे. मुद्रांक शुल्काची रक्कम रु.2900/- वसुल केलेली नाही. मागील वर्षा अखेरचा पाईपचा शि ल्लक साठा विचारात घेता रक्कम रु. 4903694/- रकमेच्या पाईपची अनावश्यक खरेदी केली आहे.

पाणी पुरवठा ही अत्यावश्यक सेवा असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रभागामध्ये जलवाहिन्या टाकणेसाठी विविध व्यासाच्या बिडाच्या पाईप्स पुरवठा करण्यासाठी स्थायी समिती सभा दि.22/12/2011 ठराव क्र.88 च्या मंजुरीनुसार निविदा सुचना क्र.5 (2011-12) अन्वये जाहिरात प्रसिध्दी देऊन सिलबंद निविदा मागवुन पाईप्स खरेदी करण्यात आले असुन एकूण पाईप्स खरेदीवर झालेला खर्च रक्कम रू.41,77,161/- बाबत लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमिततांबाबत अर्धसमास पत्र क्र.110 दि.31/10/2015 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून पत्र क्र.मनपा /पापु/1686 दि.11/12/2015 अन्वये खुलासा सादर केला आहे. सदर खुलाश्याची पडताळणी करता खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) प्रस्तुत पाईप खरेदी कामी दि.04/10/2011 रोजीच्या दै.फ्री प्रेस जर्नल व दै.पुढारी या वृत्तपत्रातमध्ये जाहिरात प्रसिध्दी देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. या जाहिरात प्रसिध्दीस प्रातिसाद म्हणुन खालीलप्रमाणे एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. तसेच वाटाघाटी नंतर खालीलप्रमाणे दर निश्चित करणेत येऊन त्यांना पाईप्स पुरवठा कामी वेळोवेळी कार्यादेश देणेत येऊन पाईप्सची खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच मे.नोबेल इंटरप्रायझेस याचे दर जादा आल्याने सदर निविदा नामंजूर करणेत आली आहे.

व्यास पाईप सी.आय	एम.जे.पी. डी.एस.आर. दर रूपये	मे.ओ.ई. इंन्फ्राप्रोजेक्ट यांचे निविदेतील दर	वाटाघाटी नंतरचे दर रूपये	मे.केशरी निविदेतील दर रूपये	वाटाघाटी नंतरचे दर रूपये

		रूपये			
100 मि.मी	981.76	--	--	1176.00	1176.00
150 मि.मी	1573.52	--	--	1885.00	1885.00
200 मि.मी	2303.60	--	--	2760.00	2760.00
250 मि.मी	3103.36	3827.25	3674.16	3950.00	--
300 मि.मी	4000.88	3935.00	4737.60	5095.00	--
350 मि.मी	5041.92	6211.25	5962.82	7844.00	--
400 मि.मी	4805.00	7570.50	7267.68	9547.00	--
450 मि.मी	7397.52	9135.00	8769.60	11508.00	--
500 मि.मी	8548.80	10710.00	10281.60	13474.00	--

उपरोक्त प्राप्त व मंजूर झालेल्या निविदेतील स्विकृत दरांचे लेखा परीक्षणात अवलोकन केले असता मे.केशरी ॲन्ड कंपनी यांचे दर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील जिल्हा दरसुचीच्या 20% जादा आहेत. तसेच मे.अे.ई.इंन्फ्राप्रोजेक्ट यांचे दर सरासरी 24% जादा असल्याचे निदर्शनास आले. प्रस्तुत निविदा स्थायी समितीच्या उपरोक्त ठरावाने बी-2 पध्दतीने मागवुन मंजूर करण्यात आल्या असुन कोणतीही जाहिर निविदा मागवितांना तसेच विभागाकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील जिल्हा दरसुचीमधील दर उपलब्ध असतांना व त्यानुसार सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिशिष्ट क्र.20 मधील तरतूदी तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम क्र.167(2) नुसार एकूण अंदाजपत्रक तयार करून मुळ अंदाजामध्ये 10% पेक्षा वाढ होणार नाही अथवा वाढ होण्याच्या संभव असेल अथवा संकल्प चित्रात किंवा योजनेत मंजुरीसह तयार केले पाहिजेत, असे असतांना जिल्हा दरसुची पेक्षा 20% ते 24% जादा दराची निविदा नियमबाहयपणे स्विकारली आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्याची पडताळणी करता खुलासा आक्षेपाशी संयुक्तिक तसेच साधार नसल्यामुळे मान्य करता येत नाही. पाईप खरेदीवर खर्च झालेली रक्कम रू.41,77,161/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958चे कलम 3 मधील तरतूदीनुसार मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि.01/05/2006 पासुन पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम रू.10 लाखापर्यंत मुद्रांक शुल्क रू.100/- त्यानंतर प्रत्येक 1 लाखासाठी मुद्रांक शुल्क रू.100/- (कमाल 5 लाखापर्यंत) उपरोक्त कामाचा खर्च 41 लाखापर्यंत असल्याने रक्कम रू.3100/- मुद्रांक शुल्क अनुज्ञेय आहे. परंतु ठेकेदारासोबत महानरपालिकेने केलेल्या करारासाठी 100 + 100 चे मुद्रांक वापरलेले आहे. याबाबत सादर केलेला खुलाश्याची पडताळणी करता मुद्रांक शुल्क रक्कम भरणा केल्याची प्रत सोबत जोडल्याचे नमूद केले आहे. तथापि, चलनाची प्रत अनुपालनासोबत जोडलेली नाही. त्यामुळे मुद्रांक शुल्क भरणा केल्याबाबत खात्री झाली नसल्याने रक्कम रू.2900/- चे मुद्रांक शुल्क संबंधित ठेकेदाराकडून वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

3) मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम 58 खालील दिलेल्या वित्तीय औचीत्यानुसार खरेदीचा विचार करतांना आवश्यकतेनुसार काटकसरीने व किफायतशिर खरेदी करणे आवश्यक आहे. याबाबत पाईप खरेदीची 2012-13 ची साहित्यसाठा नोंदवही तपासली असता खालील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे वित्तीय वर्षात खरेदी व दि.31/03/2013 अखेर शिल्लक साठा असल्याचे निदर्शनास आले.

व्यास पाईप सी.आय	दि.01/04/12 चा शिल्लक साठा	2012-13 मध्ये खरेदी साहित्य	2012-13 मध्ये वापरलेले साहित्य	2012-13 अखेर शिल्लक साहित्य	साहित्याची एकूण किंमत

100 मि.मी	355.50 मी	215 मी	132.50 मी	438.00	X	1176	515080/-
250 मि.मी	488.50 मी	204.00 मी	524.00 मी	172.50	X	3674	633765/-
300 मि.मी	655.50 मी	77.00 मी	672.00 मी	60.50	X	4737	286588/-
350 मि.मी	93.50 मी	--	5.00 मी	88.50	X	5962	527637/-
400 मि.मी	171.50 मी	--	27.50 मी	144.00	X	7267	1046448/-
450 मि.मी	80.00 मी	--	--	80.00	X	8769	701520/-
500 मि.मी	116.00 मी	--	--	116.00	X	10281	1192596/-
						साहित्य एकूण किंमत	4903694/-

वरीलप्रमाणे मागील वर्षाअखेरीचे शिल्लक साहित्य विचारात न घेता अनावश्यक खरेदी केल्यामुळे महानगरपालिकेचे पाईप खरेदीपोटी रक्कम रू.4903694/- विनाकारण अडकुन पडली आहे. याबाबत विभागाने केलेला खुलासा समर्थनिय नसून वित्तीय औचित्याचा भंग झाला आहे. तरी रू.4903694/- एवढा खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रू.2900/-

आक्षेपाधिन रक्कम रु.4903694/-

DATNDMM5801 (Ref No : 79, Hmm No : 110)

24 भाईंदर (पूर्व) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका सुचवेल तो इतर जलकुंभ येथुन मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे कामातील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 9660000.00/-

महाराष्ट्र उद्योग व ऊर्जा विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.02/01/1992 मधील तरतूदीनुसार ठेक्याच्या

मुदतवाढीस स्थायी समिती / महासभा यांची मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु अशी मंजुरी घेणेत आल्याचे दिसून आले नाही. निविदेतील अट क्र.1 व 2 नुसार पुरवठादाराने सादर करावयाचे अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही. टँकर फेऱ्यांची नोंदवही व लॉगबुक लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही. त्यामुळे प्रत्यक्ष फेऱ्यांची पडताळणी करता आली नाही.

भाईंदर (पूर्व) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका सुचवेल तो इतर जलकुंभ येथुन मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे याकामाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

लेखा शिर्ष व एकूण तरतूद	:	रू. 80.00 लक्ष
प्रशासकीय मंजुरी	:	मा. स्थायी समिती सभा दि. 23/06/2011 ठराव क्र. 32.
निविदा सुचना	:	सुचना क्र. 2 (2011-12)
निविदा प्रसिध्दी	:	दै. पुढारी व दै. फ्री प्रेस जर्नल दि.31/07/2011
एकूण प्राप्त निविदा	:	03
ठेकेदाराचे नाव	:	मे. सागर वॉटर सप्लायर सर्वात कमी दर रू. 385/- प्रतीफेरा वाटाघाटीने दर रू. 380/- प्रतीफेरा
कार्यादेश	:	मनपा/पा.पु./75/2011-12 दि.07/10/2011
कामाची मुदत	:	1 वर्ष दि.07/10/2011 ते दि.06/10/2012 आयुक्त यांची मुदतवाढ दि. 27/09/2012 अन्वये
एकूण झालेला खर्च	:	रू. 96.6 लक्ष

भाईंदर (पूर्व) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका सुचवेल तो इतर जलकुंभ येथुन मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे या कामासाठी दि.31/07/2011 च्या दै. पुढारी व दै. फ्री प्रेस जर्नल या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन ई-टेंडरींगद्वारे निविदा मागविण्यात आल्या असुन तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. यापैकी सर्वात कमी दर असलेली मे. सागर वॉटर सप्लायर यांची वाटाघाटीने प्रतीफेरा रू.380/- प्रमाणे निविदा स्विकारणेत येऊन मंजूर केली असून त्यांना कार्यादेश देणेत आले आहेत. सदर ठेक्यापोटी एकूण झालेल्या रु.96,60,000/- खर्चाबाबत लेखा परीक्षणास आढळून आलेल्या अनियमिततांबाबत अर्धसमास पत्र क्र.111 दि.31/10/2015 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून पत्र क्र.मनपा/पापु/1684 दि.1/12/2015 अन्वये खुलासा सादर केला आहे. सदर खुलाश्याची पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

2) प्रस्तुत टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे या कामाचा ठेका दि.07/10/2011 ते दि.06/10/2012 पर्यंत मे. सागर वॉटर सप्लायर यांना देणेत आलेला असुन सदर ठेक्याची मुदत दि.06/10/2012 पर्यंत असल्याने पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मा. आयुक्त यांनी दि.27/09/2012 रोजी मुदतवाढ दिलेली आहे. परंतु अशी मुदतवाढ किती कालावधी पर्यंत दिली आहे, याबाबतचे मा.आयुक्त यांचे मंजुरीचे आदेश नस्तीसोबत जोडलेले नाहीत. महाराष्ट्र उद्योग व ऊर्जा विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.02/01/1992 मधील तरतूदीनुसार ठेक्याच्या मुदतवाढीस स्थायी समिती/महासभा यांची मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु अशी मंजुरी घेणेत आल्याचे दिसून आले नाही, याबाबत विभागाने केलेल्या खुलाश्यामध्ये मुदतवाढ

प्रत जोडल्याचे नमूद केले आहे. परंतू मुदतवाढीची स्थायी समितीच्या मंजूरीची प्रत जोडलेली नाही. त्यामुळे सदर खुलासा मान्य करता येत नाही.

3) प्रस्तुत ठेक्याच्या बी-2 निविदेतील जनरल अटी शर्ती व अट क्र.1नुसार ठेकेदाराने पाण्याचे टँकरचे दररोजचे फेरे कोणत्या विभागात केले, यासंबंधीचा दररोजचा अहवाल कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. परंतु असे अहवाल ठेकेदाराने सादर केलेले नाहीत. अट क्र.22 नुसार ठेकेदाराने पुरविलेले टँकर वाहन यांचे आर.टी.ओ.रजिस्ट्रेशन,परमिट,रोड टॅक्स क्लियरन्स,विमा कागदपत्रे,आर.सी.बुक यांच्या फोटोप्रती पाणी पुरवठा विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतू असे अभिलेख तपासणीसाठी लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाहीत, याबाबतचे अभिलेख अनुपालनासोबत सादर करण्यात येत असल्याचे खुलाश्यात नमूद केले आहे. परंतू सदर अभिलेख अनुपालनासोबत उपलब्ध नाहीत. त्यामुळे आक्षेपाची पुर्तता होत नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही.

4) प्रस्तुत कामामध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करणेकामी ठेकेदाराने पुरवठा केलेले प्रत्येक टँकर वाहन यांचे लॉगबुक (स्कंद नोंदवही) नोंदवहया तपासणीसाठी सादर केल्या नाहीत. तसेच फेऱ्यांच्या नोंदवहया ठेवणेत आलेल्या नाहीत. त्यामुळे प्रत्येक वाहनांचा दर दिवशी किती किलोमिटर प्रवास झाला, याची माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. प्रत्यक्ष ठेकेदारास प्रदान केलेल्या देयकांची तपासणी केली असता ठेकेदारास वाहनांच्या प्रत्येकी फे-यापोटी रक्कम रू.380/- चे प्रदान केले आहे. तसेच प्रत्येक वाहनाने पाणी कोणत्या जलकुंभावरून भरले व कोणत्या ठिकाणावर खाली केले याबाबतची माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. देयकांच्या तपासणीवरून असे दिसुन आले की पाण्याचा टँकर वाहनाने दर दिवशी सरासरी 25 फेऱ्या केल्या आहेत. परंतु पाणी टँकरमध्ये जलकुंभातुन उचलणे (लोड करणे) व इच्छीत स्थळी जाऊन वाटप करणे (डाऊनपलोड करणे) या दोहोमधील वेळेची गणना तांत्रीकदृष्टया याचा विचार करता सरासरी 25 फेरे होणे अशक्यप्राय असल्याचे लेखापरिक्षणाचे मत व्यक्त करयात येत आहे. टँकर फेऱ्यांची नोंदवही व टँकरचे लॉगबुक सादर न केल्यामुळे टँकर भाडयापोटी ठेकेदारास अदा केलेली रक्कम रू.96.6 लक्ष यामध्ये साशंकता निर्माण झालेली आहे. याबाबतचे अभिलेख अनुपालनासोबत सादर करण्यात येत असल्याचे खुलाश्यात नमूद केले आहे. परंतू सदर अभिलेख अनुपालनासोबत उपलब्ध नाहीत. तरी वरील कागदपत्रे लेखा परिक्षणास सादर न केल्याने पाणी पुरवठयावरील खर्च रु.96,60,000/- लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.96,60,000/-

DATNDMM5801 (Ref No : 80, Hmm No : 111)

25 पाणी पुरवठा व मलनिस्सा:रण विभागाने नवीन नळ जोडणी व अनधिकृत नळ जोडणी नियमित करण्यासाठी वसुल केलेल्या शुल्काबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 02

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 770000.00/-

मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र. मनपा/आयुक्त/193/2011-12 दि. 04/10/2011 नुसार नवीन नळजोडण्या बंद करण्यात आल्या असतांना विभागाने अनधिकृत नळ जोडण्यांना मंजूरी दिली आहे. तसेच सदर लेखाशीर्षाखालील जमा रकमेबाबतची अभिलेखे, अनधिकृत नळ जोडण्या नियमित करण्यास मंजूरी दिल्याच्या नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध केल्या नाहीत.

1) मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना पाणी पुरवठा ही अत्यावश्यक सेवा असल्यामुळे नळाद्वारे घरगुती व वाणिज्य रूपाने पाणी पुरवठा सेवा उपलब्ध करून विहीत दराने पाणीपट्टी कर रूपाने वसुल करणे व असा पाणी पुरवठा नियमित होणेसाठी महानगरपालिका शहरात दररोज स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीकडून 86 दशलक्ष लिटर पाणी व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडून 20 दशलक्ष लिटर असे दरारोज पाणी खरेदी करून पाण्याचे वितरण करते. शहराला दररोज 150 दशलक्ष लिटर एवढया पाण्याची गरज असुन वितरणामध्ये 44 दशलक्ष लिटरची तुट पडत आहे. नळ जोडण्या वाढल्यान पाण्याचा दाब मोठयाप्रमाणात कमी होऊन शहरवासी यांना त्याचा त्रास होत असल्यामुळे व पर्यायाने नागरीकांच्या नाराजीला तोंड द्यावे लागते. यासाठी आयुक्त यांनी त्यांचेकडील पत्र क्र.मनपा/आयुक्त/193/2011-12 दि.04/10/2011 अन्वये नवीन नळ जोडणीला स्थगिती दिलेली आहे, असे असतांना योजना संकेतांक 1554 नवीन नळ जोडणी शुल्क रू.4.35 लक्ष व अनधिकृत नळ जोडणी नियमित करणे दंडशुल्क योजना सांकेतांक 1585 नुसार रू.7.70 लक्ष जमा झाले असल्याचे निदर्शनास आले. आयुक्तांचे उक्त आदेश असतांना वरील रक्कम वसुलीनुसार अनधिकृत नळ जोडण्या नियमित केल्याचे नियमबाहयपणे दिसुन आले. याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.112दि.31/10/2015 अन्वये खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाने पत्र क्र.मनपा पापु/1683 दि.1/12/2015 अन्वये खुलासा सादर केला असून सदर खुलाश्याची पडताळणी करता विभागाने सदर जमा रक्कम ही नविन नळ जोडणीची नसून अनधिकृत नळ जोडण्यांची असल्याचे नमूद केले आहे. तथापि, मा. आयुक्त यांचे आदेशानुसार नवीन नळ जोडण्या बंद करण्यात आल्या असल्याने अनधिकृत नळ जोडण्या निष्कासित करणे आवश्यक असतांना त्या नियमित करण्यात आल्या असल्याचे खुलाश्यावरुन दिसून येते. यास मा.आयुक्त यांची मान्यता घेण्यात आलेली नाही. त्यामुळे अनधिकृत नळ जोडण्या नियमित करणे ही विभागाची कार्यवाही नियमबाहय आहे.

2) लेखा परीक्षण कालावधीत (2012-13) किती नवीन नळ जोडण्या दिल्या, तसेच किती अनधिकृत नळ जोडण्या नियमित केल्या, याबाबतच्या नस्त्या विभागाने लेखा परिक्षणास उपलब्ध करून दिल्या नाहीत. त्यामुळे त्याची पडताळणी करता आली नाही. याबाबत विभागाने केलेला खुलासा संयुक्तिक नाही. त्यामुळे अनधिकृत नळ जोडणी नियमित करणे दंडशुल्क योजना सांकेतांक 1585 खालील वर्ष 2013-13 मधील जमा रक्कम रू.7,70,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.7,70,000/-

DATNDMM5801 (Ref No : 81, Hmm No : 112)

26 पाणी पुरवठा विभागानेकिरकोळ दुरुस्तीसाठी पुरविलेल्या बिडाचे पाईपच्या (सी.आय) नोंदी मोजमाप नोंदवहीमध्ये घेतल्या नसल्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 8974362.00/-

पाणी पुरवठा विभागाने पाणी पुरवठा जलवाहिन्यांच्या किरकोळ दुरुस्तीसाठी पाईपच्या साठा नोंदवहीमधून अभियंता यांना वितरीत केलेले पाईपच्या नोंदी कामाच्या मोजमाप नोंदवहीत नोंदविण्यात आलेल्या नाहीत. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 अनु.क्र.11 नुसार तांत्रीकदृष्टया प्रत्येक बाबींची मोजमापे मोजमाप नोंदवहीमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. परंतू त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

महापालिकेचा पाणी पुरवठा विभाग हा अत्यावश्यक सेवेमध्ये मोडत असल्याने महापालिकेतर्फे दैनंदिन पाणी पुरवठयाचे काम हाताळले जाते. सदरच्या कामासाठी व देखभाल दुरूस्तीसाठी 100 मि.मी.ते 500 मि.मी व्यासापर्यंतचे बिडाचे सी.आय. (एस ॲन्ड एस) टायटन पाईप्स आय.एस.नं.1536:2001 आय.एस.ओ. स्टॅन्डडप्रमाणे जाहिरात प्रसिध्दी देऊन बी-2 पध्दतीने निविदा मागवुन मे.केशरी ॲन्ड संन्स तसेच मे.अे.ई.इंन्फ्राप्रोजेक्ट यांचेकडून रक्कम रु.8974362/- चे 2918 रनिंग मीटर एवढे सी.आय पाईप खरेदी महापालिकेने केलेली आहे. परंतु प्रत्यक्षात खरेदी प्रमाणके उपलब्ध झाली नाहीत. खरेदी केलेल्या पाईप्सची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आल्यानंतर अभियंता यांच्या मागणीनुसार किरकोळ कामांच्या दुरुस्तीसाठी वाटप करण्यात आलेल्या आहेत. व तशी साठा नोंदवहीला अभियंता यांची स्वाक्षरी घेवून सदर पाईप प्रत्यक्ष किरकोळ कामांच्या दुरुस्तीसाठी वापरले आहेत. परंतू वाटप करण्यात आलेले पाईप प्रत्यक्ष कोणत्या कामावर किती प्रमाणात वापरले गेले याबाबतची मोजमापे मोजमाप नोंदवहीत नोंदविल्याच्या नोंदवहया लेखा परिक्षणास उपलब्ध केल्या गेल्या नाहीत. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 अनु.क्र.11 नुसार तांत्रीकदृष्टया प्रत्येक बाबींची मोजमापे मोजमाप नोंदवहीमध्ये नोंदविणे आवश्यक असतांना अशी मोजमापे नोंदविली गेलेली नाहीत. त्यामुळे जलवहिन्या पुरवठाकामी व त्या अनुषंगाने खरेदी केलेल्या जलवाहिन्यांची रक्कम रू.8974362/- लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

व्यास पाईप	2012-13 मध्ये वापरलेले एकूण साहित्य		साहित्य दर प्रती रनिंग मीटर		साहित्याची एकूण किंमत	ठेकेदाराचे नाव
100 मि.मी	132.00 मी	X	1176/- प्रती मीटर	=	155232/-	मे. केशरी ॲन्ड संन्स

150 मि.मी	932.00 मी	X	1885/-	=	1756820/-	--//--
200 मि.मी	626.00 मी	X	2760/-	=	1727760/-	--//--
250 मि.मी	524.00 मी	X	3874/-	=	1925176/-	मे.ओ.ई. इंन्फ्राप्रोजेक्ट
300 मि.मी	672.00 मी	X	4737/-	=	3183264/-	--//--
350 मि.मी	5.00 मी	X	5962/-	=	29810/-	--//--
400 मि.मी	27.00 मी	X	7267/-	=	196209/-	--//--
एकूण	2918 रनिंग मीटर	साहित्याची एकूण किंमत			8974362/-	

याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.113 दि.31/10/2015 अन्वये खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाने पत्र क्र.मनपा/पापु/1682 दि.1/12/2015 अन्वये खुलासा सादर केला आहे. सदर खुलाश्याची पडताळणी केली असता खुलाश्यात किरकोळ दुरुस्तीच्या कामांसाठी वापरलेल्या पाईपची मोजमापे घेण्यात आली आहेत असे नमूद केले आहे. परंतु अशी मोजमाप नोंदवही लेखा परिक्षणास उपलब्ध केली गेली नाही. त्यामुळे खुलाश्यावरुन आक्षेपाची पुर्तता होत नसल्याने सदर खुलासा मान्य करता येत नाही. तरी कामासाठी पुरवठा केलेल्या जलवाहिन्यांची रक्कम रू.8974362/- लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रू.8974362/-

27 अतिक्रमण विभागास भाडे तत्वावर पुरविण्यात आलेल्या डंपरच्या प्रदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 2247000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 76000.00/-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची "ड" प्रकरण 5 कलम 2)(1) मधील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस 1093/(2635)/ उद्योग-6 दि.16 जुलै 1993 मधील परि.3 नुसार रु.50,000/- किंवा त्यापेक्षा अधिक खर्चाच्या कामासाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक आहे.त्यानुसार जाहिर निविदा मागविण्यात आल्या नाहीत. देयकात दर्शविलेल्या दिवशी

पुरवठा केलेल्या डंपरचे लॉगबुकच्या नोंदी अथवा दैनंदिन कार्यवाहीचा तपशिल लेखा परिक्षणास तपासणीसाठी उपलब्ध झाला नाही. मनपा हद्दीत ना फेरीवाला क्षेत्रातील फेरीवाले हटविणे कामी आरोग्य विभागाकडील मंजूर दराने 3 डंपर भाडेतत्वावर घेण्यास मा.आयुक्त यांनी दि.08/11/2012 रोजी मंजुरी दिली आहे. करारनाम्यातील अट क्र.7.2 नुसार पुरवठादाराने कमी वाहन पुरवठा केल्यास मिनी टिपर ट्रक (डंपर) या वाहनासाठी रू.1,000/- प्रतिवाहन प्रतीदिन याप्रमाणे रु.76,000/- दंड वसुल करण्यात आलेला नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका अतिक्रमण विभागास रस्त्यावरील फेरीवाल्यांवर कार्यवाहीसाठी तसेच अनधिकृत बांधकामांच्या निष्कासनासाठी भाडे तत्वावर डंपर पुरविण्यासाठी आरोग्य विभागाकडील मंजूर दराने पुरवठादार मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांना अतिक्रमण विभागाने कार्यादेश क्र.मनपा/अवि/249/2012-13 दि.30/11/2012 अन्वये मिनी टिपर ट्रक (डंपर) (1.5 टन) मजूरासह रू.3,210/- प्रति वाहन प्रति दिन या दराने पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. माहे ऑगस्ट-12 ते फेब्रुवारी-13 या कालावधीत डंपर पुरवठयासाठी पुरवठादारास प्रमाणक क्र.1528 दि.25/02/2013 अन्वये रू.13,54,620 व प्रमाणक क्र.1928 दि.30/03/2013 अन्वये रू.8,92,380/- असे एकूण रू.22,47,000/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. सदर खर्च अतिक्रमण विभागास वर्ष 2012-13 मध्ये "जे.सी.बी./गॅस कटर्स/ट्रक निगा/भाडयाने घेणे" या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून करण्यात आला आहे. उपरोक्त प्रमाणकांची तपासणी करता आढळून आलेल्या त्रुटींबाबत खुलासा करण्याबाबत विभागास कळविण्यात आले असता विभागाकडून दि.14/10/2015 अन्वये सादर केलेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखापरीक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची "ड" प्रकरण 5 कलम 2)(1) मधील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस 1093/(2635)/उद्योग-6 दि.16 जुलै 1993 मधील परि.3 नुसार रु.50,000/- किंवा त्यापेक्षा अधिक खर्चाच्या कामासाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक आहे. त्यानुसार अतिक्रमण विभागाने जाहिर निविदा मागवून पुरवठादाराची नियुक्ती न करता डंपर पुरवठा करण्यासाठी आरोग्य विभागाकडील मंजूर दराने पुरवठा आदेश देण्यात आले असुन सदर कामासाठी पुरवठादाराशी करारनामा न करता आरोग्य विभागाने केलेल्या करारनाम्यातील अटी-शर्तीच्या अधिन राहून पुरवठादारास कार्यादेश देण्यात आला आहे. आरोग्य विभागाने केलेल्या करारनाम्यात अतिक्रमण विभागाच्या कामावरील खर्चाचा समावेश न करता आरोग्य विभागाच्या कामा व्यतिरिक्त पुरवठादारास अतिक्रमण विभागाचे वाढीव काम देण्यात आले आहे. आरोग्य विभागासाठी निविदा मागवितांना अतिक्रमण विभागास डंपर पुरवठयासाठी रू.22,47,000/- एवढया खर्चाचा समावेश करुन जाहिर निविदा मागविण्यात आल्या असत्या तर आरोग्य विभागाच्या निविदेत प्राप्त दरापेक्षा एकत्रित खर्चासाठीच्या जाहिर निविदेत वाजवी दर प्राप्त झाले असते. परंतू अतिक्रमण विभागाने जाहीर निविदा न मागविता अथवा आरोग्य विभागाच्या निविदेत खर्च समाविष्ट न केल्यामुळे अतिक्रमण विभागास स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही. त्यामुळे डंपर पुरवठयावरील खर्चाची रक्कम रु.22,47,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) ना फेरीवाला क्षेत्रातील फेरीवाला हटविणे कामी केलेल्या कार्यवाहीचा दैनंदिन नोंदीचा अहवाल देयकासोबत पडताळणीस उपलब्ध झाला नाही. कार्यादेशानुसार पुरवठादाराने मिनी टिपर ट्रक (डंपर) (1.5 टन) मजुरासह पुरवठा करणे आवश्यक आहे. परंतु देयकात दर्शविलेल्या दिवशी पुरवठा केलेल्या डंपरचे क्रमांक

लॉगबुकच्या नोंदी अथवा दैनंदिन कार्यवाहीचा तपशिल तपासणीस उपलब्ध झाला नाही. त्यामुळे प्रत्यक्षात पुरवठा केलेल्या वाहनांची (डंपर) खात्री करता आली नाही. याबाबत विभागाने केलेल्या खुलाश्यामध्ये कार्यादेशानुसार प्रतिदिन डंपर पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले असल्याने लॉकबुक ठेवण्याची आवश्यकता नाही असे नमूद केले आहे. सदर खुलासा संयुक्तिक नसल्याने व त्यावरुन आक्षेपाची पुर्तता होत नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही.

3) मनपा हद्दीत ना फेरीवाला क्षेत्रातील फेरीवाले हटविणे कामी आरोग्य विभागाकडील मंजूर दराने 3 डंपर भाडेतत्वावर घेण्यास मा.आयुक्त यांनी दि.08/11/2012 रोजी मंजुरी दिली आहे. आरोग्य विभागाने पुरवठादाराशी केलेल्या अटी-शर्तीच्या अधिन राहून अतिक्रमण विभागाने कार्यादेश दिले आहेत. करारनाम्यातील अट क्र.7.2 नुसार पुरवठादाराने कमी वाहन पुरवठा केल्यास मिनी टिपर ट्रक (डंपर) या वाहनासाठी रू.1,000/- प्रतिवाहन प्रतीदिन याप्रमाणे दंड वसुल करण्याची तरतूद आहे.

पुरवठादारास माहे मे-2012 ते नोव्हें-2012 या कालावधीत प्रदानाच्या देयका सोबतच्या उपप्रमाणकांची पडताळणी करता दैनंदिन कामासाठी 3 डंपर पेक्षा कमी पुरवठा केल्याचे दिसून येते. माहे मे मध्ये 26 दिवसांसाठी प्रती दिन 3 प्रमाणे 78 डंपर ऐवजी 56 डंपरचा पुरवठा करण्यात आला. 22 कमी डंपरच्या पुरवठा करण्यात आला. माहे जुन-12 मध्ये 24 दिवसांसाठी प्रती दिन 3 प्रमाणे 72 ऐवजी 53 वाहनांचा पुरवठा करण्यात आला. 19 कमी डंपर पुरवठा करण्यात आला. माहे जुलै-12 मध्ये 28 दिवसांसाठी प्रती दिन डंपर याप्रमाणे 78 ऐवजी 70 वाहनांचा पुरवठा करण्यात आला, त्यानुसार 8 डंपरचा कमी करण्यात आला. माहे सप्टें-12 मध्ये 23 दिवसांसाठी प्रती दिन 3 याप्रमाणे 59 ऐवजी 53 वाहन पुरवठा करण्यात आला आहे. 9 डपंरचा कमी पुरवठा करण्यात आला, ऑक्टों-12 मध्ये 27 दिवसांसाठी प्रती दिन 3 याप्रमाणे 81 ऐवजी 70 वाहन पुरवठा करण्यात आल्याने 11डंपरचा कमी पुरवठा करण्यात आला. नोव्हे-12 मध्ये 19 दिवसांसाठी प्रती दिन 3 याप्रमाणे 57 ऐवजी 50 डंपरचा पुरवठा करण्यात आल्यामुळे 7 डंपरचा कमी पुरवठा केल्यामुळे करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार पुरवठादाराकडून एकुण रु.76,000/- दंडात्मक रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

याबाबत विभागाने केलेल्या खुलाश्यामध्ये 3 डंपर भाडे तत्वावर घेण्यास मा.आयुक्त यांची मान्यता घेण्यात आली असली तरी कार्यादेशात प्रतिदिन पुरवठा करावयाच्या डंपरच्या संख्येचा उल्लेख केलेला नाही. तसेच आवश्यकतेनुसार डंपर मागविण्यात आले आहेत. त्यामुळे कमी डंपर पुरवठा केला अशी सदरची बाब नाही. त्यामुळे दंड वसुल केलेला नाही असे नमुद केले आहे. परंतू दैनंदिन कामासाठी किती डंपरची आवश्यकता होती व आवश्यकतेनुसार पुरवठादारास डंपर पुरवठयाचे आदेश देण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही. त्यामुळे विभागाने सादर केलेल्या खुलाश्यावरुन दंडात्मक कार्यवाही न करण्याबाबत विभागाने केलेला खुलासा संयुक्तिक नाही. तरी वर नमुद केल्याप्रमाणे मे-12 ते नोव्हेंबर-12 या कालावधीतील एकूण 76 डंपरचा कमी पुरवठा केल्याने रु.1000/- याप्रमाणे रु.76,000/- एवढी दंडात्मक शुल्काची रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.22,47,000/-

वसुलपात्र रक्कम रु.76,000/-

FDSANMM7201 (Ref No : 94, Hmm No : 90)

28 विद्यार्थ्यांना सकस आहार पुरविणेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 05

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 378429.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 60721.00/-

कार्यादेशाप्रमाणे फक्त 914 मुलामुलीकरिता सकस आहार पुरविणे आवश्यक असताना जादा पटसंख्येला सकस आहार पुरविली आहे. दोन ठेकेदारांच्या नोंदीनुसार पटसंख्येमध्ये विसंगत आढळून येते. ठेकेदारांने अन्नभेसळ प्रतिबंधक कायदा 1954 अंतर्गत खाद्य परवाना घेतल्याचे दिसून आले नाही.ठेकेदारांनी बालवाडयांना सकस आहार पुरविण्यापूर्वी सदर खाद्य पदार्थाचे चाचणी अहवाल सादर केले नाहीत.2011-12 या वर्षातील खर्चाची देयके (रुपये 378429) प्रदान केले असल्याचे दिसून येते.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 मधील नियम क्र. 86(1) चे उल्लंघन झाले आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत विद्यार्थ्यांना सकस आहार पुरविणेबाबत अर्धसमास ज्ञापन क्रं.60 दिनांक 23.09.2015 अन्वये विचारणा केली असता लेखापरीक्षण कालावधीमध्ये विभागाकडून त्यांचे उत्तर अप्राप्त असल्यांने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत 2012-2013 आर्थिक वर्षामध्ये बालवाडी विद्यार्थ्यांना सकस आहार पुरविणेबाबत फक्त एकाच वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिली, त्यानुसार Online पध्दतीने पाच निविदा प्राप्त झाल्या आहेत. वास्तवीक तीन भाषाच्या वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून स्पर्धात्मक दरांचा फायदा घेतलेले नाही.पात्र निविदेपैकी मे.प्रज्वलीत ज्ञानदिप सामाजिक महिला संस्था व मे.साई कॅटरर्स डेकोरेटर्स यांना कमी दराच्या निविदेस मा.आयुक्तांनी दिनांक 29.06.2012 अन्वये अटी व शर्तीनुसार दर मंजुरी दिलेली आहे.सदर योजनेकरिता 15 लाख तरतूद आहे.

2) मे. प्रज्वलीत ज्ञानदिप सामाजिक महिला संस्था व मे.साई कॅटरर्स डेकोरेटर्स यांना कार्यादेश क्रं.अनुक्रमेमनपा/सुजयो/78/2012-2013 व मनपा/सुजयो/78/ 2012-2013 दिनांक 04.07.2012 अन्वये बालवाडीच्या यादीप्रमाणे फक्त 914 मुला मुलीकरिता सकस आहार पुरविणे आवश्यक असताना सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे जादा पटसंख्याना सकस आहार पुरविल्याने ठेकेदारांना रू.60721/- एवढया जादा रक्कमेचे प्रदान झाले आहे.ज्या बालवाडयांना सकस आहार पुरविले आहे त्या बालवाडयांचे उपस्थिती अहवाल/हजेरीपट लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे सदर पुरवठयाबाबत खात्री करता आली नाही. सदर उपस्थिती अहवाल/ हजेरीपट अवलोकन करुन खुलासा सादर केलेला नाही.उदाहरणदाखल म्हणून नाझरेथ आगार या बालवाडीचे पटसंख्येबाबतचे लेखापरिक्षण केले असता खाली नमूद केलेल्या ठेकेदारांच्या पुरवठयांच्या पटसंख्येमध्ये विसंगती आढळून आली आहे.

अ.क्र.	संस्थेचे नांव	पटसंख्या (जुलै-12 ते डिसे.12)	पटसंख्या (जांने.13 ते मार्च13)
1	प्रज्वलीत ज्ञानदिप सामाजिक महिला संस्था	19	29
2	साई कॅटरर्स डेकोरेटर्स	21	31

वरील तक्त्यामधील बालवाडयांचे पटसंख्येबाबत तसेच इतर बालवाडयांच्या पटसंख्येबाबतचे मूळ उपस्थिती / हजेरीपट अहवालासह लेखापरिक्षणास अनुपालन सादर केले नाही.

3) प्रज्वलीत ज्ञानदिप सामाजिक महिला संस्था व साई कॅटरर्स डेकोरेटर्स या ठेकेदारांच्या नस्ती तपासल्या असता सदर ठेकेदाराकडे अन्नभेसळ प्रतिबंधक कायदा 1954 अंतर्गत खाद्य परवाना घेतल्याचे दिसून आले नाही.

4) मे प्रज्वलीत ज्ञानदिप सामाजिक महिला संस्था व मे.साई कॅटरर्स डेकोरेटर्स यांनी बालवाडयांना सकस आहार पुरविताना खाद्यपदार्थाचे चाचणी अहवाल सादर करण्याबाबत मूळ करारनाम्यात आढळून आले नाही.परंतु तसे अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे गुणवत्तापूर्ण सकस आहाराचा पुरवठा झाल्याची लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही.

5) वर्ष 2012-2013 मध्ये "सकसआहार" या लेखाशिर्षाखालील अर्थसंकल्पिय तरतुद रु.15 लाखमधून वर्ष 2011-12 या वर्षातील खर्चाची देयके (रुपये 378429) प्रदान केली असल्याचे दिसून येते. सदर प्रदानाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्रं.	संस्थेचे नांव	देयकाचा कालावधी	प्रमाणक क्र. व दिनांक	प्रदानाची रक्कम रुपये
1	नवघर महिला व बालके विकास गट	10.02.2012 ते 29.02.2012	168/29.5.2012	120940
2	नवघर महिला व बालके विकास गट	01.03.2012 ते 31.03.2012	329/3.7.2012	194649
3	नवघर महिला व बालके विकास गट		प्रमाणक उपलब्ध झाला नाही.	62840
	एकूण रुपये:			378429

वरील खर्च वर्ष 2011-2012 मधील मंजूर तरतुदीतून न करता वर्ष 2012-2013 मधील तरतुदीतून करण्यात आला

आहे.यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 मधील नियम क्रं. 86(1) नुसार सक्षम प्राधिका-यांची मान्यता घेतल्याबाबतचा साधार खुलासा लेखापरिक्षणास सादर केले नाही. तसेच तरतुद नोदवही तपासले असता नवघर महिला व बालके विकास गट यांना सकस आहाराचे रुपये 62640/- इतक्या रक्कमेचे प्रदान केल्याचे दिसते,परंतु सदर खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यास आलेली नाही.

आक्षेपाधिन रक्कम रुपये :- 378429

वसूलपात्र रक्कम रुपये :- 60721

DDDTKSM6801 (Ref No : 26, Hmm No : 60)

29 महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत प्रशिक्षणावरील खर्चातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 02

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 4311327.00/-

प्रशिक्षण 2011-2012 आर्थिक वर्षात राबविण्यात आले आहे त्यामुळे सदर खर्चाचे प्रदान प्रशिक्षण संस्थेस वर्ष 2011-2012 मधील उपलब्ध तरतूदीतून करणे आवश्यक असताना वर्ष 2012-2013 मधील उपलब्ध तरतुदीतून करण्यात आले आहे.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 मधील नियम क्र. 86(1) नुसार मागील आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पिय तरतुदीतील खर्च पुढील आर्थिक वर्षात करणे नियमबाहय् आहे.तरतूद नोंदवही तपासली असता महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत प्रशिक्षण/ शिबिरे या लेखाशिर्षाखालील रुपये 4311327/- खर्चाची प्रमाणके लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील महिला व बाल कल्याण विभागाअंतर्गत प्रशिक्षण / शिबिरे या लेखाशिर्षाखालील प्रशिक्षणबाबत अर्धसमास ज्ञापन क्रं.61दिनांक 23.09.2015 अन्वये विचारणा केली असता विभागाकडून लेखापरीक्षण कालावधीमध्ये उत्तर अप्राप्त असल्यांने लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)महिला व बाल कल्याण योजनेअंतर्गत प्रशिक्षण / शिबिरे या लेखाशिर्षाखाली रु.50 लाख इतकी तरतूद असून खाली नमूद केल्याप्रमाणे व्यवसायाचे प्रशिक्षणावर खर्च केले आहे. संगणक

प्रशिक्षणावर रु.1244000/-, ब्युटीपार्लर प्रशिक्षणावर रु.1358000/-, शिवणकाम प्रशिक्षणावर रु.408000/- व वाहन चालक प्रशिक्षणावर रु. 1123327/- खर्च करण्यात आले त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

संगणक प्रशिक्षण (रु.2000/- प्रमाणे प्रती लाभार्थी)				
अ.क्रं.	प्रमाणक क्रं. व दिनांक	लाभार्थीचीसंख्या	संस्थेचे नांव	रक्कम रु. रुपये
1	50/2.5.12	56	मे.कॉम्पूटर कॅरीयर क्लासेस	112000
2	50/2.5.12	58	मे.कॉम्पूटर कॅरीयर क्लासेस	116000
3	55/2.5.12	100	मे.ब्युटेक कॉम्पूटर एज्युकेशन	200000
4	54/2.5.12	34	मे.ग्लोबल अॅकेडॅमी फॉर कॉम्पूटर एज्युकेशन	68000
5	58/2.5.12	22	मे.युनिकॉन कॉम्पूटर एज्युकेशन	44000
6	56/2.5.12	15	मे.इन्फोलिंक कॉम्पूटर एज्युकेशन	30000
7	93/7.5.12	29	मे.आदर्श कॉम्पूटर एज्युकेशन	58000
8	93/7.5.12	20	मे.आदर्श कॉम्पूटर एज्युकेशन	40000
9	98/7.5.12	28	मे.ग्लोबल अॅकेडॅमी फॉर कॉम्पूटर एज्युकेशन	56000
10	99/7.5.12	31	मे.अरिहंत कॉम्पूटर एज्युकेशन	62000
11	102/7.5.12	11	मे.कॉम्पूटर कॅरीयर क्लासेस	22000

12	104/7.5.12	25	मे.ऑयकॉन एज्युकेशन	50000
13	105/7.5.12	103	मे.ब्युटेक कॉम्पूटर एज्युकेशन	206000
15	163/29.5.12	9	मे.युनिकॉन कॉम्पूटर एज्युकेशन	18000
16	163/29.5.12	10	मे.युनिकॉन कॉम्पूटर एज्युकेशन	20000
17	163/29.5.12	8	मे.युनिकॉन कॉम्पूटर एज्युकेशन	16000
18	163/29.5.12	5	मे.युनिकॉन कॉम्पूटर एज्युकेशन	10000
19	160/29.5.12	13	मे.ब्युटेक कॉम्पूटर एज्युकेशन	26000
20	166/29.5.12	29	मे.कॉम्पूटर कॅरीयर क्लासेस	56000
21	167/29.5.12	16	मे.ग्लोबल अॅकेडॅमी फॉर कॉम्पूटर एज्युकेशन	32000
				1244000
	ब्युटीपार्लर प्रशिक्षण			
1	57/2.5.12	54	श्रध्दा बालमहिला शिक्षण प्रसारक व समाजकल्याण संस्था	108000
2	52/2.5.12	79	मे.सिध्दीविनायक महिला आणि बालकल्याण शिक्षण प्रसारक संस्था.	158000

3	52/2.5.12	83	मे.सिध्दीविनायक महिला आणि बाल कल्याण शिक्षण प्रसारक संस्था.	166000
4	53/2.5.12	41	मे.शगुन समाज विकाससंस्था.	82000
5	53/2.5.12	68	मे.शगुन समाज विकाससंस्था.	136000
6	94/7.5.12	39	मे.खुशी पार्लर अँड क्लासेस	78000
7	97/7.5.12	51	मे.सिध्दीविनायक महिला आणि बालकल्याण शिक्षण प्रसारक संस्था.	102000
8	109/7.5.12	120	श्रध्दा बालमहिला शिक्षण प्रसारक व समाजकल्याण संस्था	240000
9	161/29.5.12	44	मे.सिध्दीविनायक महिला आणि बालकल्याण शिक्षण प्रसारक संस्था.	88000
10	161/29.5.12	75	मे.सिध्दीविनायक महिला आणि बालकल्याण शिक्षणप्रसारक संस्था.	150000
11	161/29.5.12	53	मे.सिध्दीविनायक महिला आणि बालकल्याण शिक्षण प्रसारक संस्था.	106000
12	161/29.5.12	109	मे.सिध्दीविनायक महिला आणि बालकल्याण शिक्षण	218000

			प्रसारक संस्था.	
13	161/29.5.12	32	मे.सिध्दीविनायक महिला आणि बालकल्याण शिक्षण प्रसारक संस्था.	64000
14	161/29.5.12	17	मे.सिध्दीविनायक महिला आणि बालकल्याण शिक्षण प्रसारक संस्था.	34000
				1358000
	शिवणकाम प्रशिक्षण			
1	107/7.5.12	75	मे.मराठवाडा एज्युकेशन ट्रस्ट	150000
2	165/29.5.12	21	मे.मराठवाडा एज्युकेशन ट्रस्ट	42000
3	165/29.5.12	22	मे.मराठवाडा एज्युकेशन ट्रस्ट	44000
4	165/29.5.12	8	मे.मराठवाडा एज्युकेशन ट्रस्ट	16000
5	165/29.5.12	62	मे.मराठवाडा एज्युकेशन ट्रस्ट	124000
6	165/29.5.12	16	मे.मराठवाडा एज्युकेशन ट्रस्ट	32000
				408000
	वाहन चालक प्रशिक्षण			

1	95/7.5.12	11	मे.साईनाथ मोटार ट्रेनिंग स्कूल	22000
2	164/29.5.12	18	मे.साईनाथ मोटार ट्रेनिंग स्कूल	36000
3	164/29.5.12	3	मे.साईनाथ मोटार ट्रेनिंग स्कूल	6000
4	162/29.5.12	8	मे.जनता मोटार ट्रेनिंग स्कूल	16000
5	162/29.5.12	8	मे.जनता मोटार ट्रेनिंग स्कूल	16000
6	162/29.5.12	21	मे.जनता मोटार ट्रेनिंग स्कूल	42000
7	162/29.5.12	7	मे.जनता मोटार ट्रेनिंग स्कूल	14000
8	162/29.5.12	7	मे.जनता मोटार ट्रेनिंग स्कूल	14000
9	162/29.5.12	4	मे.जनता मोटार ट्रेनिंग स्कूल	8000
10	162/29.5.12	2	मे.जनता मोटार ट्रेनिंग स्कूल	4000
				178000

वर नमूद केलेल्या लाभार्थी संख्येनुसार प्रशिक्षणावर खर्च केला आहे.परंतु सदर प्रशिक्षण संस्थेकडे किती लाभार्थीना पाठविण्यात आले व त्यापैकी किती लाभार्थ्यांनी प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष फायदा घेतला याबाबतचे संबधित प्रशिक्षण संस्थेकडील उपस्थिती अहवाल व संस्थेने प्रदान केलेली प्रमाणपत्र / बॅच परवानाबाबतची माहिती लेखापरिक्षणास सादर केलेली नाही.त्यामुळे संबधित लाभार्थीना

प्रशिक्षण मिळाल्याची खात्री करता आली नाही.

उपरोक्त प्रमाणकांची तपासणी केली असता सदरचे प्रशिक्षण वर्ष 2011-2012 मध्ये राबविण्यात आले आहे त्यामुळे सदर खर्चाचे प्रदान प्रशिक्षण संस्थेस वर्ष 2011-2012 मधील उपलब्ध तरतुदीतून करणे आवश्यक असताना वर्ष 2012-2013 मधील उपलब्ध तरतुदीतून खर्च करण्यात आला यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 मधील नियम क्र. 86 (1) नुसार सक्षम प्राधिका-यांची मान्यता घेतल्याबाबतचा साधार खुलासा सादर केलेला नाही

2) तरतूद नोंदवही तपासली असता महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत प्रशिक्षण/शिबिरे या लेखाशिर्षाखाली रु 50 लाख इतक्या तरतूदीचे खर्च तपासता खाली नमूद केलेल्या रक्कमेची प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

अ.क्रं.	संस्थेचे नांव	प्रदानाची रक्कम रुपये
1	मे.मराठवाडा एज्युकेशन ट्रस्ट	10000
2	मे.मराठवाडा एज्युकेशन ट्रस्ट	92000
3	मे.युनिकॉन कॉम्पूटर एज्युकेशन	6000
4	मे. सरस्वती महिला एज्युकेशन	114000
5	अविष्कार समाज विकास संस्था	64000
6	मे.बिटेक कॉम्पूटर एज्युकेशन	100000
7	मे.इन्फोलिंक कॉम्पूटर एज्युकेशन	40000
8	मे.साईनाथ मोटार ट्रेनिंग स्कूल	38000
9	मे.जनता मोटार ट्रेनिंग स्कूल	66000
10	मे.धारावी डेकोरेटर्स	72334
11	मे.राजहंस ग्रॅफिक्स	5000

12	मे. वैष्णवी एंटरप्रायजेस	500000
13	मे.सिने अँड फोटो स्टुडिओ	6475
14	मे.रुबी पब्लिसिटी	9518
एकूण रू.		1123327.00

आक्षेपाधिन रक्कम रुपये :- 4311327

DDDTKSM6801 (Ref No : 27, Hmm No : 61)

30 बालवाडी शाळेच्या मुलामुलींसाठी गणवेश, स्कुल बॅग,पाटी व छोटा स्टील डबा पुरवठा करणे या खर्चातील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 08

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 340370.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 21799.00/-

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-1088/(2512)/उद्योग6 दि.2 जानेवारी,1992 नुसार पाटी व शालेय गणवेश ही बाब लघुउद्योग महामंडळाकडून खरेदीसाठी राखीव असतांना निविदा मागवून खरेदी करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील परिशिष्ट "ड" प्रकरण 5(2)(2) नुसार फायदेशीर निविदा स्विकारणे आवश्यक आहे. परंतू शासन दरकरार उपलब्ध असतांना निविदा मागवून खरेदी करण्यात आल्यामुळे निविदेतील प्राप्त दर शासन दर करारपेक्षा किफायतशीर असल्याबाबत लेखा परिक्षणास आढळून आले नाही. महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील प्रकरण 7 कलम 73(ड) नुसार सदर निविदा स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करण्यात आलेली नाही. अधिनियमातील सदर तरतूदीनुसार स्थायी समितीची मान्यता न घेता पुरवठादारास प्रदान करण्यात आले. पुरवठादाराकडून विलंब शुल्काची व स्थानिक संस्थाकराची वसुली केलेली नाही. साठा नोंदवहीत अखेरचा शिल्लक साठा दर्शविण्यात आलेला नाही. लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप केल्याबाबत लाभार्थ्यांकडून पोहोच घेण्यात आलेल्या नाहीत.

मिरा भाईदर मनपा हद्दीतील एकुण 26 बालवाडयांमधील 520 मुले व 530 मुली असा एकूण 1050 विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक गणवेश देण्यासाठी जाहिर निविदा मागवून पुरवठादाराची नियुक्ती करण्यात आली असून वर्ष 2012-13 मध्ये महिला बालकल्याण विभागासाठी "बालवाडी गणवेश वाटप" व "बालवाडी मुलांसाठी साहित्य" या लेखाशीर्षाखाली उपलब्ध अनुदानातून खर्च भागविण्यात आला आहे. निविदेत यशस्वी निविदादारांना दिलेल्या कार्यादेशांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

3) कार्यादेश क्र.मनपा/109/2012-13 दि.27/8/2012

पुरवठादार - मे.ग्लोबलट्रेडींग-

पुरवठ्याची बाब - पाटी -1010 नग रु.29/- प्रतीनग

प्रमाणक क्र.-निरंक- दि.1/12/2012रु.29,290/-

) कार्यादेश क्र.मनपा/सुजयो/107/2012-13 दि.27/8/2012

पुरवठादार - मे.महाशक्ती जनजागृती एज्यु.ट्रस्ट

स्कुलबॅग - 1010 नगरु.80/- प्रतीनगरु.80,800/-

स्टीलडबा - 1010 नगरु.35/- प्रतीनगरु.35350/-

प्रमाणक क्र.-निरंक- दि.1/12/2012रु.1,16,150/-

5) कार्यादेश क्र.मनपा/सुजयो-106/2012-13 दि.27/8/2012

पुरवठादार -मे.प्रज्वलित ज्ञानदिप सामाजिक महिला संस्था

गणवेश पुरवठा - मुलींसाठी 518 नग रु.193/- प्रती नग

मुलांसाठी 492 नग रु.193/- प्रती नग

प्रमाणक क्र.1124 दि.1/12/2012 रु.1,94,930/-

विषयांकीत साहित्याचा पुरवठा करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदेच्या प्रशासकीय मान्यतेची नस्ती, पुरवठा आदेश, पुरवठा चलने व खर्चाची प्रमाणके, साठा नोंदवही यांची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींचा खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.65 दि.23/09/2015 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरीखालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-1088/(2512)/ उद्योग-6 दि.2 जानेवारी,1992नुसार तयार गणवेश खरेदी ही बाब परिशिष्ट-5 मधील नामनिर्देशित महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ यांच्याकडून खरेदीसाठी आरक्षण्ठिेवण्यात आली असतांना त्यानुसार खरेदी न करता नियमबाहयपणे जाहिर निविदा मागवून गणवेश खेरदी करण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील परिशिष्ट "ड" प्रकरण 5(2)(2) नुसार फायदेशीर निविदा स्विकारणे आवश्यक आहे. परंतू शासन दरकरार उपलब्ध असतांना निविदा मागवून खरेदी करण्यात आल्यामुळे निविदेतील प्राप्त दर शासन दर करारपेक्षा किफायतशीर असल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

2) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस-1088/(2512)/उद्योग6 दि.2 जानेवारी,1992 च्या परिशिष्ट पाच (अ),(ब) व (क) नंतर इतर संस्था याखाली अनुक्रमांक 24 नंतर मे.आदर्श ग्राम विकास उद्योग सोसायटी, घासळवाडी, पनवेल, जिल्हा रायगड या संस्थेकडून शालेय पाटी खरेदी ही बाब उद्योग उर्जा व कामगार विभाग, पुरक शासन निर्णय क्र.भाखंस-2001/(2940)/उद्योग-6,दि.19 सप्टेंबर 2003 अन्वये आरक्षित करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन उद्योग संचालनालयाकडील परिपत्रक

क्र.उसं/भांखस/दर निश्चिती/शालेय पाटी/07/20/2012/बी15491 दि.20 ऑगस्ट 2012 अन्वये शासन दरकरार उपलब्ध असतांना व सदर संस्थेचा दर रु.21.60 प्रती नग एवढा असतांना जाहिर निविदा मागवून मे.ग्लोबल ट्रेडींग या खाजगी पुरवठादाराकडून रु.29/- प्रतीनग या दराने पाटी खरेदी करण्यात आल्यामुळे 1010 नग पाटी खरेदीसाठी मनपास प्रतीनग रु.7.40 याप्रमाणे रु.7474/- एवढा जादा खर्च करावा लागला आहे. सदर जादा खर्च रु.7474/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

3) खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे जाहिर निविदेत प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता पहाता पाच पुरवठादारांच्या दरांमध्ये मोठया प्रमाणात तफावत असल्याचे दिसून येते.

कामाचा तपशिल	मे.ग्लोबल ट्रे.कं.	मे.महाशक्ती जनजागृती	मे.तिरुपती बालाजी	मे.प्रज्वलित ज्ञानदिप	मे.अे.डी.
गणवेश	375	210	492	**193**	440
स्कुलबॅग	138	**80**	292	113	382
पाटी	**29**	40	35	38	72
स्टीलडबा	118	**35**	62	43	65

बालवाडी मुलामुलींना पुरवठा करावयाच्या साहित्याचे विनिर्देश निश्चित करुन नमुना विहीत करण्यात आलेला नाही. पुरवठादाराने निविदेत दिलेल्या नमुन्यात व दराने निविदा मंजूर करण्यात आली आहे. पुरवठादाराने दिलेले नमुने हे वेगवेगळे असुन त्यानुसार प्राप्त दर हे वेगवेगळया नमुन्यांचे आहेत. त्यामुळे सदर दरांमध्ये तुलना होवून शकत नाही. निविदाधारकांनी निविदेत प्राप्त दरांची बाजारभावाशी तुलना न करता प्राप्त निविदाधारकांकडून प्राप्त दरांमध्ये कमी अधिक दरांची तुलना करण्यात आली आहे. त्यामुळे निविदादारकांचे दर बाजार भावांशी सुसंगत आहेत याची खात्री झाली नाही.

तसेच उपरोक्त दि.2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयातील परि.8.4 नुसार चिन्हांकीत नसलेल्या वस्तूंची खरेदी करतांना मालाच्या दर्जाविषयी परिशिष्ट-8 मधील नामनिर्देशित संस्थांकडून तपासणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त वस्तूंच्या दर्जाविषयक तपासणीबाबत नामनिर्देशित संस्थेकडून करण्यात आलेल्या तपासणीचा अहवाल नस्तीत आढळून आला नाही. त्यामुळे लघुत्तम दराच्या निविदाकाराने पुरवठा केलेल्या मालाच्या दर्जाविषयी लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

4) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 7 कलम 73 (ड) नुसार रु.50,000/- पेक्षा अधिक परंतु दहा लाखापेक्षा अधिक नसेल एवढया खर्चाची निविदा पुढील 15 दिवसांच्या आत स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक आहे. सदर साहित्याच्या खरेदीसाठी रु.3,40,370/- एवढा खर्च करण्यात आला आहे. त्यानुसार बालवाडी विद्यार्थ्यांना साहित्य पुरवठयासाठी मागविण्यात आलेली निविदा स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर न करता नियमबाहयपणे पुरवठादारांना रु.3,40,370/- एवढे प्रदान करण्यात आले आहे.

5) वर नमुद केल्याप्रमाणे पुरवठादारांना पुरवठयाचे आदेश दि.27/8/2012 रोजी देण्यात आले असून मालाचा पुरवठा कार्यादेशांपासून 15 दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे. करारनाम्यातील अट क्र.12 नुसार विलंबाने पुरवठा केल्यास विलंबाने पुरवठा केलेल्या साहित्याच्या किंमतीच्या 0.1 टक्के प्रति आठवडा या दराने विलंब शुल्क वसुल करणे आवश्यक आहे. पुरवठादाराने पाटीचा पुरवठा चलन क्र.66 दि.03.10.2012 अन्वये केला असून सदर पुरवठा विहीत कालावधीपेक्षा 22 दिवस विलंबाने केला आहे. स्टील डबा व

स्कुलबॅगचा चलन दि.24.09.2012 अन्वये केलेला पुरवठा विहीत कालावधीपेक्षा 14 दिवस विलंबाने केला आहे. गणवेशाचा चलन दि.24.09.2012 अन्वये केलेला पुरवठा विहीत कालावधीपेक्षा 14 दिवस विलंबाने केला आहे. विलंबाने प्राप्त झालेल्या पुरवठयावर पुरवठादारांकडून पाटीच्या पुरवठा किंमतीवर रु.88/- स्टील डबा व स्कुलबॅग पुरवठा किंमतीवर रु.232/- गणवेश पुरवठयाच्या किंमतीवर रु.390/- याप्रमाणे एकूण रु.710/- एवढा विलंब शुल्क वसुल करण्यात आलेला नाही. सदर रक्कम रु.710/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

6) करारनाम्यातील अट क्र.9 व 10 नुसार पुरवठादाराने स्थानिक संस्थाकराची नोंदणी करणे आवश्यक असून त्यानुसार कराचा भरणा करणे आवश्यक आहे. परंतू पुरवठादाराकडून सादर करण्यात आलेल्या बीलावर स्थानिक संस्था कराचा नोंदणी क्रमांक नोंदविण्यात आलेला नाही. तसेच पुरवठादाराच्या देयकातून स्थानिक संस्थाकराची वसुली करण्यात आलेली नाही. त्यामुळे एकुण खर्चाच्या 4 टक्के प्रमाणे रु.13,615/- एवढी स्थानिक संस्था कराची रक्कम उपरोक्त पुरवठादारांकडून वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

7) बालवाडीतील मुलामुलींसाठी पुरवठा केलेल्या साहित्याच्या साठा नोंदवहीची पडताळणी करता प्राप्त साठयाबाबत पुरवठा चलन क्रमांक, दिनांक व तसेच वितरित साठयाबाबत मागणीपत्रानुसार वाटपाच्या नोंदी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या नाहीत. वाटप करावयाचे साहित्य संबंधित बालवाडी शिक्षकेला वितरित करण्यात आल्याचे दिसून येते. परंतू संबधिताच्या स्वाक्षरी सोबत नाव व पदनामाची नोंद आढळून आली नाही. बालवाडी विद्यार्थ्यांना वाटप केलेल्या साहित्याबाबत संबंधित लाभार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या पोहोच लेखापरिक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष साहित्याचे वाटप केव्हा करण्यात आले याबाबत पडताळणी करुन लेखापरिक्षणास खात्री करता आली.

8) साठा नोंदवहीनुसार गणवेश, स्टील डबा, स्कुल बॅग व पाटी यांच्या प्रत्येकी 1010 प्राप्त नगांपैकी 997नग लाभार्थ्यांना वाटपासाठी वितरित करण्यात आल्याचे दिसून येते. बाबनिहाय शिल्लक 13 नगाचा अखरेच्या शिलकेची नोंदसाठा नोंदवहीत घेण्यात आलेली नाही. तसेच वर्ष 2012-13 मधील शिल्लक साठयाची नोंद 2013-2014 च्या साठा नोंदवहीमध्ये सुरुवातीच्या साठ्यात नोंदविण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रत्यक्षात शिल्लक साठयाबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

वसुलपात्र रक्कम

जादा दराने खरेदी खर्च रु.7474/-

अधिक विलंब शुल्क रु.710/-

अधिक स्थानिक संस्था कराची रक्कम रु.13,615/-

एकुण रु.21,799/-

आक्षेपाधिन रक्कम रु.3,40,370/-

FDSANMM7201 (Ref No : 44, Hmm No : 65)

31 महिला व बालकल्याण विभागाच्या मंजुर अर्थसंकल्पीय तरतूद खर्च न करण्यात आल्यामुळे वर्ष अखेर अखर्चित राहिलेल्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 04

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 12467000.00 /-

महिला व बालकल्याण विभागासाठी वर्ष 2012-13 मध्ये विविध कल्याणकारी योजनांसाठी मंजूर तरतूद रु.264.80 लक्ष यापैकी वर्ष अखेर रु.124.67 लक्ष एवढा तरतूद अखर्चित राहिली आहे. शिलाई मशिन वाटप, गलिच्छ वस्ती झोपडपट्टयांमध्ये आरोग्य / स्वयंरोजगार विकास कार्यक्रम, महिला/मुलींसाठी वस्तीगृह तयार करणे, निराधार विधवा घटस्फोटीत मुलींच्या विवाहाकरिता अर्थसहाय व मुलांना शिष्यवृत्ती, अंध अपंगांच्या कल्याणाकरीता उपाय योजनेकरीता खर्च, अंध व अपंग साहित्य पुरवठा/खरेदी या योजनांची संपुर्ण तरतूद शिल्लक राहिली आहे. त्यामुळे विभागांतर्गत विविध कल्याणकारी योजनांचा लाभ गरजवंत लाभार्थ्यांना मिळू शकला नाही. तसेच सदर अखर्चित तरतूद वर्षभर गुंतून राहिल्यामुळे तिचा इतर लोकोपयोगी कामासाठी वापर करता आला नाही.

महापालिकेच्या लेखा विभागाकडून लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आलेल्या वर्ष 2012-13 च्या जमा खर्च विवरणपत्रानुसार तसेच विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अभिलेख्यांची पडताळणी करता महिला व बाल कल्याण विभागासाठी वर्ष 2012-13 या वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पिय तरतुद व प्रत्यक्ष खर्चाच्या रकमांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(रक्कम लाखात)

अ.क्र.	उददीष्टे	2012-13 साठी मंजुर अर्थ.तरतुद	2012-13 अखेर प्रत्यक्ष खर्च	वर्ष अखेर शिल्लक अनुदान
1	2	3	4	5
1	स्थायी आस्थापना, बालवाडी	72.88	58.47	14.41
2	अस्थायी आस्थापना, बालवाडी	10.00	5.04	4.96
3	सकस आहार पुरवठा	15.00	13.28	1.72
4	बालवाडी मुलांसाठी साहित्य / शिबीरे	3.00	2.25	0.75
5	महिला बालकल्याणासाठी कार्यक्रम	50.00	49.85	0.15
6	शिलाई मशिन वाटप	3.00	--	3.00
7	गलिच्छ वस्ती झोपडपट्टयांमध्ये आरोग्य / स्वयंरोजगार विकास कार्यक्रम	2.00	--	2.00
8	बालवाडी गणवेश वाटप	5.00	3.11	1.89
9	महिला/मुर्लीसाठी वस्तीगृह तयार करणे	5.00	--	5.00

10	निराधार विधवा घटस्फोटीत मुर्लीच्या विवाहाकरिता अर्थसहाय व मुलांना शिष्यवृत्ती	3.00	0.10	2.90
	एकूण	168.88	132.10	36.88
	अंध अपंग कल्याण अंदाजपत्रक			
1	अंध अपंगांच्या कल्याणाकरीता उपाय योजनेकरीता खर्च	76.00	8.21	67.79
2	अंध व अपंग साहित्य पुरवठा/खरेदी	20.00	--	20.00
	एकूण	96.00	8.21	87.79
		264.8	140.31	124.67

वरीलप्रमाणे मंजुर तरतुद, व प्रत्यक्ष खर्चाच्या रकमांची पडताळणी केली असता मोठया प्रमाणात अर्थसंकल्पीय तरतूदी अखर्चित राहिल्याने त्याबाबत अर्धसमास पत्र क्र.66 दि.28/09/2015 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता याबाबत लेखा परिक्षण कालावधीत विभागाकडून काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) वरीलप्रमाणे मंजूर तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची पडताळणी करता अ.क्र. 6,7 व 9 येथील लेखाशीर्षाखाली वर्ष 2012-13 साठी ज्या खर्चाच्या बाबींसाठी अर्थसंकल्पीय तरतूदी करण्यात आली होती. सदर बाबींसाठी वर्षभरात काहीही खर्च करण्यात आला नाही. त्यामुळे सदर उद्दीष्टांखालील 100 टक्के तरतूद अखर्चित राहिली आहे. वर्षअखेर अपेक्षित खर्चाचा आढावा घेवून खर्च न होणारी तरतूद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम 103 अनुसार सुधारीत अंदाजात कमी करण्यात आली नाही. त्यामुळे सदर तरतूद वर्षभर गुंतून राहिली आहे.

2) वरील अ.क्र.2 अस्थायी आस्थापना बालवाडी या लेखाशीर्षाखाली मंजूर तरतूद रु.10.00 लक्ष यापैकी वर्ष अखेर रु.4.96 एवढी तरतूद अखर्चित राहीली आहे. सदर अखर्चित तरतूदीचे प्रमाण मंजुर तरतूदीच्या 50 टक्के एवढे आहे. तसेच अ.क्र.10 निराधार / विधवा/ घटस्फोटीत मुर्लीच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य व मुलांना शिष्यवृत्ती या लेखा शिर्षाखालील रु.3.00 लक्ष मंजूर तरतूदीतून वर्ष अखेर रु.2.90 लक्ष एवढी तरतूद अखर्चित राहिली आहे. सदर अखर्चित तरतूदीचे प्रमाण मंजूर तरतूदीच्या 97.44 टक्के एवढे आहे. अंध अपंग कल्याणकारी योजनांसाठी मंजूर तरतूद रु.96.00 लक्ष यापैकी वर्षअखेर रु.87.79 लक्ष एवढी तरतूद अखर्चित राहिली आहे. सदर अखर्चित तरतुदीचे प्रमाण मंजूर तरतूदीच्या 91.44 टक्के एवढे आहे.

यावरुन महिला व बालकल्याण विभागांकडून राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठी विशेष प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून येत नाही, तसेच वर्षभरातील अपेक्षित खर्चाचा आढावा घेवून अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आल्याचे आढळून येते. त्यामुळे विभागासाठी एकुण मंजूर तरतूद रु.264.8 लक्ष यामधून रु.124.67 लक्ष एवढी तरतूद अखर्चित राहिली आहे. मोठया प्रमाणात तरतूद अखर्चित राहिल्यामुळे ज्या उद्दीष्टांसाठी अर्थसंल्पीय तरतूद करण्यात आल्या ती उद्दीष्ट साध्य झालेली नाही. त्यामुळे सदर योजनांपासून गरजवंत लाभार्थी वंचित राहिले आहेत. तसेच सदर तरतूद वर्षभर गुंतून राहिल्यामुळे मनपास इतर लोकोपयोगी कामासाठी वापरता आला नाही.

FDSANMM7201 (Ref No : 45, Hmm No : 66)

32 सुवर्ण जयंती शहरी योजनेची वर्ष 2012-13 मधील विहीत उद्दीष्टये साध्य झालेली नसल्याबाबत तसेच प्राप्त अनुदान अखर्चित राहिल्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 02

शासन निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 20102932.00 /-

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत महापालिकेस वर्ष 2012-13 मध्ये मंजूर निधी, वर्ष अखेर प्रत्यक्ष खर्च व शिल्लक निधी यांची पडताळणी करता वर्ष अखेर रू2,01,02,932/- एवढे अनुदान अखर्चित राहिले आहे. अखर्चित अनुदानाचे प्रमाण मंजूर अनुदानाच्या 90 टक्के एवढे आहे. तसेच सदर योजनेंतर्गत शासनाकडून वर्ष 2012-13 साठी विहीत करण्यात आलेली घटक निहाय भौतिक उद्दीष्टये साध्य झालेली नाहीत. 2012-13 या आर्थिकवर्षासाठी मंजूर भौतिक उद्दीष्टानुसार प्राप्त निधी वर्ष 2012-13 मध्ये खर्च करणे आवश्यक असतांना मंजूर भौतिक उद्दीष्ट साध्य केली नसल्यामुळे सदर कल्याणकारी योजनेचे पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे 2012-13 च्या लेखा परिक्षणासाठी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत विभागाकडून उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांची पडताळणी करीता मंजूर निधी, वर्ष अखेर प्रत्यक्ष खर्च व शिल्लक निधी यांची पडताळणी करता लेखा परिक्षणास आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.89 दि.12/10/2015 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा सादर करण्यात आला नाही. तरी खालीलप्रमाणे लेखा परीक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) सन 2012-13 मध्ये महानगर पालिका/नगरपरिषदांना घटक निहाय साध्य करावयाची भौतिक उद्दीष्टये व देय निधी आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचे पत्र क्र.सुजयो/उद्दीष्ट धोरण/2012/का.16 दि.5 मे, 2012 अन्वये निर्धारित करण्यात आला आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महापालिकेस वर्ष 2012-13 मध्ये घटकनिहाय प्राप्त अनुदान, वर्षाअखेर प्रत्यक्ष खर्च व शिल्लक अनुदान याबाबतचा तपशिल सोबतच्या परिशिष्ट क्र. – मधील तक्ता क्र.1 मध्ये दर्शविण्यात आला आहे.

मिरा भाईंदर मनपास वर्ष 2012-13 मध्ये घटक निहाय एकूण रू.1,22,40,954/- एवढे अनुदान प्राप्त झाले

आहे. तथापि, विभागाकडून वर्ष अखेर रू.11,33,000/- एवढा खर्च करण्यात आला असून वर्ष 2011-12 अखेर शिल्लक अनुदान रू.89,02,978/- यासह एकूण रू.2,01,02,932/- एवढे अनुदान अखर्चित राहिले आहे. वर्ष 2012-13 मध्ये सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत खर्चाचे प्रमाण हे उपलब्ध अनुदानाच्या 10% एवढे असुन 90% अनुदान अखर्चित राहीले आहे. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांच्या उपरोक्त पत्रानुसार 2012-13 या आर्थिकवर्षासाठी मंजूर भौतिक उद्दीष्टानुसार प्राप्त निधी वर्ष 2012-13 मध्ये खर्च करणे आवश्यक असतांना मंजूर भौतिक उद्दीष्ट साध्य केली नसल्यामुळे सदर कल्याणकारी योजनेचे पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. यावरुन शासनाच्या सदर कल्याणकारी योजनेच्या अंमलबजावणीसाठी विभागाकडून विशेष प्रयत्न करण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

2. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत सन 2012-13 मध्ये महानगरपालिका/नगरपरिषदांना घटक निहाय साध्य करावयाची भौतिक उद्दीष्टये व देय निधी आयुक्त तथा संचालक,नगर परिषद प्रशासन संचालनालय,वरळी,मुंबई यांचे पत्र क्र.सुजयो/उद्दीष्ट धोरण/2012/का.16 दि.5 मे, 2012 अन्वये निर्धारित करण्यात आली आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी निर्धारित केलेली भौतिक उद्दीष्टये व प्रत्यक्षात वर्ष 2012-13 अखेर साध्य केलेल्या उद्दीष्टांबाबतचा तपशिल सोबतच्या परिशिष्ट क्र.------मधील तक्ता क्र.2 मध्ये दर्शविण्यात आला आहे.

परिशिष्टातील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेस शासनाकडून वर्ष 2012-13 साठी विहीत करण्यात आलेली घटकनिहाय भौतिक उद्दीष्टये साध्य झालेली नाहीत. शासनाने विहीत केलेली भौतिक उद्दीष्टये साध्य न झाल्याबाबत विभागाकडून लेखा परिक्षणास काहीही समर्पक खुलासा सादर करण्यात आला नाही. विभागाकडून सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत विशेष प्रयत्न करण्यात आले नाहीत असे दिसून येते. त्यामुळे शासनाच्या सदर कल्याणकारी योजनेचे पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.

FDSANMM7201 (Ref No : 48, Hmm No : 89)

33 अंध व अपंग कल्याण योजनेअंतर्गत केलेल्या रु.5000/- खर्चाचे प्रमाणक लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 821414.00/-

अंध व अपंग कल्याण योजनेअंतर्गत अंध व अपंग व्यक्तिला वैद्यकिय उपचाराकरीता केलेल्या रुपये 821414/- च्या खर्चाचे प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

तरतूद नोंदवही तपासले असता अंध व अपंग कल्याण योजनेअंतर्गत अंध व अपंग व्यक्तिला वैद्यकिय उपचारा करीता म्हणून रूपये 75 लाख इतकी तरतूद केली असून फक्त 821414/- इतक्या रक्कमेचे प्रदान लाभार्थ्यांना दिल्याचे तरतूद नोंदवहीवरुन दिसते. मात्र सदर देयकाचे प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्यामुळे प्रत्यक्ष लाभार्थीस फायदा झाला किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.याबाबत अर्धसमास पत्र क्रं.62 दिनांक 23.09.2015 निर्गमित करण्यात आले असता विभागाकडून उत्तर अप्राप्त आहे. महाराष्ट्र लेखापरीक्षा अधिनियमाचे कलम 4 नुसार लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध करण्याची जबाबदारी संबधित प्राधिकरणाची आहे.तसेच सदर अधिनियमातील कलम 6 अन्वये अर्धसमासान्वये मागणी करुनही सदर अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही आक्षेपाधिन रुपये :821414/-

DDDTKSM6801 (Ref No : 56, Hmm No : 62)

34 रस्ते दुरूस्ती व सुधारणा कामातील अनियमितता.

रस्ते देखभाल दुरूस्ती / सुधारणा

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 175812000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 65812000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 100626.00/-

मूळ प्रशासकीय मंजुरीपेक्षा वाढीव खर्च रक्कम रू65812000/- केला असून त्यास सुधारीत प्रशासकीय मंजुरी घेतली नाही. गौण खनिजाची रॉयल्टी रक्कम रू100626/- वसुल केल्याची खात्री करून प्रदान केले नाही.

कामाचे नाव : रस्ते दुरूस्ती व सुधारणा, रस्त्यावरील खड्डे बुजविणे, सार्व.प्रयोजनाकरीता रस्ते दुरूस्ती करून ते पुर्ववत करणे.

प्राकलन :- रु.12 कोटी

प्रशासकिय मंजूरी:-

तांत्रिक मंजुरी :- कार्यकारी अभियंता व शहर अभियंता यांनी वेळोवेळी दिली आहे.

निविदा तारीख :- नोटीस क्र. 30 दि.22/05/2012, फ्रि-प्रेस जनरल दि.28/05/2012, व मनपा वेबसाईट

एल-1निविदा :- प्रभाग क्र. 1 (प्रा. 2 कोटी) मे. अस्फाल्ट इंडिया कोर्पोरेशन 22% कमी दराने
प्रभाग क्र. 2 (प्रा. 2 कोटी) मे. पी. ई. इंन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स 17.71% कमी दराने
प्रभाग क्र. 3 (प्रा. 4 कोटी) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन 20.42% कमी दराने
प्रभाग क्र. 4 (प्रा. 4 कोटी) मे. श्री. जी. कंन्स्ट्रक्शन 23% कमी दराने

निविदा मंजुरी :- स्थायी समिती सभा ठराव क्र.36 दि.06/07/2012.

करार :- दि.25/07/2012

कार्यादेश :- मनपा/सांबा/कार्या/253/2012-13 दि.06/07/2012
मनपा/सांबा/कार्या/254/2012-13 दि.06/07/2012
मनपा/सांबा/कार्या/255/2012-13 दि.06/07/2012
मनपा/सांबा/कार्या/256/2012-13 दि.06/07/2012

मुदत :- एक वर्ष (दि. 06/07/2012 ते दि. 05/07/2013)

काम पुर्ण : पुर्ण

खर्च :- एकूण खर्च रू. 1758.12 लक्ष.

लेखा परीक्षण काळात खर्च केलेल्या निवडक प्रमाणकांचा तपशिल :-

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रूपये	प्रदानाचा तपशिल
11	08/10/2012	1475632	मे. गजानन
08	01/10/2012	1410712	मे. गजानन
19	04/12/2012	1975361	मे. गजानन
19(1)	04/12/2012	2042576	मे. गजानन
19(2)	-//-	2072062	मे. गजानन
19(3)	-//-	1804288	मे. गजानन
19(4)	-//-	2065349	मे. गजानन
23	31/12/2012	1233573	मे. अस्फाल्ट इंडिया
23(1)	-//-	2118808	मे. अस्फाल्ट इंडिया
25	09/01/2013	1491322	मे. श्री.जी.
25(1)	-//-	1932895	मे. श्री.जी.
25(2)	-//-	1923771	मे. श्री.जी.
30	22/02/2013	2184890	मे. गजानन
30(1)	-//-	1807887	मे. गजानन
32	19/03/2013	2048869	मे. गजानन
39	30/03/2013	1035693	मे. गजानन

महानगरपालिकेने रस्ते दुरूस्तीच्या निविदा प्रभागवार मंजूर केल्या आहेत. त्यानंतर जसे-जसे दुरूस्तीचे काम निघेल, त्या कामाचे स्वतंत्र प्राकलन करून संबंधित प्रभागातील मंजूर ठेकेदाराकडून कामे करून घेतली आहेत. या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.82 दि.08/10/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र. निरंक दि.18/11/2015

अन्वये केला. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम क्र.73 नुसार महापालिका सभागृहाच्या (सर्वसाधारण सभा) प्रशासकीय व आर्थिक मंजुरीशिवाय कोणतीही संविदा करता येणार नाही. रस्ते दुरूस्तीचा अंदाजित खर्च रू.12 कोटी असल्याने या प्रकरणी सर्वसाधारण सभागृहाची (महासभेची) प्रशासकीय व आर्थिक मंजुरी बाबत विभागाकडे विचारणा केली होती. विभागाने सादर केलेला महासभेचा ठराव क्र.04 दि.18/04/2013 ची प्रमाणित प्रत पहाता सन2012-13 मधील रस्ते दुरूस्ती कामाच्या प्रभागनिहाय वार्षिक निविदा मागविण्यासाठी रक्कम रू.11 कोटीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. प्रत्यक्षात या कामावर2012-13 या वित्तीय वर्षात एकूण खर्च रू.1758.12 लक्ष इतका झाला आहे. त्यामुळे प्रशासकीय मंजुरीपेक्षा जादा झालेला खर्च रक्कम रू.658.12 लक्ष असून या जादा खर्चासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नाही.

2) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम - 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारे व उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, भुकटी, गोटे, बारीख खडी, मुरुम, वाळू यांवर स्वामित्व धनाची रक्कम प्रति ब्रास रु.200/- वसुल करुन शासन खाती (महसुल व वन) भरणा करायची आहे. परंतू या प्रकरणी गौण खनिजाची रक्कम वसुल केल्याचे दिसून येत नाही. त्याचा उदाहरणादाखल तपशिल पुढील प्रमाणे :

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	वापरलेले साहित्य (cmt)				एकूण (cmt)
			Trap Rubble Stone	Crush Mettle	40,50, 60 MM	Murom H/S	
30	22/02/13	2184890	215.97	261.93	417.56	-	895.46
30(1)	-//-	1555570	-	-	213.63	-	213.63
22	24/12/12	1008951	-	-	54.36	-	54.36
25	09/01/13	1491322	-	-	209.87	-	209.87
19	04/12/12	1192024	50.54	-	-	-	50.54
						एकूण	1423.86

1423.86 +2.83 = 503.13 ब्रास X रू.200/- = रू. 100626/-

सबब रक्कम रु.100626/- वसुलपात्र आहे. विभागाने केलेल्या खुलाश्यानुसार रॉयल्टीची चलने सादर करण्यात येत आहेत, असे नमुद केले आहे. परंतु सदर चलनाच्या प्रमाणित प्रती सोबत जोडल्या नाहीत.

आक्षेपाधिन रक्कम रू. 65812000/-

वसुलपात्र रक्कम रू.100626/-

DATPMVM6001 (Ref No : 38, Hmm No : 82)

35 *रस्ता मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे कामांतील अनियमितता.*

मिरारोड (पू.) शांती पार्क रस्ता बालाजी ग्रॅंड हॉटेल ते रूची हॉटेल पर्यंत रस्ता मजबुतीकरण करून डांबरीक

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 4366740.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4209971.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 156769.00/-

महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तीका परिच्छेद क्र.150 नुसार स्विकृत निविदा 17.02% कमी दराने प्राप्त झाल्याने सुधारीत कपातीचे अंदाजपत्रक तयार केले नाही. पावसाळयात डांबरीकरण केले आहे. मोजमाप पुस्तिका क्र.795 लेखा परीक्षणास उपलब्ध करून दिली नाही. स्वामित्वधनाची रक्कम रू.156769/- वसुलपात्र आहे.

मिरारोड (पू.) शांती पार्क रस्ता बालाजी ग्रॅन्ड हॉटेल ते रूची हॉटेल पर्यंत रस्ता मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे.

प्राकलन :- रु. 4996300/-

प्रशासकिय मंजूरी:- स्थायी समिती ठराव क्र. 14 दि. 08/05/2012

तांत्रिक मंजुरी :- शहर अभियंता क्र. 17/2012-13 दि.09/05/2012

निविदा : दि. 10/05/2012 दै. लोकमत, दै. फ्री. प्रेस जर्नल व मनपा वेबसाईडवर

एल-1 निविदा : मे. गजानन कंन्सट्रक्शन 17.02% कमी दराने

निविदा मंजुरी :- स्थायी समिती सभा ठराव क्र.33 दि.29/05/2012.

करार :- दि. 01/06/2012

कार्यादेश :- मनपा/सा.बां./कार्या/124/2012-13 दि. 29/05/2012

मुदत : दि. 29/05/2012 ते 28/10/2012

काम : पुर्ण दि. 22/10/2012

खर्च :- प्र.क्र.13 दि. 05/12/2012 रू. 4366740/- MB No.795 P79 to 83

या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.103 दि.27/10/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र. निरंक दि.30/11/2015 अन्वये केला. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) या कामासाठी तीन निविदा प्राप्त झाल्या.

मे. गजानन कंन्सट्रक्शन 17.02% कमी दराने

मे. आशापुरा कंन्सट्रक्शन 16.05% कमी दराने

मे. एम. ई. प्राजेक्ट 15.55% कमी दराने

कामाची निविदा प्राकलन दराच्या 17.02% कमी दराची स्विकारली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.150 नुसार - स्विकृत निविदेचा दर प्राकलन दराचे 10% किंवा यापेक्षा कमी दराने प्राप्त झाल्याने, प्राप्त निविदा दराप्रमाणे सुधारीत प्राकलन + 5% आकस्मिक खर्चाच्या तरतुदीसह तयार केले नाही. मुळ अंदाजपत्रक रद्द करून कपातीचे अंदाजपत्रक तयार करून

कामासाठी वापरले नाही.

2) या कामाचा कार्यादेश दि.29/05/2012 रोजी दिला. कामाची मुदत दि.29/05/2012 ते 28/10/2012 असून दि.22/10/2012 रोजी काम पुर्ण झाले. म्हणजेच जुन महिन्यापासुन पावसाळा असतांना पावसाळयात रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम कसे शक्य झाले, याचा खुलासा विभागाने केला असून, त्यानुसार पावसाळयात खडीकरणाचे काम करण्यात आले होते. दि.22/10/2012 रोजी डांबरीकरण करण्यात आले, असे नमुद केले आहे. परंतु संबंधित तारखांना खडीकरण, डांबरीकरण केल्याची नोंद मोजमाप पुस्तकात नाही. मोजमाप पुस्तकात संपुर्ण मोजमापाची नोंद घेतली आहे. तारखेवार केलेल्या कामाची नोंद नाही.

3) याकामाची मोजमाप पुस्तीका क्र.795 लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही.

4) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम - 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारे व उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, भुकटी, गोटे, बारीख खडी, मुरुम, वाळू यांवर स्वामित्व धनाची रक्कम प्रति ब्रास रु.200/- वसुल करुन शासन खाती (महसुल व वन) भरणा करायची आहे. प्र.क्र. 13 दि.05/12/2012 सोबत जोडलेल्या अभिलेख्यानुसार व देयकानुसार या कामावर वापरलेले साहित्य

Agg. 830.48 cmt

Grit powder 346.95 cmt

40mm & Above 1040.86 cmt

Total 2218.29 cmt

म्हणजेच 783.84 ब्रास X रू.200/- = रू.156769/-

रक्कम रू.156769/- स्वामित्व धनाची (रॉयल्टी) वसुलीपात्र आहे.

वसुलपात्र रक्कम रू. 156769/-

आक्षेपाधिन रक्कम रू. 4209971/-

DATPMVM6001 (Ref No : 41, Hmm No : 103)

36 सामाजिक आर्थिक व जातनिहाय जणगणनेचे अभिलेखे उपलब्ध न केल्याबाबत.

जनगणना विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष :2219 शासन निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 468682.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 175754.00/-

सामाजिक आर्थिक व जातनिहाय जणगणनेचे रक्कम रु.1,75,754/- इतक्या खर्चाचे अभिलेखे उपलब्ध करण्यात आलेले नाहीत.

2012-13 या वित्तीय वर्षामध्ये जणगणना 2011 या शिर्षाखाली प्रमाणक क्र.67 दि.03.05.2012 अन्वये रक्कम रु.48257/-, प्रमाणक क्र.460 दि.18.07.2012 अन्वये रक्कम रु.127497 व प्रमाणक क्र.1282 दि.21.12.2012 अन्वये रक्कम रु.292928/- अशी एकुण रक्कम रु.4,68,682 एवढा निधी खर्ची टाकण्यात आला आहे.

त्यानुसार प्रमाणक क्र.1282 अन्वये रक्कम रु.2,92,928/- एवढा अखर्चित निधी / रक्कम जिल्हाधिकारी ठाणे यांचे पत्र क्र.सामान्य/कक्ष4/टे10/जग/अवि 181/2012 दि.01.09.2012 नुसार धनादेशाद्वारे कलेक्टर ऑफीस, ठाणे यांचेकडे जमा करण्यात आलेला आहे. अर्धसमास ज्ञापन क्र.58 दि.22/09/2015 अन्वये अभिलेख उपलब्ध करणेबाबत विनंती केली असता प्रमाणक क्र.67 व 460 शी संबंधित अभिलेखे उपलब्ध करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे खालीलप्रमाणे आक्षेप ठेवण्यात आलेले आहेत.

प्रमाणक क्र.67 अन्वये संगणक भाडयाने घेण्यासाठी रु.2950/- प्रति नग प्रतीमहा (सर्व करासहीत) याअन्वये 8 नग संगणक भाडयाने घेण्यात आले असुन त्याकरिता रक्कम रु. 48257/- एवढा खर्च केला असून त्याबाबतची मुळ नस्ती, पत्रव्यहार इ. अभिलेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करण्यात आलेले नाहीत. तसेच प्रमाणक क्र.460 दि.18.07.2012 अन्वये Tablet Pc ची बॅटरी चार्ज करणेसाठी स्वीच बोर्ड भाडयाने घेण्यात आले असून त्यासाठी रक्कम रु.1,27,497/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. तथापि त्यासंबधीत नस्ती, टिपण्या व इत्यादी अनुषांगिक अभिलेखे, तरतूद रजिस्टर इ. लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आलेले नाही. त्यानुसार रक्कम रू.1,75,754/- इतका खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम - रू. 1,75,754/-

DGPAGPM8503 (Ref No : 61, Hmm No : 58)

37 देयके मंजूर करतांना बांधकाम विभागातील मोजमाप पुस्तकाबाबत विहित कार्यवाही केली नसल्याबाबत....

सार्व. बांधकाम विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष :00 मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

मोजणी पुस्तकांतील संबंधित नोंदीवर काट मारणे व देयकावर आणि मोजणी पुस्तकांत प्रतिसंदर्भ नमुद करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. देयके मंजूर करतांना बांधकाम विभागातील

मोजमाप पुस्तकावर प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. विभागाने साठा नोंदवही लेखा परीक्षणास दाखविली नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे 2012-13 या वित्तीय वर्षाचे बांधकाम विभागाचे व पाणी पुरवठा विभागाच्या मोजमाप पुस्तिकांची(उदा. मोजमाप पुस्तक क्र.688.700 page no.51ते55,702 page no.32,704 page no.60ते62,705 page no.66ते68,708page no.48ते51,714page no.57ते61,775,802page no.66ते67,803, 805,806,809,894 इ.) लेखापरीक्षण करताना पुढील अनियमितता आढळुन आल्या.

1) महानगरपालिकेने नगरपालिका लेखा संहिता 1971 नुसार लेखे ठेवले आहेत. लेखा संहिता नियम 180 नुसार मोजमाप पुस्तकात (M.B.) केलेल्या बांधकामाच्या नोंदी मोजमाप पुस्तकात घ्यावयाच्या आहेत. नियम 180(3) नुसार जेव्हा देयक मंजूर करण्यात येतील तेव्हा मोजणी पुस्तकांतील संबंधित नोंदीवर काट मारणे व देयकावर आणि मोजणी पुस्तकांत प्रतिसंदर्भ नमुद करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ट 24 मोजमापे नियम अ.क्र. (15) नुसार बिल संमत झाल्याबरोबर मोजमाप नोंदवहीत नोंदी दुसऱ्या लाल शाईने कर्णरेषेने खोडुन टाकणे आवश्यक आहे. गोषवाऱ्याखाली बिल संमत करण्यात आले आहे, त्याची एकूण व निव्वळ रक्कमा लिहून प्रमाणक क्रमांक व दिनांक दर्शविणारी नोंद लाल शाईने करणे आवश्यक आहे. परंतु सक्षम अधिकाऱ्यांनी देयक संमत/मंजूर करतांना मोजमाप पुस्तकातील नोंदी लाल शाईने कर्णरेषेने खोडून टाकल्या नाहीत. प्राधिकृत अधिकाऱ्याने नियम 180(4) नुसार मोजमाप पुस्तकातील तपासणी केल्याबद्दल स्वाक्षरी केली नाही. त्यामुळे एखादया देयकाचे दुबार प्रदान टाळण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही केली नसल्याचे दिसते. सबब वरील अर्धसमास ज्ञापन क्र.94, दि.14/10/2015 व ज्ञापन क्र.118 दि.17/11/2015 अन्वये विचारणा केली होती. तथापि संयुक्तिक खुलासा प्राप्त झाला नाही.

3) नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम 180(5) नुसार मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही नमुना 137 मध्ये ठेवायची आहे. विभागाने साठा नोंदवही ठेवुन त्याचा वापर दाखविणे आवश्यक आहे. यासाठी अर्धसमास ज्ञापनपत्र देवुनही विभागाने साठा नोंदवही लेखा परीक्षणास दाखविली नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 62, Hmm No : 94)

38 अग्नीशमन विभागाकडून देण्यात येणाऱ्या ना हरकत प्रमाणत्राच्या अनुषंगाने वसूल करण्यात येणा-या कॅपीटेशन फीच्या 10% दरवाढीला शासनाची मंजूरी नसतांना वाढीव दराने कॅपीटेशन फी वसुलीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

महापालिकेने इमारत विकास धारकाकडून वसुल होणाऱ्या कॅपिटेशन फीच्या दरात 10टक्के वाढ करण्यास महासभेने मान्यता दिली आहे. परंतू अशा वाढीस शासनाची मंजूरी नसतांना सदर वाढीव दराने कॅपीटेशन फी वसुल केली आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाय योजना अधिनियम 2006 मधील कलम 13 व 14 मधील तरतुदीनुसार ना हरकत प्रमाणपत्र देताना ठरवून दिलेल्या विहीत दरानुसार इमारत विकास धारकाकडून कॅपीटेशन फी वसूल करण्यात येत असते. अशा फी वसूलीबाबत अस्तीत्वात असलेले जूने दरात महासभा ठराव क्र.93 दिनांक 17/03/2007 अन्वये 10 % वाढ करणेस सभेने मंजूरी दिली असून 2012-2013 या वर्षात सुधारित दरानुसार कॅपीटेशन फी वसूल करुन मनपा फंडामध्ये जमा केली आहे. परंतू अशा दरवाढीस उक्त् नियमातील कलम 12 (ब) नुसार शासनाची पूर्वमंजूरी घेणे आवश्यक आहे. शासनाकडे असा प्रस्ताव गेल्यानंतर शासन ही बाब राजपत्रात प्रसिध्द करून तसा आदेश महापालिका प्रधिकरणाला देते. महापालिकेला असे आदेश प्राप्त् झाल्यानंतर सदर आदेश स्थानिक वृत्त्पत्रात जाहीर प्रसिध्द करुन महापालिकेच्या नोटीस बोर्डावर जनतेच्या माहितीसाठी ठेवणे आवश्यक आहे. परंतू विभागाने 10% कॅपीटेशन फी दरवाढी बाबत अद्यापर्यंत शासनाची मंजूरी घेतलेली नाही. त्यामुळे उक्त आधिनियमातील कलमाचे पालन झाल्याचे दिसून आले नाही. याबाबत आवश्यक खुलासा करणेस अर्धसमास पत्र क्र.09 दि.19/08/2015 अन्वये विभागास कळविण्यात आले असता विभागाकडून पत्र क्र.मिभा/मनपा /अग्नि/401 दि.25/08/2015 अन्वये खुलासा सादर केला आहे. सदर खुलासा पडताळणी केली असता सदरचा ठराव शासनाच्या मंजूरीकरीता व राजपत्रात प्रसिध्दी करण्याकरीता तातडीने प्रस्ताव सादर करण्यात येईल असे नमूद केले आहे. त्यामुळे सध्यस्थितीत आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

DATNDMM5801 (Ref No : 75, Hmm No : 09)

39 अग्निशमन दलाकरीता 39 मीटर उंच एरियल लॅडर प्लॅट फॉर्म (टी.टी.एल) वाहन खरेदीतील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 04

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 67605312.00/-

अग्निशमन दलाकरिता 39 मीटर उंच एरियल लॅडर प्लॅट फॉर्म (टी.टी.एल) वाहन खरेदी करण्यात आले आहे. परंतू राष्ट्रीय स्तरावरुन वृत्तपत्र जाहिरात प्रसिध्दी देण्यात आली नाही. शासन निर्णयानुसार लॅडर खरेदी कामी मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांची पूर्वमान्यता घेण्यात आली नाही. इमारत बांधकामासाठी 45 मीटर उंची पर्यत बांधकाम परवाने देण्यात आले आहेत. परंतू अग्निशमन दलाकरिता 39 मीटर उंच एरियल लॅडर प्लॅट फॉर्म (टी.टी.एल) वाहन खरेदी करण्यात आले.

प्रशासकिय व आर्थिक मंजूरी	:- महासभा दि.10.10.2008
जाहिरात प्रसिध्दी	:- हिंदुस्थान टाईम्स दि.05.09.2010 महाराष्ट्र टाईम्स दि.05.09.2010
तांत्रीक मंजूरी	:- मा.आयुक्त दि.26.08.2010
निवीदा स्विकृती अंतिम	:- दि.11.11.2010.
वाढीव तारीख	:- ---
एकुण प्राप्त निवीदा	:- 1. मे.मेटझ रु.5,26,96,380/- (युरो कंरन्सी 87273 @ रु.60/-) 2. मे.इग्नेस ब्रान्टेक्नीक रु.5,60,22,518/- (युरो कंरन्सी 901089 @ रु.62/-) 3. मे.रोझन बॉर रु.5,16,63,228/- (युरो कंरन्सी 861053 @ रु.60/-)
निविदा उघडल्याचा दिनांक	:- दि.24.12.2010 गठित समिती समोर.
मनपा बॅक खाते क्रमांक	:- बॅक ऑफ बडोदा करंट खाते क्र. 34154020000030
फॉरेन लेटर ऑफ क्रेडीट	:- दि.18.04.2015.
कार्यादेश कमांक	:- 250 दि.17.03.2011.
वाहन स्विकारणेची मुदत	:- 12 महिने (कार्यादेशापसून)
करारनामा	:- दि.17.03.2011
बॅक गॅरेटी	:- दि.06.04.2011
कस्टम डयुटी	:- रु.1,59,82,098/- धनादेश क्र.426898 दि.05.05.2012
वाहनाचा खर्च	:- रु.5,16,63,214/- (861053 युरो)

अग्निशमन दलाकरिता 39 मीटर उंच एरियल लॅडर प्लॅट फॉर्म (टी.टी.एल) वाहन

खरेदीकरिता दि.05.09.2010 च्या दैनिक हिंदुस्थान, दैनिक महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देउन "ई" निवीदा पध्दतीने शिलबंद निवीदा मागविण्यात आल्या असून प्रस्तुत वाहन खरेदी कामी एकूण तीन निवीदा प्राप्त झाल्या असून अशा निवीदा दि.24.12.2010 रोजी निवीदा गठित समिती समोर उघडण्यात आल्या प्राप्त निवीदापैकी सर्वात कमी दर असलेली मे.रोझन बॉर कंपनी (ऑस्टोलिया स्थित असलेली) यांची रक्कम रु.5,16,63,224/- ची निवीदा स्विकारणेत येउन त्यांना सदरचे वाहन खरेदीसाठी दि.17.03.2011 रोजी कार्यादेश देणेत आले असून वाहन अग्निशमन विभागास दि.02.05.2012 या दिवशी प्राप्त झाले. सदर वाहन खरेदीवरील खर्चाबाबत लेखापरिक्षणास आढळून आलेल्या अनियमितंताबाबत खुलासा करण्यास अर्धसमास पत्र क्र.13 दि.24/08/2015 अन्वये विभागास कळविण्यात आले असता विभागाकडून पत्र क्र. मिभा/मनपा/अग्नी/434 दि.3/09/2015 अन्वये खुलासा सादर करण्यात आला असून सदर पडताळणी करता खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) प्रस्तुत वाहन खरेदीच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि.26.08.2010 रोजी मंजूरी दिली असून अहवालानुसार निवीदा प्रसिध्दीसाठी राज्य स्तरीय, राष्ट्रीय स्तरावर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील एका वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन ई.टेंडरव्दारे निवीदा मागविणे आवश्यक होते. परंतु वाहन खरेदी करिता केवळ राज्य व राष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देऊन निवीदा मागविण्यात आल्याचे निदर्शनास आले. आंतराष्ट्रीय वृत्तपत्रात प्रसिध्दी न दिल्यामुळे वाहन खरेदीमध्ये स्पर्धात्मक दराचा लाभ अग्निशमन विभागास मिळालेला नाही असे लेखा परिक्षणात स्षट मत नोंदविण्यात येत आहे त्यामुळे वाहन खरेदीत अनियमितता झाल्याचे दिसून आले याबाबत विभागाने सादर केलेला खुलासा परिपुर्ण नसल्याने व आक्षेपाची पुर्तता होत नसल्याने मान्य करता येत नाही.

2) प्रस्तुत लॅडर वाहनाची उत्पादित कंपनी देशामध्ये नसलेने परदेशातून म्हणजेच ॲस्ट्रोलियामधून खरेदी करण्यात आले आहे. परंतू अशी उत्पादित कंपनी स्वदेशी बनावटीची नसलेबाबत पुरावे दाखल केले नाहीत त्यामुळे सदर वाहन स्वदेशी कंपीन कंपनीकडे उपलब्ध नसल्याच्या सत्यतेबाबत पडताळणी करता आली नाही. शासन निर्णय क्र.अशस 1407/360/प्र.क्र.211/नवि-20/मंत्रालय मुंबई दिनांक 31/08/2009 मधील मुद्दा क्र.5 अन्वये आवश्यक अग्निशमन वाहने, रेस्क्यू वाहने उंच शिडया व इतर रेस्क्यू उपकरणे व संयत्रे खरेदी कामी त्यांचा दर्जा व तपशील मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा हयांच्याकडून विहीत करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. परंतू वाहनाचा दर्जा व तपशीलास मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांची मान्यता घेण्यात आलेली नाही. तोपर्यंत झालेला खर्च रक्कम रु.5,16,63,214/- + कस्टम डयुटी खर्च रु.1,59,82,098/- = रु.6,76,05,312/- लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. याबाबत विभागाने सादर केलेला खुलासा विचारात घेता उपरोक्त शासन निर्णयानुसार मा.संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांची

मंजूरी घेणे आवश्यक होते. परंतू अशी मंजूरी घेण्यात आलेली नाही. तरी आक्षेप कायम करण्यात येत आहे. आक्षेपाधिन रक्कम रु.6,76,05,312/-

3) प्रस्तुत LTT लॅडर वाहन 39 मीटर उंच असलेले खरेदी केलेले आहे. अग्निशमन विभागाने इमारत बांधकामसाठी ना हरकत प्रमाण पत्र देताना 45 मीटर उंची पर्यत परवाने दिलेले असल्याचे नस्तीवरून दिसून आले. जादा 6 मीटर उंचीवरील आग विझविणेसाठी पुढील व्यवस्था कशा प्रकारे करण्यांत येणार याबाबत उपाययोजनांचा आढावा वाहन खरेदी करतांना केल्याचे दिसून आले नाही. याबाबत विभागाने सादर केलेला खुलासा संयुक्तिक नाही. 39 मीटर उंच लॅडर वाहन खरेदी केल्यामुळे त्याचा अग्नीशमन विभागास परिपूर्ण उपयोग झाला असे म्हणता येणार नाही.

4) प्रस्तुत लॅडर वाहन अग्निशमन विभागास दि.02.05.2012 रोजी प्राप्त झाले असून सदर वाहनाचा आग विझविण्यासाठी किती प्रमाणात उपयोग झाला याबाबतच्या पडताळणी साठी वाहनाचे लॉगबूक उपलब्ध झाले नसल्याने वाहन फे-या व उपयोगिता हयांची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही. त्यामुळे खरेदी केलेले वाहन आवश्यकते नुसार खरेदी केले गेले असे लेखा परिक्षणात म्हणता येणार नाही. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्याची पडताळणी केली असता विभागाकडून पुर्ण वर्षात सदर वाहनाने आग विझविण्यासाठी 04 फेऱ्या केल्याचे दिसून येते. परंतू याबाबतचे लॉगबुक सादर केले नसल्याने आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.6,76,05,312/-

DATNDMM5801 (Ref No : 76, Hmm No : 13)

40 विधी अधिकारी व संगणक चालक यांनी केलेल्या परतीच्या विमान प्रवासाच्या रकमेचे अतिप्रदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष : विधी विभाग मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 11017.00/-

सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे याचिकेत अर्ज दाखल करण्यासाठी महानगरपालिकेच्या विधी विभागाकडील

विधी अधिकारी व संगणक चालक यांना अनुज्ञेय नसताना केलेल्या परतीच्या विमान प्रवासाचे झालेले अतिप्रदान रक्कम रु.11017/- वसूलपात्र आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विधी विभागातील विधी अधिकारी व संगणक चालक यांचे विमानाने जाण्या-येण्याचे विमान प्रवासाच्या देयक/ प्रमाणक क्रमांक 1253, दिनांक 17/09/2012 रक्कम रु.32134/- चे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 100 दिनांक 19/10/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. विभागाने त्यांचे पत्र क्रमांक जा.क्र. मनपा/विधी/41/शासकीय/2015-16, दिनांक 3/11/2015 अन्वये खुलासा केलेला आहे. विभागाने केलेला खुलासा विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) विधी विभागातील विधी अधिकारी व संगणक चालक यांचे सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे याचिकेत अर्ज दाखल करण्यासाठी दिनांक 5 व 6 ऑगस्ट 2012 चे विमानाने जाण्या-येण्याचे विमान प्रवासाचे प्रमाण क्रमांक 1253, दिनांक 17/09/2012, रक्कम रु.32134/- चे प्रदान ट्रीनिटी एक्सकूरशन्स यांना केले आहे. सदर प्रदान केलेली रक्कम रु.32134/- चे प्रमाणकाची तपासणी केली असता अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 100 दिनांक 19/10/2015 अन्वये मागविण्यात आलेली माहिती विभागाने त्यांचे उपरोक्त पत्रान्वये दिली असून दि.4/08/2012 च्या टिपणीमध्ये विधी अधिकारी यांनी सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे हजर राहण्यास परवानगी मागितली आहे. तथापी सदर कामाच्या नस्तिमधील दिनांक 23/08/2012 रोजीच्या टिपणी मध्ये विधी अधिकारी श्रीमती सई वडके व संगणक चालक श्री प्रमोद जाधव यांना सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे जाण्यासाठी परवानगी दिल्याचे नमूद असून टिपणीला आयुक्तांनी मंजूरी दिली आहे. आयुक्तांच्या पुर्वपरवानगी शिवाय कोणत्याही अधिका-याला व कर्मचा-याला विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही, परंतू तातडीच्या प्रसंगी आयुक्तांची कार्योत्तर मंजूरी घेऊन विमान प्रवास अनुज्ञेय असेल असे असले तरी तातडीच्या व महत्वाच्या प्रसंगी आयुक्तांच्या मान्यतेने विमान प्रवास जाण्यासाठी अनुज्ञेय आहे परतीच्या प्रवासासाठी नाही. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे जाण्यासाठी केलेला प्रवास अनुज्ञेय होत आहे, परंतू दिल्ली येथून कार्यालयास परतताना तातडीचे/महत्वाचे काम नसल्याने तातडीने प्रवास करणे आवश्यक नाही. तसेच सचिव किंवा सचिव दर्ज्याच्या अधिका-यांनाच फक्त विमान प्रवास अनुज्ञेय आहे. त्यामुळे विधी अधिकारी आणि संगणक चालक यांनी केलेला परतीचा विमान प्रवास अनुज्ञेय होत नाही. अधिकारी/ कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतनानुसार प्रवास पात्रता विहित केली असून विधी अधिकारी यांना प्रथम श्रेणी वातानुकूलित 2 स्तर शयन यान व संगणक चालक यांना द्वितीय वर्ग शयनयान रेल्वे प्रवास पात्र आहे. विधी अधिकारी यांनी अनुज्ञेय नसलेला केलेला परतीचा विमान प्रवास खर्च रु.8156/- वजा त्यांना अनुज्ञेय असलेले रेल्वेचे प्रवास भाडे रु.4710/- यामधील तफावत रक्कम रु.3446/- वसूलपात्र ठरते. तसेच संगणक चालक यांना अनुज्ञेय नसलेला परतीचा विमान प्रवास खर्च रु.8156/- वजा त्यांना अनुज्ञेय असलेले रेल्वेचे प्रवास भाडे रु.585/- यामधील तफावत रक्कम रु.7571/- वसूलपात्र ठरते. त्यामुळे विधी अधिकारी यांच्या देय वेतनातून रु.3446/- व संगणक चालक यांच्या देय वेतनातून रु.7571/- वसूली करणे आवश्यक आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 11017/-

DATAMSM6401 (Ref No : 34, Hmm No : 100)

41 विधी विभागाने अभियोक्त्याची पॅनलवर नेमूण केली नसताना मानधनाचे नियमबाह्य प्रदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष : विधी विभाग मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ
आक्षेपाधीन रक्कम रु. 115000.00/-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विधी विभागाने महानगरपालिकेचे सर्वोच न्यायालय येथे न्यायालयीन कामकाज चालविणेसाठी अभियोक्ता नेमणूकीबाबत व अभियोक्त्याच्या मानधनाबाबत स्थायी समिती ठराव किंवा आयुक्तांनी दिलेली मान्यता दिसून आली नाही. त्यामुळे सर्वोच न्यायालय येथे खटला /दावा, न्यायालयीन कामकाज चालविणेसाठी अभियोक्ता ॲड. विनय नवरे यांना प्रदान करण्यात आलेली मानधनाची रक्कम रु.115000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विधी विभागाने महानगरपालिकेचे न्यायालयीन कामकाज चालविण्यासाठी अभियोक्त्यांची पॅनलवर नेमणूक करण्याबाबत तसेच वकिलांच्या मानधनाबाबतचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 100 दिनांक 19/10/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. विभागाने त्यांचे पत्र क्रमांक जा.क्र. मनपा/विधी/41/शासकीय/2015-16, दिनांक 3/11/2015 अन्वये खुलासा केलेला आहे. यामध्ये ठरावाच्या व अहवालाच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देण्यात आल्या असून त्यापैकी अ.क्र.(1) प्रशासकीय ठराव क्र.3, दिनांक 15/03/2002 नुसार वकीलांना वाढविलेल्या दराने फी ची बीले अदा करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे, असे नमूद आहे. अ.क्र.(2) स्थायी समिती ठराव क्रमांक 65, दिनांक 27/07/2006 नुसार वकीलांची नेमणूक व त्यांची फी ठरविणे याबाबत मंजूरी देण्यात येत आहे, असे नमूद आहे. अ.क्र.(3) अहवाल दिनांक 5/08/2006 नुसार सुधारित मानधन आकारणी संदर्भात मान्यतेबाबत आहे. अ.क्र.(4) अहवाल दिनांक 5/10/2013 नुसार ॲड. विनय नवरे यांची महानगरपालिका अभियोक्ता पॅनलवर नियुक्ती करण्यास तसेच त्यांचे वकिल फी चे दर निश्चित करणेबाबत आहे. अ.क्र.(5) अहवाल दिनांक 27/03/2015 यामध्ये सुधारित वकीलांची फी च्या शिफारशी बाबत आहे. उपरोक्त अ.क्र.1 ते 3 ठराव, अहवालामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या वकीलांच्या फी व नेमणूकी बाबत मान्यता, ठराव केलेला नाही. तसेच अ.क्र.4 व 5 वरील अहवाल हे आर्थिक वर्ष 2012-13 या कालावधी नंतरचे आहेत. याबाबत. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) 2012-13 या आर्थिक वर्षामधील दि. 01/04/2012 ते दि. 31/03/2013 या कालावधीमध्ये मिरा भाईंदर मनपाचे न्यायालयीन कामकाज चालविणेसाठी (1) औद्योगिक न्यायालय, (2) न्यायालय, ठाणे, (3) जिल्हा न्यायालय व (4) उच्च न्यायालय येथे महापालिकेच्या पॅनलवर विधी सल्लागार म्हणुन नेमणुक केलेल्या वकीलांची व त्यांना देण्यात येणाऱ्या मानधन दराबाबत स्थायी समितीच्या ठरावाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 मधील नियम क्रमांक 481 (1) (ज) व (ह) नुसार महानगरपालिकेचे न्यायालयीन कामकाज चालविण्यासाठी अभियोक्त्यांची पॅनलवर नेमणूक करण्याबाबत तसेच त्यांचे मानधन निश्चित करण्याबाबत स्थायी समितीच्या मान्यतेने महापालिकेचे आयुक्त अभियोक्त्यांची पॅनलवर नेमणूक करु शकतात. परंतु स्थायी समितीच्या मान्यते शिवाय आयुक्तांनी 2012-13 आर्थिक वर्षामध्ये अभियोक्त्यांच्या पॅनलवर नेमणूका केल्याचे दिसून आले आहे. अभियोक्त्यांच्या पॅनलवर नेमणूका करण्यासाठी स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

2) देयक क्रमांक 1276, दिनांक 20/12/2012, सर्वोच्च न्यायालय येथे खटला /दावा न्यायालयीन कामकाज चालविणेसाठी अभियोक्ता ॲड. विनय नवरे यांना प्रदान करण्यात आलेल्या रक्कम रु.115000/- रकमेच्या देयकाची तपासणी केली असता, सर्वोच न्यायालय येथे न्यायालयीन कामकाज चालविणेसाठी अभियोक्ता नेमणूकीबाबत व अभियोक्त्याच्या मानधनाबाबत स्थायी समिती ठराव किंवा आयुक्तांनी दिलेली मान्यता दिसून आली नाही. तसेच देयकाच्या मान्यतेपूर्वीचे मुख्य लेखापरीक्षक यांचे दिनांक 12/11/2012 चे अभिप्राय- विधी विभागाने सर्वोच्च न्यायालयातील दाव्या प्रकरणी अभियोक्त्यांची पॅनलवर नेमणूक करण्याबाबत तसेच त्यांचे मानधन निश्चित करण्याबाबत कार्यवाही करावी, असे निर्देश दिले असताना सदर कार्यवाही झालेली दिसून आली नाही. त्यामुळे ॲड.विनय नवरे यांची पॅनलवर नेमणूक केलेली नसताना तसेच त्यांच्या मानधनाचे दर ठरविले नसताना त्यांना केलेले प्रदान नियमबाहय असल्याने सदर प्रदान रक्कम रु.115000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.115000/-

DATAMSM6401 (Ref No : 37, Hmm No : 100)

42 पावसाळयापुर्वी कच्चे/पक्के नाले सफाई करणे बाबत.

पावसाळयापुर्वी कच्चे/पक्के नाले सफाई करणे
लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : सार्व.आरोग्य विभाग मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ
गुंतलेली रक्कम रु. 1401497.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1393197.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 8300.00/-

कामासाठी महासभेची आर्थिक प्रशासकीय मंजुरी घेतली नाही. काम पुर्ण झाल्यानंतर पुढील वित्तिय वर्षात महासभेची कार्योत्तर आर्थिक प्रशासकीय मंजुरी घेतली आहे. याबाबत विभागाने खुलासा केला नाही. महसुल मुद्रांकाची रक्कम रू8300/- संबंधिताकडून वसुल केली नाही. करारातील अट क्र.28 नुसार दंडात्मक कार्यवाही केल्याने चालु असलेल्या लवादाचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध करून दिले नाहीत.

पावसाळ्यापुर्वी कच्चे/पक्के नाले सफाई करणे बाबत.
प्राकलन :- रु. 19200000/-
प्रशासकिय मंजूरी:- कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी महासभा ठराव क्र. 02 दि.18/04/2013
निविदा : दि.22/03/2012 ई-टेंडरींग
एल-1 निविदा : मे. एम.ई. प्रोजेक्ट प्रा.लि.
निविदा मंजुरी :- स्थायी समिती सभा ठराव क्र.07 दि.23/04/2012.
करार :- दि.25/04/2012
कार्यादेश :- क्र.मनपा/आरोग्य/43/2012-13 दि.26/04/2012
मुदत : 01 वर्ष
खर्च : रू.1401497/-
प्र.क्र. 917 (01 ते 09) दि.18/10/2012 रू.1401497/-
कामाची स्थिती : काम अपुर्ण.

या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.123 दि.10/12/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र. निरंक दि.14/12/2015 अन्वये केला. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73(ब) नुसार महासभेच्या रितसर मंजुरी शिवाय आयुक्तांना कोणतीही संविदा करता येणार नाही.

अधिनियमातील कलम 73(ड) नुसार 5 लाख ते 25 लाखांपर्यंत खर्च अंतर्भुत असेल अशी संविदा आयुक्तांना करता येईल. मात्र अशी संविदा केल्याच्या तारखेपासून 15 दिवसाच्या आत स्थायी समितीची अवलोकनार्थ मंजुरी घेतली पाहिजे. असे असतांना नाले सफाईची संविदा महासभेच्या प्रशासकीय किंवा आर्थिक मंजुरी शिवाय करण्यात आली, असे दिसून येते. याबाबत विभागाने खुलासा केला नाही.

2) ठेकेदारासोबत दि.25/04/2012 रोजी रु.10,000/- च्या महसुल मुद्रांकावर करार केला आहे.

मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 03 मधील तरतूदीनुसार, या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि.01/05/2006 पासून पुढील प्रमाणे मुद्रांक वापरणे आवश्यक आहे.
रू. 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-
त्यानंतरच्या प्रत्येक लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू. 100/- (कमाल रू.5 लाख)

त्यामुळे याकामाचे बाबत मुद्रांक शुल्क रू. 18300/- चे वापरणे आवश्यक असतांना रू.10,000/- मुद्रांक शुल्क वापरले आहे. सबब रक्कम रू. 8300/- संबंधिताकडून वसुल करून शासनाच्या मुद्रांक महसुल खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) या कामाची नस्ती पहाता ठेकेदाराने समाधानकारक काम केले नाही, पावसाळ्यापुर्वी कच्चे / पक्के

नाले सफाईचे काम पुर्ण झाले नाही. म्हणुन करारातील अट क्र.28 नुसार दंडात्मक कार्यवाही केल्याचे दिसून येते. ठेकेदाराला महानगरपालिकेने दि.22/05/2012, 18/06/2012 रोजी नोटीसा पाठविल्या आहेत. कामाचा कार्यादेश दि.26/04/2012 रोजी दिल्यानंतर कामाची प्रगती पाहून वेळीच काम काढून एल 2 निविदाधारकास दिले नाही. केवळ मे 2012 व जुन 2012 मध्ये नोटीस देवून वेळ वाया घालवला आहे. ठेकेदाराकडून विलंब दंडाची रक्कम देयकातुन वसुल केल्याने, कपात केलेली रक्कम परत मिळणेबाबत मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या Arbitration Petition No 27/2015 लवादाचे काम चालु आहे. याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही व्हावी

वसुलपात्र रक्कम रू.8300/-
आक्षेपाधिन रक्कम रू.1393197/-
DATPMVM6001 (Ref No : 54, Hmm No : 123)

43 पल्स पोलिओ मोहिमेसाठी मंडप, टेबल व खुर्च्या यांचा पुरवठा करण्यासाठी केलेल्या खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 03

मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ
आक्षेपाधीन रक्कम रु. 803228.00/-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची "ड" प्रकरण 5 कलम (2)(1) मधील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. मांखस 1093/(2635)/उद्योग-6 दि.16 जुलै 1993 मधील परि.3 नुसार रू.50,000/- पेक्षा अधिक खर्चासाठी जाहिर निविदा मागवून पुरवठादाराची नियुक्ती न करता 2009-10 च्या मंजूर दराने खर्च करण्यात आला आहे. कार्यादेशानुसार 64 बुथसाठी मागणी केलेल्या साहित्याचा पुरवठा प्राप्त झाल्याबाबत अथवा पुरवठादाराने 64 बुथसाठी आवश्यक साहित्याचा पुरवठा केल्याबाबतचा नियंत्रण अधिकाऱ्यांचा कार्यपुर्ती अहवाल देयकासोबत उपलब्ध झाला नाही.

मिरा भाईदर महानगरपालिकेतर्गत दि.09.09.2012 व दि.04.11.2012, दि.20जाने.2013, दि.24फेब्रु.2013 रोजी राबविण्यात आलेल्या पल्स पोलिओ मोहिमेसाठी मंडप, पडदा, टेबल खुर्च्याच्या पुरवठा करण्यासाठी मे.धारावी डेकोरेटर्स, भाईंदर (प.) या पुरवठादारास कार्यादेश देण्यात आले आहेत.

मनपाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सर्वधर्मीय उत्सवांतर्गत वलकनी माता

उत्सवाकरिता लाईट, मंडप, स्टेज, रोलिंग, टेबल, खुर्च्या इ. व्यवस्था करण्यासाठी वर्ष 2009-10 मध्ये कार्यादेश क्र.मनपा/सा.बां/349/2000 दि.07.08.2009 अन्वये मे.धारावी डेकोरेटर्स यांचे बाबनिहाय दर मंजूर करण्यात आले आहेत. सदर कार्यादेशातील दरानुसार पल्स पोलिओ माहितीतर्गत मंडप, पडदा, टेबल खुर्च्या पुरवठा करण्यासाठी दि.09.09.2012 व दि.04.11.2012 रोजी राबविण्यात आलेल्या मोहिमेसाठी मे.धारावी डेकोरेटर्स यांना दि.09.01.2012 व दि.04.11.2012 रोजीच्या पल्स पोलिओ मोहिमेसाठी मंडप, पडदा, टेबल, खुर्च्या पुरवठयासाठी पुरवठादारास प्रमाणक क्र.1717 दि.30/03/2013 अन्वये रु.3,39,784/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. तसेच मिरा भाईदर मनपा हद्दीतील सर्व धर्मीय उत्सवांतर्गत गणगौर उत्सवा करिता मंडप, लाईट, स्टेज, पार्टीशन, कारपेट इ. व्यवस्था करणेसाठी रु.92000/- अंदाजित खर्चासाठी मागविण्यात आलेल्या अनुसरुन मे.धारावी डेकोरेटर्स या पुरवठादारास कार्यादेश क्र.मनपा/सा.बां/कार्या/438/2012-13 दि.31.10.2012 अन्वये दिलेल्या कार्यादेशातील दराने दि.20.01.2013 व दि.24.02.2013 पल्स पोलिओ मोहिमेसाठी मंडप, पडदा, टेबल व खुर्ची पुरवविण्यासाठी कार्यादेश क्र.मनपा/वैद्यकीय/ 1624/2012-13 दि.16.01.2013 च्या पुरवठा आदेशानुसार मे.धारावी डेकोरेटर्स यांना रु.4,63,444/- एवढे प्रदान करण्यात आले आहे.

यासाठी झालेला खर्च वर्ष 2012-13 या आर्थिक वर्षात महानगरपालिका फंडातील "पल्स पोलिओ लसीकरण प्रचार व प्रसार" या शीर्षाखाली मंजूर अर्धसंकल्पीय तरतूदीतून करण्यात आला आहे. सदर लेखाशिर्षाखाली मार्च-13मधील खर्चाची पडताळणी करता प्रमाणक क्र.1717 दि.30 मार्च 2013 अन्वये मे.धारावी डेकोरेटर्स, भाईंदर (प.) यांना वरीलप्रमाणे एकुण रु.8,03,228/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकांची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.64 दि.23/09/2015 अन्वये खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या पत्र क्र.मनपा/वैद्यकीय/1221/2015-16 दि.29/09/2015 अन्वये सादर केलेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची "ड" प्रकरण 5 कलम 2)(1) मधील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस 1093/(2635)/उद्योग-6 दि.16 जुलै 1993 मधील परि.3 नुसार रु.50,000/- किंवा त्यापेक्षा अधिक खर्चाच्या कामासाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही न करता दि.09.01.2012 व दि.04.11.2012 रोजीच्या पल्स पोलिओ मोहिमेसाठी मंडप, पडदा, टेबल व खुर्च्या पुरवण्यासाठी मनपाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील वर्ष 2009-2010 च्या मंजूर दरान्वये रु.3,39,784/- एवढा खर्च करण्यात आला आहे.

2) गणगौर उत्सवासाठी रु.92,000/- एवढया अंदाजित खर्चासाठी मागविलेल्या निविदेच्या मंजूर दराने पल्स पोलिओ मोहिमेसाठी मंडप, पडदा, टेबल व खुर्ची पुरवण्यासाठी पुरवठादरारास रु.4,63,444/- एवढया खर्चाचे प्रदान करण्यात आले आहे. परंतु गणगौर उत्सव व पल्स पोलिओ मोहिमेसाठी आवश्यक साहित्य पुरवठा करण्यासाठी एकत्रीत खर्चासाठी जाहिर निविदा मागवून पुरवठादाराची नियुक्ती न करता कमी खर्चासाठी मागविलेल्या निविदेच्या मंजूर दराने त्याच पुरवठादारास वाढीव काम देण्यात आले आहे. महापालिकेस विविध विभागासाठी आवश्यक साहित्याबाबत अपेक्षित खर्चाबाबत एकत्रित निविदा मागवून पुरवठादार नियुक्त करण्यात आल्यास एकत्रित जादा खर्चाच्या

कामासाठी जाहिर निविदेत अधिक वाजवी दर प्राप्त झाले असते.

3) दि.20.01.2013 व दि.24.02.2013या दोन दिवशी पल्स पोलिओ मोहिमेसाठी मंडप, पडदा, टेबल व खुर्ची पुरविण्यासाठी कार्यादेश क्र.मनपा/वैद्यकीय/1624/2012-13 दि.16.01.2013 अन्वये दिलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठादाराने 64 बुथसाठी आवश्यक असलेले 64 मंडप, 117 टेबल, 351 खुर्च्यांचा पुरवठा केल्याबाबत पुरवठा चलने अथवा संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांचा कार्यपुर्तता अहवाल प्राप्त न करता पुरवठादारास प्रदान करण्यात आले आहे. त्यामुळे पुरवठादाराकडून कार्यादेशानुसार विहीत संख्येत साहित्याचा पुरवठा करण्यात आल्याबाबत व त्यानुसार प्राप्त साहित्याचे पुरवठादारास प्रदान करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.त्यामुळे पुरवठादारास उपरोक्त प्रमाणकान्वये केलेला खर्च रु.8,03,228/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.8,03,228/-

FDSANMM7201 (Ref No : 59, Hmm No : 64)

44 मनपा प्राथमिक शाळांकरिता फर्निचर खरेदीवरील खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 06

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

वसूलपात्र रक्कम रु. 23229.00/-

महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भाखंस 1088/(2512)/उद्योग-6 दि.02 जानेवारी 1992 मधील परिशिष्ट-3 नुसार स्टिल फर्निचर खरेदी महाराष्ट्र लघूउद्योग विकास महामंडळा मार्फत खरेदी करण्यासाठी राखीव ठेवण्यात आली असतांना स्टिल फर्निचर खाजगी पुरवठादाराकडून निविदा मागवून खरेदी करण्यात आली आहे. करारनाम्यातील अटीनुसार पुरवठादाराकडून विलंब शुल्क व स्थानिक संस्था कर वसुल करण्यात आलेला नाही.

मिरा भाईंदर मनपाच्या प्राथमिक शाळांकरिता लागणारे फर्निचर खरेदी भांडार विभागाने मे.व्होरा एन्टरप्रायजेस यांचेकडील मंजूर दर करारान्वये केली असून वर्ष 2012-13 मध्ये सदर पुरवठादरास प्रमाणक क्र.298 दि.22.06.2012 अन्वये रु.4,16,465/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. सदर प्रमाणकाची तपासणी करता खरेदीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

कामाचा तपशिल	परिमाण	दर प्रतिनग रु.	रक्कम रु.
1) कार्यादेश क्र.मनपा/भांडार/255/2011-12 दि.13/2/2012			
स्टील टेबल (48"X24"X30")	11 नग	3000	33000
प्लास्टीक चेअर	20 नग	396	7920
2) कार्यादेश क्र.मनपा/भांडार/248/2011-12 दि.02/02/2012			
स्टील टेबल (48"X24"X30")	10 नग	3530	35300
स्टील चेअर	12 नग	1430	17160
स्टील कर्बोड (78"X36"X19")	11 नग	7130	78430
3) कार्यादेश क्र.मनपा/भांडार/263/2011-12 दि.19/03/2012			
स्टील कर्बोड (78"X36"X19")	10 नग	7130	71300
रिवॉल्वींग चेअर (78"X36"X19")	35 नग	3175	111125
प्लास्टीक चेअर (48"X24"X30")	50 नग	396	19800
4) कार्यादेश क्र.मनपा/भांडार/246/2011-12 दि.02/02/2012			
स्टील कप बोर्ड (78"X36"19")	01 नग	7130	7130
एकुण			416465/-

उपरोक्त प्रमाणक, कार्यादेश व पुरवठा चलनांची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.49 दि.15/09/2015 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता विभागाकडून भांडार अधिकारी यांनी दि.30/9/2015 रोजी सादर केलेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखंस 1088/(2512)/ उद्योग-6 दि.02 जानेवारी 1992 मधील परिशिष्ट-3 नुसार स्टिल फर्निचर खरेदी महाराष्ट्र लघूउद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद-5 नुसार सर्व शासकीय विभाग- महामंडळे शासकीय व निमशासकीय संस्था यांनी सदर वस्तूची खरेदी महामंडाळामार्फत करणे बंधनकारक असतांना भांडार विभागाने जाहिर निविदा मागवून खाजगी पुरवठादाराकडून स्टील फर्निचरची खरेदी केली आहे. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये मा.आयुक्त यांच्या मान्यतेने निविदा मागवून लघुत्तम निविदाकाराकडून खरेदी केल्याचे तसेच यापुढे महाराष्ट्र लघूउद्योग विकास महामंडळा मार्फत खरेदी करण्यात येईल असे नमूद केले आहे. सदर खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही.

2) कार्यादेश क्र.मनपा/भांडार/255/2011-12 दि.13/02/2012 अन्वये एकुण 11 नग स्टिल टेबल (Steel Table48"X24"X30") रु.3000/- प्रती नग याप्रमाणे खरेदी करण्यात आले आहेत. तथापि कार्यादेश क्र.मनपा/भांडार/248/2011-12 दि.02/02/2012 अन्वये त्याच आकाराचे स्टील टेबल (SteelTable48"X24"X30") 10 नग व कार्यादेश क्र.मनपा/भांडार/263/2011-12 दि.19/03/2012 अन्वये 10 नग असे एकुण 20 नग रु.3530/- या दराने खरेदी करण्यात आले आहेत. एकाच महिन्यात खरेदी केलेले स्टील टेबल वेगवेगळया दराने खरेदी करण्यात आल्यामुळे स्टील टेबल खरेदीसाठी 20 नगासाठी प्रतिनग रु.530/- याप्रमाणे एकूण रु.10,600/- एवढा जादा खर्च करण्यात आला आहे. याबाबत विभागाने सादर केलेला खुलासा आक्षेपाशी सुसंगत नसल्याने मान्य करता येत

नाही. त्यामुळे जादा खर्चाची रक्कम रु.10,600/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

3) करारनाम्यातील अट क्र.02 नुसार कार्यादेशात नमूद केलेल्या मुदतीत फर्निचर पुरवठा न केल्यास त्यापुढील 1 महिन्यापर्यंत प्रतिदिन रु.100/- विलंब आकार दंड म्हणून देण्यास पुरवठादार जबाबदार राहील अशी तरतूद आहे. कार्यादेश क्र.मनपा/भांडार/255/2011-12 दि.13/02/2012 पुरवठा कालावधी कार्यादेशापासून 05 दिवस विहीत करण्यात आला आहे. तथापि, पुरवठा चलन क्र.23 दि.29/02/2012 अन्वये प्राप्त पूरवठा 11 दिवस विलंबाने करण्यात आला आहे. सदर विलंबाबाबत करारनाम्यातील अटीनुसार प्रतिदिन रु.100/- या प्रमाणे रु.1100/- विलंब शुल्क वसूल करण्यात आले नाही. याबाबत विभागाने केलेल्या खुलाश्यामध्ये पुरवठादारास कार्यादेश विलंबाने प्राप्त झाल्याचे तसेच सार्वजनिक सुट्टी वगळता पुरवठा उशिराने प्राप्त झाला नसल्याचे नमूद केले आहे. परंतू पुरवठादारास कार्यादेश विलंबाने प्राप्त झाल्याबाबत साधार पुर्तता दर्शविण्यात आली नाही. त्यामुळे विलंबाने पुरवठा प्राप्त झाला नाही हा खुलासा संयुक्तिक नाही. त्यामुळे विलंब शुल्काची रक्कम रु.1100/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

4) कार्यादेश क्र.मनपा/भांडार/248/2011-12 दि.02/02/2012 नुसार पुरवठा कालावधी कार्यादेशानुसार 05 दिवस असतांना पुरवठा चलन क्र.24 दि.29/02/2013 अन्वये मालाचा पुरवठा विहीत कालावधीपेक्षा 22 दिवस विलंबाने प्राप्त झाला असतांना पुरवठादाराकडून रु.2200/- विलंब शुल्क वसूल करण्यात आलेले नाही. वर नमुद केल्याप्रमाणे विभागाचा खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही. तरी विलंब शुल्काची रक्कम रु.2200/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

5) कार्यादेश क्र.मनपा/भांडार/246/2011-12 दि.02/02/2012 नुसार पुरवठा कालावधी कार्यादेशानुसार 05 दिवस असतांना पुरवठा चलन क्र.22 दि.23/02/2012 अन्वये मालाचा पुरवठा 10 दिवस विलंबाने प्राप्त झाला आहे. परंन्तू कार्यादेशातील पुरवठा दाराच्या अटीनुसार प्रदानातून रु.1000/- विलंब शुल्क वसूल करण्यात आलेले नाही. वर नमुद केल्याप्रमाणे विभागाचा खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही. तरी विलंब शुल्काची रक्कम रु.1000/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

6) करारनाम्यातील अट क्र.08 नुसार पुरवठादाराच्या देयकाच्या रकमेतून 1 टक्का कामगार कल्याण निधी कपात केला जाईल. तसेच स्थानिक संस्था कराची नोंदणी करुन मनपा दरसूचीप्रमाणे कराचा भरणा करणे बंधनकारक राहिल अशी अट सामाविष्ठ आहे. तथापि, उपरोक्त प्रमाणक क्र.298 दि.22/06/2012 ची तपासणी केली असता स्थानिक संस्था कराची वसुली केल्याचे आढळून येत नाही. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये कामगार कल्याण कर हा सार्वजनिक बांधकाम विभागास लागू असून सदरची अट नजरचुकीने करारनाम्यात नमुद झालेली आहे असे नमुद केले आहे. परंतू स्थानिक संस्था कराच्या वसुलीबाबत खुलासा केलेला नाही. त्यामुळे स्थानिक संस्था कराची 2 टक्के रक्कम रु.8329/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.10,600/- अधिक रु.1100/- अधिक रु.2200/- अधिक रु.1000/- अधिक रु.8329/- एकूण रु.23,229/-

FDSANMM7201 (Ref No : 57, Hmm No : 49)

45 महानगरपालिकेस विविध प्रकारचे नमुने फॉर्म, रजिस्टर ई. छपाई करून पुरवठा करणेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 06

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

आक्षेपाधीन रक्कम रु. 111008.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1000.00/-

महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग शा.नि. क्र.ससस-1600/ प्र.क्र.20/22-स दि.15.02.2001 नुसार सहकारी मुद्रणालयांकडून छपाईची कामे करुन न घेता जाहिर निविदा मागवून पुरवठादार नियुक्त करण्यात आला आहे. पुरवठादाराशी करारनामा करतांना विहीत रकमेपेक्षा कमी मुद्रांक शुल्काचा भरणा करण्यात आला आहे. जाहिर निविदेत पात्र निविदाकार मे.वंसत ट्रेडर्स, मे.निलिमा एन्टरप्रायजेस, मे.प्रेयस कॉर्पोरेशन यांच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. तथापि, मे.निलिमा एन्टरप्रायजेस व मे.प्रेयस कार्पोरेशन यांचा करारनामा लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नाही.

मिरा भाईंदर मनपा भांडार विभागाकडून वर्ष 2012-13 या वित्तीय वर्षाकरीता लागणारी विविध प्रकारची नमुने छपाई वार्षिक निविदा मागवुन दर निश्चित करण्यासाठी मा.आयुक्त यांच्या दि.26.03.2012 रोजीच्या आर्थिक व प्रशासकीय मान्येतनुसार सा.प्र.विभागाकडील "स्टेशनरी व छपाई" या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून छपाई खर्चासाठी रु.20.00 लक्ष अंदाजित खर्चासाठी दि.12.04.2012 ते दि.20.04.2012 या कालावधीत जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली. पुरेसा प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे दि.05.06.2012 ते दि.11.06.2012 या कालावधीत सदर निविदेस मुदतवाढ देण्यात आली असून 3 पात्र निविदाकारांची तांत्रिक निविदा दि.12.06.2012 रोजी उघडण्यात आल्याचे तसेच दि.16.06.2012 रोजी दरांचा लिफाफा उघडण्यात आल्याचे भांडार विभागाकडील उपलब्ध केलेल्या विषयांकित नस्तीवरुन दिसुन येते. मे.वसंत ट्रेडर्स यांना छपाई कामासाठी माहे मार्च 2013 मध्ये प्रमाणक क्र.1934 दि.30/03/2013 अन्वये रु.1,11,008/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. सदर निविदा नस्तीतील कार्यादेश, करारनामा, पुरवठा चलने, साठा नोंदवही व प्रमाणकाची तपासणी करता आढळून आलेल्या त्रुटींबाबत खुलासा करण्यास विभागास अर्धसमास पत्र क्र.56 दि.22/09/2015 अन्वये कळविण्यात आले आहे. त्यास अनुसरुन भांडार अधिकारी यांनी दि.30/09/2015 अन्वये सादर केलेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्र.ससस-1600/ प्र.क्र.20/22-स दि.15.02.2001 नुसार राज्यातील सहकारी मुद्रणालयांना रु.10.00 लक्ष एवढया किंमती पर्यन्तची मुद्रणाची कामे विना निविदा देण्यास शासन निर्णयातील निकषांस अधिन राहून मान्यता

देण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही न करता जाहिर निविदा मागवुन पुरवठादाराची नियुक्ती करुन मुद्रण छपाइची कामे करण्यात आली आहेत. याबाबत विभागाने केलेला खुलासा आक्षेपाशी सुसंगत नसल्याने मान्य करता येत नाही.

2) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखंस/1093/(12635)/उद्योग -6 दि.16 जुलै 1993 मधील परि क्र.3 नुसार रु.50,000/- किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशावेळी राजपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करुन जाहिरात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत योग्य वृत्तपत्रात देणे आवश्यक आहे. तथापि, निविदा प्रसिध्दीचा तपशील नस्तीत उपलब्ध झाला नाही. त्यामुळे निविदेस जाहिर प्रसिध्दी देण्यात आल्याबाबत पडताळणी करुन खात्री करता आली नाही. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये जाहिरात जनसंपर्क विभागाकडून देण्यात येते. यापुढे जाहिरात प्रसिध्दीचा तपशिल नस्तीत उपलब्ध करण्यात येईल. असे नमूद करण्यात आले आहे. परंतू जाहिरातीचा तपशिल सादर केला नाही. सदर खुलाश्यावरुन आक्षेपाची पुर्तता होत नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही.

3) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन.निर्णय क्र.भांखसं-1088/(2512)/उद्योग -6 दि.2 जानेवारी 1992 मधील परि.8.3 (न) नुसार निविदा उघडतांना त्याची पुर्वसूचना निविदाकारांना देणे व ठराविक वेळी, ठराविक ठिकाणी अशी निविदा हजर असलेल्या निविदाकारा समोर उघडण्यात यावी असे बंधनकारक आहे. तथापि, विषयांकीत नस्तीची पडताळणी करता प्राप्त निविदांकार उपस्थितीचा तपशील नस्तीत उपलब्ध झाला नाही. उपरोक्त तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

4) नगरविकास विभागाकडील परिपत्रक क्र.संकीर्ण-2009/सं.क्र./794/नवि-20 दि.7डिसेंबर 2009 नुसार मुंबई मुंद्रांक अधिनियम 1958 च्या अनुच्छेद 63 प्रमाणे कंत्राटाची रक्कम रु.10.00 लाखापेक्षा अधिक नसेल तेव्हा रु.100/- व रु.10 लाखापेक्षा अधिक असेल त्याबाबतीत रु.100/- अधिक रु.10 लाखावरील प्रत्येक 1 लाखासाठी किंवा त्याचा भागासाठी रु.100/- मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. महापालिकेस लागणारी विविध प्रकारची नमुने छपाई करण्याकामी वर्ष 2012-13 मध्ये अंदाजित रु.20.00 लाख एवढया खर्चासाठी निविदा मागविण्यात आल्या असल्याने पुरवठादाराशी करारनामा करतांना रु.1100/- एवढा मुंद्रांक शुल्क भरणा करणे आवश्यक असतांना यशस्वी निविदाकारांशी रु.100/- एवढया मुंद्रांक शुल्काच्या पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. विहीत रकमेपेक्षा कमी मुद्रांक शुल्क भरणा करण्यात आल्यामुळे रु.1000/- एवढया शासन महसुलाचे नुकसान झाले आहे. सदर रक्कम रु.1000/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

5) जाहिर निविदेत पात्र निविदाकार मे.वंसत ट्रेडर्स, मे.निलिमा एन्टरप्रायजेस, मे.प्रेयस कॉर्पोरेशन यांच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. तथापि, मे.निलिमा एन्टरप्रायजेस व मे.प्रेयस कार्पोरेशन यांचा करारनामा लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नाही. तसेच मे.वसंत ट्रेडर्स व मे.प्रेयस कार्पोरेशन यांचे वार्षिक दर करार मंजूरीचे आदेश लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाहीत. याबाबत खुलासा सादर करतांना विभागाकडून साधार पुर्तता दर्शविण्यात आली नाही. त्यामुळे उपरोक्त यशस्वी निविदाकरांचे दरकरार मंजूर करण्यात आल्याबाबत तसेच यशस्वी निविदाकारांसोबत विहीत रकमेच्या मुद्रांक शुल्क पेपरवर करारनामा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली

नाही.

वसुलपात्र रक्कम रु.1000/-

आक्षेपाधिन रक्कम रु.1,11,008/-

FDSANMM7201 (Ref No : 58, Hmm No : 56)

46 अभ्यास दौऱ्याकरिता अग्रीमाचे समायोजन प्रलंबित असल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 1

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ
आक्षेपाधीन रक्कम रु. 1800000.00/-

मिरा भाईंदर महापालिकेच्या स्थायी समितीने वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये अंदमान-निकोबार येथे अभ्यास दौरा आयोजित केला होता. सदर दौऱ्यासाठी रु. 1800000 अग्रिम घेतले होते त्या अग्रिम रकमेचे समायोजन करण्यात आले नाही.

2012-13 वित्तीयवर्षात महापालिकेच्या स्थायी समिती सदस्य व अधिकारी यांचा मीरा-भाईंदर शहरात मुलभूत नागरीसोयी सुविधा पुरवणे, प्रकल्प राबवणे याबाबत दार्जिलिंग-सिक्कीम येथे अभ्यास दौऱ्यासाठी स्थायी समितीचा ठराव क्रमांक 42 दिनांक 7/3/2013 अन्वये प्रती मानसी रु.90000 खर्चासमान्यता घेऊन सदर अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यासाठी मे. पिरॉमिड ट्रव्हल या एजन्सीची नेमणूक करण्यात आली सदर एजन्सीने प्रती मानसी रु. 90000 दर आकारून एकूण 20 स्थायी समिती सदस्य अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी 1800000 आपेक्षित खर्च महापालिकेस सादर केला. त्यानुसार प्रमाणक क्रमांक 1775 दिनांक 30/3/13 अन्वये अग्रिम देयक पारित करून वरीलप्रमाणे रक्कम सदर एजन्सीला प्रदान करण्यात आली. तथापि स्थायी समितीच्या ठरावात नमूद केल्याप्रमाणे मागील वित्तीय वर्षात महापालिकेच्या सदस्यांनी अंदमान-निकोबार व काश्मीर येथे अभ्यास दौरे आयोजित केले होते. त्या अभ्यास दौऱ्यासाठी अग्रिम घेतले होते. त्या अग्रीमाचे व वित्तीय वर्ष 2012-13 मधील अग्रीमाचे मुंबई वित्तीय नियम मधील नियम क्रमांक 142क अन्वये 90 दिवसात समायोजन केल्याचे दिसून आले नाही. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 86 अन्वये विचारणा केली असता अग्रिम समायोजनबाबतचे अनुपालन सादर करण्यात आले नाही. त्याचप्रमाणे एजन्सीने प्रती मानसी आकारलेल्या रु. 90000 खर्चाचा संपूर्ण तपशील व तपशीलवार खर्चाच्या मूळ देयकाच्या प्रती नस्तीमध्ये आढळून आल्या नाहीत.

DATPLKM7501 (Ref No : 67, Hmm No : 86)

47 संगणक विभागातील संगणकासाठी टोनर खरेदीच्या अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 1

लेखा शीर्ष :2470 मनपा निधी
अनियमितता कलम : 9अ
आक्षेपाधीन रक्कम रु. 1247705.00/-

शासन दर करार उपलब्ध असाताना महानगरपालिकेच्या संगणक विभागामार्फत पालिकेतील इतर विभागांना संगणकासाठी लागणारे टोनर खरेदीबाबत मे. कॅनकॉपीअर सर्विसेस या कंपनीसोबत करारनामा झाला असून त्या करारनाम्याची मुदत संपल्यानंतरही सदर करारनाम्यानुसार रुपये 1247705 चीखरेदी केली आहे.

वित्तीय वर्ष 2012-13 मधील महापालिकेच्या संगणक विभागातून प्रिंटरसाठी टोनर पुरवठा करणे व प्रिंटर्सची देखभाल व दुरुस्तीसाठी शासनाचे दर-करार उपलब्ध असताना देखील महापालिकेच्या संगणक विभागाने ई-टेंडरिंग प्रक्रिया राबवून टोनर पुरवठा कामी मे. कॅनकॉपीअर सर्विसेस कंपनीची निवड करण्यात आली. परंतु टोनर खरेदीच्या नस्तीची पडताळणी केली असता ई-टेंडर निविदा प्रक्रीयेबाबत कोणताही अभिलेख अथवा कागदपत्रे, उदा. निविदेची वर्तमानपत्रातून जाहिरात देणे, एकूण प्राप्त निविदा किती, निविदा कधी व कोठे उघडण्यात आल्या, दराबाबत तुलनात्मक तक्ता, इसारा व अनामत रकमेबाबतची माहिती निविदाधारक अधिकृत पुरवठा धारक आहे किंवा कसे, मागील दोन वर्षाचे आयकर विवरणपत्र, मागील दोन वर्षाचे ताळेबंद अहवाल, मागील दोन वर्षाच्या कालावधीतील शासकीय कामाचा अनुभवाचे पत्र इत्यादी. लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. सदरच्या नस्तीमध्ये दिनांक 16/3/13 रोजी टोनर खरेदी करणे कामी स्थायी समितीस ठराव पारित करण्यासाठी नगर सचिव विभागास गोषवारा देण्यात आला. परंतु सदरचा ठराव पारित झाला किंवा कसे याबाबत साधार खुलासा लेखापरीक्षणास केला नाही. रुपये 2500000 च्या आतील खरेदी करण्याचे अधिकार आयुक्तांना मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 मधील कलम 73(क) अन्वये अशा रीतीने देण्यात आलेल्या निविदांपैकी जी कोणतीही निविदा, सर्व परिस्थिती विचारात घेता सर्वात फायदेशीर आहे असे त्यास वाटेल ती निविदा त्यास स्वीकारता येईल. परंतु महापालिकेतील संगणक विभागाने शासन दर करारातील दर व निविदेतील दर यांची तुलना न करता निविदेद्वारे जास्त दराने टोनर खरेदी करण्यात आली आहे.

सदरच्या नस्तीमध्ये उपरोक्त कंपनीसोबत दिनांक 17/05/2012 रोजी करारनामा करण्यात आला व तो नस्तीमध्ये जोडण्यात आला असून त्या करारनाम्यातील अट क्रमांक 14 नुसार टोनर पुरवठा करणेबाबत करारनाम्याची मुदत दिनांक 17/05/2012 ते 16/05/2013 पर्यंत असून सदर करारनाम्याची मुदत संपल्यावर देखील पुढील कालावधीत वरील कंपनीला देण्यात आलेल्या कार्यादेशात सदर करारनाम्याचा संदर्भ नमूद करून खरेदी करण्यात आली आहे.

पुरवठा केलेल्या सामग्रीचा दर्जा शासन दर-करारामध्ये नमूद दर्जा प्रमाणे असणे पुरवठादारास बंधनकारक

असताना पुरवठा केलेल्या सामग्रीचा सक्षम प्राधिकाऱ्याचा चाचणी अहवाल नस्ती मध्ये आढळून आला नाही. करारनाम्याच्या कालावधीतील खरेदीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

प्रमाणक क्रमांक व दिनांक	टोनरचा प्रकार	टोनरचीसंख्या	टोनर खरेदीचादर	एकूण रक्कम	कार्यादेश क्रमांक
1064 19/12/12	12A 88A 53A	150 50 50	1480 1580 1880	222000 79000 94000	मनपा/संगणक/118 2012-13 दिनांक 6/10/12
				395000	
2034 30/3/13	12A 88A 53A 43x 10A	150 50 50 10 20	1480 1580 1880 4890 2630	222000 79000 94000 48900 52600	मनपा/संगणक/39 2012-13 दिनांक30/5/13
				496500	
	12A 88A 53A 43x	150 50 50 10	1480 1580 1880 4890	14800 47400 37600 48900	मनपा/संगणक/210 2012-13 दिनांक31/1/13
				148700	

एकूण रक्कम = 395000+496500+148700=1040200 करारनामा संपल्यानंतर करण्यात आलेल्या खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे.

प्रमाणक क्रमांक व दिनांक	टोनरचा प्रकार	टोनरचीसंख्या	टोनर खरेदीचादर	एकूण रक्कम	कार्यादेश क्रमांक
528 26/7/13	12A 88A 53A 43x	180 100 50 25	1480 1580 1880 4890	266400 158000 94000 122250	मनपा/संगणक/210 2012-13 दिनांक31/1/13
				640650	

	12A 88A 53A	55 15 5	1480 1580 1880	81400 9400 23700	मनपा/संगणक/210 2012-13 दिनांक31/1/13
				112455	
	12A 88A 43x	100 20 10	1480 1580 4890	148000 31600 48900	मनपा/संगणक/210 2012-13 दिनांक31/1/13
				228500	
	12A 88A 53A	100 20 20	1480 1580 1880	148000 31600 37600	मनपा/संगणक/210 2012-13 दिनांक31/1/13
				217200	
	43x	10	4890	48900	मनपा/उपौक्त/भांडार 65/14/दिनांक 11/8/14

एकूण रुपये 112455 + 228500 + 640650 +217200 + 48900 = 1247705/-

वित्तीय वर्ष 2012-13 मध्येखरेदी करण्यात आलेल्या सामग्रीचे उपप्रमाणकाच्या स्थळप्रती नस्ती सोबत जोडण्यात आलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे रकाना क्रमांक 1 मध्ये ज्या ठिकाणी प्रमाणक क्रमांक नोंदवला नाही त्या खरेदीच्या प्रदानाचा प्रमाणक क्रमांक लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आला नाही. सदर खरेदीच्या प्रदान ठेकेदारास ज्या प्रमाणकाद्वारे केले त्या प्रमाणकाची व दिनांकाची तसेच धनादेशाची नोंद नस्ती मध्ये नाही. उपरोक्त खरेदीबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 74 दिनांक 28/09/2015 अन्वये विचारणा केली असता संबधित विभागाकडून अनुपालन सादर करण्यात आले नाही.

DATPLKM7501 (Ref No : 73, Hmm No : 74)

48 स्थानिक संस्था करासंदर्भातील अभिलेख/माहिती/विवरणपत्र उपलब्ध न केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

***No. of Irregularities:* 05**

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

स्थानिक संस्था कर भरणा प्रलंबित असलेल्या व्यावसायिकांची नस्ती उपलब्ध झाली नाही. स्थानिक संस्था करवसूलीच्या रक्कमेची चलने लेखापरीक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाही.तसेच विविध बँका/ डाकघराकडून निर्गमित केलेल्या सोन्याच्या नाण्यावरील स्थानिक संस्था कर, आर.टी.ओ.ठाणेकडे नोंदणी झालेल्या सर्व प्रकारच्या वाहनांचा तपशिल व त्यावरील देय स्थानिक संस्था कर वसुलीबाबतचा तपशिल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

मिरा भाईंदर महाव्रपरलिकेचे 2012-13 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणासाठी स्थानिक संस्था करासंदर्भातील अभिलेखे /माहिती / विवरणपत्र उपलब्ध करण्याबाबात अर्धसमास पत्र क्र. 96 दि. 17.10.2015 अन्वये विचारणा करण्यात आली होती. याबाबत विभागांने त्यांचे पत्र क्र. मनपा /स्था.सं.क./ 537 दि.20.10.2015 अन्वये खुलासा सादर केला आहे. विभागाचा खुलासा विचारात घेता, लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) स्थानिक संस्था कर आकारणीची अंमलबजावणी दिनांक 1.4.2011 पासून सुरु झाल्यापासून दिनांक 31.03.2013 अखेर स्थानिक संस्था कर भरणा प्रलंबित असलेल्या व्यावसायिकांची संख्या विभागाने सादर केलेल्या माहितीवरून 4433 इतकी आहे. परंतु याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नसल्यामुळे स्थानिक संस्था कराचा रक्कमेबाबत पडताळणी करता आली नाही.

2)2012-2013 मध्ये वसूल झालेल्या स्थानिक संस्था कराचा खालील प्रमाणे व्यावसाय निहाय तपशिल उपलब्ध झाला आहे. (उदा.ज्वेलर्स,पेट्रोलपंप, मद्यविक्रेते,लघुउद्योग इ.)

अनुक्रमांक	तपशिलवसंख्या	स्थानिकसंस्थाकरवसूलीचा दर	स्थानिकसंस्थाकरवसूलीचीरक्कम	शेरा
1	ज्वेलर्स	2% व 0.5%	2919604	
2	पेट्रोलपंप	1.25 %	56099785	
3	उद्योग/लघुउद्योग	1% ते 3%	787835208	
4	मद्यविक्रेते	4%	34955934	
5	मॉल	1% ते 3%	14791615	

6	चित्रपटगृहे	निरंक	781388	
7	रुगणालये	1% ते 3%	1266001	

परंतु चित्रपटगृहे यांचे स्थानिक संस्था कर वसूलीचा दर उल्लेख नसल्यामुळे कोणत्या दराने वसूल करण्यात आली व स्थानिक संस्था कर वसूलीच्या रक्कमेच्या चलने लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

3) माहे मार्च 2013 मध्ये वसूल झालेल्या स्थानिक संस्था कराबाबतची चलने व ती बँकेत जमा केल्याबाबतचे विवरणपत्र (Bank Scrol) उपलब्ध न झाल्यामुळे लेखापरीक्षणास जमेची पडताळणी करता आली नाही.

4) विविध बँका/डाकघराकडून निर्गमित केलेल्या सोन्याच्या नाण्यावरील स्थानिक संस्था कर वसुलीबाबतचा तपशिल उपलब्ध झाला नाही.

5) आर.टी.ओ.ठाणेकडे नोंदणीक्त झालेल्या सर्व प्रकारच्या वाहनांचा तपशिल व त्यावरील देय संस्था कर वसुलीबाबतचा तपशिल उपलब्ध झाला नाही. महाराष्ट्र लेखापरीक्षण अधिनियम 1930 मधील कलम 4 नुसार लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध करण्याची संबधित प्राधिकरणाची जबाबदारी आहे.तसेच सदर अधिनियमातील कलम 6 अन्वये अर्धसमासान्वये मागणी करुनही सदर अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही त्यामुळे लेखापरीक्षणास अभिप्राय नोंदविता आले नाही.

कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

49 उद्याने सुशोभिकरणाचे खर्चातील अनियमितता.

उद्याने / दुभाजक सुशोभिकरण करणे

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष :उद्यान व वृक्षप्र मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 5667249.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 91154.00/-

सुशाभिकरणाची कामे करतांना करारानुसार सुरक्षा अनामतीची 2% रक्कम देयकातून वसुल केली नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालकिची 43उद्याने, 13चौपाटया, 2नर्सरी, जवळपास 15 कि.मी.चे दुभाजक आहेत. महापालिकेने उद्याने / दुभाजक सुशोभिकरणाचे कामासाठी खर्च रू.5667249/- केला आहे. सदरचे काम तुकडे पाडून म्हणजे उद्यानानुसार / दुभाजकानुसार केल्याचे दिसून येते.

प्राकलन - —

प्रशासकीय मंजुरी - निरनिरळया उद्यानासाठी स्वतंत्र घेतली आहे.

निविदा तारीख - उद्यानानुसार स्वतंत्रपणे मागविल्या आहेत. तसेच काही उद्यानाबाबत जुन्या मंजूर

निविदा धारकांस - मंजुर दराने काम दिले आहे.

कामाचा एकुण खर्च :- रु.198.88 लक्ष

याबाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.17 दि.25/08/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र.344 दि.02/09/2015 रोजी केला असून, तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) आरक्षण क्र.122 सी मैदान भाईंदर (पु.) लॅन्डस्केपीग करणे.

प्र.क्र.1082 दि.21/11/2012 रु.1773696/- मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट भाईंदर (पु) या कामाची निविदा नस्ती उपलब्ध झाली नाही. कामास महासभेची प्रशासकीय मंजूरी घेतली नाही. मा.आयुक्त यांचे मंजूरीने काम केले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम73(ड) नुसार आयुक्तांना रक्कम रू.25 लाख खर्च करण्याचे अधिकार आहेत. या कामाचा खर्च रू.31.50 लाख असल्याने स्थायी समितीची / महासभेची मंजुरी घेणे आवश्यक असतांना, तशी मंजुरी घेण्यात आली नाही. करारातील अट क्र.06 नुसार अनामत किती घ्यावी, या ठिकाणी खाडाखोड केली आहे. 1% इएमडी व 2% अनामत करार झाल्यावर, तसेच 2% अनामत देयकातुन वसुल करावयाची आहे. प्रत्यक्षात प्रदान

करताना 2% अनामतीची होणारी रक्कम रु.35474/- वसुल केली नाही. सदरची रक्कम वसुलपात्र आहे.

2) आरक्षण क्र.100 येथे लॅन्डस्केपीग करणे.

प्र.क्र.1549 दि.28/02/2013 रु.441666/- मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट भाईंदर.

प्राकलन उद्यान अधिक्षकाने केले आहे. मा.आयुक्त यांचे मंजूरीने काम केले. आरक्षण क्र.111 साठी मागविलेल्या दराने काम दिले आहे. कारातील अट क्र.06 नुसार देयकातून 2% अनामत रक्कम रु.8833/- वसुल केली नाही. सदरची रक्कम वसुलपात्र आहे.

3) पेणकरपाडा स्मशानभूमी सेक्टर 9 उद्यान/मैदान मिरा रोड (पु.)

सेक्टर 10 उद्यान, मिरा रोड (पु) येथे लॅन्डस्केपीग करणे.

प्र.क्र.1528 दि.25.02.2013 रु.499250/- मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट भाईंदर

प्र.क्र.1528 दि.25.02.2013 रु.969100/- मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट भाईंदर

रु.1468350/-

मा.आयुक्त यांनी आरक्षण क्र.111 साठी मंजूर केलेल्या दराने काम दिले आहे. करारातील अट क्र.06 नुसार देयकातून 2% अनामत रु.29367 वसुल केली नाही. सदरची रक्कम वसुलपात्र आहे.

4) स्व.इंदिरा गांधी तलाव उद्यान गोडदेव येथे सुशोभिकरण करणे.

प्र.क्र.09 दि.04/06/2012 रु.377377/-

करारामधील अट क्र.06 नुसार देयकातून सुरक्षा अनामत रक्कम रु.2% रु.7548/- वसुल केली नाही.

5) प्रभाग क्र.1,2,3,4 अंतर्गत उद्याने/मैदाने, सुशोभिकरण दुभाजक व घनकचरा व्यवस्थापन येथील झाडांना व गवताला पाण्याचे टॅकर पुरविणे.

प्रमाणक क्र.14 दि.09/11/2012 रु.541880/- मे.सागर वॉटर सप्लायर
दि.01 ते31ऑक्टोबर 2012
एकुण फेरे 1426 x दर 380
= रू.541880/-

प्रमाणक क्र.19 दि.14/01/2013 रु.524400/- मे.सागर वॉटर सप्लायर
दि.01/11/2012 ते 30/11/2012

प्रमाणक क्र.24 दि.24/01/2013 रु.541880/- मे.सागर वॉटर सप्लायर
दि.01.12.2012 ते दि.31.12.2012

रु.16,06,160/-

महिन्याला सुमारे रू.5.25 लक्ष खर्च अपेक्षीत असुन पावसाळया नंतर ऑक्टोबर ते डिसेंबर पर्यंत मा.आयुक्तांनी मंजूरी दिली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73(ड) नुसार आयुक्तांना रू.25 लक्ष खर्चाचे अधिकार आहेत. या कामाचा खर्च रू.31.50 लक्ष असल्याने सुधारीत मंजुरी - अवलोकनार्थ मंजुरी स्थायी समिती / महासभेची घेतली नाही.

2011-12 च्या ठेकेदारास मुदतवाढ दिली आहे. शहरात दिवसाला 46 टॅकर फेरे कशाच्या आधारे ठरविले, याचे दप्तरी अभिलेखे उपलब्ध करून दिले नाहीत. विभागाने नियोजन केले नाही. या कामासाठी आयुक्तांची मंजूरी, करारनामा, कार्यादेश आणि काम सुरू केल्याची तारीख दि.01/10/2012 असे दाखवुन प्रदान केले आहे. एकाच दिवशी ही सर्व कामे केल्याने दि.01/10/2012 रोजी 46 फेऱ्यांनी पाणी पुरवठा केल्याचे पटत नाही. ठेकेदारासोबत केलेल्या करारातील अट क्र.14 नुसार उदयानास पाणी पुरवठा केल्यानंतर चलनावर उदयान मुकादमाची स्वाक्षरी घेणे बंधणकारक आहे. परंतु दि.01/10/2012 रोजी केलेल्या पाणी पुरवठा बाबतची चलने लेखा परीक्षणास उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे 46 फेऱ्यांची रक्कम रू.17480/- (46X380) वसुलपात्र आहे.

6) महानगरपालिकेच्या एकुण43 उद्यानापैकी कोणत्या उद्यानाचे सुशोभिकरण केले, याची नोंद संबंधित नोंदवहीत नाही. सबब मागील वर्षात सुशोभिकरण केलेल्या उद्यानाचे काम पुन्हा चालू वर्षात केले किंवा कसे याची लेखा परिक्षणास खातरजमा करता आली नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु.91,154/-

DATPMVM6001 (Ref No : 2, Hmm No : 17)

50 उद्याने सुशोभिकरण करणे करीता माती व शेणखत खरेदीतील अनियमितता.

माती व शेणखत खरेदी

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष :उद्यान विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1149618.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1149618.00/-

एल 1 निविदा धारकाने काम नाकारल्याने EMD जप्त रक्कम रू1 लक्ष जमा केल्याची नोंद दाखवली नाही. सुरक्षा अनामत रू26325/- वसुल केली नाही. लाल माती व शेणखताचे परीमाण आवश्यक तेवढे वापरल्याची खातरजमा करता आली नाही. रॉयल्टीची मुळ चलने उपलब्ध झाली नाही. मोजमाप नोंदी, मुकादमाच्या सहया असलेली मुळ चलने उपलब्ध झाली नाही.

उद्यानासठी माती व शेणखत खरेदी.

प्राकलन - रु.50 लाख

प्रशासकीय मंजुरी - वृक्षप्राधिकरण समिती ठराव क्र.08 दि.07.02.2012

निविदा तारीख - 04.04.2012 प्रि प्रेंस जनरल, लोकनायक, ई-टेंडरींग

एल 1 निविदा -मे.जय श्रीकृष्ण

एल 2 निविदा - मे.भुषण ट्रान्सपोर्ट

निविदा मंजुरी - स्थायी समिती ठराव क्र.17 दि.08.05.2012

करार - दि.08.06.2012

कार्यादेश - दि.03.10.2012

मुदत -1 वर्ष

कामाचा एकुण खर्च - रु.45.15 लक्ष

याकामासाठी 4 निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्याचा तपशील पुढील प्रमाणे.

प्रकार	मे.जय श्रीकृष्णा (प्रति ब्रास)	मे.भुषण ट्रान्सपोर्ट (प्रति ब्रास)	मे.मानस क. (प्रति ब्रास)	मे.श्रृती ई. (प्रति ब्रास)
लाल माती	1250	1575	1780	2100
शेणखत	1195	1360	1595	1750
सफेद रेती	3500	9500	11200	13500

एल 1 निविदा धारक मे. जय श्री कृष्ण यांना दि.22/05/2012 रोजी कार्यादेश दिला. त्याने कामास सुरुवात केली नसल्याने अंतिम नोटीस दि.30/05/2012 रोजी दिली आणि त्याचे काम काढून एल-2 निविदा धारक मे.भुषण ट्रान्सपोर्ट यांना दिले.

लेखापरिक्षण काळात खर्च केलेल्या काही प्रमाणकांचा उदाहरणा दाखल तपशिल पुढीलप्रमाणे.

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	तपशिल
45	30.03.13	453283	मे.भुषण ट्रान्सपोर्ट देयकातुन सुरक्षा अनामत रु.9066 वसुल केली नाही.
22	14.01.13	384535	मे.भुषण ट्रान्सपोर्ट देयकातुन सुरक्षा अनामत रु.7691 वसुल केली नाही.
27	08.02.13	478399	मे.भुषण ट्रान्सपोर्ट देयकातुन सुरक्षा अनामत रु.9568 वसुल केली नाही.

या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.15 दि.24/08/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र.344 दि.02/09/2015 रोजी केला असून, तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.

1) एल-1 निविदा धारकाने काम नाकारल्याने त्याचेवर महापालिकेने निविदा नस्तीमधील अट क्र.16 नुसार कारवाई करुन संबधिताकडून दोन दरातील फरकाची एकुण रक्कम रु.1207301/- वसुल करण्यासाठी प्रयत्न केला आणि संबधिताची EMD रक्कम रू.100000/- व आरोग्य विभागातील एका

देयकातून एकुण रक्कम रु.1149618/- वसुल केल्याची नोंद विभागाच्या टिपणीत आहे. परंतु EMD ची रक्कम रू.100000/- जप्त केल्याबाबत म्हणजे अनामत खाती खर्च व मनपा खाती जमा केल्याची नोंद लेखा परिक्षणास दाखविली नाही.

2) सुरक्षा अनामतीची रक्कम देयकातून 2% वसुली करण्याबाबत करारातील अट क्र.06 मध्ये तरतुद आहे. परंतु विभागाने प्रत्यक्षात प्रदान करताना सुरक्षा अनामतीची रक्कम रू.26325/- वसुल केली नाही, असे उपरोक्त प्रमाणक क्र.45,22,27 नुसार दिसून येते. सदरची रक्कम वसुलपात्र आहे.

3) मनपाच्या उद्यानासाठी किती लालमाती, शेणखत, सफेद रेती लागेल याचे नियोजन विभागाने केले नाही. आवश्यक्ता निश्चित न करता मागणी केल्याचे दिसून येते.

4) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारे उत्खननाद्वारे किंवा गोळा केलेले सर्व दगड, दगडाची भुकटी, गोटे, बारीक खडी, मुरुम, वाळू यावर स्वामित्व धनाची रक्कम प्रति ब्रास रु.200/- वसुल करुन शासन खाती (महसुल व वन) भरणा करावयाची आहे. याकामाचे बाबत रॉयल्टीच्या रक्कमा वसुल केल्याची झेरॉक्स चलने देयका सोबत जोडली आहे. चलनावर ठेकेदाराचे नांव नमुद आहे. परंतु कोणत्या कामासाठी साहित्य वापरले याची नोंद नाही. म्हणजेच महापालिकेला वरील कामासाठी पुरविलेल्या साहित्यावर रॉयल्टी भरली आहे किंवा इतर कामाचे बाबत ठेकेदारानी रॉयल्टी भरली आहे. याचा अर्थबोध होत नाही.

रॉयल्टीच्या मुळ पावत्या अभिलेख्यात जतन करुन ठेवल्या आहेत असे विभागाने खुलाश्यात नमुद केले आहे. परंतु मुळ पावत्या दाखविल्या नाहीत.

5) साहित्य ज्या ठिकाणी पुरविण्यात आले, त्या ठिकाणी जाऊन महापालिका बांधकाम अभियंत्याने मोजमापे घेऊन, मोजमाप नोंदवही क्र.39 मध्ये नोंदी घेऊन लेखा परिक्षणास सादर केले नाहीत. तसेच उपरोक्त उदारणातील प्रमाणक क्र.22 व 27 चे बाबत कार्यकारी अभियंता बांधकाम यांचे मोजमाप सबंधी पत्र जोडले नाही.

6) देयका सोबत मुकादमाने स्वाक्षरी केलेली चलने, प्रमाणक क्र.45,22,27 जोडणे अभिप्रेत आहे. लालमाती, शेणखते, सफेद रेती पुरविल्याबाबत मनपा मुकादम चलनावर सही करुन देतो. उपरोक्त कामाचे बाबत सदर चलनाच्या झेरॉक्स प्रती जोडल्या आहेत.

आक्षेपाधिन रक्कम रु. 1149618/-

DATPMVM6001 (Ref No : 3, Hmm No : 15)

51 उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाने ठेका पध्दतीने मजूर घेवून त्यांचेव्दारे उद्यान विभागाची कामे करुन घेतल्याबाबत.

मजूर पुरवठा

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष :उद्यान विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 15650000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 15650000.00/-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 कलम 73 नुसार महापालिकेच्या सभागृहाच्या (सर्वसाधारण सभेची) प्रशासकीय व आर्थिक मंजुरी घेतल्याचा ठराव लेखा परीक्षणास उपलब्ध झाला नाही. ठेकेदारास दंडात्मक कारवाई केली नाही. विभागाकडील मजूर हजेरीची नोंदवही उपलब्ध झाली नाही. नियोजनाचा अभाव, अर्थसहाय्य देऊन पुरविलेल्या सेवा बाबतचा अहवाल उपलब्ध झाला नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने 43उद्याने, 13चौपाट्या, 8मैदाने, 2नर्सरी, जवळपास 15 कि.मी चे दुभाजक विकसित केलेले असून सदर ठिकाणी शोभिवंत फुलझाडे, मोठी झाडे, तसेच लॉन लावलेली आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात 1,2,3,4 प्रभागामध्ये 2 ट्रक्टर - टॅंकर, 2 टॅम्पो जिप,1 हायड्रॉलिक शिडी, 1 ठेक्याने घेतलेला टॅम्पो जीप व कार्यालयीन वापरासाठी 1 वाहन उपलब्ध आहे. टॅंकरद्वारे झाडांना पाणीपुरवठा केला जातो, डायड्रॅलिक सिडी वाहनाद्वारे धोकादायक वृक्षांची छाटणी केली जाते. उदयान विभागाची सर्व कामे मजूराकडून करून घेतली आहेत.

प्राकलन - रु.170 लक्ष

प्रशासकीय मंजुरी - ठरावाची प्रत उपलब्ध झाली नाही.

निविदा तारीख - 04/04/2012 दै. फ्री प्रेस जनरल व दै. नवशक्ती, ई-टेंडरींग (4 निविदा प्राप्त) परंतु पात्र नसल्याने फेर निविदा मागविल्या

फेर निविदा - दि.05/05/2012 दै. फ्री प्रेस जनरल व दै. संध्यानंद ई-टेंडरींग (6 निविदा प्राप्त)

एल 1 निविदा - मे.स्टार कंस्ट्रक्शन दर- रु.293 प्रती मजुर, वाटाघाटीने रु.290.50पै.

निविदा मंजुरी - स्थायी समिती ठराव क्र.39 दि.06/07/2012

करार - दि.06/07/2012

कार्यादेश - क्र.200 दि.06/07/2012 (प्रभाग क्र.1,2 साठी 85 मजूर, प्रभाग क्र.3,4 साठी 85 मजुर)

मुदत -1 वर्षे

कामाचा एकुण खर्च - रु.156.50 लक्ष

कामाची निविदा- 06/07/2012 रोजी मंजुर झाली, त्यापुर्वीच्या काळासाठी मागील 2010-11 मधील निविदा धारकास मुदतवाढ दि.06/06/2012 पर्यंत दिलेली आहे. (मे.गणेशकृपा ट्रान्सपोर्ट व मे.स्टार कंस्ट्रक्शन)

लेखापरिक्षण काळात खर्च केलेल्या काही प्रमाणकांचा उदाहरणा दाखल तपशिल पुढीलप्रमाणे.

अ.क्र.	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	तपशिल

1	1	19/04/2012	4,86,422	मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट, 01/03/2012 ते 31/03/2012
2	2	19/04/2012	4,88,990	मे.स्टार कंस्ट्रक्शन 01/03/2012 ते 31/03/2012
3	26	24/01/2013	15,19,024	मे.स्टार कंस्ट्रक्शन 01/12/2012 ते 31/12/2012

मनपा फंडातुन -

4	470	18/07/2012	4,79,146	मे.स्टार कंस्ट्रक्शन 01/06/2012 ते 30/06/2012
5	1594	13/03/2013	22,06,057	मे.स्टार कंस्ट्रक्शन 01/02/2013 ते 28/02/2013
6	1627	19/03/2013	6,89,066	मे.स्टार कंस्ट्रक्शन 01/02/2013 ते 28/02/2013

या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.14 दि.24/08/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र.344 दि..02/09/2015 रोजी केला असून, तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 नुसार महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या प्रशासकीय व आर्थिक मंजुरी शिवाय कोणतीही संविदा करता येणार नाही. मजुर पुरवठयाचा अंदाजीत खर्च रु.170 लक्ष असल्याने या प्रकरणी सर्वसाधरण सभागृहाची प्रशासकीय व आर्थिक मंजुरी घेणे आवश्यक होते. परंतु महासभेची प्रशासकीय व आर्थिक मंजूरी घेतली नाही.

2) ठेकेदारासोबत केलेल्या करारातील अट क्र.11 व नविन ठेका करारातील अट क्र.30 नुसार ठेकेदाराने इंष्ठांपेक्षा कमी मजूरांचा पुरवठा केल्यास प्रती मजूर रु.100 दंडात्मक कारवाई आहे. परंतु विभागाने अशी दंडात्मक कारवाई केली नाही. उदाहरणादाखल तपशिल पुढील प्रमाणे-

प्रमाणक क्र.01 दि.19/04/2012 रु.486422 अन्वये मे.गणेश कृपा ट्रान्सपोर्ट, यांना दि.01/03/2012 ते दि.31/03/2012 पर्यंतचे प्रदान केले आहे. या देयकाची तपासणी करता ठेकेदाराने 52 मजूर कमी पुरवठा केल्याचे दिसून येते. त्याचे बाबत दंडाची होणारी रक्कम रु.5200 वसूल केली नसल्याने अर्धसमास पत्र क्र.14 दि.24/08/2015 रोजी विचारणा केली होती. सदरची रक्कम विभागाने सामान्य पावती क्र.776864 दि.02/09/2015 अन्वये वसुल करुन मनपा फंडात जमा केली आहे.

प्रमाणक क्र.02 दि.19/04/2012 रु.488990 मे.स्टार कंस्ट्रक्शन यांना दि.01/03/2012 ते दि.31/03/2012 पर्यंतचे प्रदान केले आहे. या देयकाची तपासणी करता ठेकेदाराने 40 मजूर कमी पुरवठा केल्याचे दिसून येते. त्याचे बाबत दंडाची होणारी रक्कम रु.4000 वसूल केली नसल्याने अर्धसमास पत्र क्र.14 दि.24/08/2015 रोजी विचारणा केली होती. सदरची रक्कम विभागाने सामान्य

पावती क्र.776837 दि.31/08/2015 अन्वये वसुल करुन मनपा फंडात जमा केली आहे.
अशा प्रकारे अन्य देयकांचे प्रदान करताना दंडात्मक कारवाई केल्याची खात्री करून त्यानुसार कार्यवाही आवश्यक आहे.

3) करारनाम्यातील अट क्र.20 नुसार कंत्राटी कामगार कायदयानुसार आवश्यक ते सर्व अभिलेखे (हजेरी नोंदी, दैंनदिन कामाच्या नोंदी इत्यादी) उद्यान विभागाच्या अधिक्षकांने तपासून, त्यावर अभिप्राय नमुद करुन कारवाई करावयाची आहे. परंतू विभागाकडे किती कामगार हजर होते, याचा तारीखवार तपशील, त्यांना केलेल्या कामाचा तपशील इ. बाबी लेखापरिक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. सबब कामाच्या प्रमाणात खर्च झाल्याची लेखा परिक्षणाची खातरजमा करता आली नाही. विभागाने केलेल्या खुलाशानुसार नोंदवही ठेवण्यात आली असल्याचे नमुद केले आहे. परंतु सदर नोंदवही लेखा परीक्षणास दाखविली नाही.

4) उद्यानातील कामासाठी किती मजूर लागतील, त्याच्याकडून कोणती कामे करायची आहेत, एकुण 43 उद्यानात किती-किती मजूर कामासाठी आवश्यक आहेत, रोज किती काम आहे, याबाबतची अंदाजीत आकडेवारी विभागात उपलब्ध नाही. ठेकेदाराकडून किती मजूर घेण्यात यावे, याच्या अंदाज विभागाकडे नाही. 2011-2012 मध्ये एकूण 150 मजूर ठेक्याने घेतले होते. 2012-2013 मध्ये 170 मजूर ठेक्याने घेतले आहेत. महानगरपालिकेच्या मालकिची उद्याने किती, त्याचे एकुण क्षेत्रफळ किती, चौरस मिटर व करावयाच्या कामानुसार किती मजूरांची आवश्यकता आहे. याबाबतचा अंदाज विभागाने केला नाही.

2012-13 मधे 20 मजूर वाढविले आहेत. परंतु काम किती वाढले, मैदाने किती वाढली कि चौपाटया वाढल्या याचा उल्लेख विभागाच्या नस्तीत दिसून आला नाही. मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम क्र.58 मध्ये दिलेल्या वित्तीय औचित्याचे पालन झाले नाही. विभागाने केलेल्या खुलाशानुसार उद्यानाचे क्षेत्रफळ 140000चौ.मीटर, स्मशाने क्षेत्रफळ 46937चौ.मीटर, मैदान क्षेत्रफळ 249983 चौ.मीटर असल्याचे नमुद केले आहे. त्यानुसार प्रत्यक्षात जादा मजुर लागतील, असेही नमुद केले आहे. परंतु एकुण चौ.मीटर क्षेत्रफळानुसार आवश्यक असलेल्या कामगारांची संख्या, त्याकडून काम करावयाचा तपशील इ. बाबी टिपणीत नमुद करुन सभागृहाची मंजुरी घेतल्याचे दिसून आले नाही.

5) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 95अ नुसार अर्थसहाय्य देवून पुरविलेल्या सेवा बाबतचा अहवाल स्थायी समितीस अर्थसंकल्प सादर करतांना त्या सोबत दयावयाचा आहे. म्हणजे लगतपुर्वीच्या वर्षात अर्थसहाय्य देवून पुरविण्यात आलेला सेवांचा अहवाल सादर करावयाचा आहे. वृक्ष प्राधीकरण विभागाची एकुण जमा रु.180.95 लक्ष आहे आणि एकुण खर्च रु.729.35 लक्ष इतका आहे. म्हणजे खर्च जादा आहे. सबब कलम 95अ नुसार तयार केलेल्या अहवालाची प्रत मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम 1930 अध्यादेश 2011 मधील कलम 06 नुसार मागणी करूनही लेखापरिक्षणास सादर केली नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु.1,56,50,000/-

52 अधिकृत व अनधिकृत मोबाईल टॉवर्स बाबत.

मोबाईल टॉवर्स

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : नगर रचना मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 2235200.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2235200.00/-

अनधिकृत मोबाईल टॉवर्स यांच्याकडून छाननी फी, सुरक्षा अनामत, परवाना शुल्क, विनापरवाना शुल्क, नुतनीकरण फी याबाबतची होणार रक्कम रु.22,35,200/- वसुलपात्र आहे. अनधिकृत मोबाईल टॉवर्सबाबत विभागाने बांधकाम तोडून टाकण्याची कार्यवाही केली नाही.

मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीत मोबाईल टॉवर शुल्क आकारणे बाबत महासभा ठराव क्र.50 दि.10/10/2008 अन्वये मंजूरी दिलेली आहे. तसेच मोबाईल टॉवर्स / यंत्रणा बसविणे कामी महासभा ठराव क्र.47 दि.15/01/2013 अन्वये सुधारीत धोरण निश्चित केले आहे.

अ.क्र.	प्रकार	ठराव क्र.50 दि.10/10/08 नुसार रक्कम रू.	ठराव क्र.47 दि.15.01.2013 नुसार रक्कम रू.
1	छाननी फी	800/-	800/-
2	सुरक्षा अनामत (परतावा पात्र)	25000/-	50000/-
3	परवाना शुल्क (प्रती वर्ष)	15000/-	20000/-
4	विना परवाना दंडात्मक शुल्क	10000/-	50000/-
5	नुतरणीकरण	1 वर्ष	20000/- मुदत संपल्यावर 1 महिन्या पर्यत, त्यानंतर रु.1000/- प्रती महिना 1 वर्ष पर्यंत

महासभा ठराव क्र.47 दि.15/01/2013 अन्वये महापालिका क्षेत्रात परवानगी घेतलेल्या मोबाईल टॉवर्सची संख्या 240 व उर्वरीत 176 विना परवानगी उभारण्यात आले आहेत. प्रभागाकडील प्राप्त झालेल्या यादीनुसार, विभागाने एकुण मोबाईल टॉवरची संख्या 310 दाखविली असून प्रभाग क्र.02 व

06 ची माहिती अप्राप्त असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे प्रभागनिहाय मनपा क्षेत्रातील एकूण मोबाईल टॉवरची संख्या निश्चित करता आली नाही. तसेच विभागाने दिलेली एकुण मोबाईल टॉवरची संख्या-310 ची परवानगी घेतलेले व न घेतलेले मोबाईल टॉवर अशी विगतवारी देण्यात आलेली नाही. तसेच ठराव क्र. 47 नुसार मोबाईल टॉवरची संख्या व प्रभागनिहाय विभागाने सादर केलेली एकुण मोबाईल टॉवरची संख्या यांचा मेळ बसत नाही. याबाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.31 दि.04/09/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र.निरंक दि.10/09/2015 रोजी केला असून, तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) महासभा ठराव क्र. 47 दि. 15/01/2013 अन्वये दाखवलेली परवानगी घेतलेल्या मोबाईल टॉवरची संख्या 240 असून विभागाने ती 172 दाखवली आहे. त्यामुळे ठराव क्र. 47 नुसार मोबाईल टॉवरची संख्या व प्रभागनिहाय विभागाने सादर केलेली एकुण मोबाईल टॉवरची संख्या यांचा मेळ बसत नाही. या तफावतीबाबत विभागाने कोणताही खुलासा केला नाही.

2)विभागाने दि.10/09/2015 रोजी केलेल्या खुलाशानुसार एकुण 216 मोबाईल टॉवर पैकी 172 मोबाईल टॉवर्सला परवाना दिलेला असुन त्याकडुन शुल्क, मुदतवाढ शुल्क वसुल केले आहेत. उर्वरीत 44 मोबाईल टॉवरची परवानगी घेतली नाही. विनापरवानगी 44 टॉवर्स वसलपात्र आहेत.

44xरू.50,800 (किमान - ठराव क्र. 50 दि. 10/10/2008 नुसार) = रू.22,35,200/- संबंधिताकडुन रक्कम रु.22,35,200/- वसुलपात्र आहे.

तसेच मुदतवाढीची रक्कम देखील संबंधिताकडुन वसुल केलेली नाही. सदर रक्कम सुध्दा वसुलपात्र आहे.

3) महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडुन / प्रभाग कार्यालयाकडुन अनधिकृत मोबाईल टॉवर्सला नोटीसा बजाविण्यात येतात, असा खुलासा विभागाने केला. परंतु याबाबतचे अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिले नाहीत. 3 मोबाईल टॉवर्स बांधकाम अंशत: तोडुन काही सामुग्री जप्त केल्याचे कळविले आहे. परंतु जप्त्ा केलेल्या साहित्याची नोंद असलेली नोंदवही, लिलावाचे अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिले नाहीत.

4) विभागाच्या खुलाश्यानुसार महापालिकेच्या धोरणाविरोधात विविध मोबाईल कंपन्यांनी मा. उच्च न्यायालयात विविध रिटपिटीशन दाखल केलेली आहेत. मा.उच्च न्यायालयाने महापालिकेचे धोरण हे शासनाच्या धोरणानिशी विसंगत असल्याचे स्पष्ट करून शासन निर्णय दि.04/03/2014 अन्वये धोरण निश्चित करण्याबाबत आदेशीत केल्याचे नमुद केले आहे. याबाबतची मुळ संचिका लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसारचे कार्यवाहीबाबत लेखा परीक्षण करता आले नाही.

वसुलपात्र रक्कम रु. 22,35,200/-

DATPMVM6001 (Ref No : 6, Hmm No : 31)

53 बाजार फी/ लायसन्स फी वसुली करीता करण्यात आलेल्या लिलावाच्या करारनाम्यामधील त्रुटी बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष : बाजार लिलाव विभाग मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब
आक्षेपाधीन रक्कम रु. 8619163.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 49200.00/-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दि.10.09.2012 दै.पुण्यनगरी, दै.हमारा महानगर च्या जाहिर नोटीसीनुसार ई ऑक्शन पध्दतीने विभागातील बाजार फी/ लायसन्स फी वसुली करीता लिलाव करण्यात आले आहेत. बाजार फी/ लायन्स फी वसुली करीता एकूण चार ठेके देण्यात आले आहेत. सदर चार ठेकेदारांनी अनामत रक्कम महापालिका फंडात भरल्याचे लेखापरीक्षणास दर्शविले नाही. तसेच सदर ठेकेदारांनी नियमापेक्षा कमी मुद्रांक शुल्क रकमेच्या करारनाम्यावर करार केलेले आहेत. त्यामुळे कमी भरलेली मुद्रांक शुल्काची रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बाजार फी / लायसन्स फी वसुली करीता देण्यात आलेल्या ठेक्याचे करारनामे तपासले असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 50 दिनांक 15/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केलेला नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर विभागाकडून दरवर्षी बाजाराचे लिलाव करण्यात येतात. महानगरपालिकेच्या दि.10.09.2012 दै.पुण्यनगरी, दै.हमारा महानगर च्या जाहिर नोटीसीनुसार ई ऑक्शन पध्दतीने विभागातील बाजार फी/ लायसन्स फी वसुली करीता लिलाव करण्यात आले आहेत. लिलावातील अटीशर्ती नुसार करारनामा करण्यात येत असतो. बाजार फी / लायसन्स फी वसुली करीता एकूण चार ठेके देण्यात आले आहेत. त्यापैकी 3 ठेकेदारांचे करारनामे लेखापरीक्षणास दाखविले असून एक करारनामा मे. सिमरन एंटरप्रायजेस रक्कम रु.754848/- लेखापरिक्षणास दाखविलेला नाही. तसेच याबाबातची नस्ती लेखा परीक्षणास दाखविण्यात आलेली नाही.

बाजार फी लिलाव करारनाम्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

करारनामा लिहून देणारा	बाजार फी वसुलीचा प्रभाग	ठेक्याची रक्कम (रूपयात)
श्री. राजेश तुलसीदार बेलानी	मिरा रोड ते चेणा	18117080
श्री. विजय गजाधार सोमानी	भाईंदर (पू.)	17222708
मे. सिमरन एंटरप्रायजेस	भाईंदर (प.)	17088980

लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) दिनांक 15.10.2012 पासून उपरोक्त ठेकयांचा कामांचा कार्यादेश देण्यात आला आहे. करारनाम्यातील अट क्रमांक 14(1) नुसार लिलाव मंजूर केल्यानंतर व कार्यादेश दिल्यानंतर ठेका रकमेच्या 15 % जमा अनामत रक्कम महापालिकेच्या फंडात बिन व्याजी मूदत पूर्ण होईपर्यंत जमा करावयाची आहे. परंतू सदर ठेकेदारांनी त्यांच्या संबधित अनामत रक्कम 1) ठेक्याची रक्कम रु.18117080/- च्या 15% अनामत रक्कम रु.2717562/- 2) ठेक्याची रक्कम रु.17222708/- च्या 15% अनामत रक्कम रु.2583406/- व 3) ठेक्याची रक्कम रु.17088980/- च्या 15% अनामत रक्कम रु.2563347/- अशा अनामती रकमा एकूण रक्कम रु.7864315/- महापालिका फंडात अनामत खाती जमा केल्याचे दिसून आले नाही. तसेच विभागाने अनामत नोंदवही ठेवल्याचे लेखापरीक्षणास दर्शविले नाही. याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर रक्कम रु.7864315/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) करारनाम्यातील अट क्र.14 (2) अन्वये मंजूर लिलाव रकमेची 12 हप्यात (12 महिन्याकरीता) विभागाणी करुन सदर रक्कम प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात महानगरपालिकेच्या फंडात जमा करावी. उपरोक्त करारनाम्यामध्ये कामाचा कालावधी नमूद केलेला नाही. करारनाम्यात कामाचा कालावधी नसल्याने 12 हप्ते कसे ठरविले व त्याप्रमाणे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात 1/12 लिलावाची रक्कम जमा झाल्याबाबत खात्री पटविण्यात आली नाही.

3) उपरोक्त करारनामे रु.100/- च्या स्टँप पेपरवर करण्यात आले आहेत. मुंबई मद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील कलम 63 व 54 (ii) नुसार 10 लाखाच्या वरील करारनाम्यांकरीता प्रथम रु.10 लाखा करीता रु.100/- व त्यापुढील प्रत्येक लाख रुपयांपर्यंतच्या करारनाम्याकरीता रु.100/- एवढया रकमेच्या स्टँप पेवरवर करारनामा करणे आवश्यक होते. तथापी बाजार लिलावा करिता करण्यात आलेल्या करारनाम्यांकरीता वरील कायदयातील तरतूदीनुसार आकारण्यात येणा-या शुल्काचा भरणा झालेला नसल्याचे लेखापरीक्षणाचे निदर्शनास आले. उपरोक्त करारनामे रु.100/- एवढया मुद्रांक शुल्काच्या पेपरवर करण्यात आले आहेत.

खालील प्रमाणे करारनाम्याचे मुद्रांक शुल्क कमी भरले आहे.

कंत्राटदाराचे नांव	ठेक्याची रक्कम	देय मुद्रांक शुल्क	भरलेले मुद्रांक शुल्क	कमी भरलेले मुद्रांक शुल्क
1	2	3	4	5
श्री. राजेश तुलसीदार बेलानी	18117080	17100	100	17000
श्री. विजय गजाघार सोमानी	17222708	16300	100	16200
श्री. सिमरन एंटरप्रायजेस	17088980	16100	100	16000
एकूण कमी भरलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम				49200

उपरोक्त करारनामे कमी मुद्रांक शुल्काच्या रकमेवर केले आहेत. त्यामुळे रक्कम रु.49200/- इतका शासनाचा महसुल बुडाला आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 50 दिनांक 15/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. परंतु विभागाकडून खुलासा करण्यात आलेला नाही. कमी भरलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम रु.49200/- संबधितांकडून वसूल करुन शासन खाती भरणा करणे

आवश्यक आहे.

4) बाजार फि वसुलीबाबतचा करारनामा मे. सिमरन एंटरप्रायजेस रक्कम रु.754848/- लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. तसेच याबाबातची नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदर मे. सिमरन एंटरप्रायजेस यांनी करारनाम्याप्रमाणे काम केले किंवा कसे, वसुल करुन भरलेली बाजार फि ची रक्कम योग्य असल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता येत नसल्याने सदर रक्कम रु.754848/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.8619163/-

वसुलपात्र रक्कम रु. 49200/-

DATAMSM6401 (Ref No : 14, Hmm No : 50)

54 बाजार लिलाव /बाजार फी वसुलीतील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष : बाजार लिलाव विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 1180000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 58700.00/-

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे बाजार फी/ लायसन्स फी इत्यादी वसूलीचा दिनांक 26/03/2013 रोजीची वसूल केलेली रक्कम रु.58700/- चे चलन एकत्रित चलन फाईलमध्ये आढळून आले नाही. सदर दिनांकास रोखीने जमा झालेली रक्कम रु.48860/- लेखा शाखेतील रोख जमा पुस्तकात दिसून आली नाही. तसेच बँक विवरणपत्र लेखापरीक्षणास दाखविले नसल्यामुळे धनादेशाची रक्कम रु.9840/- या रकमेबाबत पडताळणी करता आली नाही. अशी एकूण रक्कम रु.58700/- ची नोंद लेखा शाखेमधील कॅश बुकला दिसून आली नाही. त्यामुळे सदर रक्कम रु.58700/- मनपा फंडात जमा झाल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर विभागाकडील बाजार फी वसूलीचे लेखापरीक्षण केले असता अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 51 दिनांक 15/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केलेला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) बाजार लिलाव /बाजार फी / लायसन्स इत्यादी वसूलीची पोटकिर्द तपासली असता लेखापरीक्षणासाठी निवड केलेला महीना माहे मार्च 2013 मधील वसुल केलेली एकूण जमा रक्कम रू.4648846/- एवढी आहे. विभागाने मुख्यालयी जमा झालेल्या बाजार फी / लायसन्स इत्यादी रक्कम रु.3731731/- वसूलीची पोटकिर्द व जमा पावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिल्या आहेत. परंतू

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभागांच्या (1)भाईंदर (प.) प्रभाग क्रमांक 1, (2)भाईंदर (पू.) प्रभाग क्रमांक 2, (2)भाईंदर (पू.) प्रभाग क्रमांक 3, (3)मिरा रोड प्रभाग क्रमांक 4, (5)विभाग मिरा या प्रभागांच्या माहे मार्च 2015 च्या जमा झालेल्या बाजार फी / लायसन्स इत्यादी रक्कम रु.917115/- वसूलीची पोटकिर्द व जमा पावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध करण्याबाबत अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 51, दिनांक 15/09/2015 अन्वये मागणी करुनही सदर अभिलेख उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे माहे मार्च 2013 मधील बाजार फी / लायसन्स इत्यादी वसुल केलेली एकूण जमा रक्कम रू.4648846/- पैकी रक्कम रु.917115/- जमा रकमेचे लेखापरीक्षण करता आले नाही. सदर प्रभागांचे बाजार फी इत्यादी च्या वसूलीच्या रकमा जमा पावती पुस्तकानुसार अचुक व योग्य जमा झाल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

2) जमा पावती पुस्तक क्रमांक 006498 पावती क्रमांक 649799, श्रीमती. प्रमिला म. गंगीकर, रक्कम रु.2160/- या जमा पावतीवर लिपिक/ लेखापाल/ रोखपाल व प्राधिकृत अधिका-याची स्वाक्षरी नाही. त्यामुळे सदर पावती ग्राहय धरता येत नाही.

3) दि.26/03/2013 चे बाजार फी / लायसन्स इत्यादी वसूलीचे चलन रु.58700/- एकत्रित चलन फाईलमध्ये उपलब्ध झाले नाही. बाजार लिलाव /बाजार फी विभागाच्या पोटकिर्दी मधील दिनांक 26/03/2013, पान क्रमांक 73 वरील बाजार लिलाव /बाजार फी जमा केल्याच्या नोंदी पुढील प्रमाणे आहेत- (1)भाईंदर (प.) प्रभाग क्रमांक 1 चे जमा रु.12040/-, (2)भाईंदर (पू.) प्रभाग क्रमांक 2 चे जमा रु.10160/-, (3)भाईंदर (पू.) प्रभाग क्रमांक 3 चे जमा रु.4200/-, (4)मिरा रोड प्रभाग क्रमांक 4 चे जमा रु.18450/- व (5)विभाग मिरा चे जमा रु.4010/- असे एकूण जमा रु.48860/- आणि पावती पुस्तक क्रमांक 6498 पावती क्रमांक 649767 ने श्री.ठाकूर फेब यांच्याकडून धनादेश क्रमांक 541168, दिनांक 9/03/2013 अन्वये वसुल केलेला करमणूक कर रु.9840/- अशी एकूण दिनांक 26/03/2013 रोजी जमा झालेली रक्कम रु.58700/- ची नोंद विभाच्या पोटकिर्दीत दिसून येते. परंतू सदर दिनांक 26/03/2013 रोजी जमा झालेल्या रक्कम रु.58700/- चे चलन एकत्रित चलन फाईलमध्ये आढळून आले नाही. तसेच बाजार लिलाव / बाजार फी ची दि.26/03/2013 रोजीची रोख जमा रक्कम रु.48860/- रकमेची नोंद लेखा शाखेमधील रोख जमा पुस्तकामध्ये दिसून आली नाही तसेच बँक विवरणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिले नसल्यामुळे धनादेशाने केलेली जमा रु.9840/- रक्कम जमा झाल्याबाबत खात्री करता येत नाही. दिनांक 26/03/2013 रोजीची रोख जमा रु.48860/- आणि धनादेशाची जमा रु.9840/- अशी एकूण जमा रक्कम रु.58700/- रकमेची नोंद कॅश बुकला आढळून आली नाही आणि त्यामुळे दिनांक 26/03/2013 रोजी जमा झालेली सदर रक्कम रु.58700/- मनपा फंडात जमा झाल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

4) विभागाने बाजार फी रु.20/- ची कुपन पुस्तकाची साठा नोंदवही ठेवलेली नाही. तसेच सन 2012/13 मधील बाजार फी कुपन पुस्तके लेखापरीक्षणास दाखविली नाहीत. तसेच अनुषंगीक व आवश्यक बाब म्हणून भांडार शाखेकडील, बाजार फी रु.20/- ची कुपन पुस्तके कर विभागास वितरीत केलेली साठा नोंदवही तपासली असता कुपन पुस्तकांच्या हिशेबामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

सन 2012/13 ची प्रारंभिची शिल्लक 12715 पुस्तके व अखेरची शिल्लक 3755 असून एकूण 8960 पुस्तके सन 2012/13 मध्ये वितरीत केल्याचे साठा नोंदवही मध्ये दर्शविले आहे. सदर कुपन पुस्तकांना सलग क्रमांक देण्यात आलेले नाहीत. म्हणजे पुस्तक क्रमांक 1 ते 1000 नंतर पुस्तक

क्रमांक 1 ते 1000 असे क्रमांक दिले आहेत. साठा नोंदवहीमध्ये ब-याच ठिकाणी कुपन पुस्तके दिलेल्या संख्येला व शिल्लक संख्येला खाडाखोड केलेली आहे. साठा पुस्तक पान क्रमांक 61 वर दि.11/12/2012 रोजी प्रत्यक्षात 130 कुपन पुस्तके दिलेली नोंद आहे. या नोंदी अगोदर दिलेल्या पुस्तकांचा पुस्तक क्रमांक 861 ते 1000 अशी पुस्तक क्रमांकाची नोंद आहे. पुस्तक क्रमांक 861 ते 1000 ही 140 पुस्तके होतात त्यामुळे 10 कुपन पुस्तकांचा मेळ होत नाही. म्हणजे वितरित पुस्तके 140 परंतू पुस्तके दिल्याची नोंद 130 अशी दर्शविली आहे. साठा पुस्तक पान क्रमांक 61 वर दि.18/01/2013 रोजी 601 ते 900 अशी 300 पुस्तके दिली आहेत परंतू 1 ते 600 क्रमांकाची पुस्तके कोणाला दिली ते दर्शविले नाही. म्हणजे 600 पुस्तकांचा मेळ होत नाही. साठा नोंदवही मध्ये पुस्तकाच्या क्रमांकानुसार पुस्तके वितरित केली आहेत परंतू प्रत्यक्षात विभागास कमी पुस्तके मिळाली आहेत. यावरून पुस्तके दिल्याचे दर्शवून प्रत्यक्षात (10+600) 610 पुस्तके कमी दिल्याचे दिसत आहे. तसेच साठा पुसतक पान क्रमांक 62 वर दि.7/02/2013 रोजी 131 ते 210 अशी पुस्तक क्रमांकानुसार 80 पुस्तके होत असताना 100 पुस्तके दिल्याचे दर्शविले आहे. प्रत्यक्षात 80 पुस्तके दिली आहेत. म्हणजे 20 पुस्तके जास्त दिली आहेत. अशाप्रकारे एकूण (610-20) 590 पुस्तके कमी दिली आहेत. यावरुन 590 पुस्तकांचा हिशेब लागत नसल्याने सदर पुस्तके कोणाला दिली व त्या 590 पुस्तकांचा योग्य वापर झाला किंवा कसे याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 51, दिनांक 15/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता परंतू खुलासा केला नसल्यामुळे सदर 590 पुस्तकांच्या वापरा बाबत लेखापरीक्षणाची खात्री पटविलेली नाही. 590 पुस्तकांचे प्रत्येकी 100 पावत्यांप्रमाणे 59000 एवढया पावत्यांचे रु.20/- प्रमाणे रु.1180000/- एवढया रकमेच्या पावत्या उपलब्ध झालेल्या नाहीत. तथापी सदर 590 पावती पुस्तकांचे प्रति पावती रु.20/- प्रमाणे येणारी रक्कम रु.1180000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

5) सन 2012-13 मधील बाजार लिलाव/ फी वसुलीची मागणी, वसुली व थकबाकी याबाबतची माहिती/ तपशिल अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 51, दिनांक 15/09/2015 अन्वये मागणी करुनही लेखापरीक्षणास देण्यात आलेला नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु.1180000/-

वसुलपात्र रक्कम रु. 58700/-

DATAMSM6401 (Ref No : 15, Hmm No : 51)

55 मालमत्ता हस्तांतरणापोटी फी आकारणी करुन वसुल न केल्याने झालेल्या आर्थिक नुकसानाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 05

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 6000.00/-

2012-13 या आर्थिक वर्षामधील मालमत्ता हस्तांतरण प्रकरणांची तपासणी करतांना प्रथम खरेदीदाराकडून सदर मालमत्ता दुसऱ्या खरेदीदारास व दुसऱ्या खरेदीदाराकडून तिसऱ्या खरेदीदास विक्री करण्यात आल्याचे आढळून आले आहे. परंतू सदर खरेदी व्यवहारानंतर सदर मालमत्ता हस्तांतरण प्रकरणात मालमत्ता हस्तांतर फी वसुल न करता तिसऱ्या वा त्यानंतरच्या खरेदीदाराच्या नावे मालमत्ता हस्तांतरणास मान्यता देण्यात आल्यामुळे मालमत्ता हस्तांतरणात महापालिकेस प्राप्त होणाऱ्या महसुलाचे नुकसान झाले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या निवासी मालमत्ता धारकांकडून रू.1000/-, बिगर निवासी मालमत्ता धारकांकडून रू.1500/- व झोपडपट्टी विभागातील मालमत्ता हस्तांतरणासाठी रू.500/- एवढी फी आकारण्यास मा. महासभा ठराव क्र.13 दि.18/04/2008 अन्वये मान्यता देण्यात आली आहे. मिरा भाईंदर मनपाच्या प्रभाग समिती कार्यालय क्र.01 यांचेकडील 2012-13 मधील मालमत्ता हस्तांतरण प्रकरणांची तपासणी करता आढळुन आलेल्या त्रुटींबाबत खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.92 दि.14/10/2015 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखापरीक्षणास खुलासा करण्यात आला नाही. तरी खालील प्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) प्रभाग समिती क्र.01 मालमत्ता क्र. डी03000129800 वरील मे. पटनी कंम्प्युटर प्रा.लि. यांचे नाव कमी करून श्री.देवचंद वीरचंद भिंडारिया यांचे नाव हस्तांतरण करण्यास प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र.01 यांची जा.क्र.मनपा/प्र.का.क्र.1/1450/3174/2012-13 दि.10/09/2012 अन्वये मान्यता दिली असून पावती क्र.609632 दि. 05/06/2012 अन्वये रू.1000/- एवढी मालमत्ता हस्तांतरण फी वसुल करण्यात आली आहे.

सदर नस्तीची तपासणी करता मे.पटनी कंम्प्युटर प्रा.लि. यांचेकडून सदर मालमत्ता श्री.अजय लालचंद गुप्ता यांना विक्री करण्यात आली असुन सदर व्यवहारात मालमत्ता हस्तांतरण फी वसुल केलेली नाही. श्री.अजय लालचंद गुप्ता यांनी सदर मालमत्ता श्री.देवचंद वीरचंद भिंडारिया यांना विक्री केल्याचे खरेदी विक्री करारनाम्यावरून दिसुन येते. मे.पटनी कंम्प्युटर प्रा.लि. यांचे नावे असलेली मालमत्ता श्री.देवचंद वीरचंद भिंडारीया यांचे नावे हस्तांतरीत केल्यामुळे हस्तांतरण फी पोटी महापालिकेचे रू.1000/- एवढे नुकसान झाले आहे.

2) मालमत्ता क्र.डी020001651007 वरील श्री.हरेशकुमार के. शाह यांचे नाव कमी करून श्रीम.दिप्ती महेश ठाक्कर यांचे नावे हस्तांतरणास प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.01 यांनी क्र.मनपा/प्र.क.क्र.1/व.क्षे.4118/5724/2012-13 दि.19/03/2013 अन्वये मान्यता दिली असुन मालमत्ता हस्तांतरण फी रू.1000/- पावती क्र.662208 दि.25/03/2013 अन्वये भरणा केली आहे.

सदर नस्तीची पडताळणी करता श्री.महेश पी. शहा हे प्रथम खरेदीदार यांनी सदर मालमत्ता श्रीम.विजयाबेन पटेल यांना तसेच श्रीम.पटेल यांचेकडून श्री. भिमजी पटाडिया यांना विक्री करण्यात आली. श्री.पटाडिया यांनी सदर मालमत्ता श्रीम.दिप्ती महेश ठक्कर यांना विक्री केली आहे. श्री.महेश शहा या प्रथम खरेदीदाराच्या नावे असलेली मालमत्ता श्रीम.पटेल व श्री.पटाडिया यांचे हस्तांतरणासाठी हस्तांतरण फी वसुल करण्यात आलेली नसल्यामुळे महापालिकेचे रू.2000/- इतक्या हस्तांतरण शुल्काचे नुकसान झाले आहे.

3) मालमत्ता क्र.डी03000129800 वरील श्री.किसनलाल ए.कटारिया यांचे नाव कमी करून श्री.निलु डी.अग्रवाल यांचे नावे हस्तांतरीत करण्यास प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.01यांनी

क्र.मनपा/प्र.क.क्र.1/वे.क्षे.511/111/2012-13 दि.16/06/2012 अन्वये मान्यता दिली असुन मालमत्ता हस्तांतरण फी रू.1000/- पावती क्र.609797 दि.16/06/2012 अन्वये भरणा केली आहे.

सदर नस्तीची पडताळणी केली असता नस्तीतील खरेदी विक्री करारनाम्यानुसार प्रथम खरेदीदार श्री.किसन कटारिया यांनी सदर मालमत्ता श्री.संतोष तिवारी यांना विक्री केली असुन सदर मालमत्ता हस्तांतरणात हस्तांतरण फी वसुल करण्यात आलेली नसल्यामुळे महानगरपालिकेचे रू.1000/- एवढया हस्तांतरण शुल्काचे नुकसान झाले आहे.

4) मालमत्ता क्र.डी03000257400 वरील श्री.रामअवतार अग्रवाल/ श्रीम.शकुंलता अग्रवाल यांचे नाव कमी करून श्री.महेशकुमार अग्रवाल/श्रीम.सरला महेशकुमार अग्रवाल यांचे नावे हस्तांतरण प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.01 यांनी क्र.मनपा/प्र.क.क्र.1/वे.क्षे.232/953/2012-13 दि.06/06/2012 अन्वये मान्यता दिली असुन पावती क्र.609692 दि.08/06/2012 अन्वये रू.1000/- एवढे हस्तांतरण फी भरणा केली आहे.

सदर नस्तीची पडताळणी केली असता नस्तीतील उपलब्ध करारनाम्यानुसार श्री.रामअवतार अग्रवाल प्रथम खरेदीदार यांनी सदर मालमत्ता श्री.मांगीलाल मुंद्रा यांना विक्री केली असुन श्री.मांगीलाल मुंद्रा यांनी श्री.महेशकुमार अग्रवाल / श्रीम.सरला महेशकुमार अग्रवाल यांना विक्री केली आहे. वरील हस्तांतरणात मालमत्ता हस्तांतरण फी वसुल करण्यात आली नसल्यामुळे रू.2000/- एवढया मालमत्ता हस्तांतरण फीचे नुकसान झाले आहे.

5) उपरोक्त मालमत्ता हस्तांतरण प्रकरणे उदाहरणादाखल देण्यात आली असुन वरीलप्रमाणे इतर मालमत्ता हस्तांतरणातील मालमत्ता हस्तांतरण फी वसुलीची पडताळणी करून मालमत्तेवरील नावात बदल करतांना प्रथम खरेदीदाराचे नाव कमी करून नवीन नावाने हस्तांतरण करतांना 2 वा 3 खरेदीदाराच्या हस्तांतरणात मालमत्ता हस्तांतरण फीचा भरणा करण्यात आल्याबाबत विभागाने पडताळणी करुन लेखा परीक्षणास खुलासा करण्यात आला नाही.

वसुलपात्र रक्कम रु.6000/-

FDSANMM7201 (Ref No : 49, Hmm No : 92)

56 मालमत्ता कर संकलन विभागामध्ये इमारत, खोल्या, घरे ,झोपडया मिळकतीमध्ये होणारी वाढ अथवा घट याबाबतच्या नोंदवहया न ठेवल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 129 नुसार महानगरपालिकांना कलम 127 पोटकलम(1) नुसार मोकळया जागा, इमारती मिळकतीवर मालमत्ता कर आकारून वसुली करण्याचे अधिकार

आयुक्त यांना प्रदान केले आहेत तसेच उक्त अधिनियमातील कलम 254 नुसार मालमत्तांच्या करनिर्धारणाची वाढ घट नोंदवही ठेवणे आहे. परंतू सदर तरतूदीनुसार वाढ घट नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 129 नुसार महानगरपालिकांना कलम 127 पोटकलम(1) नुसार मोकळया जागा, इमारती मिळकतीवर मालमत्ता कर आकारून वसुली करण्याचे अधिकार आयुक्त यांना प्रदान केले असून उक्त अधिनियमातील कलम 254 नुसार एखादया इमारतीत वाढ करण्याचा अथवा काढून टाकण्याचा एखादया करधारकांचा इरादा असेल फेरफार करावयाचा असेल, अशा कोणत्याही व्यक्तीने उपविधीत विहीत केलेल्या नमुन्यात आणि उपविधी अन्वये जी माहिती पुरविणे आवश्यक असेल अशी सर्व माहिती अंतर्भुत असलेली नोटीस आयुक्तांस दिली पाहिजे व त्यानुसार आयुक्तांनी मंजुरी दिल्यानंतर वाढीव इमारतीच्या बांधकामास आकारणी करून अथवा इमारतीचा भाग पाडल्यानंतर घर म्हणुन आकारणी करून व तशी नोंद विहीत नमुन्यातील वाढ / घट नोंदवहीमध्ये घेऊन तसेच मुळ आकारणी नोंदवहीमध्ये वाढ अथवा घट करून एकूण आकारणी निश्चित करून तसेच मागणी नोंदवहीमध्येही अशा नोंदी घेऊन कराची एकूण वसुली करणे आवश्यक आहे, परंतु मालमत्ता कर संकलन विभागाने अशा विहीत नमुन्यातील वाढ घट नोंदवहया ठेवलेल्या नाहीत. त्यामुळे एकूण महापालिकेच्या करामध्ये 2012-13 या वर्षामध्ये किती रक्कमेची वाढ / घट झाली यांचा मेळ लेखा परीक्षणात घेता आला नाही. उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार कर संकलन विभागाने महापालिकेच्या स्वतंत्र उपविधी विहीत नमुन्यात तयार करून व त्यास शासनाची मंजुरी घेऊन घरपट्टी कर निश्चिती, मागणी निश्चिती करणे आवश्यक आहे. परंतू उक्त तरतूदीनुसार कोणतीही ठोस कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. सदर नियमबाहयतेबाबत साधार खुलासा होणे आवश्यक असून तसे अनुपालन लेखा शासन मंजुरीसह लेखा परीक्षणास दाखवावे असे विभागास अर्धसमास पत्र क्र.124 दि.11/12/2015 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून काहीही खुलासा प्राप्त झाला नाही.

DATNDMM5801 (Ref No : 84, Hmm No : 124)

57 कर संकलन विभागाने विहीत नमुन्यातील मागणी नोंदवही ठेवली नसल्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 76 नुसार निर्धारण सुची पुर्ण अधिप्रमाणित करुन अशी सुची अधिप्रमाणित झाल्यावर लगेच त्या वर्षासाठी नमुना क्र.47 प्रमाणे मागणी पुस्तक उघडण्यात आले पाहिजे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर निर्धारक व संकलन विभागाकडून मालमत्ता कराचे मागणी पुस्तक ठेवण्यात आलेले नाही.

महानगरपालिका कर संकलन विभागाचे 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण करणेत आले. लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 76 नुसार निर्धारण सुची पुर्ण आणि अधिप्रमाणित झाल्यावर लगेच त्या वर्षासाठी नमुना क्र.47 प्रमाणे मागणी पुस्तक उघडण्यात आले पाहिजे. तसेच जेथे अनेक प्रभाग असतील तेथे प्रभागासाठी मागणी पुस्तक ठेवुन प्रत्येक प्रभागाच्या मागणी, संकलन, थकबाकी इ. चा गोषवारा प्रभागाच्या शेवटच्या मागणी पुस्तकात अथवा वेगळया पुस्तकात क्षेत्रासाठी एकूण मागण्या संकलन आणि थकबाकी निश्चित करण्यात यावी. परंतू उक्त नियमानुसार महापालिकेच्या करविभागाने मागणी नोंदवही ठेवलेली नाही. तसेच एकूण मागण्या संकलन करुन थकबाकी निश्चित करण्यात आलेली नाही.

2) निर्धारण सुचीतील अनुक्रमाप्रमाणे मागणी प्रस्तकातील नोंदी क्रमवार असल्या पाहिजेत. पुर्वीच्या मागील वर्षाच्या पुस्तकावरून थकबाकी अग्रेषित करण्यात यावी. वर्षाअखेर मागणी पुस्तकातील सर्व नोंदी पुर्ण झाल्यावर त्याच्या प्रत्येक पानावरील पैशाच्या स्तंभाच्या बेरजा करून शेवटच्या पानावर अग्रेषित करण्यात आलेल्या नाहीत. तसेच मागणी पुस्तकात मागण्या नोंदवल्यानंतर नमुना क्र.48 नुसार देयके तयार करून ती करदात्याला दिली पाहिजेत.

याबाबत कर संकलन विभागात मागणी नोंदवही ठेवलेली नाही. मुळात कर विभागाने निर्धारण सुची विहीत नमुन्यात ठेवलेली नाही. त्यामुळे एकूण मागणी निर्धारण सुची प्रमाणे निश्चित झाल्याचे म्हणता येणार नाही. सबब आकारणी, मागणी तसेच वसुली आणि वसुली नोंदवहीमध्ये गंभीर अनियमितता झाल्याची शक्यता लेखा परीक्षणात नाकारता येत नाही. याबाबत संपुर्ण आढावा घेऊन व उक्त नियमानुसार संपुर्ण नोदवहया पुर्ण करून लेखा परीक्षणात सादर करून तसे परिपुर्ण अनुपालन लेखा परीक्षणात दाखण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.128 दि.15/12/2015 अन्वये विभागास कळविण्यात आले असता विभागाकडून याबाबत लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा सादर करण्यात आला नाही. मालमत्ता कर मागणी पुस्तका अभावी एकुण मालमत्ता कराची मागणी, प्रत्यक्ष वसुली व थकबाकीच्या रकमा याची पडताळणी करुन वसुल केलेल्या रकमा योग्य असल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

DATNDMM5801 (Ref No : 86, Hmm No : 128)

58 कर संकलन विभागातील कर वसुलीच्या थकबाकी रक्कमाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 615668117.00/-

कर संकलन विभागाचे 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण करतांना कर संकलन विभागाने सादर केलेले मत्ता-दायित्व विवरण तपासले असता दि.31/03/2013 अखेर मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम रू37,82,87,176/- तसेच मोकळया जागेवरील थकबाकीची रक्कम रू23,73,80,941/- असे एकूण एकंदर रक्कम रू61,56,68,117/- कराची थकबाकी असल्याचे दिसून आले. महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील प्रकरण आठ मधील तरतूदीनुसार आवश्यक कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसुल करण्यात आली नाही.

महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाचे 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण करतांना कर संकलन विभागाने सादर केलेले मत्ता-दायित्व विवरण तपासले असता दि.31/03/2013 अखेर मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम रू.37,82,87,176/- तसेच मोकळया जागेवरील थकबाकीची रक्कम रू.23,73,80,941/- असे एकूण एकंदर रक्कम रू.61,56,68,117/- कराची थकबाकी असल्याचे दिसून आले. सदयस्थितीत स्थानिक संस्था कर शासनामार्फत बंद झाला असल्याने कर संकलन विभागामध्ये होणारी कराची वसुली हेच महसुलाचे मुख्य स्त्रोत असल्याने कराच्या वसुलीबाबत महापालिकेने विषेश अभियान राबवून थकबाकी धारकाकडून वसुलीची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही करण्यात आली नसल्याने 2012-13 मध्ये कराच्या वसुलीचे प्रमाण मागणीच्या केवळ 41% एवढे आहे. महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियमातील प्रकरण आठ मधील तरतूदीनुसार आवश्यक कार्यवाही करुन थकबाकीची रक्कम वसुल करण्यात आली नाही. यावरून असे दिसून येते की, कर मुख्यालयामार्फत कर वसुलीचे धोरण अतिशय उदासिन आहे. याबाबत कर वसुलीचे प्रभागनिहाय लेखा परीक्षण केले असता निदर्शनास आले की, 2012-13 मध्ये किंवा तत्पुर्वीच्या मोठया प्रमाणात कर आकारणी निर्धारीत केल्या आहेत. परंतु अशा प्रकरणांच्या संगणक प्रणालीमध्ये तसेच मागणी नोंदवहीत नोंदी घेऊन वसुली देयके कर धारकाला अदयापही बजाविणेत आलेली नाहीत. उदाहरणादाखल अशा प्रकरणांबाबत स्वतंत्र आक्षेप घेण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रचंड प्रमाणात कर वसुली होणे बाकी असल्याचे दिसून आले. कर संकलन विभागामध्ये प्रामुख्याने वाढ, घट नोंदवहीत न ठेवणे, विहीत नमुन्यात आकारणी व मागणी नोंदवही ठेवलेली नाही. तसेच महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील परिशिष्ट "ड" प्रकरण 8 मधील नियम 7(अ-3) नुसार कोणत्याही

इमारतीचे किंवा जमिनीचे पोटनियम 1 अन्वये निश्चित केलेल्या भांडवली मुल्यात दर 5 वर्षांनी सुधारणा करता येईल. अशी तरतूद आहे. परंतु कर संकलन विभागाने अशा प्रणालीचा विचार करून तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे करापोटी प्राप्त होणारी उत्पन्न मोठया प्रमाणात खुंटलेले आहे. उपरोक्त नमुद बाबींबाबत आवश्यक खुलासा करणेबाबत तसचे कर वसुलीबाबत ठोस कार्यवाही केले नसल्याबाबत लेखा परीक्षणास खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.129 दि.15/12/2015 अन्वये विभागास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा करण्यात आला नाही. तरी मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम रू.61,56,68,117/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रू.61,56,68,117/-
DATNDMM5801 (Ref No : 87, Hmm No : 129)

59 कुत्र्यांचे निर्बिजीकरण/लसीकरणाकरीता केलेल्या प्रदानातील अनियमितता तसेच कोंडवाडे जमा रक्कम लेख्यात कमी घेतल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : बाजार लिलाव विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 1000000.00/-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत मोकाट कुत्र्यांना पकडुन त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व रेबिज प्रतिबंधक लस देणे आदीबाबत दिलेल्या कामाच्या करारनाम्यातील अटी शर्तींचे उल्लंघन कलेले असून मनपा क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांचे 100 टक्के निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण झाले असल्याबाबतची सर्व 79 प्रभागांचे स्वच्छता निरिक्षकांची प्रमाणपत्रे प्राप्त झाली नसताना ऍनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ (पू) या संस्थेला दि. 23/10/2012 रोजी रु.10,00,000/- चे प्रदान केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत मोकाट कुत्र्यांना पकडुन त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व रेबिज प्रतिबंधक लस देणे करीता ऍनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ (पूर्व) यांच्याशी केलेल्या करारनाम्याचे व प्रदानाचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 77 दिनांक 28/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केलेला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील

प्रमाणे आहेत.

मोकाट कुत्र्यांना पकडुन त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व रेबिज प्रतिबंधक लस देणे आदीबाबत मिरा भाईदर महानगरपालिकेचे पत्र क्र. MBMC/DYCOM/66/2011/12, दि. 23/06/2011 अन्वये प्रती कुत्रा रु.930/- दराने काम करण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. 85 दि. 12/12/2011 नुसार महानगरपालिकेने दि. 17/01/2012 रोजी ऍनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ (पूर्व) यांच्याशी करार केला आहे व त्या अनुषंगाने दि. 18/01/2012 रोजी सदर संस्थेस काम करण्यासाठी कार्यादेश दिला आहे. महानगरपालिकेने ऍनिमल वेल्फेअर सोसायटी, अंबरनाथ (पू) यांच्याशी केलेल्या करारामध्ये खालील त्रुटी आढळून आल्या आहेत.

1) सदर करारनाम्यामध्ये कामाचा कालावधी नमुद केलेला नाही, त्यामुळे सदर संस्थेने मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व रेबिज प्रतिबंधक लसीकरण कोणत्या कालावधीचे करावयाचे आहे ते स्पष्ट होत नाही.

2) मनपाने करार करण्यापूर्वी संबंधीत संस्थेकडुन सुरक्षा अनामत घेतली आहे का व कोणत्या स्वरुपात सुरक्षा अनामत घेतली आहे. याचे अभिलेख लेखापरीक्षणास दाखविले नाहीत.

3) करारनाम्यातील अट क्रमांक 14 नुसार 2012/13 या आर्थिक वर्षात नवीन कुत्र्याची पिल्ले आढळली असता प्रति कुत्री रु.1000/- दंड वसुल करावयाच आहे. 2011/12 आर्थिक वर्षात मार्च 2012 पर्यंत 491 कुत्र्यांवर शस्त्रक्रिया झाली असल्याबाबत ऍनिमल वेल्फेअर सोसायटीचे पत्रावर दिसून येते आणि 2012/13 आर्थिक वर्षात 1421 कुत्र्यांवर शस्त्रक्रिया झाल्याचे 2012/13 आर्थिक वर्षात शस्त्रक्रिया दैनंदिन अहवाल व रजिस्टर वरुन दिसते. परंतू 2012/13 आर्थिक वर्षात नवीन कुत्र्याची पिल्ले आढळली आहेत का, मोकाट जखमी कुत्र्यांवर उपचार करणेबाबत तक्रारी आल्या आहेत का, 2012/13 मधील पशुगणना अहवाला अन्वये मोकाट कुत्र्यांची संख्या किती, याचे अभिलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 77, दिनांक 28/09/2015 अन्वये विचारणा केली असता विभागाने कोणताही खुलासा केलेला नाही.

4) मोकाट कुत्र्यांना पकडुन त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व रेबिज प्रतिबंधक लस देणे करीता ऍनिमल वेल्फेअर सोसायटी अंबरनाथ (पू.) 2012/13 आर्थिक वर्षात दि. 23/10/2012 प्रमाणक क्रमांक 939 अन्वये रु.10,00,000/- चे प्रदान करण्यात आले आहे. उपरोक्त करारनाम्यातील अट क्रमांक 22 नुसार व्दितीय पक्ष यांनी 2012/13 आर्थिक वर्षात माहे जून 2012 पर्यत मिरा भाईदर मनपा क्षेत्रातील सर्व मोकाट कुत्र्यांचे प्रभागनिहाय स्वच्छता निरिक्षक यांच्यासोबत सर्वेक्षण करुन सदर कुत्र्यांवर करण्यात आलेल्या निर्बिजीकरणाबाबत व लसीकरण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. परंतू असा अहवाल लेखापरीक्षणास दाखविला नाही. एकूण 79 प्रभागांपैकी 37 प्रभागांचे 100 टक्के व 5 प्रभागांचे 80 टक्के निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण झाल्याचे स्वच्छता निरिक्षकांची प्रमाणपत्रे देयकासोबत जोडली आहेत. सदर प्रमाण पत्रांवर कालावधी किंवा तारीख नमूद नाही. तसेच 37 प्रभागांच्या स्वच्छता निरिक्षकांची निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण झाल्याची प्रमाणपत्रे नाहीत. मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांचे 2011/12 आर्थिक वर्षात 100 टक्के निर्बिजीकरण व लसीकरण करुन यापूर्वी निर्बिजीकरण झालेल्या सर्व कुत्र्यांना पुनर्लसीकरण करणे तशी स्वच्छता निरिक्षक यांचेकडुन प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन सादर करणे आवश्यक होते तथापि करारनाम्यातील अटीशर्तीनुसार मनपा क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांचे 100 टक्के निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण झाले असल्याबाबतची सर्व 79 प्रभागांचे स्वच्छता निरिक्षकांची

प्रमाणपत्रे प्राप्त झाली नसताना ऍनिमल वेल्फेअर सोसायटी अंबरनाथ (पू.) या संस्थेला दि. 23/10/2012 रोजी रु.10,00,000/- चे प्रदान करण्यात आले आहे. करारनाम्यात 2011/12 आर्थिक वर्षाअखेर पर्यत 100% प्रजोत्पादनावर नियंत्रण गाठण्याचे उद्दिष्ट असताना ते साध्य झालेले नाही. अशाप्रकारे करारनाम्यातील अटीशर्तींचे उल्लंघन करून ऍनिमल वेल्फेअर सोसायटी या संस्थेला रु.10,00,000/- चे केलेले प्रदान आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

कॉंडवाडयात बंद केलेल्या गुरांच्या दंड रकमेबाबत.

मिरा भाईदर, पशूसंवर्धन विभागाकडील मोकाट जनावरे बंदिस्त केल्याबाबत, कॉंडवाडयात बंद केलेल्या गुरांचा दंड जमा केला आहे. याबाबत स्थायी समिती ठराव क्रमांक 45, दि.28/06/2013 अन्वये 2012/13 च्या वार्षिक जमा खर्चास मंजूरी दिली आहे. सदर जमा खर्चामधील महसूली जमा, कॉंडवाडे, कोड क्रमांक 1589 या लेखाशिर्षाखाली प्रत्यक्ष जमा रु.1.56 लाख दर्शविण्यात आली आहे. तसेच क्लासिफिकेशन विवरणपत्रामध्ये सुध्दा कॉंडवाडे जमा रु.156275/- दर्शविली आहे. परंतु मोकाट जनावरे बंदिस्त केल्याबाबत, कॉंडवाडयात बंद केलेल्या गुरांच्या दंडाची पावतीनिहाय तपासणी केली असता 2012/13 आर्थिक वर्षात सदर दंडाची रक्कम रु.159375/- जमा झाल्याचे दिसुन येते. तथापि रु.3100/- लेख्यात कमी घेतल्याचे दिसून येत आहे. वार्षिक जमा खर्चाच्या जमा बाजूला सदर रक्कम रु.3100/- कमी घेण्यात आली आहे

आक्षेपाधिन रक्कम रु.1000000/-

60 घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2000 अन्वये प्रभाग निहाय वॉर्ड साफसफाई करणे बाबत.

वॉर्ड सफाई, नाले सफाई, खोदाई

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 07

लेखा शीर्ष : सार्व.आरोग्य विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 329814000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 151307245.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3000.00/-

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता सादर केला नाही. जिल्हा दर सुचीमध्ये असलेल्या दरासोबत निविदेतील प्राप्त मशीनरीच्या (जे.बी.सी., पोकलन) दराची तुलना केली नाही. ठेकेदाराने दैनंदिन कामाचा अहवाल मुख्यालयात सादर केला नाही. मागील वर्षाच्या खर्चापेक्षा वित्तीय वर्ष 2012-13 खर्चातील वाढ योग्य असल्याचा विचार केला नाही. स्थायी आस्थापनेवर असलेल्या सफाई कामगारांचा वापर वॉर्ड सफाईच्या कामासाठी केला नाही. दंडाची रक्कम रू3000/- ठेकेदाराकडून वसुल केली नाही. डंपींग ग्राऊडवर पसरविलेल्या कचऱ्याचा हिशेब ठेवला नाही.

घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2000 अन्वये प्रभाग निहाय वॉर्ड साफसफाई करणे

प्राकलन :- रु. 389779250/-

प्रशासकिय मंजूरी:- महासभा ठराव क्र. 86 दि. 01/02/2011

निविदा : नोटीस क्र. 344/2011-12 दि.13/05/2011, 24/07/2011, 22/09/2011, 24/10/2011 ई-टेंडरींग

निविदेला प्रतीसाद न मिळाल्याने व मा. न्यायालयाने स्थगिती आदेश दिल्याने (दि.29/07/2011 ते 23/08/2011) फेर निविदा मागविल्या.

एल-1 निविदा : मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि.

प्रभाग समिती क्र. 01 ते 04 करीता स्वतंत्र निविदा मागविल्या.

निविदा मंजुरी :- स्थायी समिती सभा ठराव क्र.125 दि.09/03/2012.

करार :- दि.24/04/2012 (05 वर्षाकरीता ठेका देण्यात आला.)

कार्यादेश :-

प्रभाग समिती क्रमांक	कार्यादेश	प्राकलन रू.
01	मनपा/आरोग्य/39/2012-13 दि.26/04/2012 (दि. 01/05/2012 पासून काम सुरू)	रू.8,60,77,250/-
02	मनपा/आरोग्य/40/2012-13 दि.26/04/2012 (दि. 01/05/2012 पासून काम सुरू)	रू.10,16,13,840/-
03	मनपा/आरोग्य/41/2012-13 दि.26/04/2012 (दि. 01/05/2012 पासून काम सुरू)	रू.11,44,54,175/-
04	मनपा/आरोग्य/42/2012-13 दि.26/04/2012 (दि. 01/05/2012 पासून काम सुरू)	रू.8,77,33,985/-
	एकूण	रू.38,97,79,250/-

मुदत : 05 वर्षाकरीता ठेकेदार निश्चित करण्यात आला आहे.

खर्च : 2012-13 मधील खर्च रू. 3298.14 लक्ष

लेखा परीक्षण काळात खर्च केलेल्या प्रमाणका पैकी खालील निवडक प्रमाणके तपासली, त्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे (माहे जानेवारी, फेब्रुवारी 2013) :

अ.क्र.	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	तपशिल
1	1686	28/03/13	63,05,848/-	प्रभाग समिती क्र. 01 माहे फेब्रु-13.
2	--//--	--//--	70,39,540/-	प्रभाग समिती क्र. 01 माहे जाने-13.
3	--//--	--//--	70,63,480/-	प्रभाग समिती क्र. 02 माहे फेब्रु-13.
4	--//--	--//--	77,66,615/-	प्रभाग समिती क्र. 02 माहे जाने-13.
5	--//--	--//--	63,91,457/-	प्रभाग समिती क्र. 04 माहे फेब्रु-13.
6	--//--	--//--	66,76,805/-	प्रभाग समिती क्र. 04 माहे जाने-13.

7	--//--	--//--	80,59,404/-	प्रभाग समिती क्र. 03 माहे फेब्रु-13.
8	--//--	--//--	88,01,645/-	प्रभाग समिती क्र. 03 माहे जाने-13.
		एकूण	5,81,04,794/-	

आरोग्य विभागाकडील टिप्पणीचे अवलोकन करता मिरा भाईंदर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ सुमारे 79 चौ.कि.मी. आहे. महापालिकेची लोकसंख्या सुमारे 8,50,000 असून शहरात दररोज 400 ते 450 मेट्रीक टन कचरा निर्माण होत असून, घनकचरा नियम 2000 अन्वये त्याचे व्यवस्थापन महानगरपालिकेला करावे लागते. लाड समितीच्या अहवालानुसार लोकसंख्येच्या प्रतिहजारी 5 सफाई कामगार या हिशेबाने एकूण 4250 सफाई कामगारांची आवश्यकता असल्याचे नमुद केले आहे. यासाठी महापालिकेने प्रभागनिहाय जाहिर निविदा मागवुन ठेकेदार निश्चित केला. याच ठेकेदारास 05 वर्षापर्यत पुढील वर्षापासून प्रतिवर्षी सुमारे 10% रक्कम वाढवुन देण्याच्या अटीवर ठेका मंजूर केला आहे. या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.122 दि.10/12/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र. निरंक दि.14/12/2015 अन्वये केला. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) वॉर्ड सफाई / नाले सफाई, खोदाई या कामासाठी महानगरपालिका वेबसाईटवर दि.13/05/2011, 24/07/2011, 22/09/2011, 24/10/2011 रोजी निविदा नोटीस प्रसिध्द केल्याचे दिसून येते. दि.24/10/2011 रोजीच्या निविदेस पुढील प्रमाणे प्रतिसाद मिळाला आहे.

प्रभाग क्र. 01 - 02 निविदा प्राप्त. मे. गुडलक सिव्हील कंस्ट्रक्शन प्रा.लि. व मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.

प्रभाग क्र. 02 - 02 निविदा प्राप्त. --//--

प्रभाग क्र. 03 - 02 निविदा प्राप्त. --//--

प्रभाग क्र. 04 - 01 निविदा प्राप्त. मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिला नाही. बाजार भावानुसार प्रचलित दर व निविदेतील प्राप्त दर यांची तुलना केल्याचेबाबत खरेदी समितीचा अहवाल उपलब्ध करून दिला नाही.

2) या कामासाठी ठेकेदाराने मजूर पुरवठा, साहित्य पुरवठा व वाहने पुरवठा करावयाची आहेत. कचरा वाहून नेण्यासाठी कॉम्पॅक्टर, टिपर व कचरा एकत्र करण्यासाठी जे.सी.बी, पोकलन चा पुरवठा करावयाचा आहे. ठेकेदाराने दिलेले दराची जिल्हा दर सुचीनुसार उपलब्ध असलेल्या दरासोबत तुलना करून दर स्विकारल्याचे दिसून येत नाही.

उदा :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग (कोकण रिजन) यांच्या 2012-13 च्या दरसुची नुसार असलेले दर आणि ठेकेदारास मंजूर केलेल्या दराची तफावत पुढीलप्रमाणे :

नाव	ठेकेदारास मंजूर केलेला दर 2012-13 प्रतिदिन (8 तास) दर रू.	मजिप्र दरसुचीनुसार 2012-13 प्रतिदिन (8 तास) दर रू.	तफावत रू.
जे.सी.बी.	9000/-	8800/-	200/-

कामासाठी जे.सी.बी. वापरल्याबाबत संबंधित लॉगबुकातील नोंदी लेखापरीक्षणास दाखविल्या नाहीत. प्रत्यक्षात त्यांच्या वापराची चलने ठेकेदाराने बिलासोबत सादर केली नाहीत. मशीन चालक दिवस भरात सलग 8 तास काम करू शकत नाही. त्यामुळे त्याने संबंधित दिवसाच्या कोणत्या वेळे

पासून ते कोणत्या वेळेपर्यंत मशीन चालविली, याची नोंद संबंधित स्वच्छता निरीक्षकाने प्रमाणित केलेली नाही.

निविदेमधील मशीनरीच्या प्राप्त दरासोबत जिल्हा दरसुची मधील दराशी तुलना करण्यासाठी महानगरपालिकेच्या बांधकाम / पाणी पुरवठा विभागाचे अभिप्राय घेतले नाहीत. तसेच ठेकेदाराने जे.सी.बी., पोकलन सारख्या यंत्राद्वारे केलेल्या कामाची मोजमापे घेतली नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात मशीनरी वापल्याने किती प्रमाणात काम झाले हे समजु शकत नाही.

3) कार्यादेशातील अट क्र.09 नुसार - निविदा काराने दररोज सकाळी 10.00 वाजल्या पासून सध्याकाळी 4.00 वाजेपर्यंत (काम संपल्यानंतर) सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये स्वच्छता निरीक्षकाकडून प्रमाणित करून मुख्य कार्यालयात लेखी अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. असे असतांना ठेकेदाराने मासिक एकत्रित देयक महापालिकेला सादर केलेले आहे. प्रत्यक्षात या कामाचा दैनंदिन अहवाल विभागात / प्रभागात असलेल्या स्वच्छता निरीक्षकाने सादर केला आहेत आणि त्यानुसार ठेकेदाराचे देयकाचे प्रदान करण्यात आले आहे. प्रभागवार दैनंदिन पुर्ण केलेल्या कामाची नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध करून दिली नाही. ठेकेदाराने दैनंदिन अहवाल देऊन त्याची तपासणी प्रभागातील स्वच्छता निरीक्षकाने करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न केल्याने प्रभागातील स्वच्छता निरीक्षकांचा कार्यालयीन कामाचा वेळ ठेकेदाराचा दैनंदिन अहवाल करण्यातच गेल्याचे दिसून येते.

4) मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि. यांना सदरच्या कामाचा ठेका दि.01/05/2012 पासून 5 वर्षासाठी देण्यात आला आहे. (प्रतिवर्षी 10% वाढ) वॉर्ड सफाई / नाले सफाई / नाले खोदाईच्या कामाच्या खर्चाचा विचार करता मागील 3 वर्षापासून या कामावरील खर्च पुढील प्रमाणे वाढला आहे, असे दिसून येते.

2010-11 रू. 2060.32 लक्ष

2011-12 रू. 2323.50 लक्ष (वाढ 12.75%)

2012-13 रू. 3298.14 लक्ष (वाढ 42%)

एंकदरीत 2011-12 पेक्षा 2012-13 या वर्षात वाढलेल्या खर्चाचे प्रमाण सुमारे 42% आहे. महानगरपालिकेचे क्षेत्रफळात वाढ झाली नाही, लोकसंख्येत वाढ झाल्याचे टिप्पणीत नमुद नाही, असे असतांना महागाईतील वाढीमुळे खर्चात 42% वाढ होण्याच्या कारणाबाबत विभागाने खुलासा केला नाही.

5) महानगरपालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या सफाई कामगारांचा तपशिल आस्थापना विभागाने उपलब्ध करून दिला असून 2012-13 मध्ये 813 सफाई कामगारांच्या वेतन / भत्त्यावर एकूण खर्च रू.15,13,07,245/- केला आहे. महापालिकेच्या आस्थापनेवर 813 सफाई कामगार काम करीत असतांना प्रभाग निहाय वॉर्ड सफाईच्या कामी ठेकेदाराने मजूर, साहित्य, मशीनरी इ. सर्व पुरवठा करण्याच्या अटीवर ठेका मंजूर केला आहे. महापालिकेकडे कार्यरत असलेल्या 813 सफाई कर्मचाऱ्यांच्या सेवा कोणत्या कामासाठी वापरल्या याचा खुलासा विभागाने केला असून हे कामगार प्रशासकीय कामकाजाकरीता मनपाच्या विविध विभागात कार्यरत असल्याचे नमुद केले आहे. परंतु प्रशासकीय कामासाठी मंजूर आकृतीबंधानुसार कर्मचारी कार्यरत असतांना सफाई कामगारांची सेवा प्रशासकीय कामासाठी वापरल्याचा खुलासा मान्य करता येत नाही. उपलब्ध सफाई कामगारांच्या सेवा वॉर्ड सफाईच्या कामासाठी वापरल्या असत्या तर खर्चात बचत झाली असती.

6) प्रभाग समिती क्र.01 चा दि.08/01/2013 रोजीचा स्वच्छता निरीक्षकाचा दैनंदिन अहवाल तपासता,

ठेकेदाराने काम समाधानकारक केले नसल्याने रू.3000/- दंड वसुल करण्याची शिफारस केली आहे. परंतु मुख्यालयाने एकत्रिकरण करतांना दंडाची रक्कम रू.3000/- ठेकेदाराच्या देयकातुन वसुल केली नाही, असे प्रमाणक क्र.1686 दि.28/03/2013 रू.7039540/- मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि. (जाने-13 चे देयक) नुसार दिसून येते. सबब रक्कम रू.3000/- संबंधितांकडून वसुलपात्र आहे.

लेखापरीक्षणाचे वेळी माहे मार्च-2013 मधील प्रमाणके तपासली असता त्यात उपरोक्त दर्शविल्यानुसार ठेकेदाराकडून दंडाची रक्कम वसुल केली नसल्याचे दिसुन आले. 2012-13 मधील उर्वरीत 11 महिन्यांच्या प्रमाणकांची तपासणी करून घेऊन, त्यात अशाप्रकारे अनियमितता आढळुन आल्यास रक्कम वसुल करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

7) ठेकेदाराने गटातुन / प्रभागातून साफसफाई करून उचललेला कचरा डपींग ग्राऊडवर नेऊन टाकायचा आहे. दिवस भरात डपींग ग्राऊडवर कचऱ्याचे किती कॉम्पॅक्टर, टिपर, इतर वाहनांनी कचरा आणुन टाकला, याबाबत डपींग ग्राऊडवर असलेल्या मनपा कर्मचाऱ्याने चलनाद्वारे पोच दयायची आहे. ठेकेदाराने अशा चलनाच्या प्रती देयकासोबत जोडल्या नाहीत, त्यामुळे कचरा वाहतुकीचे काम किती झाले, तसेच काम पुर्ण झाल्याचे समजुन येत नाही.

वसुलपात्र रक्कम रू.3000/-

आक्षेपाधिन रक्कम रू.151307245/-

DATPMVM6001 (Ref No : 43, Hmm No : 122)

61 आरोग्य विभगातील साठा नोंदवहीतील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 05

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 1462023.00/-

औषधे, उपकरणें इत्यादीच्या साठानोंद वहीतील अनियमितता तसेच पल्स- पोलिओ लसीकरण,महिला मंडळ कँप इ. कामावरील खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

1)मिरा-भाईदर महापालिकेअंतर्गत असलेल्या मिरा रोड येथील भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयाचे 2012-2013 या कालावधीचे लेखापरीक्षण व वेगवेगळया लसीची साठा नोंदवही तपासली असता साठा नोंदवहीमध्ये प्रारंभीचा साठा किती होता याचा उल्लेख नसल्यामुळे तसेच विभागनिहाय लस वापरल्याबाबतचे नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नसल्याने नक्की किती साठा शिल्लक

राहीला याची लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही.

अ.क्रं	लसीचे नांव	2012-2013 तील सुरुवातीची शिल्लक	2012-2013 मध्ये प्राप्त झालेली संख्या	2012-2013 मध्ये वापरण्यातआलेली संख्या	2012-2013 तील शेवटची शिल्लक संख्या
1	ARV	—	2300	2300	—
2	Antisnake	—	18	17	1
3	Cynocobalmine	—	10	10	—
4	Mytelergomefrine-1ml	—	50	50	—
5	Mytelergomefrine-2ml	—	1000	800	200
6	Oxitocin 2%	—	200	200	—
7	Diclofenac Sodium 3ml	—	200	205	15
8	Paracetomol	—	200	200	—
9	CarboprostTrimethyne 250 mg	—	50	50	—
10	Dext. 5%	—	200	200	—
11	Dext. 10%	—	50	50	—
12	Ranifidine	—	100	100	—
13	IV NS 500 ml	—	240	240	—
14	IV NS 1000 ml	—	900	900	—
15	Hepori-25000IV	—	300	300	—
16	Hyperocotione 100 mg	—	50	50	—
17	RL 500 ml	—	200	200	—
18	DNS 500 ml	—	100	30	70
19	NS 100 ml	—	50	40	10
20	Vit K 1ml	—	50	50	—
21	BrottaverinHydroclorides	—	100	30	70
22	Pheyatocin Sodium 2 ml	—	100	100	—
23	Avil	—	100	30	70
24	Busc0pan	—	50	50	—
25	Antisnake 60 mg	—	50	50	—
26	Cefricizlone 1 gm	—	50	50	—

27	Metro 100 ml	—	30	15	18
28	Genta	—	30	30	—
29	Cefaparoxine 1 gm	—	200	150	—
30	Potasium Chloride	—	25	25	—
31	MMR	—	200	163	37
32	UPT	—	700	400	300

2) वैद्यकिय उपकरण्याच्या साठा नोंदवहीमध्ये 2012-2013 ची सुरुवातीच्या शिल्लक साठयाची नोंद नसल्यामुळे 2012-13 सुरुवातीचा साठा योग्य असल्याची लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही.

3)वेगवेगळया औषधांची साठा नोंदवही तपासली असता साठा नोंदवहीतील 2011-2012 आर्थिक वर्षाअखेरची शिल्लक व 2012-2013 वर्षाची प्रारंभीची शिल्लक यामध्ये खालीलप्रमाणे तफावत आढळून आली आहे. वर्षभरात केसपेपरनिहाय औषधे वापरल्याची नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नसल्यामुळे नक्की किती औषधाचा वापर झाला व त्यानुसार शिल्लक साठा योग्य असल्याची लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही.

अ.क्र.	औषधाचे नांव	2011-2012 तील शेवटची शिल्लक	2012-2013 मधील प्रारंभीची शिल्लक
1	CPM	2000	9299
2	Brufen	1000	2537
3	Ibupara	----	1161
4	Diclofence	800	2226
5	Diclo-Para+Chlorozoxone	3600	3780
6	Diclomine 10 mg	900	1000
7	Paracetmol500 mg	10000	12280
8	FA/SA	900	1654
9	Multi vitamins	2000	9847
10	ORS Powder	100	457
11	B-Complex	----	31
12	Cap.Poxycline 100mg	200	1036
13	Tab Mox 250 mg	200	434

14	Tab Mox 500 mg	800	3639
15	Ciplox 500	200	1679
16	Cefadroxil 250 mg	3000	3187
17	capCefalaxine 250 mg	200	396
18	Metro 400	1700	1728
19	Metro 200	—	1341
20	Flucon 150	100	461
21	Norflox 400	200	1749
22	Cap Omez	800	2553
23	Rantac 150	300	2777
24	Antacid	5700	7688
25	Liv-52	200	902
26	Syp.Para	40	388
27	Salbutumol	200	388
28	Clotrimazole cream	75	132
29	Micronazole e-nitrate cream	20	172
30	Diclogel	—	71
31	Chloroquine	—	1904
32	Chloroquine 500	—	1137
33	Gentamycine ear drops	—	04
34	Clozotine ear drops	—	161

4)प्राथमिक आरोग्य केंद्र, बंदरवाडी भाईंदर (पूर्व) येथील औषध साठा नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

* वेगवेगळया औषधांची साठा नोंदवही तपासली असता साठा 2012-2013 मधील प्रारंभीची शिल्लक साठा नोंदवहीत नोंदल्याचे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यामूळे नक्की किती औषधाचा वापर झाला व शिल्लक साठा योग्य असल्याची लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही. तसेच खाली नमूद केलेल्या तारखाना भांडार विभागाकडून औषधांचा पुरवठा झाल्याचे दिसते मात्र प्राथमिक आरोग्य केंद्राने त्यांच्या साठा नोंदवहीमध्ये त्याचा वाटप झाल्याचे नोंदी दिसून येत नाही.

अ.क्रं.	औषधाचेनांव	भांडार विभागाकडून पुरवठा झाल्याचा	साठा नोंदवहीमध्ये वाटप दर्शविले नाही.

		दिनांक	
1	Tab Diclofence 50 mg	11.06.2012	3000
2	Tab Cefadroxye 250	18.06.2012	2000
3	Tab Erytromycine 500 mg	18.06.2012	1000
4	Tab Fura	18.06.2012	2000
5	Tab Domperidove	18.06.2012	2000
6	Tab GLibenclamide	18.06.2012	2000
7	ORS	18.06.2012	1200
8	Tab Multivitamin B-Complex	18.06.2012	5000
9	Cr.Cotrimazole	18.06.2012	300

*खाली नमूद केलेल्या रोगप्रतिबंधक लसींची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

अ.क्रं.	लसीचे नांव	भांडार विभागाकडून पुरवठा झाल्याचा दिनांक	साठा नोंदवहीमध्ये वाटप दर्शविले नाही.
1	D.P.T.	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
2	B.C.G.	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
3	Measles	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
4	MMR	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
5	T.T.	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
6	Hepetities B	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
7	Polio	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही

नमूद केलेल्या लसींची भांडार विभागाकडून किती प्रमाणात प्राप्त झाला व वर्षभरात किती वापर झाला याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

क)प्राथमिक आरोग्य केंद्र, नवघर, भाईदर (पूर्व) येथील लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

* पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

5) शासनाकडून व महापालिकेकडून सदर केंद्रास वेगवेगळया लसीकरण कार्यक्रमासाठी वैद्यकिय अधिकारी यांच्या खात्यावर अनुदान प्राप्त झाले आहे त्याचा विनियोग कसा झाला व त्याची उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नसल्यामुळे योग्य कारणासाठी खर्च झाल्याची खातरजमा करता आली नाही.

अ.क्रं.	दिनांक	धनादेशक्रं.	रक्कम	

14	Tab Mox 500 mg	800	3639
15	Ciplox 500	200	1679
16	Cefadroxil 250 mg	3000	3187
17	capCefalaxine 250 mg	200	396
18	Metro 400	1700	1728
19	Metro 200	----	1341
20	Flucon 150	100	461
21	Norflox 400	200	1749
22	Cap Omez	800	2553
23	Rantac 150	300	2777
24	Antacid	5700	7688
25	Liv-52	200	902
26	Syp.Para	40	388
27	Salbutumol	200	388
28	Clotrimazole cream	75	132
29	Micronazole e-nitrate cream	20	172
30	Diclogel	----	71
31	Chloroquine	----	1904
32	Chloroquine 500	----	1137
33	Gentamycine ear drops	----	04
34	Clozotine ear drops	----	161

4)प्राथमिक आरोग्य केंद्र, बंदरवाडी भाईंदर (पूर्व) येथील औषध साठा नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

* वेगवेगळया औषधांची साठा नोंदवही तपासली असता साठा 2012-2013 मधील प्रारंभीची शिल्लक साठा नोंदवहीत नोंदल्याचे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यामूळे नक्की किती औषधाचा वापर झाला व शिल्लक साठा योग्य असल्याची लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही. तसेच खाली नमूद केलेल्या तारखाना भांडार विभागाकडून औषधांचा पुरवठा झाल्याचे दिसते मात्र प्राथमिक आरोग्य केंद्राने त्यांच्या साठा नोंदवहीमध्ये त्याचा वाटप झाल्याचे नोंदी दिसून येत नाही.

अ.क्रं.	औषधाचेनांव	भांडार विभागाकडून पुरवठा झाल्याचा	साठा नोंदवहीमध्ये वाटप दर्शविले नाही.

		दिनांक	
1	Tab Diclofence 50 mg	11.06.2012	3000
2	Tab Cefadroxye 250	18.06.2012	2000
3	Tab Erytromycine 500 mg	18.06.2012	1000
4	Tab Fura	18.06.2012	2000
5	Tab Domperidove	18.06.2012	2000
6	Tab GLibenclamide	18.06.2012	2000
7	ORS	18.06.2012	1200
8	Tab Multivitamin B-Complex	18.06.2012	5000
9	Cr.Cotrimazole	18.06.2012	300

*खाली नमूद केलेल्या रोगप्रतिबंधक लसींची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

अ.क्रं.	लसीचे नांव	भांडार विभागाकडून पुरवठा झाल्याचा दिनांक	साठा नोंदवहीमध्ये वाटप दर्शविले नाही.
1	D.P.T.	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
2	B.C.G.	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
3	Measles	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
4	MMR	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
5	T.T.	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
6	Hepetities B	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
7	Polio	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही

नमूद केलेल्या लसींची भांडार विभागाकडून किती प्रमाणात प्राप्त झाला व वर्षभरात किती वापर झाला याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

क)प्राथमिक आरोग्य केंद्र, नवघर, भाईंदर (पूर्व) येथील लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

* पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

5) शासनाकडून व महापालिकेकडून सदर केंद्रास वेगवेगळया लसीकरण कार्यक्रमासाठी वैद्यकिय अधिकारी यांच्या खात्यावर अनुदान प्राप्त झाले आहे त्याचा विनियोग कसा झाला व त्याची उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नसल्यामुळे योग्य कारणासाठी खर्च झाल्याची खातरजमा करता आली नाही.

अ.क्रं.	दिनांक	धनादेशक्रं.	रक्कम	

14	Tab Mox 500 mg	800	3639
15	Ciplox 500	200	1679
16	Cefadroxil 250 mg	3000	3187
17	capCefalaxine 250 mg	200	396
18	Metro 400	1700	1728
19	Metro 200	----	1341
20	Flucon 150	100	461
21	Norflox 400	200	1749
22	Cap Omez	800	2553
23	Rantac 150	300	2777
24	Antacid	5700	7688
25	Liv-52	200	902
26	Syp.Para	40	388
27	Salbutumol	200	388
28	Clotrimazole cream	75	132
29	Micronazole e-nitrate cream	20	172
30	Diclogel	---	71
31	Chloroquine	---	1904
32	Chloroquine 500	---	1137
33	Gentamycine ear drops	---	04
34	Clozotine ear drops	---	161

4)प्राथमिक आरोग्य केंद्र, बंदरवाडी भाईदर (पूर्व) येथील औषध साठा नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

* वेगवेगळया औषधांची साठा नोंदवही तपासली असता साठा 2012-2013 मधील प्रारंभीची शिल्लक साठा नोंदवहीत नोंदल्याचे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यामूळे नक्की किती औषधाचा वापर झाला व शिल्लक साठा योग्य असल्याची लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही. तसेच खाली नमूद केलेल्या तारखाना भांडार विभागाकडून औषधांचा पुरवठा झाल्याचे दिसते मात्र प्राथमिक आरोग्य केंद्राने त्यांच्या साठा नोंदवहीमध्ये त्याचा वाटप झाल्याचे नोंदी दिसून येत नाही.

अ.क्रं.	औषधाचेनांव	भांडार विभागाकडून पुरवठा झाल्याचा	साठा नोंदवहीमध्ये वाटप दर्शविले नाही.

		दिनांक	
1	Tab Diclofence 50 mg	11.06.2012	3000
2	Tab Cefadroxye 250	18.06.2012	2000
3	Tab Erytromycine 500 mg	18.06.2012	1000
4	Tab Fura	18.06.2012	2000
5	Tab Domperidove	18.06.2012	2000
6	Tab GLibenclamide	18.06.2012	2000
7	ORS	18.06.2012	1200
8	Tab Multivitamin B-Complex	18.06.2012	5000
9	Cr.Cotrimazole	18.06.2012	300

*खाली नमूद केलेल्या रोगप्रतिबंधक लसींची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

अ.क्रं.	लसीचे नांव	भांडार विभागाकडून पुरवठा झाल्याचा दिनांक	साठा नोंदवहीमध्ये वाटप दर्शविले नाही.
1	D.P.T.	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
2	B.C.G.	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
3	Measles	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
4	MMR	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
5	T.T.	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
6	Hepetities B	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही
7	Polio	उपलब्ध नाही	उपलब्ध नाही

नमूद केलेल्या लसींची भांडार विभागाकडून किती प्रमाणात प्राप्त झाला व वर्षभरात किती वापर झाला याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

क)प्राथमिक आरोग्य केंद्र, नवघर, भाईदर (पूर्व) येथील लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

* पावती पुस्तक साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

5) शासनाकडून व महापालिकेकडून सदर केंद्रास वेगवेगळया लसीकरण कार्यक्रमासाठी वैद्यकिय अधिकारी यांच्या खात्यावर अनुदान प्राप्त झाले आहे त्याचा विनियोग कसा झाला व त्याची उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नसल्यामुळे योग्य कारणासाठी खर्च झाल्याची खातरजमा करता आली नाही.

अ.क्रं.	दिनांक	धनादेशक्रं.	रक्कम	

1	16.04.12	548015	138251	पोलिओ लसीकरण
2	16.04.12	548018	33630	पोलिओ लसीकरण
3	16.04.12	548021	11050	पोलिओ इंधन
4	14.05.12	548034	138251	
5	15.05.12	548036	10080	
6	13.07.12	552812	142778	
7	13.07.12	552803	33680	
8	17.09.12	309162	22000	महिला मंडळ कॅप
9	09.1012	309187	33630	
10	22.10.12	309193	152658	
11	06.11.12	447409	11000	महिला मेळावा
12	24.11.12	447419	43230	इंधन खर्च
13	24.11.12	447416	160045	
14	24.11.12	447418	46722	
15	12.01.12	009744	147300	
16	12.01.12	009745	42830	
17	27.01.12	009746	141730	
18	27.01.12	009693	153158	

62 2012-2013 या वित्तिय वर्षात महापालिकेने अदा केलेली विद्युत देयके लेखापरीक्षणास उपलब्ध न केल्याबाबात.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 02

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 99736052.00/-

विद्युत देयके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही व विद्युत देयकाच्या प्रमाणकावर शिल्लक रक्कम, पूर्वीचा खर्च, व खर्चाचे नियतवाटप दर्शविण्यात आले नाही.

विद्यु देयकाचे अभिलेखे / नस्ती तपासली असता विद्युत देयक खाते क्रं. 250000215 च्या थकित रक्कमेबाबत महानगरपालिका व रिलायन्स कंपनी सोबत चर्चा करुन समान 36 हप्त्यात रु. 30900000/- एवढी रक्कम प्रतिमाह रु.1958011.00 प्रमाणे रिलायन्स इन्फ्रा लि.स प्रदान करण्यात आली आहे असे नमूद केले आहे. परंतु प्रत्यक्षात विद्युत देयकाच्या अभिलेख्यानुसार 35 हप्त्यामध्ये प्रतिमाह रु.1958011.00 प्रमाणे रु.68530385.00 इतक्या रक्कमेची प्रदान झाली आहे. म्हणजेच रु.37630385.00 इतकी रक्कम जादा प्रदान केल्याचे दिसते, सदर खाते क्रंमाकांचे थकबाकीबाबतचे मूळ विज देयक उपलब्ध न झाल्यामुळे लेखापरिक्षणास मूळ विद्युत देयकाच्या प्रदानाबाबत खात्री करता आली नाही

मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या विविध कार्यालये व महापालिकेच्या हद्दीतील रस्त्यावरील दिव्यांची खाली नमूद केलेली विद्युत देयके लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नसल्यामुळे प्रदान केलेल्या देयकामध्ये विजआकार / विलंब आकार प्रदान केले किंवा कसे याबाबत लेखापरिक्षणास पडताळणी करता आली नाही.

अ.क्रं.	प्रमाणक क्रं.व दिनांक	खाते क्रं.	रक्कम
1	1659/20.03.2013	102689045 / 151515996	525950.00
2	1699/28.03.2013	250000215	10178251.00
3	1454/29.01.2013	250000215	15136324.00
4	1494/08.02.2013	151425019 / 151614942	1331540.00
5	1114/20.11.2012	102689045 / 151515996	639300.00
6	1115/20.11.2013	21 विद्युत देयके	1811212.00

7	1424/19.01.2013	13 विद्युत देयके	1583090.00
		एकूण रुपये:-	31205667.00

याबाबात अर्धसमास ज्ञापन पत्र क्रं 41 दिनांक 11.09.2015 अन्वये विचारणा केली असता विभागाकडून अनुपालन अद्याप अप्राप्त आहे. तोपर्यंत रु.68530385.00 आक्षेपाधिन व रु.31205667.00 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2)खाली नमूद केलेल्या विद्युत देयकाच्या प्रमाणकावर शिल्लक रक्कम , पूर्वीचा खर्च,व खर्चाचे नियत वाटप दर्शविण्यात आले नाही.

अ.क्र.	प्रमाणक क्रं.व दिनांक	खाते क्रं.	रक्कम
1	1571/07.03.2013	250000215	10524262
2.	1608/15.03.2013	250003462	128840.00
3	1607/15.03.2013	उपलब्ध नाही.	1334770.00
4	1609/15.03.2013	250003465	138680.00
5	1610/15.03.2013	250003463	292230.00
6	1611/15.03.2013	250003466	126670.00
7	1612/15.03.2013	250003464	893170.00
8	1699/28.03.2013	250000215	10178251.00
9	1703/28.03.2013	उपलब्ध नाही.	3650.00

याबाबात अर्धसमास ज्ञापन पत्र क्रं.41 दिनांक 11.09.2015 अन्वये विचारणा केली असता विभागाकडून खुलासा अद्याप अप्राप्त आहे

63 विज आकार शुल्कासहित विद्युत देयकाचे प्रदान झाल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 02

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 1253264.77/-

वसूलपात्र रक्कम रु. 13880.00/-

महाराष्ट्र विज आकार नियम 1958 मधील नियम (ia) नुसार महापालिकेस विज देयकातून विज शुल्क माफ असताना, महापालिकेने विज शुल्क आकारासहित विजेचे देयकाचा भरणा केली आहे. तसेच विहीत दिनांकापूर्वी भरणा केल्याचे सवलतीचा महापालिकेने फायदा घेतलेला नाही.

विज आकार शुल्कासहित विद्युत देयकाचे प्रदान झाल्याचे लेखापरिक्षणास आढळून आले आहे,निवडक महिन्यातील देयकांचे तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्रं.	प्रमाणकक्रं.व दिनांक	खाते क्रं.	विज आकार शुल्क रु.	सवलतीच्या दिनांकास मिळणारी सूट
1	1611/15.03.2013	260003466	16851.52	
2	1610/15.03.2013	250003463	39681.77	
3	1609/15.03.2013	250003465	18057.52	
4	1608/15.03.2013	250003462	16553.86	
5	1612/15.03.2013	250004364	92645.56	
6	1703/28.03.2013	000520156461	464.36	
7	1198/10.12.2012	000019026120	188011.55	
8	1393/16.01.2013	000019026120	175891.74	11730.00
9	8/09.04.2012	000019026120	161863.54	
10	237/08.06.2012	000019026120	140600.21	
11	530/26.07.2012	000019026120	30367.41	2030.00
12	601/06.08.2012	000520003410	331.20	120.00
13	890/11.12.2012	000019026120	203513.50	

14	726/10.09.2012	000019026120	168431.03	
	एकूण रु.		1253264.77	13880.00

महाराष्ट्र विज आकार नियम 1958 मधील नियम (ia) नुसार महापालिकेस विज देयकातून विज शुल्क माफ असताना,महापालिकेने विज शुल्क आकारासहित विजेचे देयकाचा भरणा केला आहे . तसेच विहीत दिनांकापूर्वी भरणा केल्यास सवलतीचा महापालिकेने फायदा घेतला नसल्यांने महापालिकेचे रु .13880.00 इतक्या रक्कमेचे नुकसान झाले आहे . वर नमूद केलेल्या तक्त्यामधील विज शुल्क आकाराची रक्कम रु .1253264.77 संबंधीत पुरवठादाराकडून वसूल अथवा समायोजित करण्याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्रं .41 दिनांक 11.09.2015 निर्गमित केले असता विभागाकडून खुलासा अद्याप अप्राप्त आहे . तोपर्यत रु .1253264.77 आक्षेपाधिन व रु.13880.00 वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

DDDTKSM6801 (Ref No : 22, Hmm No : 41)

64 संगणक विभागातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 04

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 226754.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 85720.00/-

जंगम मालमत्ता नोंदवहीमध्ये प्राप्त झालेल्या एकुण 18 संगणकापैकी 16 संगणक दर्शविले आहे म्हणजेच 2 संगणक कमी दर्शविले आहे. साठा नोंदवहीमध्ये टोनर व रीम कमी दर्शविले आहे. मागणी नसताना अनावश्यक रीम खरेदी केली आहे.महानगर टेलिफोन निगम लि. यांना Leased Line कार्यान्वित करण्याबाबत देयकाची प्रदान केलेली आहे.परंतु मूळ देयक लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. स्थानिक संस्था कर विभागाकरिता मे.राक्का इन्फोटेक प्रा.लि. यांचेकडून 10 संगणक खरेदी केली आहेत, सदर खरेदी दरकरारानुसार केली आहे. महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसूची "ड" मधील प्रकरण 5 कलम 2(2) मधील तरतुदीनुसार कलम 73(क) च्या आधिन राहून जाहीर निविदेपैकी जी निविदा सर्व परीस्थिती विचारात घेता जी फायदेशीर आहे अशी निविदा स्विकारणे आवश्यक असताना महापालिकेने राज्यपातळीवरील किफायतशीर दर कराराला

प्राधान्य न देता केंद्रीय पातळीवरील दर करारान्वये खरेदी करुन महापालिकेचे नुकसान केले आहे.

2012-2013 या वित्तिय वर्षातील संगणक विभागाचे लेखापरिक्षण करताना आढळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापन क्रं.79 दिनांक 05.10.2015 अन्वये विचारणा केली असता लेखापरीक्षण कालावधीमध्ये विभागाकडून उत्तर अप्राप्त असल्यांने खालील आक्षेप अंतिम करण्यात येत आहे.

1) जंगम मालमत्ता नोंदवही नमुना 114 चे लेखापरिक्षण केले असता कार्यादेश क्रं.मनपा/संगणक/65/2012-13 दिनांक 04.07.2012 नुसार मे.एच.टी.पी.सिस्टीम प्रा.लि.यांचेकडून चलन क्रं.90 दिनांक 10.07.2012 अन्वये एकूण 18 संगणक प्राप्त झाले, त्याची नोंद जंगम मालमत्ता नोंदवही नमुना 114 मध्ये घेण्यात आली. तसेच त्यांची विभागनिहाय खालीलप्रमाणे वाटप करण्यात आला आहे.

अ.क्रं.	विभाग	संगणक वाटप केल्याची संख्या	शेरा
1	बांधकाम विभाग	10	
2	नगररचना विभाग	02	
3	विधी विभाग	01	संगणक स्विकारण-यांची स्वाक्षरी नाही. संगणकाचे वाटप झाले किंवा कसे याची खात्री करता आली नाही.
4	अग्निशमन विभाग	01	
5	जनसंपर्क विभाग	01	
6	मुख्यलेखा परीक्षक	01	
	एकूण	16	

वरील प्राप्त 18 संगणकापैकी फक्त16 संगणकांची वाटप झाल्याचे दिसून येते, उर्वरीत 2 संगणकांची जंगममालमत्ता नोंदवहीमध्ये नोंद घेतलेली नाही.सदर संगणकाची किंमत 79800/-(2 x 38000 =76000 + VAT रु.3800) संबधित विभागाकडून वसूल करुन महापालीकेच्या

फंडात जमा करावी.

2) साठा नोंदवहीतील अनियमिततेबाबत साठा नोंदवहीचे लेखापरीक्षण केले असता खालील त्रुटी आढळून आल्या.

1) Cann Copier Tonner Catridge-WC12

प्रारंभीची शिल्लक	08 नग
वर्षभरात पुरवठा झाले	457 नग
एकूण	465 नग
विभागांना वाटप केलेली संख्या	448 नग
शिल्लक	17 नग

परंतु प्रत्यक्षात साठा नोंदवहीतील आकडेवारी पाहता 13 टोनर शिल्लक आहेत. सदर 4 टोनरबाबतचे (4 x रु.1480 = 5920/-) संबधित विभागाकडून रु.5920 वसूल करुन महापालीकेच्या फंडात जमा करावी..

ii) Computer used Branded co.A-4 Plain Papers(80.75GSM)

प्रारंभीची शिल्लक	55 नग
वर्षभरात पुरवठा झाली	270नग
एकूण	325 नग
विभागांना वाटप केलेली संख्या	320 नग
शिल्लक	05 नग

परंतु साठा नोंदवहीतील रीमची परिगणना केल्यानुसार मार्च 2013 अखेरची शिल्लक 5 रीम येत असताना साठा नोंदवहीमध्ये अखेरची शिल्लक निरंक दर्शविली आहे. सदर 5 रीमच्या तफावतीबाबतचे लेखापरीक्षणास साधार स्पष्टता झाली नाही.

iii) साठा नोंदवहीनुसार खाली नमूद केलेले पेपर्स संगणक विभागास पुरवठा केल्याचे दिसते परंतु सदरचे पेपर्स (रीम) कोणी स्विकारले याबाबतची स्वाक्षरी नाही.त्यामुळे रीमचा पुरवठा संगणक विभागास झाला किंवा कसे याची सत्यता पडताळता आली नाही.

*Computer used Branded co.A-4 Plain Papers(80.75 GSM) --- 13 रीमचा पुरवठा

*Computer used Branded co.A-3 Plain Papers(80 GSM) --- 08 रीमचा पुरवठा

v) साठा नोंदवही तपासली असता Prepaid (Single Side)As per Programme setting A-

4(85 GM) Demand Notice) (मागणी नोंटीस) दिनांक14.03.2013 D.C.No.450 - 150000 ची मागणी नसताना अनावश्यक खरेदी केली आहे.

3)स्थानिक संस्था कर विभागाकरिता मे.राक्का इन्फोटेक प्रा.लि.यांचेकडून 10 संगणक खरेदी केली आहेत,सदर खरेदी दर करारानुसार केले आहे. महानगरपालिका अधिनियम 1949 मधील अनुसूची "ड" मध्ठाील प्रकरण 5 कलम 2(2) मधील तरतुदीनुसार कलम 73(क)च्या आधिन राहून जाहीर निविदेपैकी जी निविदा सर्व परीस्थिती विचारात घेता जी फायदेशीर आहे अशी निविदा स्विकारणे आवश्यक असताना महापालिकेने राज्यपातळीवरील किफायतशीर दर कराराला प्राधान्य न देता केंद्रीय पातळीवरील दर करारान्वये खरेदी करुन महापालिकेचे नुकसान केले आहे.

4) प्रमाणक क्रं 868 दिनांक 10.10.2012 अन्वये रु.226754/- चे प्रदान महानगर

टेलिफोन निगम लि.यांना Leased Line कार्यान्वित करण्याबाबत केले आहे. परंतु मूळ देयक लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे सदर खर्चाचे लेखापरीक्षण करता आले नाही.

65 लेखनसामुग्री व स्टेशनरी खरेदीतील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 2281.00/-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 7 कलम 73 (ब) नुसार रु.50000/-पेक्षा अधिक खर्चाची निविदा 15 दिवसाच्या आत स्थायी समिती कळविली पाहिजे परंतु विलंबाने दिनांक 26.04.2013 रोजीच्या स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करण्यात आली आहे. उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्रं.भाखंस/1093/(12635)/उद्योग-6 दि.16 जुलै 1993 मधील परि.क्र.3 नुसाररु.50000/- किंवा त्यापेक्षा अधिक रक्कमेचा निविदा असेल अशावेळी राजपत्रात निवीदा चौकशी प्रसिध्द करुन माहिती व जनसंपर्क महासंचालनालया मार्फत योग्य वृत्तपत्रात जाहिरात देणे आवश्यक आहे. आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (सी) नुसार आयकराची वसूली करुन देयकाच्या प्रदानातून करुन शासनखाती भरणा केला नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भांडार विभागाकडून 2012-2013 या वित्तिय वर्षाकरिता दिनांक12.04.2012 च्या वृत्तपत्रात दिलेल्या जाहीर निविदे सुचनेनुसार ई-टेंडरींगव्दारे लेखन सामुग्रीची (स्टेशनरी)वार्षिक निविदा मागविण्यात आली. त्यानुसार पात्र निविदाधारकांनी सादर केलेल्या कमी दरास 2012-2013 या वर्षात आयुक्तांनी दि.06.07.2012 रोजी वार्षिक दराच्या निविदेस मंजुरी दिलेली आहे.सदर खरेदीसाठी 20 लाख रुपयांची तरतूद केली.सदर निविदा नस्ती,लेखापरीक्षणाच्या वेळी उपलब्ध प्रमाणके,पुरवठा चलने साठा नोंदवही यांची तपासणी केली असता आडळून आलेल्या अनियमिततेबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.52 दिनांक 15.09.2015 निर्गमित करण्यात आले असता विभागाकडून दिनांक 30.09.2015 अन्वये प्राप्त झाला असून दिलेला खुलासा संयुक्तिक नाही.लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 7 कलम 73 (ब) नुसार रु.50000/- पेक्षा अधिक खर्चाची निविदा15 दिवसाच्या आत स्थायी समितीस कळविली पाहिजे परंतु विलंबाने दिनांक 26.04.2013 रोजीच्या स्थायी समिती समोर अवलोकनार्थ सादर करण्यात आले आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात आली.

2) उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्रं.भाखंस/1093/(12635)/उद्योग-6 दि.16 जुलै 1993 मधील परि.क्र.3 नुसार रु.50000/- किंवा त्यापेक्षा अधिक रक्कमेचा निविदा असेल अशावेळी राजपत्रात निवीदा चौकशी प्रसिध्द करुन जाहीरात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत योग्य वृत्तपत्रात देणे आवश्यक आहे.तथापि निविदा प्रसिध्दीचा तपशिल नस्तीत उपलब्ध झाला नाही.

3)भांडार विभागातील नस्तीवरुन खर्च तपासले असता एकूण खर्च 2036488/- दर्शविले असून शिल्लक रक्कम 2773512/- दर्शविले आहे.परंतु प्रत्यक्षात रक्कम रु.2963512/- इतकी दिसते तफावत रु.190000/- बाबत लेखापरीक्षणास खुलासासहित साधार स्पष्टता व्हावी.

4) महानगरपालिकेतील पदाधिकारी / अधिकारी व महानगरपालिकेचे नगर वाचनालयाकरिता वृत्तपत्रे ,साप्ताहिके,पाक्षिके व दिवाळी अंक पुरवठा करणे कामी सौ.प्रिती प्रविण भाटकर यांच्या निविदेस मा.आयुक्तांनी दि.06.06.2012 वार्षिक दराच्या निविदेस मंजुरी देण्यात आली असून निविदेतील अट क्रं.17 नुसार देयकामधुन आयकर कपात करणे आवश्यक असताना खालीप्रमाणे देयकातून आयकर अधिनियम1961 चे कलम 194 (सी) नुसार आयकराची वसूली शासनखाती भरणा केला नाही.

अ.क्रं	प्रमाणक क्र. व दिनांक	देयकाची रक्कम रुपये	आयकर कपात करावयाची रक्कम रुपये
	1415/19.01.2013	57130.00	751.00
	1123/01.12.2012	41471.00	415.00
	1636/19.03.2013	42059.00	421.00
	प्रमाणक क्रं. उपलब्ध ले नाही	87422.00	874.00
			2281.00

6)महापालिकेस लेखनसामुग्री (स्टेशनरी) पुरवठा करताना निविदाधारकास देण्यात येणारी कार्यादेश व माल मिळाल्याचे चलन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्यामुळे लेखनसामुग्री विहीत वेळेत प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही

वसूलपात्र रक्कम रु.2281/-

DDDTKSM6801 (Ref No : 29, Hmm No : 52)

66 कर्मचा-यांची पदोन्नतीच्या दिनांकास चुकीची वेतन निश्चिती केल्याने झालेल्या अतिप्रदाना बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष :आस्थापना विभाग मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 1771700.00/-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्मचारी/ अधिकारी यांना महानगरपालिकेने दिनांक 28/02/2006 रोजी

पदोन्नती दिली आहे. कर्मचा-यांना दि.28/02/2006 रोजी पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन श्रेणी रु.6500-200-10500 या वेतन श्रेणीत पदोन्नती देवून वेतन निश्चिती केली आहे. परंतू सदर कर्मचा-यांची सहाव्या वेतन आयोगानुसार पदोन्नतीच्या दिनांकास वेतन निश्चिती करताना चुकीची वेतन निश्चिती केल्याचे सदर कर्मचा-यांच्या सेवा पुस्तकामधील वेतन निश्चितीच्या तक्त्यामधील नोंदीवरुन दिसून आले आहे. सदर सर्व कर्मचा-यांचे दि.28/02/2006 रोजी रु.11800/- वेतन निश्चित केले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आदेश क्रमांक जा.क्र.मनपा/आस्था/2027/2603/05-06, दिनांक 28/02/2006 रोजीच्या आदेशान्वये महानगरपालिकेच्या कर्मचारी / अधिकारी यांना तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे. सदर कर्मचारी/ अधिकारी यांची सेवापुस्तके तपासता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 37 दिनांक 07/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. सदर अर्धसमास पत्रासंदर्भात महापालिकेकडून दिनांक 7/10/2015 रोजी प्राप्त झालेल्या खुलाशात सुधारित वेतन निश्चितीची कार्यवाही सूरु असून योग्य ती नोंद घेतली आहे असे नमूद केले आहे. परंतू लेखापरीक्षण कालावधी पर्यंत सदर कर्मचा-यांच्या सेवापूस्तकात सुधारित वेतन निश्चिती केल्याचे दिसून आले नाही. तसेच वेतन निश्चिती कशाच्या आधारे/ कोणत्या नियमान्वये केली याबाबत खुलासा केलेला नाही. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा आदेश क्रमांक जा.क्र.मनपा/आस्था/2027/2603/05-06, दिनांक 28/02/2006 रोजीच्या आदेशान्वये महानगरपालिकेच्या कर्मचारी / अधिकारी यांना दिलेल्या पदोन्नतीच्या वेतन निश्चिती शासनाने मंजूर केलेल्या शिफारशीनुसार दिल्याचे दिसून आले नाही. राज्यातील महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 1009/ प्र.क्र. 355/नवि-26, दिनांक 10/08/2009 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे लागू झालेल्या अनेक वेतनश्रेण्यांचे पुनर्विलोकन करुन केवळ 6 वेतनश्रेण्या ग्रेडपेसह सहाव्या वेतन आयोगानुसार लागू केल्या आहेत. तसेच राज्यातील महापालिकांमध्ये 6 व्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतनश्रेण्या लागू करण्यास उपरोक्त शासन निर्णयामध्ये अटी घालून दिलेल्या आहेत, त्यापैकी अट क्रमांक (ड) शासनाने संवर्गनिहाय 5 व्या वेतन आयोगाच्यावेळी असलेली वेतनश्रेणी विचारात घेऊन, त्याप्रमाणे 6 व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागू केल्या आहेत, त्याप्रमाणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी लागू होतील आणि महानगरपालिकेमधील ज्या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या/ अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेण्या 5 व्या वेतन आयोगावेळी जशा मंजूर असतील त्या वेतनश्रेण्यांना समांतर अशाच सुधारीत वेतनश्रेण्या 6 व्या वेतन आयोगाप्रसंगी देखील देण्याची दक्षता घेणेत यावी. यावेळी सुधारीत वेतनश्रेणीत महानगरपालिका

कोणतीही वाढ करणार नाही. उपरोक्त अटींचे उल्लंघन करुन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्मचारी/ अधिकारी यांची महानगरपालिकेने दिनांक 28/02/2006 रोजी पदोन्नतीच्या दिनांकास सहाव्या वेतन आयोगानुसार केलेली वेतन निश्चिती चुकीची केली आहे. कर्मचा-यांची दि.28/02/2006 रोजी पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन श्रेणी रु.6500-200-10500 या वेतन श्रेणीत पदोन्नती देवून वेतन निश्चिती केली आहे. परंतू सदर कर्मचा-यांची सहाव्या वेतन आयोगानुसार पदोन्नतीच्या दिनांकास वेतन निश्चिती करताना चुकीची वेतन निश्चिती केल्याचे सदर कर्मचा-यांच्या सेवा पुस्तकामधील वेतन निश्चितीच्या प्रपत्र- तक्त्यामधील नोंदीवरुन दिसून आले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या खालील कर्मचारी/ अधिका-यांना सहाव्या वेतन आयोगानुसार पदोन्नतीच्या दिनांकास चुकीची वेतन निश्चिती करून वेतन दिल्याचे दिसून आले आहे.

कर्मचारी/ अधिका-याचे नाव	पदोन्नती पूर्वीची वेतन श्रेणी/ वेतन (रु.)	दिनांक 28/02/2006 रोजी पदोन्नतीच्या दिनांकास मनपाने दिलेले वेतन (रु.)	दिनांक 28/02/2006 रोजी पदोन्नतीच्या दिनांकास सहाव्या वेतन आयोगानुसार देय वेतन (रु.)	माहे मा 2013 पर्यंत देय दिलेल्या वेतनातील फरक (रु.)
1	2	3	4	5
श्री.चंद्रकांत ल. बोरसे	4000-100-6000/ 4300	11800	9300	22546
श्री.वासूदेव शिरवळकर	4000-100-6000/ 5600	11800	10810	9004
श्री.नरेंद्र पी. चव्हाण	4000-100-6000/ 4400	11800	9300	22558
श्री.दादासाहेव वि. खत्रे	4000-100-6000/ 4800	11800	9300	23095
श्री.हेमंत भ. पाटील	5000-150-8000/ 5600	11800	10860	8725
श्री.चिंतामण कृ. शिंदे	4000-100-6000/ 5400	11800	10480	12255
श्री.स्वप्निल ज्ञा. सावंत	5000-150-8000/ 5300	11800	10290	14005
श्री.सुदाम लि. गोडसे	4000-100-6000/ 4900	11800	9470	21563
श्री.अविनाश बु.जाधव	4000-100-6000/ 4500	11800	9300	21386

श्री.वसंत ग. राणे	4000-100-6000/ 4800	11800	9300	220330
			एकूण फरक रक्कम	1771700

कर्मचा-यांना पदोन्नती देताना एकूण मंजूर पदाच्या 20% एवढया प्रमाणात पदोन्नती देणे आवश्यक आहे. परंतू मिरा भाईंदर महापालिकेने वर्ग ब ची मंजूर पदे 51 असून नियमापेक्षा जास्त वर्ग ब च्या पदांवर पदोन्नती दिलेली आहे. उपरोक्त कर्मचारी/ अधिकारी यांना त्यांच्या पदोन्नतीच्या साखळीतील पुढील वेतन श्रेणी मंजूर न करता त्यापुढील वेतन श्रेणी रु.6500-200-10500 या वेतन श्रेणीत वेतन मंजूर केले असून सदर वेतन श्रेणी कोणत्या निकषाच्या आधारे/ नियमाने वेतन श्रेणी/ पदोन्नती दिली आहे याचा अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 37 दिनांक 07/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता परंतू याबाबत महापालिकेने खुलासा केलेला नाही. तसेच सदर कर्मचा-यांची दि.1/01/2006 रोजी सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती का करण्यात आली नाही व त्यांना दि.28/02/2006 रोजी देण्यात आलेले वेतन रु.11800/- कोणत्या नियमान्वये दिले आहे याचा बोध होत नाही. उपरोक्त तक्त्यामधील सहावा वेतन आयोगानुसार दि.28/02/2006 रोजी प्रत्यक्ष होत असलेली योग्य वेतन निश्चिती पहाता सदर कर्मचा-यांची चुकीची वेतन निश्चिती करुन जादा वेतन निश्चित केल्याने त्यांना अतिप्रदान झाल्याचे दिसून येते. सदर कर्मचा-यांची उपरोक्त तक्त्यातील रकाना क्रमांक 5 मधील वेतन फरक अतिप्रदान रक्कम रु.1771700/- ची व परिगणना करुन अतिप्रदान झालेल्या इतर भत्त्यांची त्यांच्या देय वेतनातून वसूली करण्यात यावी. तसेच अशाप्रकारे पदोन्नती दिलेल्या महापालिकेतल्या इतर कर्मचा-यांना झालेल्या अतिप्रदानाची वसूली संबधित कर्मचा-यांच्या देय वेतनातून करण्यात यावी.

वसूलपात्र रक्कम रु.1771700/-

DATAMSM6401 (Ref No : 30, Hmm No : 37)

67 भ्रमणध्वनी सेवेसाठी पुरवठादारास केलेल्या प्रदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 07

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 409976.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 409976.00/-

महापालिकेकडून मनपा पदाधिकारी, अधिकारी/ कर्मचारी यांना उपलबध केलेल्या भ्रमणध्वनी सेवेसाठी विहीत केलेल्या खर्चाच्या मर्यादेपेक्षा जादा वापर केल्यामुळे जादा वापरावरील प्रदान मनपाकडून करण्यात आली आहे. सदर जादा वापरावरील खर्च रु.4,09,976/- संबंधिताकडून पुढील देयकात वसुल करण्यात आल्याचे आढळून आले नाही. पुरवठादारास सदर जादा वापरावरील खर्चाचे महिनानिहाय देयकांचे प्रदान मनपाकडून करण्यात येत असल्यामुळे यासाठी मनपाचा निधी गुंतून राहीला आहे.

महानगरपालिकच्या महत्वाच्या कामासंबधी अधिकारी तसेच पदाधिकारी यांच्यामध्ये समन्वय साधता यावा. यासाठी मोबाईल कंपनीची भ्रमणध्वनी सेवा पदाधिकारी/अधिकारी/कर्मचारीयांचेसाठी उपलब्ध करुन घेण्यास स्थायी समिती सभा दि.01.03.2011 ठराव क्र.115 अन्वये मान्यता देण्यात आली आहे. यासाठी पदाधिकारी/अधिकारी/कर्मचा-यांना अनुक्रमे प्रतिमहा रु.2000/- रु.1000/- वरु.500/- या मर्यादेत भ्रमणध्वनीवरील एकत्रित खर्च महापालिकेकडून संबंधित पुरवठादार कंपनीस अदा करण्यात येतो. यासाठी होणारा खर्च सामान्य प्रशासन विभागांतर्गत "दुरध्वनी / भ्रमणध्वनी" या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात येतो. प्रतिमहा अनुज्ञेय रकमेपेक्षा जादा भ्रमणध्वनी देयकाची रक्कम संबंधित पदाधिकारी/अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून वसूल करण्यात येते. लेखा विभागाकडील जमा खर्च विवरणपत्रानुसार 2012-13 या वित्तीय वर्षात सदर लेखाशिर्षांतर्गत रु.25.00 लक्ष एवढया मंजूर तरतूदीतून रु.21.77 लक्ष एवढा खर्च करण्यात आला आहे. सदर खर्चाची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत विभागास खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.40 दि.10/09/2015 अन्वये कळविण्यात आले असता विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. त्यानुसार खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) स्थायी समितीच्या उपरोक्त ठराव क्र.115 अन्वये व्होडाफोन कंपनीची सेवा घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. तथापि वर्ष 2012-13 मध्ये भारती एअरटेल या कंपनीस भ्रमणध्वनी सेवेसाठी प्रदान करण्यात आले असून मनपा पदाधिकारी यांना भ्रमणध्वनी खर्चाची मर्यादा रु.2000/- मनपा अधिकारी यांना रु.1000/- व कर्मचाऱ्यांना रु.500/- याप्रमाणे प्रतिमहा खर्चाच्या मर्यादा विहीत करण्यात आल्याचे देयकासोबतच्या टिपणीवरुन दिसून येते. खाली नमूद केलेल्या प्रमाणकांवरुन भारती एअरटेल या कंपनीकडून घेतलेल्या भ्रमणध्वनी सेवेसाठी वर्ष 2012-13 या वित्तीय वर्षात रु.13,01,667/- एवढा खर्च झाल्याचे दिसून येते. भ्रमणध्वनी वापरावरील खर्चाच्या मर्यादे बाबत व त्यासाठी केलेल्या खर्चा समान्यतेचा ठराव लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे वर्ष 2012-13 मध्ये सदर भ्रमणध्वनी सेवा घेण्यासाठी केलेल्या खर्चास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

2) भ्रमणध्वनी पुरवठादाराकडून खरेदी करण्यात आलेल्या भ्रमणध्वनी सिम कार्डची संख्या, भ्रमणध्वनीचे क्रमांक, सिम कार्ड उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांची विभाग निहाय नावे याबाबतचा तपाशिल व त्यानुषंगिक नोंदवहया इ. अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही. त्यामुळे एकूण किती सिमकार्ड घेण्यात आली व कोणत्या अधिकारी कर्मचारी यांना उपलब्ध करण्यात आली याबाबत लेखा परिक्षणास पडताळणी करता आली नाही.

3) बदली, निलंबन, राजीनामा अथवा कार्यकाल समाप्ती अशा प्रकरणी संबंधितास उपलब्ध केलेल्या भ्रमणध्वनी सेवा बंद करणेबाबत करावयाची कार्यवाही इ.कार्यपध्दती महापालिकेकडून विहीत करण्यात

आलेली नाही. वर्ष 2012-13 मध्ये बंद करण्यात आलेले भ्रमणध्वनी क्रमांक व त्याची प्रकरणे इ. तपशील लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही. त्यामुळे याबाबत पडताळणी करुन लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

4) वर्ष 2012-13 मध्ये भारती एअरटेल या भ्रमणध्वनी सेवा पुरवठादारास प्रदान केलेल्या रकमांचा व मर्यादेपेक्षा जादा वापर केल्याने संबंधित भ्रमणध्वनी धारकांकडून वसूल करावयाच्या कपातीच्या रकमांचा महिना निहाय एकत्रित तपशिल पूढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक	दिनांक	कालावधी	देयकाची रक्कम रु.	जादा वापराची वसूल करावयाची रक्कम रु.
1	62	24.4.2012	11.3.2012 ते 10.4.2012	90669	14405
2	373	31.10.2012	11.5.2012 ते 10.6.2012	92920	12879
3	233	8.6.2012	11.4.2012 ते 10.5.2012	95002	14915
4	973	31.10.2012	11.6.2012 ते 10.7.2012	97572	21622
5	972	31.10.2012	11.7.2012 ते 10.8.2012	99354	168663
6	1215	12.12.2012	11.8.2012 ते 10.9.2012	93298	13884
7	1214	12.12.2012	11.9.2012ते 10.10.2012	97004	21805
8	1300	26.12.2012	11.10.2012ते 10.11.2012	109442	17582
9	1299	26.12.2012	11.11.2012ते 10.12.2012	113714	19358
10	1460	30.01.2013	11.12.2012ते 10.01.2013	132945	33155
11	1587	01.03.2013	11.1.2013 ते 10.2.2013	141851	37870
12	1732	30.3.2013	11.2.2013 ते 10.3.2013	137896	33838
			एकुण	1301667	409976

वरीलप्रमाणे भ्रमणध्वनी वापराबाबत संबंधित पुरवठाराकडून महिनानिहाय प्राप्त झालेल्या एकत्रित देयकांचे प्रदान महापालिकेकडून पुरवठादारास करण्यात आले. भ्रमणध्वनी वापरकर्त्याकडून प्रतिमहा अनुज्ञेय खर्चाच्या मर्यादेपेक्षा जादा वापर केल्यामुळे अनुज्ञेय रकमेपेक्षा जादा झालेल्या खर्चाची रक्कम संबंधिताकडून वसूल करणेबाबत विभागाच्या टिपणीत नमूद करण्यात आले आहे. वरीलप्रमाणे वसूलीच्या रकमा पुढील महिन्याच्या वेतन देयकांत तात्काळ वसुल करण्यात आल्याबाबतचा तपशिल पुढील महिन्याच्या भ्रमणध्वनी देयकासोबत उपलब्ध झाला नाही. याबाबत विभागाने केलेल्या खुलाश्यामध्ये जादा वापरवरील खर्चाची वसुली संबंधीताकडून वसुल करण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे रु.4,09,976/- एवढी रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

5) प्रमाणक क्र.233 दि.08.06.2012 अन्वये भारती एअरटेल यांना रु.95,002/- एवढे प्रदान करण्यात आले असून सदर खर्चाच्या प्रदानास मंजूरीदेतांना देयका सोबतच्या तक्त्यातील अ.क्र.47 येथील वैद्यकीय अधिकारीयांनी राजीनामा दिल्याने मनपाने अदा केलेली भ्रमणध्वनी देयकाची रक्कम रु.828/- संबंधितांकडून वसूल करावी. असे नमूद केले आहे. त्यानुसार संबंधितांकडून राजिनामा दिल्याच्या दिनांकापासून भ्रमणध्वनी

देयकाची रक्कम वसूली करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास साधार पुर्तता दर्शविण्याबाबत विभागास कळविण्यात आले असता विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये संबंधित वैद्यकीय अधिकारी यांच्या कडून रु.828/- एवढी रक्कम त्यांच्याकडून वसुल केल्याचे चलन सादर केले आहे. परंतू संबधितांना राजिनामा दिल्याच्या दिनांकापासून भ्रमणध्वनीवरील खर्चाची रक्कम वसुल केल्याबाबत प्रमाणित केलेले नाही. त्यामुळे राजिनाम्याच्या दिनांकापासूनचा भ्रमणध्वनी वरील खर्च वसुल करुन सेवा बंद करण्यात आल्याबाबत व संबंधीताकडील भ्रमणध्वनीचे सीमकार्ड परत घेण्यात आल्याबाबत साधार पूर्तता दर्शविणे आवश्यक आहे.

6) तसेच वरील प्रमाणक क्र.233 दि.08.06.2012 या देयकातील अ.क्र. 167 व 182 वरील कर्मचारी निलंबित असतांना सदर भ्रमणध्वनी देयकाची रक्कम अनुक्रमे रु.347.86 व रु.167.42 मनपाकडून अदा करण्यात आली आहे. असे टिपणीवरील शेऱ्यावरुन दिसून येते. निलंबन कालावधीत भ्रमणध्वनी देयकाची संबधितांकडून वसूल करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास साधार पुर्तता दर्शविण्याबाबत विभागास अर्धसमास पत्रान्वये कळविण्यात आले असता विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये संबधीतांकडून रु.347.86 व रु.167.42 वसुल करण्यात आल्याचे चलन सादर केले आहे. परंतू संबंधितांच्या निलंबन कालावधीतील भ्रमणध्वनी सेवेवरील खर्चाचा खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे निलंबन कालावधीतील भ्रमणध्वनी सेवेवरील खर्चाची वसुली करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

7) भ्रमणध्वनी वापराबाबत संबंधितास अनुज्ञेय असलेल्या मर्यादेपेक्षा जादा वापर केला असतांना अशा जादा वापरावरील खर्चाचे प्रदान पुरवठादार कंपनीस मनपाकडून अदा करण्यात येते. त्यामुळे महापालिकेस प्रत्येक महिन्यात अनावश्यक जादा खर्च करावा लागत असल्याचे उपरोक्त देयकांवरुन दिसून येते. वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे रु.4,09,976/- एवढा मनपाचा निधी अनावश्यक गुंतून राहिलाअसल्याचे दिसून येते. तरी भ्रमणध्वनी वापराच्या विहीत मर्यादेपेक्षा संबंधितांनी केलेल्या जादा वापराबाबत मनपास भ्रमणध्वनी सेवेसाठी जादा खर्च करावा लागणार नाही. यासाठी योग्य उपाययोजना करुन धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

वसुलपात्र रक्कम रु.4,09,976/-

FDSANMM7201 (Ref No : 53, Hmm No : 40)

68 अंशराशीकरण रकमेची चुकीची परीगणना व आश्वासित प्रगती योजनेचा चुकीचा लाभ दिल्याने अतिप्रदान.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 2

लेखा शीर्ष :2110 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 9048.00/-

सेवा-निवृत्त कर्मचाऱ्याचे अंशराशीकरण मुल्याची चुकीची परिगणना करून लाभ दिल्याने. त्याचप्रमाणे काही कर्मचाऱ्यांना अश्वासित प्रगती योजनेचा चुकीचा लाभ दिल्याने अतिप्रदान झाले आहे. सदर अतिप्रदानाची

वसुली केली नाही.

वित्तीय वर्ष2012-13 मध्ये सेवानिवृत्त कर्मचारी श्री. रिपिन पोश्या पाटील. सेवानिवृत्त दिनांक 14.03.2013 जन्म दिनांक 1.06.1960 नियुक्ती दिनांक 06.02.1986 पद लिपीक हे वर्ग तीनचे कर्मचारी यांचे सेवा निवृत्तीच्या दिनांकास त्यांचे वय 54 वर्षे असून पुढील जन्मदिनी 55 वर्षे होत असून क्र.सोनिवे 1009/प्र.व.33/00/सेवा-4 दि.30.10.2009 अन्वये त्यांना 8.627 अंशराशीकरण मुल्य देय असतांना 8.943 देण्यात आले असून त्यानुसार खालीलप्रमाणे त्यांना जास्त अंशराशीकरण रक्कम अदा करण्यात आलीआहे.

देय	दिलेले
2386 x8.627= रुपये247008	2386x8.943= रुपये256056
	256056-247008= रुपये9048

वसुलपात्ररक्कम = रुपये9048

त्याचप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचारी श्री. पांडूरंग विना पाटील व देविदास भालेराव से.नि. दि.30.04.2012 सेवा पूस्तकाची पडताळणी केली असता त्यांना जा.क्र.मनपा/आस्था/432/500/06-07/16/6/06 अन्वयेदि.01.6.97 पासून शासन निर्णय दिनांक 8 जून 1995 नुसार एकाच पदावर 12 वर्षे सेवा झाल्यामुळे कालबध्द पदोन्नतीचा प्रथम लाभ देण्यात आला. त्यानंतर जा.क्र.मनपा/आस्था/1030/2007-08 दिनांक 20.10.2006 पासून वरिष्ठ लिपीक पदावर पदोन्नती देण्यात आली असून आश्वसित प्रगती योजनेचा दूसरा लाभ जा.क्र.मनपा/आस्था/स.आ.प्र. यो./119/34/2012/65/ दि.02.06.2014 अन्वये श्री. पाटील दि.01.06.2009 पासून व श्री. भालेराव यांना दि. 06.02.2010 पासून लाभ देण्यात आला असून शासन दिनांक 08.06.1995 अन्वये व शासन निर्णय क्रमांक वेतन-1199/प्र.क्र.2/99/सेवा-3 दि. 20.07.2001मधील अट क्रमांक 5 अन्वये उपरोक्त कर्मचा-यांना देण्यात आलेल्या आश्वासित प्रगती योजनेच्या प्रथम लाभाबाबत या योजने अंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय ठरविली असल्याने वरीष्ठश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीच्या पदा करीता विहीत केलेली अर्हता, पात्रता, जेष्ठता, विभागीय परीक्षा या सर्व बाबींची पूर्तता करणे आवश्यक असतांना श्री. पाटील यांना दि.15.07.2004 व श्री.भालेराव दि.11.10.2004 रोजी विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाले असून प्रथम कालबध्द पदोन्नतीचा लाभ देतांना वरील बाबीची पूर्तता केली नसल्याचे दिसून येते. याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 44 दि. 01/09/2015 विचारणा केली असता उपरोक्त कर्मचाऱ्यांनी प्रथम व दुसऱ्या लाभासाठी शैक्षणिक अर्हता/पात्रतेची पूर्तता केली आहे असे नमूद केले असून याबाबत साधार खुलासा करण्यात आला नाही त्यामुळे संबधित विभागाने सादर केलेले अनुपालन विचारात घेवून खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

श्री. मोरेश्वर रामचंद्र पहूरकर लिपीक यांना नपा/आस्था/847/5341/96-97 दि.02.11.96 नुसार सहा.लेखापाल या पदावर 1200-30-1560 ची वेतनश्रेणी देवून दि.01.09.96 पासून पदोन्नत्ती देण्यात आली. त्यानंतर जा.क्र.मनपा/आस्था/2027/2603 2055-06 दि.28.02.2006 अन्वये दि.28.02.2006 पासून सुरक्षा अधिकारी वर्ग-2 ची वेतनश्रेणी 6500-200-10500 या पदावर पदोन्नती देण्यात आली. परंतू जा.क्र.मनपा/आस्था/पदोन्नती/1062/2011-12 दिनांक 14.11.2011 अन्वये श्री.पहूरकर सूरक्षाअधिकारी म्हणून पदोन्नतीची अट पूर्ण करत नसल्यामुळे दि.01.01.2006 पासून पून्हा 5200-20200 ग्रेडवेतन 2400 या वेतनश्रेणीत वेतन निश्चित करून सहा. लेखापालपदावर पदावनत करण्यातआले. त्यांनतर जा.क्र.मनपा/आस्था/से.आ.प्र.यो./199/340/2014-15 दि.02.06.2014 अन्वये दिनांक 01.09.1996 ते दि.01.01.2008 पर्यतच्या कालवधीत एकाच पदावर सलग 12 वर्षे सेवा गृहीत धरुन आश्वासित प्रगती योजनेचा

लाभ देण्यात आला. तथापि श्री. पहूकर यांना प्रथम दि.01.09.1996 ला प्रथम पदोन्नती व त्यांनतर दि. 28.02.2006 लादुसरीपदोन्नती देण्यात आली व त्यांनी पदोन्नती स्वीकारुन वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ घेतला असून सदरलाभाच्या वसुलीबाबत कार्यवाही करून उपरोक्त शासन निर्णयान्वये त्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिला नाही.

DATPLKM7501 (Ref No : 68, Hmm No : 44)

69 वेतन देयकातील वजातीचे लेखांकनाच्या अनियमततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष :2110 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 9626337.00/-

महानगरपालिकेच्या लेखा विभागातून माहे मार्च-2013 च्या वेतन देयकातून केलेल्या रु.9626337 वजातीचे लेखांकन दुहेरी नोंद पध्दतीने ठेवले नसल्यामुळे सदर वजातीच्या अनुसुची व विवरणपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे आयकर, ग.वि.यो. व्यवसाय कर, अल.आय.सी. परिभाषित अंशदान इत्यादी रकमांचे लेखांकन कशाप्रकारे करण्यात येते याबाबत लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही.

वित्तीय वर्ष 2012-13 च्या माहे मार्च-2013 चे वेतन देयक प्रमाणक क्र . 1573 दि. 07/03/2013 रक्कमा रू. 17884209/- मधील वेतनातील आयकराची रक्कम रू . 1243375/- ग.वि.यो. रक्कम रू. 14370 पोस्टल विमा रक्कम रू. 6851/- अंशदान रक्कम रू. 482639/- एल.आय.सी. रक्कम रू. 2434305/- व्यवसाय कर रक्कम रू. 398330 इतर वजीती रक्कम रू. 3475372 भ.नि.नि. रक्कम रू. 1571095/- अशी एकूण रक्कम रू . 9626337/- च्या नोंदी सर्वसाधारण रोखवहीत खर्च व जमा बाजूस नोंदवलेल्या नसून सदर रक्कमांचे लेखांकन क शाप्रकारे करण्यात आले याबाबतचा खुलासा व वरील देयकासोबत जोडावया च्या अनुसुची व विवरणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास ज्ञापन क्र . 23 दि. 28/08/2015 अन्वये विचारणा केली असता लेखा विभागाने सादर केलेल्या अनुपालनात सदरच्या रक्कमा रोखवहीत समायोजीत नसुन थेट खर्च म्हणुन दर्शविलेल्या असल्याने त्यांचे जमा बाजूस समायोजन दर्शवलेले नाही त्याचप्रमाणे देयकासोबतच्या अनुसुची अथवा विवरणपत्र आस्थापना शाखेला असून ती लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्याकरीता त्यांना पत्र क्र . मिभामनपा/लेखा/130 दि. 02/09/2015 अन्वये कळविले आहे. पत्राची प्रत सोबत सादर केली आहे. असे अनुपालन सादर करण्यात आले प्राप्त अनुपालनानुसार खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) शासन निर्णय क्र . लेखासु-102004/7ए/प्र.क्र.5/04/नवि-31 दि. 06/02/2005 अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक व्यवहारात अचुकता व पारदर्शकता आणण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे लेखे दु हेरी नोंद लेखा पध्दतीने दि . 1 एप्रिल 2005 पासुन ठेवण्यास सुरूवात करण्यात आली . परंतु महापालिकेच्या लेखा विभागाने वेतन देयकातील वजातीबाबतचे रकमांचे लेखांकन सर्वसाधारण रोखवहीत दुहेरी नोंद पध्दतीने ठेवलेले नाहीत . त्याचप्रमाणे सदर वजातीच्या अनुसु ची व विवरणपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे आयकर, ग.वि.यो. व्यवसाय कर, अल.आय.सी. परिभाषित अंशदान इत्यादी रकमांचे लेखांकनाबाबतच्या नोंदी लेखा परीक्षण करताना आढळून आल्या नाहीत.
2) वित्तीय वर्षे 2012-13 मधील पावती पुस्तक क्र . 6641 मधील व वापरलेल्या पावत्या क्र . 664057 ते 664100 एकूण 44 पावत्या व पावती पुस्तक क्र . 6637 मधील व वापरलेल्या पावत्या क्र . 663639 ते 663700 एकूण 62 पावत्या रद्द करून तसे प्रमाणपत्र पावती पुस्तकावर नोंदविण्यात आले आहे . तसेच पावती पुस्तक क्र . 6237 मधील पावती क्र . 628627 व 628628 रद्द केल्या असुन त्यावर सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात आली आहे. वरील सर्व पावत्या सोबत अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत . असे अनुपालन सादर करण्यात येत आले. परंतु प्रत्यक्षात रद्द केलेल्या पावत्या लेखा परीक्षणास अवलोकनार्थ सादर केल्या नाहीत.

DATPLKM7501 (Ref No : 74, Hmm No : 23)

70 भविष्य निर्वाह निधीच्या गुंतवणूकीवर मिळालेल्या व कर्मचा-यांना दिलेल्या व्याजामधील तफावती बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष :आस्थापना विभाग मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब
आक्षेपाधीन रक्कम रु. 1852937.00/-

महापालिकेला भविष्य निर्वाह निधी जमा रकमेच्या गुंतवणूकीवर सामान्यत: जेवढे व्याज मिळणार आहे त्याप्रमाणात महापालिकेने कर्मचा-यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेवर व्याज दिले नसल्यामुळे महापालिकेला रु.1852397/- एवढया रकमेची तूट सहन करावी लागली आहे. तसेच बृहतपत्रकाची शिल्लक ही रोजकीर्दीच्या शिल्लकेपेक्षा कमी असल्याने बृहतपत्रकाच्या शिल्लकेचा ताळमेळ घेतलेला दिसून येत नाही. 2012/13 आर्थिक वर्षामध्ये महापालिकेने गुंतवणूकीवरील मिळालेल्या व्याजापेक्षा कर्मचा-यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेवर रु.1852397/- जादा व्याज दिले असल्याने तेवढया रकमेने महापालिकेचे

नुकसान झाले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिके मधील कर्मचारी/ अधिकारी यांची भविष्य निर्वाह निधी वर्गणी, बृहतपत्रकाची व रोज किर्दीची तपासणी केली असता कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या गुंतवणूकीवरील मिळालेल्या व कर्मचा-यांना दिलेल्या व्याजामधील तफावती बाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 37 दिनांक 07/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. सदर अर्धसमास पत्रासंदर्भात महापालिकेकडून दिनांक 7/10/2015 रोजी प्राप्त झालेल्या खुलाशात लेखाशाखेकडून खुलासा देण्यात येईल असे नमूद केले आहे. परंतू लेखापरीक्षण कालावधी पर्यंत सदर खुलासा प्राप्त झालेला नाही. तरी लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्मचारी/ अधिकारी यांच्याकडून भविष्य निर्वाह निधीची वर्गणी जमा करण्यात येते. असे एकूण भविष्य निर्वाह निधीचे 1253 खातेदार आहेत. सदर भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीचे महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 1971 च्या नियम क्रमांक 134(3) नमुना क्रमांक 99 नुसार बृहतपत्रक तसेच नियम 134(6) नमुना क्रमांक 100 नुसार रोजकीर्द ठेवलेली आहे. भविष्य निर्वाह निधीच्या 2012-13 आर्थिक वर्षाचे रोजकीर्दीमधील अखेरची शिल्लक रक्कम रु.174491245.40 असून भविष्य निर्वाह निधीचे बृहतपत्रकामधील अखेरची शिल्लक रु.150150035/- असल्याने तफावत रक्कम रु.24341210.40 दिसून येत आहे. बृहतपत्रकामधील अखेरच्या शिल्लके पेक्षा रोजकीर्दीमधील अखेरची शिल्लक अधिक दिसून येत आहे. तसेच 2012-13 आर्थिक वर्षामध्ये भविष्य निर्वाह निधीच्या बँकेत ठेवलेल्या रकमेपोटी महानगरपालिकेला रु.9697714/- एवढे व्याज मिळाले आहे. परंतू महापालिकेने कर्मचा-यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेवर रु.11550651/- व्याज दिले आहे. यामधील तफावत रक्कम रु.1852937/- आहे. तरी मागील आर्थिक वर्ष 2009-10 पासून महापालिकेने भविष्य निर्वाह निधीच्या बँकेत गुंतविलेल्या रकमेवर बँकेकडून 7.5 त 8 टक्के दराने व्याज मिळाले असून महापालिकेने कर्मचाऱ्यांना 8 ते 8.8 टक्के दराने व्याज दिले आहे. बँकेकडून मिळालेले व्याज दर कमी असून कर्मचाऱ्यांना दिलेला व्याज दर अधिक आहे. त्यामुळे 2012-13 या आर्थिक वर्षात महापालिकेस भविष्य निर्वाह निधीच्या व्याजाबाबत रु.1852937/- एवढी तूट सहन करावी लागली आहे. तरीदेखील रोजकीर्दीमधील शिल्लक हि बृहतपत्रकातील शिल्लके पेक्षा अधिक येणे शक्य नसताना आणि बृहतपत्रकामध्ये कर्मचाऱ्यांना देय होणारे व्याजाची रक्कम अधिक होत असून रोजकीर्दीमध्ये सदर रकमेचा समावेश नसताना बृहतपत्रकामधील अखेरच्या शिल्लके पेक्षा रोजकीर्दीमधील अखेरची शिल्लक अधिक दिसून येत आहे. यावरुन बृहतपत्रकाच्या शिल्लक रक्कमेचा ताळमेळ योग्य झालेला नाही. भविष्य निर्वाह निधीच्या गुंतवणूकीवरील प्राप्त व्याजापेक्षा रक्कम रु.1852937/- जादा दिलेल्या अतिरीक्त व्याजाच्या रकमेबाबत संबधित शाखेने महासभेकडे प्रस्ताव सादर केल्याचे दिसून येत नाही तसेच सदरच्या अदा करण्यात आलेल्या जादा व्याजाची तरतूद

कोणत्या निधीतून केली आहे याबाबत खुलासा केलेला नाही. सदर जादा दिलेल्या व्याजामुळे महापालिकेचे रु.1852937/- रकमेचे नुकसान झाले असल्याने रक्कम रु.1852937/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.1852937/-

DATAMSM6401 (Ref No : 102, Hmm No : 37)

71 मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबडेकर भवन येथील मंगल कार्यालयाकडून कमी दराने भाडे वसूली/ अनामत रक्कमेच्या परताव्या बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष :नगरभवन विभाग मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब
आक्षेपाधीन रक्कम रु. 13000.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 45925.00/-

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडुन डॉ. बाबासाहेब आंबडेकर मंगल कार्यालय/हॉल भाडयाने देण्यात येत असून महापालिका ठराव क्रमांक 87, दिनांक 30/12/2011 अन्वये खुर्ची भाडे प्रतिनग रु.5/- प्रति दिन मंजूर असताना हॉल आरक्षणामध्ये खुर्ची भाडे प्रतिनग रु.2.50/- प्रति दिन असे कमी दराने वसूल केल्याने महापालिकेचे रू.45925/- नुकसान झाले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडुन डॉ.बाबासाहेब आंबडेकर मंगल कार्यालय/हॉल भाडयाने देण्यात येत असून सदर हॉलचे आरक्षण/भाडे तसेच पुरविलेल्या सुविधांचे शुल्क व अनामत रक्कम स्विकारुन महानगरपालिका फंडात जमा करण्यात येते. सदर हॉल आरक्षणामधील आढळून आलेल्या त्रुटींबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 54 दिनांक 19/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. सदर अर्धसमास पत्रासंदर्भात महापालिकेने त्यांच्या पत्र क्रमांक 30 दिनांक 3/10/2015 अन्वये केलेला खुलासा संयुक्तीक नसल्याने लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) मिरा भाईंदर महानगरपालिका महासभा दि.30.12.2011 ठराव क्र.87 अन्वये मंगल कार्यालयाचे भाडे, सुविधांचे शुल्क, अनामत रक्कम इत्यांदीच्या दरांना मंजुरी दिली आहे. त्यानुसार मंगल कार्यालय भाडे रु.3000/-, खुर्ची भाडे प्रतिनग खुर्ची रु.5/- प्रतिदिन व अनामत रक्कम र.1000/- असे दर 2012-13 या आर्थिक वर्षासाठी उपरोक्त ठरावानुसार मंजुर आहेत. परंतू मनपाने प्रतिनग

खुर्ची भाडे रु.5/- असताना रु.2.50 वसुल केले आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 54 दिनांक 19/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. त्यानुसार प्राप्त खुलाशामध्ये नविन दर माहिती नसल्याने जुन्या ठरावा नुसार खुर्ची भाडे स्विकारण्यात आले आहे असे खुलाशात नमूद आहे. अशाप्रकारे प्रतिनग खुर्ची भाडे रु.5/- ऐवजी रु.2.50 कमी वसुल केलेले माहे मार्च 2013 मधील जमा पावती व खुर्ची नगांचा तपशील खालील प्रमाणे.

पावती क्रमांक/ दिनांक	मागणी केलेले खुर्ची नग	मनपाने घेतलेले खुर्चीचे भाडे	ठरावानुसार रु.5/- प्रमाणे घ्यावयाचे खुर्चीचे भाडे	कमी घेतलेले खुर्चीचे भाडे.
117,2/3/2013	180	450	900	450
118,2/3/2013	180	450	900	450
120,2/3/2013	180	450	900	450
121,4/3/2013	200	500	1000	500
122,4/3/2013	200	500	1000	500
123,4/3/2013	100	250	500	250
124,4/3/2013	200	500	1000	500
125,4/3/2013	200	500	1000	500
126,4/3/2013	200	500	1000	500
127,4/3/2013	100	250	500	250
131,12/3/2013	100	250	500	250
132,12/3/2013	180	450	900	450
133,12/3/2013	180	450	900	450
134,18/3/2013	180	450	900	450
135,19/3/2013	100	250	500	250
136,25/3/2013	180	450	900	450
137,25/3/2013	100	250	500	250
138,25/3/2013	180	450	900	450
139,25/3/2013	180	450	900	450
140,26/3/2013	180	450	900	450
141,26/3/2013	180	450	900	450
142,30/3/2013	180	450	900	450
			एकूण रक्कम	9150

उपरोक्त तपशीलनुसार रु.9150/- खुर्चीचे भाडे कमी घेतलेले आहे. तसचे 2012-13 मधील माहे एप्रिल 2012 ते फेब्रुवारी 2013 पर्यंतची विभागाने सादर केलेल्या खुर्चीचे कमी घेतलेल्या भाडयाचे विवरणपत्र/ माहिती नुसार एकूण 85 पावत्यांचे रक्कम रु.36775/- खुर्चीचे भाडे कमी घेतले आहे. असे एकूण रु.45925/- 2012-13 मधील हॉल आरक्षणामध्ये खुर्चीचे भाडे कमी घेतल्याने रु.45925/-

एवढया रकमेचे महापालिकेचे नुकसान झाले आहे. सदर कमी घेतलेले खुर्चीचे भाडे रक्कम रु.45925/- संबधितांकडुन वसूल पात्र आहे.

2) मनपाचा हॉल भाडयाने देताना अनामत रक्कम स्विकारण्यात येते. सदर प्राप्त झालेल्या अनामत रकमा लेखा शाखेतील अनामत रजिस्टरमध्ये नोंदविल्या आहेत. तसेच अनामत रकमांची स्वतंत्र किर्द ठेवलेली आहे. प्राप्त जमा अनामत रकमा युनियन बँक ऑफ इंडिया च्या बँक खाते क्रमांक 48795 मध्ये जमा केल्याचे दिसून आले परंतू अनामत रकमा परत करताना अग्रिम मंजुर करुन दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती खाते क्रमांक 199 च्या धनादेशाव्दारे अनामत परतावा दिला आहे व याचा खर्च सर्वसाधारण किर्दीमध्ये नोंदविला आहे. अनामत रकमांचे स्वतंत्र कॅश बुक ठेवले असताना अनामत जमा रक्कम स्वतंत्र कॅश बुक मध्ये नोंदविली आहे व अनामत परतावा खर्च सर्वसाधारण कॅश बुकमध्ये नोंदविला आहे. अनामत जमा व परतावा याचे व्यवहार दोन वेगवेगळया बँकेतून केले आहेत व दोन वेगळया कॅश बुक मध्ये लिहिले आहेत. त्यामुळे लेखालेखनाच्या पध्दती प्रमाणे सदरबाब योग्य नाही. अनामतच्या स्वतंत्र कॅश बुकमध्ये जमा अनामत वाढ असून सर्वसाधारण कॅश बुकमध्ये अनामत परतावा रकमेने खर्च वाढत आहे. चुकीच्या लेखांकनामुळे अनामत जमा व त्यातून दिलेला अनामत परतावा व शिल्लक अनामत याचा मेळ घेता येणार नाही. याबाबत महापालिकेने त्यांचे पत्र क्रमांक 30 दिनांक 3/10/2015 अन्वये केलेल्या खुलाशात लेखा विभागाकडून माहिती घेण्यात येत आहे असे नमूद आहे. तसेच सन 2012-13 मध्ये अनामत वाटप बाकी आरंभिची शिल्लक रु.29000/- होते व 2012-13 मधील अनामत वाटप बाकी अखेरची शिल्लक रक्कम रु.44000/- असुन सदर अनामत वाटप बाकी रकमेमध्ये वाढ झाली आहे. मागील तिन वर्षापूर्वीच्या अनामत रकमा संबधितांकडून मागणी न केल्यास महापालिका फंडात जमा करणे आवश्यक आहे. विभागाने अशी कार्यवाही केली नसल्याने माहे मार्च 2009 पूर्वीच्या अनामत रक्कमा रु.13000/- अनामत खाती पडून आहेत व महापालिकेला सदर रु.13000/- रकमेचा उपयोग करुन घेता आला नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, 1971 मधील नियम 190 (3) नुसार तीन वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या अनामत रकमा प्रत्येक वर्ष अखेर व्यपगत होतील व महानगरपालिकेच्या व्यपगत ठेवी या शिर्षाखाली स्थानांतरीत केल्या असल्या पाहिजेत. परंतू सन 2008-09 पुर्वीच्या अनामत एकूण शिल्लक रक्कम रु.13000/- व्यपगत करुन व्यपगत ठेवी या लेखाशिर्षाखाली स्थानांतरीत केल्या नाहीत. त्यामुळे सदर रु.13000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहेत.

आक्षेपाधिन रक्कम रु.13000/-

वसुलपात्र रक्कम रु.45925/-

DATAMSM6401 (Ref No : 31, Hmm No : 54)

72 महानगरपालिका क्षेत्रात 90 होर्डिंग्ज उभारण्यासाठी दिलेल्या ठेक्यासंदर्भात निविदा प्रक्रिया विहित वेळेत राबविली नसल्याने महानगरपालिकेला झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : जाहिरा विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 14302773.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2980070.00/-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात जाहिरातीचे विविध ठिकाणी जाहिरातीचे होर्डिंग्ज उभारण्यासाठी निविदा प्रक्रिया विहित मुदतीत राबविली नसल्याचे व निविदा प्रक्रिया न राबविता ठेका दिल्याचे दिसून आले आहे. निविदा प्रक्रिया विहित मुदतीत न राबविल्यामुळे महापालिकेचे रु.2980070/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. निविदा प्रक्रिया न राबविता ठेका दिल्यामुळे उदयोग, उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भाखंस 1088/2512/उदयोग दि.02.01.1992 या शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे. त्यामुळे दोन संस्थांना निविदेशिवाय दिलेला ठेका रक्कम रु.14302773/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात विविध ठिकाणी जाहिरातीचे होर्डिंग्ज उभारण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदा नस्त्यांचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 81 दिनांक 6/10/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केलेला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात जाहिरातीचे (विविध होर्डिंग्ज व अन्य प्रकाराच्या जाहिराती) नवीन स्त्रोत उपलब्ध करण्याकरीता व उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने विविध ठिकाणी दुसऱ्या टप्प्यातील जाहिरातीचे होर्डिंग्ज उभारण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. 43 दि. 29/02/2008 ने शिफारस केलेल्या प्रस्तावास महासभा ठराव क्र. 35, दि. 29/03/2008 अन्वये 9 ग्रुप (90 होर्डिंग्ज) ठेका होर्डिंग्जच्या निविदा मागविण्याकरीता प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने निविदा दि. 27/11/2008 रोजीच्या दै. लोकसत्ता व दै. इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रात प्रसिध्दी करून निविदा मागविण्यात आल्या होत्या. 90 होर्डिंग्जसाठी महापालिकेने दर्शविलेल्या वार्षिक रकमेपेक्षा मे.ॲडव्हेंचर इंटरप्राईजेस या निविदाकाराची एस-19 लॉटसाठी 14.10% जादा दराने तर मे.ब्राईट आउटडोर प्रा.लि. या निविदाकाराची एन-14 लॉटसाठी 62.50% जादा दराने निविदा प्राप्त झाल्या आहेत. म्हणजे महानगरपालिकेने निविदेमध्ये मागणी केलेल्या वार्षिक रकमेपेक्षा जादा दराच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत, परंतू प्रति महिना/ प्रति होर्डिंग्ज सरासरी रक्कम रु.3000/- अपेक्षिली असल्याने उपरोक्त निविदांचे दर प्रति महिना/ प्रति होर्डिंग्ज सरासरी रक्कम रु.2600/- इतके प्राप्त होत असल्याचे दिसून आले. प्राप्त निविदेमध्ये कमी दर आल्याने निविदा धारकांशी वाटाघाटी अंती प्रती होर्डिंग्ज रू.3000/- मासिक दर निश्चित करून सदरच्या निविदा मंजुरी करीता स्थायी समिती ठराव क्र.123, दि. 25/02/2009 रोजीच्या सभे मध्ये ठेवण्यात आल्या होत्या.

तथापी दि. 29/03/2008 रोजी ठेका होर्डिंग्जच्या निविदा मागविण्यासाठी प्रशासकीय मंजुरी मिळालेली असल्याने त्वरीत निविदा मागवुन होर्डिंग्ज उभारण्यासाठी ठेका देण्याची कार्यवाही केली नसल्यामुळे प्रती होर्डिंग्ज रू. 3000/- प्रती माह महापालिकेस उत्पन्न मिळाले असते. म्हणजे दि.

29/03/2008 रोजी निविदा मागविण्यासाठी प्रशासकीय मंजुरी मिळाल्याने माहे एप्रिल 2008 मध्ये विहित मुदतीत निविदा प्रक्रिया राबवून मंजूर करून ठेका देण्याची कार्यवाही केली असती तर माहे मे 2008 पासून प्रती माह होर्डिंग्ज रू. 3000/- महापालिकेस उत्पन्न मिळाले असते. त्यामुळे माहे मे 2008 ते फेब्रु 2009 पर्यंत (रू. 3000 X 90 होर्डिंग्ज X 10 म. = 2700000/-) या 10 महिन्याच्या कालावधीत महापालिकेचे एकूण 90 होर्डिंग्जचे रू. 27 लाखाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

2) तसेच दि. 25/02/2009 च्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र. 123 अन्वये प्रती होर्डिंग् मासिक रक्कम रू. 4001/- पहिल्या वर्षाकरीता मासिक मुल्याधिकारीक रक्कम निश्चित करून फेर-निविदा मागविण्याचा ठराव केला. त्यानुसार 90 होर्डिंग्ज करीता दि. 23/05/2009 रोजी निविदा मागविल्या त्यावेळेस मे. मदार बिझनेस वेंचर्स यांची एक निविदा प्राप्त झाली. सदर निविदा 4.76% जादा दराने प्राप्त झाली होती. तरी सुध्दा सदर निविदा ना मंजूर करून फेर-निविदा मागविण्यात आल्या. मे. मदार बिझनेस वेंचर्स यांची निविदा मंजूर करून त्यांना ठेका दिला असता तर माहे जुलै 2009 ते फेब्रु 2010 पर्यंतच्या 7 महिन्यासाठी महापालिकेला (रु.4001 X 10 हो. X 7 म. = 280070) रू. 280070/- एवढे उत्पन्न मिळाले असते. म्हणजे मे. मदार बिझनेस वेंचर्स यांची 4.76 जादा दराने निविदा प्राप्त होऊन सुध्दा त्यांना ठेका न दिल्याने महापालिकेचे रू. 280070/- चे नुकसान झाले आहे.

3) स्थायी समिती ठराव क. 43, दि. 29/03/2008 च्या शिफारशीनुसार महासभेच्या मान्यतेने निविदा मागविण्याकरीता प्रशासकीय मंजुरी मिळाली होती व त्या अनुषंगाने दि. 27/11/2008 रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्या निविदा धारकांना बोलावुन त्यांच्याशी वाटाघाटी करून 90 होर्डिंग्जचा ठेका देण्याऐवजी ज्यांच्या निविदा प्राप्त झाल्याच नव्हत्या ते मे. सरस्वती ॲडव्हडायझिंग सर्विस व मे. उमराव इंन्स्टीटयुट ऑफ सायन्स ॲन्ड रिसर्च यांना होर्डिंग्ज उभारण्यासाठी विभागाकडून ठेका देण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, अनुसूची ड मधील प्रकरण 5 कलम 2(2) मधील तरतूदीनुसार तातडीची व अत्यावश्यक बाब असल्यास ठेका देण्यात येत असताना सदर ठेका देण्यासाठी 2008 पासून निविदा प्रक्रीया राबवून आर्थिक वर्ष 2012-13 पर्यत ठेका देण्यात आला नसल्यामुळे सदर ठेका देणे अत्यावश्यक व तातडीची बाब राहिली नसल्याने ज्या संस्थांच्या निविदा प्राप्त झालेल्या नाहीत त्या संस्थांना थेट होर्डिंग्ज उभारण्याचा ठेका नियम बाहय पध्दतीने दिला आहे. ज्या संस्थांच्या निविदा प्राप्त झालेल्या नाहीत त्या संस्था (1) मे. सरस्वती ॲडव्हडायझिंग सर्विस यांना 80 होर्डिंग्ज करीता रू. 3840960/- पहिल्या वर्षाकरीता, दुसऱ्या वर्षाकरीता रु.4225056/- व तिस-या वर्षाकरीता रु.4647560/- असे एकूण रु.12713576/- रकमेचा ठेका देण्यात आला व (2) मे. उमराव इंन्स्टीटयुट ऑफ सायन्स ॲन्ड रिसर्च यांना 10 होर्डिंग्ज करीता रू. 480120/- पहिल्या वर्षाकरीता, दुसऱ्या वर्षाकरीता रु.528132/- व तिस-या वर्षाकरीता रु.580945/- असे एकूण रु.1589197/- रकमेचा ठेका देण्यात आला. प्राप्त निविदा धारकांपैकी संस्थांना ठेका देण्याऐवजी ज्यांच्या निविदा प्राप्त झालेल्या नाहीत, त्या संस्थांना कशाच्या आधारे होर्डिंग्ज उभारण्याचा ठेका देण्यात आला, याचा खुलासा अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 81 दिनांक 6/10/2015 अन्वये विचारणेत आला होता परंतू विभागाने कोणताही खुलासा केलेला नाही. निविदा प्रक्रिया विहित वेळेत राबविली नसल्याचे व निविदा प्रक्रिया न राबविता उपरोक्त ठेका दिल्याचे दिसून आले आहे. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, अनुसूची ड मधील प्रकरण 5 कलम 2(2) मधील तरतूदीनुसार कलम 73 (क) च्या आधिन राहून जाहिर निविदांपैकी जी निविदा सर्व

परिस्थिती विचारात घेता फायदेशिर आहे अशी निविदा स्विकारणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी प्राप्त निविदांपैकी फायदेशिर निविदा न स्विकारता निविदा न भरलेल्या कंत्राटदारांच्या निविदा स्विकारण्यात आल्या आहेत. सदर बाब उपरोक्त तरतूदीनुसार नियम बाहय आहे. तसेच निविदा प्रक्रिया न राबविता ठेका दिल्यामुळे उदयोग, उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र.भाखंस 1088/2512/उदयोग दि.02.01.1992 या शासन निर्णयाचेही उल्लंघन झाले आहे. त्यामुळे उपरोक्त दोन संस्थांना दिलेला ठेका रक्कम रु.14302773/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.14302773/-

वसुलपात्र रक्कम रु. 2980070/-

DATAMSM6401 (Ref No : 32, Hmm No : 81)

73 पाणीपट्टी जमा रकमेबाबत व पाणी आकार मागणी नोंदवही ठेवली नसलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 82450194.00/-

मिरा भाईंदर पाणी पुरवठा विभागाच्या एकूण 10 विभागिय कार्यालयाकडून पाणीपट्टी व जलउपकर वसुल करण्यात येतो. 2012-13 आर्थिक वर्षाचे चार विभागिय कार्यालयांचे पाणीपट्टी जमा रु.79595182/- एवढया रकमेचे अभिलेखे उपलब्ध करुन दिले नसल्यामुळे सदर विभागांतर्गत जमेची पडताळणी करता आली नाही. तसेच पाणी आकार मागणी नोंदवही संगणिकृत विवरणपत्र लेखापरीक्षणस उपलब्ध करुन दिलेली नाहीत.

मिरा भाईंदर पाणी पुरवठा विभागाच्या पाणीपट्टी जमा पावत्या व पोटकिर्दीनुसार जमा रकमेची तपासणी केली असता चार विभागिय कार्यालयांचे पाणीपट्टी जमा पावत्या व पोटकिर्द व इतर अभिलेख उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच पाणी आकार मागणी नोंदवही उपलब्ध करुन देण्याबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 35 दिनांक 08/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. विभागाने त्यांचे पत्र क्रमांक जा.क्र.मनपा/पापु/1468/2015-16, दिनांक 16/10/2015 अन्वये केलेला खुलासा विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. पाणी पुरवठा विभागाच्या पाणीपट्टी जमा रकमेबाबत.

पाणीपुरवठा विभागाच्या एकूण 10 विभागिय कार्यालयाकडून पाणीपट्टी व जलउपकर वसुल करण्यात येतो. 2012-13 आर्थिक वर्षामधील निवड महिना मार्च 2013 मध्ये पाणीपट्टी व जलउपकराची 10 विभागीय कार्यालयाकडून एकूण रु.106436451/- एवढी रक्कम जमा झाल्याचे पाणी

पुरवठा विभागातील मुख्यालयाच्या एकत्रित पोटकिर्दीवरुन दिसून येते. दहा पाणी पुरवठा विभागीय कार्यालयांपैकी पाणी पुरवठा विभागीय कार्यालय 1)भाईंदर (प.), 2)चेणे - वसावे, 3)भाईंदर (पू.), व 4)मिरा रोड या चार विभागांचे पाणी पट्टीकराच्या जमा पावत्या व पोटकिर्द व इतर अभिलेखे उपलब्ध करण्याबाबत अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 35, दिनांक 08/09/2015 अन्वये विचारणा करुनही उपलब्ध करुन दिले नाहीत. माहे मार्च 2013 मधील एकूण जमा रक्कम रु.106436451/- या रकमेपैकी उपरोक्त चार विभागिय कार्यालयांचे रु.79595182/- एवढया रकमेचे अभिलेखे उपलब्ध करुन दिले नसल्यामुळे सदर विभागांतर्गत जमेची पडताळणी करता आली नाही. त्यामुळे उपरोक्त चार विभागिय कार्यालयांतर्गत पाणीपट्टी थकीत रकमेसह चालू मागणीनुसार पाणीपट्टीची जमा योग्य व अचूक जमा करुन घेतल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता येत नाही. सदर जमा रक्कम रु.79595182/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2. पाणी आकार मागणी नोंदवही. (Demand Register 2012-13)

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 मधील नियम क्रमांक 90 नुसार मापकाद्वारे पाणी पुरवठयासाठी निश्चित केलेल्या पाणीपट्टीचे मागणी पुस्तक नमुना क्रमांक 64 प्रमाणे ठेवण्यात यावे. परंतू विभागाने सदर नियमानुसार पाणीपट्टीचे मागणी पुस्तक नमुना क्रमांक 64 नुसार ठेवलेले नाही. पाणी आकार मागणी नोंदवही विभागाने उपलब्ध करून दिली नसल्याबाबत अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 35 दिनांक 08/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला त्या अनुषंगाने विभागाने खुलाशात पाणीपुरवठा विभागाची पाणीपट्टी देयके संगणक आज्ञावलीतून काढण्यात येतात व मागणीच्या नोंदी संगणकीय आज्ञावलीत ठेवण्यात येतात असे कळविले आहे. पाणी आकार मागणी नोंदवही संगणिकृत विवरणपत्रामध्ये (सॉफ्ट कॉपी) ठेवली आहे. परंतू सदर पाणी आकार मागणी नोंदींची संगणिकृत विवरणपत्रे लेखापरीक्षणस उपलब्ध करुन दिलेली नाहीत. सदर पाणी आकार मागणी नोंदींची संगणिकृत विवरणपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे मागणी अचूक निश्चित केल्याची, त्यानुसार पाणीपट्टी आकाराची मागणी केल्याची व मागणीनुसार पाणीपट्टी जमा पावत्यांच्या रकमांचा मेळ घेता आला नाही. ज्या पाणी पुरवठा विभागीय कार्यालयांचे जमा रकमेचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे त्यांच्या पाणीपट्टी नळजोडणी धारकांचे मागील पाणीपट्टी कराची थकबाकी व चालू वर्षातील मागणी अशी एकूण रक्कम संबधित पाणीपट्टी नळजोडणी धारकांचे जमा करुन घेतल्याचे लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

3. पाणी पुरवठा विभागाने मागणी, वसूली व थकबाकीची मागील तीन वर्षाची विवरणपत्रे लेखापरीक्षणास दिली आहेत. मागणी व थकबाकीचा तक्ता पुढील प्रमाणे-

आर्थिक वर्ष	मागणी	थकबाकी
2010-11	352518993	51742090
2011-12	51742090	24828841
2012-13	27683853	28369823

आर्थिक वर्ष 2010-11 या आर्थिक वर्षाची मागील थकबाकी रु.352518993/- व चालू आर्थिक वर्षाची पाणीपट्टी थकबाकी रु.51742090/-, आर्थिक वर्ष 2011-12 ची मागील थकबाकी रु.51742090/- व चालू आर्थिक वर्षाची पाणीपट्टी थकबाकी रु.24828841/- तसेच 2012-13 या

आर्थिक वर्षाची मागील थकबाकी रु.27683853/- व चालू आर्थिक वर्षाची पाणीपट्टी थकबाकी रु.28369823/- दर्शविली आहे. 2010-11 ची थकबाकी रु.51742090/- पुढील आर्थिक वर्ष 2011-12 मध्ये मागील थकबाकी म्हणून घेतली आहे परंतू आर्थिक वर्ष 2011-12 ची थकबाकी रक्कम रु.24828841/- आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये मागील थकबाकी म्हणून अंतर्भुत करणे अभिप्रेत असतांना आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये मागील थकबाकी रु.27683853/- दर्शविण्यात आली आहे. आर्थिक वर्ष 2011-12 ची प्रत्यक्ष थकबाकी रु.24828841/- व आर्थिक वर्ष 2012-13 मध्ये दर्शविण्यात आलेली मागील थकबाकी रु.27683853/- यामध्ये रु.2855012/- ची तफावत आहे. यातफावतीबाबत खुलासा करण्यात आलेला नाही. अकारणी नोंदवही व मागणी नोंदवही अभावी मागणी, वसूली व थकबाकी योग्य असल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही. त्यामुळे थकबाकीच्या तफावतीची रक्कम रु.2855012/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम (रु.79595182 + रु.2855012)रु.82450194/-

DATAMSM6401 (Ref No : 33, Hmm No : 35)

74 पाणीपट्टी कर वसुलीच्या न वटलेल्या धनादेशांबाबत दंडात्मक शुल्काची वसुली न केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 04

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 2542.00/-

पाणीपट्टी कराच्या वसुलीचे धनादेश न वटलेल्या संबधित ग्राहकास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम कलम 149(1)(2) नुसार नोटीस बजावून दंडात्मक शुल्क वसुल करण्यात आलेले नाही. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमातील अनुसूची "ड" प्रकरण 8 मधील कलम 54 मधील तरतूदीनूसार 10% दंड आकारण्याच्या धोरणात पाणीपुरवठा विभागाकडील दि.15/05/2012 च्या परिपत्रकान्वये बदल करण्यात आला आहे. पाणीपट्टी कर वसुली धोरणात बदल करण्यास कार्यकारी संबंधित विभाग सक्षम असल्याबाबत अथवा त्यास अधिनियमातील कलम 134 नुसार महासभेची मान्यता घेण्यात आल्याबाबत लेखापरिक्षणास साधार पूर्तता दर्शविण्यात आली नाही.

पाणीपुरवठा विभागाच्या मिरा विभागाच्या पाणीपट्टी कर वसुलीच्या माहे. मार्च-2013 मधील जमा

रकमांची तपासणी करतांना मिरा विभागामध्ये वर्ष 2012-13 मध्ये एकुण 26 धनादेश वटले नसल्याचे न वटलेल्या धनादेशांच्या नोंदवहीवरुन आढळून आले आहे. सदर न वटलेल्या धनादेशांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	धनादेश न वटलेल्या नळजोडणी धारकाचे नाव	ग्राहक क्रमांक	धनादेशरक्कम	धनादेश क्र.बँकेचे नाव	पावती दिनांक	पूर्नभरणा क्र.व दि.
1	विजय दुर्ग को.ऑ.हौ.सो	Q7/02	8042	124465 14.9.12 Sbi	54124 14.9.12	76176 18.3.13
2	विजय दुर्ग को.ऑ.हौ.सो	Q18/79	8042	124465 19.9.12 Sbi	54123 14.9.12	76177 18.3.13
3	शादीक अली खान	R7/28	414	049056-15.9.12 Bharat C0P	58651 24.9.12	73883 5.3.13
4	स्वप्ना पुजारी	P6/28	3867	694493-7.2.13 Karnatak BANK	68961 11.2.13	388605 31.12.13
5	तुकाराम तपासे	Q2/50	815	000001- 24.01.13 Bnk of Ind	68976 11.2.13	400128 21.1.14
6	नव ओमकार को.ऑ.हौ.सो.	Q21/2,4 Q6/71,72,73 Q7/77,78	67107	338506 24.2.13 Sbi	72516 ते72522 28.2.13	76309-10 76314-15 76316 25.3.13
7	लक्ष्मी रामदास तांदळे	Q19/44	323	371782- 7.3.12 Icici Bank	54131 14.9.12	76879 25.3.13
8	मिना अे. ठकर /शाह ठकर	Q6/65	12812	11955-11.3.13 Axis Bank	74561 14.3.13	76332 26.3.13
9	अमरसिंह पवार	R1/71	10010	100832- 4.3.13 kapol bank	74423 6.3.13	77111 31.3.13
10	शांताराम नामदेव पाटील	Q6/89	4915	233540- 18.3.13 Canara Bank	76181. 18.3.13	463605 24.2.14
11	रामप्रसाद नामदेव डहाके	Q9/89	2542	233540-18.3.13 Canara Bank	76180 18.3.13	भरणाबाकी
12	नवलोटस को.ऑप.सो.	R2/24,27	10474	347720	74479 31.3.13	77149 31.3.13
13	आसिया हॉटेल	Q4/97	6049	959086 26.3.13 SBI	76320 26.3.13	76402 31.3.13
14	नॅशनल बॉडी	R4/85	6446	959086	76319	76401

	रेपीअर			26.3.13 SBI	26.3.13	31.3.13
15	देशबंधू अग्रवाल	Q7/36	2751	710105 18.9.15 SBI	76215 21.3.15	388661 31.12.13
16	विरेश प्रिंन्टर्स	Q4/38	5504	174087 20.2.13SBI	68839 21.2.13	493120 26.3.14
17	लक्ष्मी लहु.तोडवलकर	P3/34,35	9801	89550 19.3.13 SBI	76220 ते 76221 20.3.13	77150 ते 77151 31.3.13
18	मेहता इंटरप्रायजेस	Q18/65,66	58540	100062- 30.3.13 Bass Cath Bank	76391 ते 7639231.3.13	7930 79304 29.7.14
19	राजू एस आंचन	P2/1	22406	537035- 30.3.10 BaharatBank	76369 30.3.13	296276 23.9.13
20	अब्वास मोला साहेब जादा	R5/43	5631	123777- 30.3.13 Union Bank	76390 30.3.13	494336 27.3.14
21	अब्दुल वहाब रोख	R7/62	8410	959087-20.3.15 SBI	76364 30.3.13	651267 26.11.14
22	दिना डायकेम	Q1/14	448	228705- 26.1.12 UnionBank	60759 26.1.12	72505 26.2.13
23	गंगाराम सखाराम नाकोड	P4/81	450	24900-20.1.13 IDBI Bank	68061 29.1.13	73149 7.2.13
24	मदरसा स्कूल	R5/37	6278	191182- 18.10.13 UnionBank	314304 18.10.13	388460 30.12.13
25	अनमोल प्रिंन्ट	P1/80	5974	390356-8.10.13 UnionBank	305542 9.10.13	389695 1.1.14
26	ऑस्कोपेंन्ट	P1/94	2298	701967- 30.12.13 Pun. nati.Bank	359093 30.12.13	444578 10.2.14

उपरोक्त नळजोडणी धारकांकडून भरणा केलेल्या रकमांच्या पावत्यांची तपासणी करता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.21 दि.16/08/2015 अन्वये विभागास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता याबाबत विभागाने पत्र क्र.मनपा/पापु/1469/2015 दि.26/10/2105 अन्वये सादर केलेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) पाणी पुरवठा विभागाकडील जा.क्र.मनपा/पाप/322/2012-13 दि.15.05.2012 नुसार पाणीपट्टी कराच्या

वसुलीचे धनादेश न वटलेल्या ग्राहकांकडून मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम कलम 149(1)(2) नुसार संबंधित ग्राहकास नोटीस बजावून रु.100/- इतके दंडात्मक शुल्क आकारण्यात यावा. तसेच संबंधित ग्राहकाविरुध्द शासनास खोटा धनादेश देवुन हेतू पुरस्कर फसवणूक केलेबाबत Negotiable Instrument Act चे कलम 138 अन्वये स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये रितसर फौजदारी गुन्हा दाखल करणेत यावा. असे सुचित करण्यात आले आहेत.

उपरोक्तप्रमाणे धनादेश न वटलेल्या नळ जोडणी धारकांकडून पुर्नभरणा केलेल्या रकमांच्या पावत्यांची तपासणी करता रु.100/- प्रमाणे दंडात्मक शुल्काची वसूली करण्यात आलेली नाही. तसेच उपरोक्त परिपत्रकानुसार संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही. तरी पाणीपट्टी कराचा धनादेश न वटलेल्या उपरोक्त 26 नळजोडणी धारकांकडून प्रत्येक प्रकरणी रु.100/- याप्रमाणे एकूण रु.2600/- दंडात्मक शुल्क वसुल करुन महापालिका फंडात भरणा करण्याबाबत उपरोक्त अर्धसमास पत्रान्वये विभागास कळविण्यात आले असता विभागाने पुनर्भरणा केलेल्या रकमांच्या संगणकीय पावत्या सादर केल्या आहेत. सदर पावत्यांची पडताळणी केली असता न वटलेल्या धनादेशांच्या रकमा संबंधीत नळ जोडणी धारकाकडून तात्काळ वसुल न करण्यात आल्यामुळे सदर रकमा पुढील वर्षातील देयकात समाविष्ट करण्यात आल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे न वटलेल्या धनादेशांची रक्कम थकबाकीमध्ये समाविष्ट होत असल्याने मनपास प्राप्त होणाऱ्या कराच्या रकमा विलंबाने प्राप्त होत असल्याचे दिसून येते.

2) वरील तक्त्यातील अ.क्र.11मध्ये दर्शविलेल्या नळ जोडणी धारकाचा धनादेश न वटल्यामुळे संबंधिताकडून सदर पाणीपट्टी कराची रु.2542/- एवढी रक्कम दंडात्मक शुल्कासह रोखीने वसुल करणे आवश्यक असतांना अद्यापही मनपास येणे असलेली पाणीपट्टी कराची वसुली करण्यात आलेली नाही. अथवा उपरोक्त परिपत्रकातील तरतूदीनुसार Negotiable Instrument Act चे कलम 138 अन्वये कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबतविभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये सदर नळ जोडणी खंडीत करण्यात आले असल्याचे नमूद केले आहे. परंतू न वटलेल्या धनादेशाची रक्कम रु.2542/- वसुल करण्यात आल्याबाबत काहीही खुलासा केलेला नाही. तरी संबंधितांकडून पाणीपट्टी कराची रक्कम दंडात्मक शुल्कासह वसुल करुन महापालिका फंडात भरणा करणे आवश्यक आहे. त्यामुळे रक्कम रु.2542/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

3) पाणीपुरवठा विभागांतर्गत इतर प्रभाग कार्यालयांकडील पाणी पट्टी कराच्या वसुलीचे न वटलेल्या धनादेशांची पडताळणी करुन उपरोक्त तरतूदीनुसार दंडात्मक शुल्कासह वसुल करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री पटविण्याबाबत विभागास उपरोक्त अर्धसमास पत्रान्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाने काहीही खुलासा सादर केला नाही. त्यामुळे इतर प्रभागाकडे न वटलेल्या धनादेशांबाबत दंडात्मक शुल्काच्या वसुलीबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

4) पाणीपट्टी देयकाचे धनादेश बँकेत न वटल्यास संबधित ग्राहकांस नोटीस बजावून सदर थकीत रकमेवर मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमातील अनुसूची "ड" प्रकरण 8 मधील कलम 54 मधील तरतूदीनूसार 10% दंड आकारण्याच्या धोरणात पाणीपुरवठा विभागाच्या उपरोक्त परिपत्रकांन्वये बदल करण्यात आला असून त्याऐवजी रु.100/- एवढे दंडात्मक शुल्क आकारण्यात यावेत असे नमूद करण्यात आले आहे. रु.100/-एवढया नगण्य स्वरुपात दंडात्मक शुल्क वसुल करण्यात येत असल्यामुळे महापालिकेचे आर्थिकनुकसान होत असून अशा न वटलेल्या धनादेशांमुळे महापालिकेस प्राप्त होणाऱ्या कराची रक्कम अनावश्यक गुंतून राहत आहे. तरीवरीलप्रमाणे अधिनियमातील तरतूदीनुसार दंडात्मक शुल्क वसुलीच्या धोरणात्मक निर्णयात विभाग स्तरावर करण्यात आलेल्या बदलास अधिनियमातील कलम 134 नुसार महासभेची मान्यता घेण्यांत

आल्याबाबत लेखापरिक्षणास साधार पूर्तता दर्शविण्यात आली नाही. त्यामुळे सदर परिपत्रकाच्या वैधतेबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

वसुलपात्र रक्कम - रु.2542/-
FDSANMM7201 (Ref No : 50, Hmm No : 21)

75 विधी विभागाकडून नवीन संगणकीय आज्ञाप्रणाली विकसित करणेसाठी केलेल्या करारनाम्यानुसार करावयाच्या प्रदानापेक्षा जादा झालेल्या प्रदानाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : विधी विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 93600.00/-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विधी विभागाकडून नवीन संगणकीय आज्ञाप्रणाली विकसित करणेसाठी केलेल्या करारनाम्यानुसार मे.अडवाणी एंटरप्रायझेस यांना फक्त रु.115000/- चे प्रदान करावयाचे असताना त्याव्यतिरिक्त रु.23000/- व रु.18000/- असे एकूण रु.41000/- रकमेचे स्थायी समितीची मान्यता न घेता प्रदान केले आहे. तसेच करारनाम्यानुसार त्यांना वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्चाकरीता रू.19200/- प्रत्येक वर्षी असे 3 वर्षापर्यंत प्रदान करावयाचे असतांना एकदम एकत्रित रक्कम रू.52600/- प्रदान केले आहे. त्यामुळे रक्कम (रु.41000 + रू.52600) रु.93600/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विधी विभागातील अभिलेखे सुस्थितीत अद्यावत करण्याकरीता विधी विभागाकडून नवीन संगणकीय आज्ञाप्रणाली विकसित करणेसाठी दि. 28/03/2011 रोजी मे.अडवाणी एंटरप्रायझेस यांच्या सोबत करारनामा करण्यात आला आहे. सदर करारनाम्याचे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 100 दिनांक 19/10/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. विभागाने त्यांचे पत्र क्रमांक जा.क्र. मनपा/विधी/41/शासकीय/2015-16, दिनांक 3/11/2015 अन्वये खुलासा केलेला आहे. विभागाने केलेला खुलासा विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) अभिलेखे सुस्थितीत अद्यावत करण्याकरीता विधी विभागाकडून नवीन संगणकीय आज्ञाप्रणाली विकसित करणेसाठी मे.अडवाणी एंटरप्रायझेस यांच्या सोबत केलेल्या करारनाम्यातील अट क्र. 5 नुसार सदर कामासाठी रू.115000/- (रू.38000 + 46000 + 31000) प्रदान करण्याचा करार आहे. सदर करार नाम्यातील अटींचे उल्लंघन करून उपरोक्त रक्कम रु.115000/- या रक्कमे व्यतिरिक्त प्रदान करण्याबाबत करारनाम्यामध्ये नमूद नसताना रू.23000/- व रू.18000/-

मे.अडवाणी एंटरप्रायझेस यांना केलेले प्रदान कशाच्या आधारे केले आहे. एकदा करारनामा केल्यानंतर त्यामध्ये बदल करावयाचा असल्यास स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि, स्थायी समितीची मान्यता घेतल्याचे दिसून आले नाही. करारनाम्यानुसार मे.अडवाणी एंटरप्रायझेस यांना फक्त रु.115000/- चे प्रदान करावयाचे असताना त्याव्यतिरिक्त रु.23000/- व रु.18000/- असे एकूण रु.41000/- रकमेचे स्थायी समितीची मान्यता न घेता प्रदान केले आहे. त्यामुळे रक्कम रु.41000/- (23000 + 18000) आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे. स्थायी समितीची मान्यता घेऊन पुर्तता करण्यात यावी अन्यथा सदर रक्कम रु.41000/- संबधितांकडून वसूलपात्र ठरते.

2) तसेच करारनाम्यानुसार त्यांना वार्षिक देखभाल दुरुस्ती खर्चाकरीता रू.19200/- प्रत्येक वर्षी असे 3 वर्षापर्यंत प्रदान करावयाचे असतांना एकदम एकत्रित रक्कम रू.52600/- प्रदान केले आहे. तथापि मुख्य लेखा परीक्षक यांचे नस्तीमधील अभिप्रायानुसार मे. अडवाणी एंटरप्रायझेस यांना एकदम वार्षिक देखभाल खर्चाकरीता रू.52600/- तीन वर्षाचे प्रदान करावयाचे असल्यास मे. अडवाणी यांच्याकडून बंधपत्र घ्यावे असे मुख्य लेखा परीक्षक यांनी निर्देश दिले असताना सदर बंधपत्र घेतलेले नाही. 3 वर्षाची वार्षिक देखभाल दुरुस्तीची रक्कम एकदम दिल्याने व 3 वर्षापूर्वी सदर संस्थेने काम करण्यास नकार दिल्यास अथवा काम योग्य केले नसल्यास, बंधपत्र घेतले नसल्यामुळे त्यांच्याकडून रक्कम वसूल करता येणार नाही. तसेच करारनाम्याचेही उल्लंघन केलेले आहे. उपरोक्त बाबींची पुर्तता करेपर्यंत रक्कम रु.52600/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन रक्कम रु.93600/-(41000+52600)

DATAMSM6401 (Ref No : 35, Hmm No : 100)

76 अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे लेखापरीक्षणामध्ये आढळुन आलेल्या अनियमिततांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय 3 व मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 15240.00/-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रभाग कार्यालय क्र. 03 व 04 ची सन 2012-13 ची तक्रार नोंदवही, बीट निरीक्षक यांचे अहवाल व नोंदवही तसेच आवक-जावक नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. सन 2012-13 ची मागणी बिले लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे मागणी व वसूलीची कार्यवाही योग्य व अचूक होत असल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे प्रभाग कार्यालय क्र. 03 व 04 चे लेखापरीक्षण केले असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 91 दिनांक 14/10/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केलेला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) प्रभाग कार्यालय क्र. 03 व 04 (तत्कालीन प्रभाग कार्यालय क्र. 02) कडील कारवाई नोंदवही, निष्कासित बांधकाम, बिल मागणी नोंदवही, एम.आर.टी.पी. गुन्हे दाखल नोंदवही व नोटीस नोंदवही इ. नोंदवहयातील पृष्ठांना महापालिका शिक्का ठसविलेला नसुन पृष्ठ क्रमांक टाकुन नोंदवहयांत सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणपत्र नोंदविलेले नाही. सदर नोंदवहयातील नोंदविलेल्या नोंदीबाबत संबंधित लिपीक, कनिष्ठ अभियंता, प्रभाग अधिकारी यांनी एकही नोंदी समोर ती केल्याची, तपासल्याची, बरोबर असल्याची स्वाक्षरी करून नोंद प्रमाणित केलेली नाही.

2) प्रभाग कार्यालय क्र. 03 व 04 च्या नोटीस नोंदवहीत दि.01/04/2012 ते दि. 31/03/2013 या कालावधीत एकूण 16 जणांना नोटीस बजाविलेल्या नोंदी आहेत व प्रभागाने सादर केलेल्या नोटीसा विवरणपत्रात एकूण 33 जणांना नोटीस बजाविलेल्या आहेत. सदर नोटीस नोंदवही मधील 5 नोंदी समोर आदेश पारीत करून पुढे काय कार्यवाही करण्यात आली आहे ते नमुद केलेले नाही. तसेच सदर नोटीस नोंदवहीतील नोंदीचा मेळ एम.आर.टी.पी. गुन्हे दाखल नोंदवहीमध्ये एकही नोंद नसल्याने व कारवाई नोंदवहीतील नोंदी सोबत मेळ घेता आला नाही.

3) 2012-13 ची प्रभाग कार्यालय क्र. 03 व 04 ची तक्रार नोंदवही, बीट निरीक्षक यांचे अहवाल व नोंदवही तसेच आवक-जावक नोंदवही ठेवलेली लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. 2012-13 ची मागणी बिले लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. सुनावणी नोंदवहीत एकूण 15 नोंदी घेतलेल्या असुन सुनावणी झाल्यानंतर काय आदेश पारित झाले ते लिहीलेले नाही.

4) 2012-13 या आर्थिक वर्षात निष्कासित प्रकरणी कारवाई नोंदवहीत एकूण 23 प्रकरणांची नोंद केलेली आहे. प्रभाग कार्यालय क्र. 03 व 04 मध्ये तक्रार नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे सन 2012-13 मध्ये एकूण किती तक्रारी प्राप्त झाल्या ते कळुन येत नाही. तथापि यासंदर्भात मुख्यालयामध्ये अतिक्रमण विभागाच्या आवक रजिस्टरची तपासणी केली असता सदर प्रभाग कार्यालय क्र. 03 व 04 च्या एकूण 123 तक्रारी प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे. म्हणजे 123 जणांच्या तक्रारी आलेल्या असतांना कारवाई 23 जणांवर करण्यात आली आहे. 123 जणांच्या तक्रारी पैकी 23 जणांवर कारवाई करण्यात आल्याने 100 जणांच्या तक्रारींबाबत महापालिकेने काय कार्यवाही केली याबाबतचे लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध झाले नाहीत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 479 अन्वये अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमणे दूर करण्यासाठी केलेला खर्च संबधित इसमाकडून वसूल करावयाचा असताना कारवाई नोंदवहीत नोंद नसल्याने मागणी नोंदविली नसल्याने वसूलीची कार्यवाही झालेली नाही. तसेच मागणी बिल नोंदवहीतील नोंदी सोबत मेळ घेतला असता मागणी बिल नोंदवहीत एकूण 12 नोंदी केलेल्या असुन एकूण मागणी रक्कम रू. 42775/- इतकी मागणी रक्कम आहे. विभागाने लेखापरीक्षणास 2012-13 चे संगणकीय बिल मागणी विवरणपत्र सादर केले नाही. मागणी बिल नोंदवहीतील 12 नोंदीची मागणी बिल रक्कम रू. 42775/- पैकी 6 जणांची वसुली रक्कम रू.27775/- वसुल करण्यात आली असुन 6 जणांची वसुली रक्कम रु.15000/- वसूल करण्यात आलेली नाही. सदर खर्चाची रक्कम रु.15000/- संबधितांकडून वसूल पात्र

आहे.

कारवाई प्रकरणे नोंदवहीत एकूण 23 प्रकरणे असतांना मागणी बिल नोंदवहीत फक्त 12 जणांची मागणी केल्याने प्रस्तृत प्रकरणी 11 प्रकरणांची मागणी केलेली नाही. तसेच 123 जणांच्या तक्रारी आल्या असताना 23 जणांवर कारवाई केली आहे. प्रभागामध्ये प्राप्त तक्रारींवर काय कार्यवाही झाली ते आवक-जावक नोंदवही ठेवलेली नसल्याने समजून येत नाही तसेच कारवाई नोंदवही, मागणी नोंदवही यावर प्रभाग अधिकारी, कनिष्ठ अभियंता आणि बिट निरिक्षक यांच्या स्वाक्ष-या नाहीत. तसेच 2012-13 वर्षापर्यंतच्या निष्कासित प्रकरणांची संख्या व त्यामधील वसुल करावयाची थकबाकी रक्कमेची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही, त्यामुळे मागणी व वसूलीची कार्यवाही योग्य व अचूक होत असल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

5) कारवाई नोंदवहीत बांधकाम निष्कासित करण्यासाठी, वाहन, जे.सी.बी., पोलीस मनुष्यबळ वापरल्याच्या नोंदी केलेल्या नाहीत. तर मागणी बिल नोंदवहीत अशा वापरलेल्या यंत्रणेची नोंद, निष्कासित कालावधी दिवस तास व दर दर्शविलेला नाही. केवळ मागणी रक्कम नोंदविली आहे. त्यामुळे मागणी नोंदवही मधील 12 नोंदींची मागणी रक्कम रु.42775/- अचुक व बरोबर असल्याची खात्री करता येत नाही.

6) प्रभाग कार्यालय क्र. 03 व 04 च्या महानगरपालिका येथील जागा मंडपासाठी भाडयाने देण्यात येतात. सदर मंडप परवानगी (विक्रीकरीता) 2012-13 करीता महासभा ठराव क. 87 दि. 30/12/2011 अन्वये प्रती चौ.फुटास रू. 1/- प्रतीदिन सुधारीत दर मंजूर करण्यात आलेला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालमत्ता (समाज मंदीरे, हॉल, मैदाने, मंगल कार्यालय) भाडयाने दिलेल्या जमा पावत्यांचे लेखापरीक्षण केले असता पावती पुस्तक क्र. 6523 पावती क्र. 652227 जमा रक्कम रू.7800/- श्री. शकील अहमद इस्लाम यांना कलिंगड विक्रीसाठी दि. 05/03/2013 ते दि. 31/05/2013 पर्यंत मंडप 8 X 10 चौ.फुट जागा भाडयाने दिलेली रक्कम वसुल केली आहे. सदर रक्कमेमध्ये रू.6800/- भाडे व रू. 1000/- खड्डा फी घेतली आहे. सदर मंडपाचे क्षेत्रफळ 8 X 10 चौ.फुट = 80 चौ.फुट होत असुन प्रती चौ.फुट रू.1.00/- प्रमाणे रू.80/- प्रतीदिन होतात व दि. 05/03/2013 ते दि. 31/05/2013 पर्यंत 88 दिवसांचे रू.80/- प्रतीदिन प्रमाणे एकूण 88 दिवसांचे भाडे रू.7040/- येते. परंतु सदर पावतीनुसार भाडे रू.6800/- घेतले असल्याने रू.240/- कमी वसुल केले आहे. सदर कमी वसूल केलेले मंडप भाडे रु.240/- संबधितांकडून वसूल पात्र आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 15240/-

DATAMSM6401 (Ref No : 36, Hmm No : 91)

77 महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत केलेल्या कामातील अनियमितता.

नगरोत्थान अभियान

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 145383000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 30496684.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 221495.00/-

गौण खनिजाची रॉयल्टी रक्कम रू221495/- वसुलपात्र आहे. 04 कामांची मोजमाप पुस्तके अ.क्र. 857,829,839,848 उपलब्ध करून दिली नसून या कामावर एकूण खर्च रू30496684/- केला आहे.

नगरोत्थान अभियान योजनेतुन केलेल्या कामाबाबत.

प्राकलन :- रु.17871 लक्ष

प्रशासकिय मंजूरी:- 1) महासभा ठराव क्र. 65 दि. 17/11/2006
2) महासभा ठराव क्र. 59 दि. 21/10/2008
3) पर्जन्य जलवाहिन्याकामी नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. नगरो-2011/प्र.क्र.218/11/नवि-33 दि. 31/03/2012

तांत्रिक मंजुरी :- मुख्य अभियंता मजीप्र(पुणे)/सुजल/560/2011 दि.21/02/2011

निविदा : एकूण 35 कामांसाठी प्राकलन तयार करण्यात आले होते. निविदा निरनिराळया तारखांना प्रसिध्द केल्याअसुन त्या फ्री प्रेस जर्नल व मनपा वेबसाईटवर प्रसिध्द केल्या आहेत. त्यापैकी लेखा परीक्षण काळात 14 कामे सुरू आहेत.

निविदा मंजुरी :- स्थायी समिती सभा ठराव क्र.73 दि.20/06/2007.

करार :- निरनिराळया तारखांना केल्या आहेत.

कार्यादेश :- ---//---

काम : अपुर्ण

खर्च :- कामावर झालेला एकूण खर्च रू. 1453.83 लक्ष

राज्यातील नागरी भागांचा दिर्घकालीन विकास करून सुनियोजित विकास करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान राबवण्याचा निर्णय शासनाने दि.20/02/2010 रोजी घेतला. पायाभुत सोयीसुविधांच्या प्रकल्पाकरीता अनुदान व कर्ज या योजनेतुन देण्यात येते. महानगरपालिकेस2012-13 मध्ये शासनाकडून एकूण अनुदान रू.4468 लक्ष मिळाले असुन मनपाने नाले बांधणेकरीता एकूण खर्च रू.1453.83 लक्ष केला आहे. या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.102 दि.27/10/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र. निरंक दि.18/11/2015 अन्वये केला. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम - 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारे व उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, भुकटी, गोटे, बारीख खडी, मुरुम, वाळू यांवर स्वामित्व धनाची रक्कम प्रति ब्रास रु.200/- वसुल करुन शासन खाती (महसुल व वन) भरणा करायची आहे. परंतू या प्रकरणी गौण खनिजाची रक्कम वसुल केल्याचे दिसून येत नाही. त्याचा उदाहरणादाखल तपशिल पुढील प्रमाणे :

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	वापरलेले साहित्य (cmt)	एकूण

			Trap Rubble Stone	Crush Mettle	40,50, 60 MM	Murom H/S	(cmt)
रा.म.क्र.08 वरील ग्रीन व्हिलेज येथील बस्त्याव डिसोझा वाडी ते वेस्टर्न पार्क सोसायटी ते डाचकुलपाडा रस्त्यालगत साई पॅलेस हॉटेलपर्यंत नाला बांधणे. प्राकलन रू.470 लक्ष MB856 P1to15							
10	30/03/13	4260727	239.29	--	--	--	239.29
क्विन्स पाक पाठीमागील नाला बांधणे. प्राकलन रू.208 लक्ष. MB 849 P 1 to 16							
12	30/03/13	2106322	789.95	--	--	--	789.95
मिरा भाईंदर मनपा मधील झंकार कंपनी शेजारील नाला बांधणे. प्राकलन रू 73 लक्ष MB838 P1 to30							
04	30/03/13	5140540	181.40	377.28	317.26	--	875.94
मिराधाम सेंट पॉल शाळा ते शगुन पर्यंत नाला बांधणे. प्राकलन रू 438 लक्ष MB 813 P 01to06							
03	30/03/13	2500000	162.60	562.68	282.04	--	1007.32
क्रांतीनगर, गणेशदेवलनगर येथे नाला बांधणे. प्राकलन रू 236 लक्ष MB 848 P 1 to 87							
09	30/03/13	6463004	221.66	--	--	--	221.66
						एकूण	3134.16

3134.16 +2.83 = 1107.47 ब्रास X रू.200/- = रू. 221495/-

सबब रक्कम रु.221495/- वसुलपात्र आहे. विभागाने केलेल्या खुलाश्यानुसार रॉयल्टीची चलने सादर करण्यात येत आहेत, असे नमुद केले आहे. परंतु सदर चलनाच्या प्रमाणित प्रती सोबत जोडल्या नाहीत.

2) खालील कामाची मोजमाप पुस्तके उपलब्ध झाली नाहीत.

अ) भाईंदर (प.) उड्डाणपुल रस्ता समांतर तोडी बंगल्यापर्यंत नाला बांधणे - प्राकलन रू. 276 लक्ष - काम : मे. एम. ई. प्राजेक्ट प्रा.लि. यांना 16.30% कमी दराने दिले आहे.

खर्च - प्रमाणक क्र. 05 दि. 30/03/2013 रू. 3031381/- एम.बी. नं. 857 (पृ.क्र. 1 ते 23) उपलब्ध झाली नाही.

ब) गोल्डन नेस्ट रस्त्यावर चाळघर पर्यंत नाला बांधणे. (उजवी बाजु) -

प्राकलन रू. 362 लक्ष मे. डी. के. इंन्फ्रा. प्रा.लि. यांना 16.56%

कमी दराने दिली आहे.

खर्च - प्रमाणक क्र. 06 दि. 30/03/2013 रू. 10008279/- एम.बी. नं. 829 (पृ.क्र. 1 ते 39) उपलब्ध झाली नाही.

क) गोल्डन नेस्ट रस्त्यावर चाळघर पर्यंत नाला बांधणे. (डावी बाजु) - प्राकलन रू. 363 लक्ष मे. आर. ॲन्ड बी. इनफ्रा प्रा.लि. यांना 16.30% कमी दराने दिली आहे.

खर्च - प्रमाणक क्र. 09 दि. 30/03/2013 रू. 10994020/- एम.बी. नं. 839 (पृ.क्र. 1 ते 64) उपलब्ध झाली नाही.

ड) क्रांतीनगर, गणेश देवलनगर येथे नाला बांधणे प्राकलन रू. 236 लक्ष मे. आर. ॲन्ड बी. इनफ्रा प्रा.लि. यांना 9% जादा दराने दिली आहे.

खर्च - प्रमाणक क्र. 09 दि. 30/03/2013 रू. 6463004/- एम.बी. नं. 848 (पृ.क्र. 1 ते 87) उपलब्ध झाली नाही.

आक्षेपाधिन रक्कम रू.30496684/-

वसुलपात्र रक्कम रू.221495/-

DATPMVM6001 (Ref No : 39, Hmm No : 102)

78 गटार बांधणे/सुधारणा करणे कामातील खर्चातील अनियमितता.

भाईंदर (पूर्व) मेरी गोल्ड नं. 02 ते गौरव रेसीडेन्सी पर्यंत गटार बांधणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 02

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1294978.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1290063.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 4915.00/-

महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तीका परिच्छेद क्र.150 नुसार स्विकृत निविदा 16.3% कमी दराने प्राप्त झाल्याने सुधारीत कपातीचे अंदाजपत्रक तयार केले नाही. स्वामित्वधनाची रक्कम रू4915/- वसुल केल्याची खात्री करून प्रदान केले नाही.

भाईंदर (पूर्व) मेरी गोल्ड नं. 02 ते गौरव रेसीडेन्सी पर्यंत गटार बांधणे.

प्राकलन :- रु. 2838000/-

प्रशासकिय मंजूरी:- स्थायी समिती ठराव क्र. 14 दि. 08/05/2012

तांत्रिक मंजुरी :- शहर अभियंता क्र. 27/2012-13 दि.09/05/2012

निविदा : दि. 10/05/2012 दै. लोकमत, दै. फ्री. प्रेस जनरल व मनपा वेबसाईडवर

एल-1 निविदा : मे. रिध्दी इंटरप्रायझेस 16.3% कमी दराने

निविदा मंजुरी :- स्थायी समिती सभा ठराव क्र.33 दि.29/05/2012.

करार :- दि. 05/06/2012

कार्यादेश :- मनपा/सा.बां./कार्या/135/2012-13 दि. 29/05/2012

मुदत : दि. 29/05/2012 ते 28/09/2012

काम : पुर्ण दि. 06/10/2012

खर्च :- प्र.क्र.17 दि. 18/01/2013 रू. 1294978/- MB No.796 P64 to 69

या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.104 दि.27/10/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र. निरंक दि.30/11/2015 अन्वये केला. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) कामाची निविदा प्राकलन दराच्या 16.3% कमी दराची स्विकारली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.150 नुसार - स्विकृत निविदेचा दर प्राकलन दराचे 10% किंवा यापेक्षा कमी दराने प्राप्त झाल्याने, प्राप्त निविदा दराप्रमाणे सुधारीत प्राकलन + 5% आकस्मिक खर्चाच्या तरतुदीसह तयार केले नाही. मुळ अंदाजपत्रक रद्द करून कपातीचे अंदाजपत्रक तयार करून कामासाठी वापरले नाही.

2) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम - 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारे व उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, भुकटी, गोटे, बारीख खडी, मुरुम, वाळू यांवर स्वामित्व धनाची रक्कम प्रति ब्रास रु.200/- वसुल करुन शासन खाती (महसुल व वन) भरणा करायची आहे. परंतु या प्रकरणी गौण खनिजाची रक्कम वसुल केल्याची दिसून येत नाही. कामासाठी वापरलेले साहित्य

Trap Stone 69.55 cmt

म्हणजेच 24.57 ब्रास X रू.200/- = रू.4915/-

रू.4915/- स्वामित्व धनाची रक्कम वसुलपात्र आहे.

वसुलपात्र रक्कम रू.4915/-

आक्षेपाधिन रक्कम रू.1290063/-

DATPMVM6001 (Ref No : 40, Hmm No : 104)

79 भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.119 येथे क्रिडा संकूल बांधणे.

बांधकाम विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 08

लेखा शीर्ष :3224 खासदार निधी

अनियमितता कलम : 9ब

50 लाख पेक्षा जास्त किंमतीच्या कामांसाठी प्रथम निविदेस 25 दिवस जाहिरात सुचना कालावधी देणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. निविदेस योग्य ती प्रसिध्दी देण्यात आलेली नाही. सदर कामाच्या निविदा सरासरी सुमारे 21.74% जादा दराने प्राप्त झाल्या आहेत. अशावेळी सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक होते. ठेकेदाराने युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीकडे कामगारांचा विमा उतरवला असुन सदर विम्याचा प्रिमीयम कालावधी हा दि.18/05/2012 ते दि.15/05/2013 या कालावधी पुरताच असल्याचे दिसुन येत आहे. सदरचे काम अद्याप अपूर्ण असून दि.15/05/2013 ते काम पूर्ण दिनांकपर्यंत कालावधीचा विमा उतरवला नाही.

खासदार निधिमधून भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.119 येथे क्रिडा संकुल बांधणे

ठेकेदाराचे नाव :- शायना कार्पोरेशन

कामाचे अंदाजपत्रकीय तरतूद :- 21.35 कोटी.

करारनामा :- दि.10.05.2012 मुद्रांक शुल्क = 49,100/-

महासभेची प्रशासकिय मान्यता : ठराव क्र.19 दि.20.04.2011 रक्कम = 21.35 कोटी

प्राकलन :- रु.4,99,58,000/-

निविदा मंजूर दर :- 21.74 % above पात्र निविदा - 03

निविदेस मान्यता :- स्थायी समिती ठराव क्र.17 दि.08.05.2012

बॅक गॅरंटी :- रक्कम रु.1498740/- दि.09.05.2012

कामाची आदेश :- जा.क्र.मनपा/साबा/कार्या/50/2012-2013 दि.10.05.2012

प्रमाणक क्र.:- 2 दि.30.03.2012 मोजमाप पुस्तिक क्र.858

सदरच्या क्रिडा संकुल बांधणे कामाची नस्ती मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आल्या. सदरच्या आढळलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.97 दि.19/10/2015 अन्वये अनुपालन सादर करणेबाबत विनंती केली असता विभागाचे पत्र क्र. - दि.01/12/2015 अन्वये अनुपालन प्राप्त झाले, त्यानुसार लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.119 येथे क्रिडा संकूल बांधणे कामासाठी मागविलेल्या निविदांसाठी सादर करण्यास्तव केवळ 10 दिवसांची कालावधी देण्यात आला असून महाराष्ट्र शासनाच्या सार्व. बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र. सीएटी 10/2006/प्र.क्र.133/ इमारती-2, मंत्रालय, मुंबई- 400032 दिनांक -02 नोव्हेंबर 2006 अन्वये 50 लाख पेक्षा जास्त किंमतीच्या कामांसाठी प्रथम निविदेस 25 दिवस जाहिरात सुचना कालावधी देणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक निविदा प्राप्त होऊन कमी दराच्या निविदा येण्यासाठी पुरेसा कालावधी दिला गेला नाही.

2) सदर कामाच्या निविदा सरासरी सुमारे 21.74% जादा दराने प्राप्त झाल्या आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम 73 खंड (क) अन्वये प्राप्त निविदांपैकी जी निविदा सर्व बाजूंचा विचार करता फायदेशीर असेल ती निविदा स्वीकारण्याची तरतूद आहे. परंतु सदर वाढीव दाराची निविदा फायदेशीर असल्याची तपासणी करून स्वीकारल्याची लेखापरीक्षणात खात्री झाली नाही.

3) निविदा नस्ती तथा बी-1 निविदा (ठेकेदारांच्या) लेखा परिक्षणास तपासणीसाठी उपलब्ध झाली नाही.

4) वित्तीय वर्ष 2012-2013 मधील प्राप्त अनुदान व खर्च यांचा हिशोब सादर केला नसल्याने प्राप्त अनुदान, खर्च व वापराची शिल्लक याचा मेळ घेता आला नाही.

5) ठेकेदाराने कामगारांचा विमा शासकीय विमा संस्थेकडे काढणे आवश्यक होते. तथापी ठेकेदाराने युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीकडे कामगारांचा विमा उतरवला असुन सदर विम्याचा प्रिमीयम कालावधी हा दि.18/05/2012 ते दि.15/05/2013 या कालावधी पुरताच असल्याचे दिसुन येत आहे. उर्वरीत कालावधीचा विमा उतरविण्यात आला नाही.

6) रक्कम रू.5,28,54,000/- खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाही.

7) बॅंक गॅरंटीची तरतूद करारनाम्यामध्ये नसतांना 3% सुरक्षा अनामत रोखीने घेण्याएवजी बॅंक गॅरंटी घेण्यात आली आहे. सदरची बॅंक गॅरंटी/ सुरक्षा अनामत करारनाम्यानुसार 3 वर्षाची असणे आवश्यक होते. बॅंक गॅरंटीची छायांकित प्रत लेखा परीक्षणास उपलब्ध झाल्या असुन मुळ प्रत उपलब्ध झाली

नाही. बॅंक गॅरटी दि. 08/05/2013 पर्यंतच वैध आहे.

8) सदरच्या कामाचे मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये स्वामित्वधनाची प्रती ब्रास 200/- प्रमाणे वसूल करून/देयकातून कपात करून शासन खाती भरावयाची असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. सदरच्या कामाची स्थिती अपुर्ण असून काम पुर्ण झाल्यावर लेखा परीक्षणास दाखविण्यात यावे.

DGPAGPM8503 (Ref No : 63, Hmm No : 97)

80 खासदार निधीतुन प्रभाग क्र.74 मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे कामातील अनियमिततेबाबत.....

बांधकाम विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष :3224 खासदार निधी

अनियमितता कलम : 9ब

निविदा प्रसिध्दीचा तपशील नस्तीत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे निविदेस योग्य ती प्रसिध्दी देण्यात आलेली नाही. सदरच्या कामाची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याचे अभिलेखे दाखविलेले नाहीत. दोन वर्किंग सिझनमध्ये काम पुर्ण करणे आवश्यक होते, त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

खासदार निधिमधून मौजे चेना येथे प्रभाग क्र. 74 येथील बेलकरीपाडा ते पाटीलपाडा येथे पेव्हर ब्लॉक बसविणे.

ठेकेदाराचे नाव :- मे. श्री.बालाजी इंन्फ्रा.

कामाचे अंदाजपत्रकीय तरतूद :- 25.00 लक्ष

करारनामा :- दि. 19/01/2012 मुद्रांक शुल्क = 1,100/-

जिल्हाधिकारी प्रशासकिय मान्यता : क्र. नियो/खास्थापीका/टे-2/11-12/2432 दि. 14/11/2011.

प्राकलन :- रु.25,00,000/-

निविदा मंजूर दर :- अदांजपत्रकीय दराने, पात्र निविदा - 04

निविदेस मान्यता :- स्थायी समिती ठराव क्र.106 दि.07/01/2012

कामाची आदेश :- जा.क्र.मनपा/साबां/कार्या/563/2011-2012 दि.19/01/2012

प्रमाणक क्र.:- 1 दि.30/03/2012 रक्कम रू. 12,90,207/- मोजमाप पुस्तिक क्र.688

जाहिरात प्रसिध्दी : दै. मुंबई केसरी

कामाची स्थिती : अपुर्ण

खासदार निधिमधून मौजे चेना येथे प्रभाग क्र. 74 येथील बेलकरीपाडा ते पाटीलपाडा येथे पेव्हर ब्लॉक बसविणे कामाची नस्ती मोजमाप पुस्तिका व प्रमाणक तपासली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आल्या. सदरच्या आढळलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.98 दि.19/10/2015 अन्वये अनुपालन सादर करणेबाबत विनंती केली असता विभागाचे पत्र क्र. निरंक, दि.07/12/2015 अन्वये अनुपालन प्राप्त झाले, त्यानुसार लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र. भाखंस /1093/(12635)/ उद्योग -6 दि.16 जुलै 1993 मधील परि क्र.3 नुसार रु.50,000/- किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशावेळी राजपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करुन जाहिरात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत योग्य वृत्तपत्रात देणे आवश्यक आहे. याची खात्री करण्यासाठी निविदा प्रसिध्दीचा तपशील नस्तीत उपलब्ध झाला नाही. त्यामुळे निविदेस योग्य ती प्रसिध्दी दिल्याचे दिसून येत नाही.

2) मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील आदेश क्र.2432/2011 दि.14/11/2011 मधील अ.क्र.08 नुसार प्रस्तावित कामाची जागा महानगरपालिकेचे ताब्यात असल्याशिवाय ठेकेदारास कार्यादेश देवू नये असे नमुद केले आहे. जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याची खात्री अभिलेखे दाखविले नसल्याने करता आली नाही.

3) दोन वर्किंग सिझनमध्ये काम पुर्ण करणे आवश्यक होते, तथापि दोन वर्किंग सिझन होऊन देखील (कालावधी दि.19/01/2012 ते दि. 19/10/2015 पर्यंत काम अपूर्ण आहे.

DGPAGPM8503 (Ref No : 64, Hmm No : 98)

81 आमदार/खासदार निधीतून केलेल्या कामातील अनियमिततेबाबत.....

बांधकाम विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 05

लेखा शीर्ष :3224 आमदार निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 53208.00/-

निविदेस योग्य ती प्रसिध्दी देण्यात आल्याचे दिसून येत नाही. नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम 167(2) नुसार मुळे अंदाजामध्ये 10% पेक्षा अधिक वाढ/घट होण्याचा संभव असेल अथवा संकल्पचित्रात किंवा योजनेत फेरफार प्रस्तावित केला असेल तर सुधारीत अंदाज तयार करून त्यास मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कारवाई मनपाने केलेली नाही. रक्कम रु.53208/- ठेकेदाराकडून वसुल करणे आवश्यक आहे. मुर्धा गावदेवी मंदीर रस्ता डांबरीकरण करणे या कामास कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समितीच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले नाही.

आमदार/खासदार निधीतून केलेल्या कामामध्ये काही अनियमितता आढळून आल्या. सदरच्या आढळलेल्या त्रुटीबाबत अर्धसमास पत्र क्र.117 दि.17/11/2015 अन्वये अनुपालन सादर करणेबाबत विनंती केली असता विभागाचे पत्र क्र. निरंक दि. निरंक अन्वये अनुपालन प्राप्त झाले, त्यानुसार लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) उद्योग उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र. भाखंस /1093/(12635)/ उद्योग -6 दि.16 जुलै 1993 मधील परि क्र.3 नुसार रु.50,000/- किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशावेळी राजपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करुन जाहिरात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत योग्य वृत्तपत्रात देणे आवश्यक आहे. तथापि, निविदा प्रसिध्दीचा तपशील नस्तीत उपलब्ध झाला नाही. निविदेस योग्य ती प्रसिध्दी देण्यात आल्याचे दिसून येत नाही.

2) काही कामांची निविदा नस्ती उपलब्ध झाली नाही. उदा. शितलनगर ए.टी.एन.एल. लगत गटार बांधण्याचे काम- खर्च रक्कम रु.9,99,975/-. त्यामुळे सदरच्या कामाचे लेखा परीक्षण करता आले नाही.

3) या कामासाठी तीन निविदा प्राप्त झाल्या असून मे. रिध्दी इंटरप्रायझेस यांची 16.3% कमी दराची निविदा मंजूर केली आहे. सार्व. बांधकाम विभागाचे नियम पुस्तीका परिशिष्ठ क्र. 20 मधील निविदा मंजुरीच्या तरतूदीनुसार कोणतीही जाहिर निविदा प्राकलन दराच्या 10% किंवा त्यापेक्षा कमी दराने आल्यानंतर कामाचा दर्जाचा विचार करणे आवश्यक आहे. तसेच 16.3% कमी दराची निविदा मंजूर केली असल्याने महाराष्ट्र सार्व. बांधकाम विभागा नियम पुस्तीका परिशिष्ठ क्र. 150 नुसार स्वीकृत निविदेचा दर प्रकालन दाराच्या 10% किंवा त्यापेक्षा कमी दराने प्राप्त झाल्याने प्राप्त निविदा दराप्रमाणे सुधारीत प्राकलन अधिक 5% आकस्मिक खर्चाची तरतूद तयार केली नाही व ते मूळ अंदाजपत्रक रद्द करून कपातीचे अंदाजपत्रक तयार करून त्यासाठी वापरले नाही. उदा. गणेशनगर येथे बागेश्री पार्क मागील नाल्यावर स्लॅब टाकणे 18.81% कमी दराने, राई शिवनेरी भागातील रस्ते व गटारे तयार करणे 13% कमी दराने.

4) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम - 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारे व उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, भुकटी, गोटे, बारीख खडी, मुरुम, वाळू यांवर स्वामित्व धनाची रक्कम प्रति ब्रास रु.200/- वसुल करुन शासन खाती (महसुल व वन) भरणा करायची आहे. परंतू या प्रकरणी गौण खनिजाची रक्कम वसुल न करता प्रदान केले आहे. त्याचा उदाहरणादाखल तपशिल पुढील प्रमाणे :

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	वापरलेले साहित्य (cmt)				एकूण
			Trap Rubble Stone	Crush Mettle	40,50, 60 MM	Sand	
1	29/06/12	999975	49.35	110.50	--	48.55	208.4
2	27/07/12	432921	--	58.98	47.20	33.60	139.78
3	30/08/12	975564	45.26	--	135.78	--	181.04
4	30/08/12	308430	81.68	33.38	96.43	--	211.49
18ब	30/03/13	808904	12.20	--	--	--	12.20
	एकूण	3525794	188.49	202.86	279.41	82.15	752.91

752.91 +2.83 = 266.04 ब्रास रू.200/- = रू. 53208/-

सबब सदरची रक्कम रु. 53208/- ठेकेदाराकडून वसुलपात्र आहे. विभागाने सादर केलेले अनुपालन पत्र क्र. निरंक दि. निरंक अन्वये स्वामित्व धनाची रक्कम भरल्याचे छायांकित प्रत जोडल्याचे कळविले आहे, तथापी अनुपालनामध्ये चलनाच्या प्रती आढळून आल्या नाहीत.

5) मुर्धा गावदेवी मंदीर रस्ता डांबरीकरण करणे या कामास कार्योत्तर मंजुरीसाठी स्थायी समितीच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट ड प्रकरण 8 मधील कलम 73(ड) प्रमाणे स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

DGPAGPM8503 (Ref No : 65, Hmm No : 117)

82 शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे. (BSUP)

बांधकाम विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 10

लेखा शीर्ष :3210 केंद्र/राज्य शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

सदरच्या कामाबाबत सुधारीत अंदाज तयार करून त्यास शासन मान्यता न घेतल्याने या कामात 30% पर्यंत जादा होणाऱ्या खर्चासाठी केंद्र/ राज्य शासनाचे अनुदान पाप्त होणार नाही. सदरच्या वाढीव खर्चास महानगरपालिकेने तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच सुधारीत DPR शासनाकडून मंजूर करून घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही. लाभार्थ्याकडून अंशदानाची वसुली झालेली दिसत नाही. अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्र लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. मनपाने ट्राझीट कॅम्प बांधण्यासाठी तरतूद करून अदयाप निधी उभारण्यात आलेला नाही. आगाऊ रक्कमेचे समायोजन करण्यात आलेले नाही. दरमहा व वर्षाअखेरीस बँक ताळमेळ घेतलेला नाही. भाडे तत्वावर स्थलांतरीत करण्याचे 185 लाभार्थ्यांचे देयक अदा केलेले आहे. त्याप्रमाणे स्थलांतरण करणेबाबत महापालिकेची जबाबदारी राहील.

शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे (BSUP) या कार्यक्रमाच्या बाबत शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्र जनयो-2007 प्र.क.52/गृनिधी-2, दि.25 जुन 2007 अन्वये मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेने BSUP अंतर्गत काशी मिरा येथील जनतानगर येथे 3665 व काशी चर्च येथे 471 अशा एकूण 4136 झोपडपट्टीवासियांना सदनिका बांधुन देण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करून म्हाडा मार्फत केंद्र शासनास सादर केला. या कामी केंद्र शासनाची मंजुरी मिळाली असुन त्यानुसार अनुदान रक्कम रु. 279.55 कोटी मंजूर झाले. महासभा ठराव क्र. 36 दि. 20/11/2009 व क्र. 28 दि. 30/07/2010 अन्वये प्रशासकीय व आर्थिक मंजुरी रक्कम रू. 300 कोटीची देण्यात आली आहे. स्थायी समिती ठराव क्र. 31 दि.05/08/2010 अन्वये निविदेस मंजुरी देण्यात आली आहे. न्यूनतम दराच्या ठेकेदाराशी वाटाघाटी करून (Negotiation) मुंबई प्रांतिक

महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) नुसार खालीलप्रमाणे निविदा मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

कामाचे नाव / फेज	मंजूर निविदा किंमत	ठेकेदाराचे नाव
जे-1 पॅकेज	106.73 कोटी	मे. शायोना कॉर्पोरेशन
जे-2 पॅकेज	93.305 कोटी	मे. समर कॉर्पोरेशन
जे-3 पॅकेज	93.283 कोटी	मे. बिटकॉन इंडिया इंफ्रा.
जे-4 पॅकेज	37.24 कोटी	मे. डी. के. इंन्फ्रा. प्रा.लि.
एकूण	330.558 कोटी	--

केंद्र शासनाची प्रकल्पास मंजुरी दि.11/11/2009 रोजी रक्कम रू.279.55 कोटी

शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे (BSUP)

अनुदान	निवारा पुरविणे	मुलभुत सुविधा	नागरी सुविधा
केंद्र शासन	50%	50%	50%
राज्य शासन	30%	25%	50%
अंमलबजावणी यंत्रणा	09%	25%	----
लाभार्थी अंशदान लाभार्थी 11% सरासरी (मागास वर्ग 10% सर्वसाधारण 12%)	11%	---	---
एकूण	100%	100%	100%

Nodal Agency	:	MHADA
Implementing Agency	:	MBMC
Project Cost	:	27955.42 लक्ष
Central Share	:	12707.01 लक्ष
State Share	:	8276.37 लक्ष
ULB Share	:	5537.29 लक्ष
Beneficiary	:	1434.75 लक्ष

प्रकल्पाची मुदत - म्हाडाचे पत्र जा.क्र. एम.एच./मु.अ.-2/उमुअ/काअ-2/जे/प्रा/न दि.25/05/2015 नुसार मुदतवाढ दि. 31/03/2017 पर्यंत.

सदरचे काम लेखा परीक्षण काळात अपुर्ण असून लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) 2008-09 च्या डी.एस.आर. नुसार रू. 279.55 कोटी रक्कमेचा प्रकल्प अहवाल शासनाने मंजूर केला. 2009-10 च्या डी.एस.आर. नुसार खर्च रू. 330.33 कोटी म्हणजे एकूण रू. 50.78 कोटीने वाढला. म्हणजेच 18.16% वाढला. प्रत्यक्षात महापालिकेने निविदा मागविल्या तेव्हा खर्चात सरासरी सुमारे 30.16% पर्यंत वाढ झालेचे समजले. स्थायी समितीने ठराव क्र. 31 दि.05/08/2010 नुसार रु.300 कोटी खर्चास मंजुरी दिली आहे. तांत्रिक व्यवस्थापन सल्लागारांने दिलेल्या अभिप्रायानुसार / दर पृथःकरणानुसार डी.पी.आर. हा डी.एस.आर. 2008-09 नुसार केलेला होता व निविदा प्राप्त झाल्या त्या वेळचा डी.एस.आर. 2009-10 असल्याने दरात तफावत व इतर अन्य तांत्रिक कारणास्तव प्रत्यक्ष काम करणाऱ्या ठेकेदारांनी भरलेल्या दराचा विचार करता प्राप्त निविदा 10% जादा दराने असल्याने मंजुरीची शिफारस केली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 1971 च्या नियम 167(2) नुसार मुळ अंदाजात 10% पेक्षा अधिक वाढ होण्याचा संभंव असेल. संकल्प चित्रात फेरफार प्रस्तावित असेल, तर सुधारीत अंदाज तयार केले पाहिजेत. परंतु सुधारीत अंदाज तयार करून त्यास मान्यता न घेतल्याने

या कामात 30% पर्यंत जादा होणाऱ्या खचासाठी केंद्र / राज्य शासनाचे अनुदान प्राप्त होणार नाही. सदरच्या वाढीव खर्चासाठी महानगरपालिकेने तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच सुधारीत DPR मंजूर करून घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) शासन निर्णय दि. 25/06/2007 अ.क्र. 27 नुसार प्रत्येक लाभार्थ्याने अंशदान (मागासवर्ग 10% व सर्वसाधारण 12%) प्रकल्पासाठी जमा करायचे आहे. परंतु लाभार्थ्याकडून अंशदानाची वसुली झालेली दिसत नाही. तरी सदरच्या अशंदानाची वसुली करून घेणे आवश्यक आहे.

3) रक्कम रु. 5.517 कोटी खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. जमा रक्कम व खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे :'

रक्कम रूपये कोटी

अनुदान	दि. 31/3/12 पर्यंत प्राप्त	2012-13 मध्ये प्राप्त	दि. 31/3/13 पर्यंत प्राप्त	खर्च व तपशिल	दि. 31/3/12 पर्यंत	2012-13 मधील खर्च	दि.31/3/13 पर्यंत	शेरा
केंद्र/राज्य	48.22	--	48.22	मार्च-12 पर्यंत	11.60	--	11.60	
व्याज	--	0.825	0.825	I) Part Payment of J-1 Package	--	1.50	1.50	
				II) Part Payment of J-2 Package	--	1.25	1.25	
				III) Part Payment of Kashi Church Package	--	1.20	1.20	
				IV)Rental Charges for 185 Beneficiaries of J-1 Package	--	1.332	1.332	
				V) IIT Mumbai Prof. RS Jangid यांचे Drawing & Design च्या Proof Checking चे देयक	--	0.247	0.247	
एकूण	48.22	0.825	49.04	एकूण	11.60	5.517	17.117	

4) महाराष्ट्र सार्व. बांधकाम लेखा संहिता प्रकरण 10 बांधकाम लेखे "घ" कंत्राटदारांना आगाऊ रक्कम देणे परिच्छेद 10.2.21, 10.2.22 नियमानुसार कंत्राटदाराला आगाऊ रक्कम देणेस मनाई आहे. असे असताना मनपाने कंत्राटदारांना मोबीलायझेन ॲडव्हान्स निविदा नस्ती मधील अटी-शर्ती (1.18) नुसार 5% ॲडव्हान्स देण्याची तरतूद नमुद करून ॲडव्हान्स अदा केलेला आहे. सदरच्या आगाऊ रक्कमेचे समायोजन करण्यात आलेले नाही.

5) नगर विकास विभागाचा शासन निर्णय दि. 02/03/2009 अन्वये त्रयस्थ संस्थेकडून सामाजिक लेखापरीक्षण करणे आवश्यक असताना सदर प्रकल्पाचे सामाजिक लेखा परीक्षण टाटा समाजशास्त्र संस्था / यशदा / अन्य एन.जी.ओ. मार्फत करण्यात आलेली नाही.

6) मनपाने ट्राझीट कॅम्प बांधण्याची योजना मंजूर केल्याने योजनेच्या किंमतीत वाढ झाल्याचे स्थायी समिती ठराव क्र. 31 दि. 05/08/2010 नुसार समजते. (महासभा ठराव क्र.36 दि.20/11/2009) अशा प्रकारे जादा खर्च होणार आहे. त्यासाठी मनपाने स्वतंत्र तरतूद करण्यात येयील असे अनुपालनामध्ये कळविले आहे, तथापि तरतूद केलेली नाही.

7) सहाय्यक वित्त संचालक म्हाडा यांचे पत्र क्र. वित्त/मिभामनपा/सायनो फ दि.06/11/2012 नुसार मनपाच्या माफत देण्यात येणाऱ्या कंत्राटी कामाचा ठेका देतांना शासकीय विमा उतरविणे आवश्यक आहे. मे. शायनो कॉर्पोरेशन यांनी सादर केलेली युनायटेड इंडिया इंशुरन्स कंपनी लि. ची विमा पत्रे ग्राहय धरण्यात येऊ नये, असे कळविले आहे. त्यानुसार कार्यवाही झाल्याची लेखा परीक्षणाची खात्री पटविण्यात आलेली नाही.

8) बी.एस.यु.पी. योजनेसाठी स्वतंत्र लेखे ठेवले आहेत. परंतु मनपाने अद्यापपर्यंत मनपाचा हिस्सा या खात्यामध्ये जमा केला नाही.

दि. 01/04/2012 ची आरंभिची शिल्लक - रू. 40,36,85,102/-

2012-13 मधील जमा - रू. 96,21,474/-

2012-13 मधील खर्च - रू. 5,52,92,257/-

दि. 31/03/2013 अखेरची शिल्लक - रू. 35,77,14,656/-

बी.एस.यु.पी. च्या रोकडवहीत दि. 31/03/2013 रोजी अखेरची शिल्लक रू. 35,77,14,656/- असुन पासबुक प्रमाणे शिल्लक रक्कम उपलब्ध करण्यात न आल्याने रोखवहीतील शिलकेचा पासबूकामधील शिलकेशी मेळ घेता आला नाही. दरमहा व वर्षाअखेरीस बॅंक ताळमेळ घेतलेला नाही.

9) पार्ट पेमेंट केले असून अंतिम / पुर्ण प्रदान करतांना मोजमाप पुस्तीकेतील अपुर्ण नोंदी अद्यावत करणे आवश्यक आहे.

10) वित्तीय वर्ष 2012-13 मधील खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

रक्कम रु. कोटीत

अ.क्र.	प्रमाणक क्रमांक	दिनांक	खर्चाचा तपशिल	प्रदान रक्कम रूपये	मागणी रक्कम रूपये
1)	1	16/10/2012	I) Part Payment of J-1 Package	1.50	2.60
2)	2	26/11/2012	II) Part Payment of J-2 Package	1.25	1.69
3)	3	26/11/2012	III) Part Payment of Kashi Church Package	1.20	1.625
4)	4	26/11/2012	IV)Rental Charges for 185 Beneficiaries of J-1 Package	1.332	4.32
5)	5	30/03/2013	V) IIT Mumbai Prof. RS Jangid यांचे Drawing & Design च्या Proof Checking चे देयक	0.247	0.247
			एकूण	5.529	10.482

I) प्रमाणक क्र. 5 नुसार अदा करण्यात आलेल्या रक्कमेच्या मंजुरीचा महासभा ठराव लेखा परीक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही.

II) प्रमाणक क्र. 4 नुसार भाडे तत्वावर स्थलांतरीत करण्याचे 185 लाभार्थ्यांचे देयक अदा केलेले आहे. त्याप्रमाणे स्थलांतरण केल्याची खात्री लेखापरीक्षणास झाली नाही.

III) पुर्ण रक्कम अदा करताना स्वामित्व धनाची रक्कम शासन खाती जमा केल्याची खात्री करण्यात यावी.

सदर कामाची स्थिती अपुर्ण असून शासनाने दिलेल्या मंजुरीच्या अधिन राहून काम पुर्ण करण्यात यावे.

DGPAGPM8503 (Ref No : 66, Hmm No : 114)

83 अतिक्रमण विभागास ठेका पध्दतीने मजूर पुरवठा करण्यावरील खर्चातील अनियमिततांबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 06

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 1254459.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 87400.00/-

अतिक्रमण विभागाच्या कामासाठी जाहिर निविदा न मागविता उद्यान विभागाकडील दराने पुरवठादारास वाढीव काम देण्यात आले आहे. अतिक्रमण विभागाने पुरवठादाराशी करारनामा न करता वा मजुर पुरवठयाबाबत कोणत्याही अटी शर्ती विहीत न करता रू12,54,459/- एवढा खर्च केला आहे. पुरवठा केलेल्या मजुरांचे हजेरीपट ठेवण्यात आलेले नाहीत. इष्टांकाप्रमाणे मजूर पुरवठा न केल्याने प्रती मजूर प्रतीदिन रू100/- याप्रमाणे दंडात्मक रक्कम वसुल करण्यात आली नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागास रस्त्यावरील फेरीवाल्यांवर कारवाई करण्याकरीता आवश्यक असलेल्या मजूरांचा पुरवठा करण्यासाठी अतिक्रमण विभागाने उद्यान विभागाकडील पुरवठादार मे.स्टार कंन्स्ट्रक्शन यांना रू.290.50 प्रतिदिन प्रति मजूर दराने 25 मजूर 2012-13 मध्ये दैनंदिन कामासाठी पुरवठा करण्यास कार्यादेश क्र.मनपा/अवि/154/2012-13 दि.07/07/2012 अन्वये कामाचे आदेश देण्यात आले असून सदर कामी होणारा खर्च अतिक्रमण विभागाकडील " अतिक्रमण सर्वेक्षण/अनधिकृत बांधकामे हटविणे" या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीतून करण्यात आला आहे. वर्ष 2012-13 मध्ये मे.स्टार कंन्स्ट्रक्शन यांना मजूर पुरवठयासाठी केलेल्या प्रदानाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	ठेकेदाराचेनाव	प्रमाणकक्र. वदिनांक	रक्कम
1.	मे.स्टारकंन्स्ट्रक्शन	1930दि.30/03/2013	रू.3,32,914/-
2.		1528दि.25/02/2013	रू.7,70,485/-
3.		917 दि.18/10/2012	रू.1,51,060/-
एकूण			रू.12,54,459/-
4.	मे.गणेशकृपाट्रान्सपोर्ट	517 दि.24/07/2012	रू.1,26,688/-
5.		735 दि.17/09/2012	रू.1,37,816/-
एकूण			रू.15,28,963/-

सदर प्रमाणकांची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत लेखापरीक्षणास खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.87 दि.12/10/2015 अन्वये विभागास कळविण्यात आले असता विभागाकडून दि.6/11/2015 रोजी प्राप्त झालेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची "ड" प्रकरण 5 कलम 2)(1) मधील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस 1093/(2635)/उद्योग-6 दि.16 जुलै 1993 मधील परि.3 नुसार रु.50,000/- किंवा त्यापेक्षा अधिक खर्चाच्या कामासाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक आहे. त्यानुसार अतिक्रमण विभागाने जाहिर निविदा मागवून पुरवठादाराची नियुक्ती न करता उद्यान विभागाकडील मंजूर दराने व अटी शर्तीनुसार पुरवठादारास अतिक्रमण विभागाचे वाढीव काम देण्यात आले आहे. अतिक्रमण विभागाने पुरवठादाराशी करारनामा न करता वा मजुर पुरवठयाबाबत कोणत्याही अटी शर्ती विहीत न करता रू.12,54,459/- एवढा खर्च केला आहे.

2) उद्यान विभागाने पुरवठादाराशी केलेल्या करारनाम्यातील अट क.11 नुसार मजुरांचे हजेरीपत्रक ठेवणे आवश्यक असुन सदर हजेरीपटावर संबंधित विभागाच्या अधिक्षकांच्या स्वाक्षरीनिशी रोजनिशी हजेरीपटाचा

अहवाल पुरवठादाराने संबंधित विभागप्रमुखाकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतु अतिक्रमण विभागास पुरवठा केलेल्या मजुरांचे हजेरीपट ठेवण्यात आलेले नाहीत. मजुरांचे हजेरीपट ठेवले नसतांना देयकामध्ये दर्शविलेल्या संख्येनुसार मजुरांच्या उपस्थितीबाबत पुरवठादारास मजुरीचे प्रदान केले आहे. विभागाने केलेल्या खुलाश्यामध्ये दोन्ही विभागातील मजुरांची कामे ही भिन्न स्वरुपाची आहेत. अतिक्रमण विभागात मजुरांनी करावयाचे काम हे रस्त्यावरील विविध ठिकाणी दिवसागणिक बदलणारे व गुप्तता बाळगून करावयाचे असल्याने प्रत्यक्ष हजेरीपट ठेवणे शक्य होत नाही. असे नमुद केले आहे. सदर खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही. त्यामुळे मजुरीवरील खर्चाची रक्कम रु.12,54,459/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

3) पुरवठादाराने कंत्राटी कामगार कायद्यानुसार आवश्यक सर्व (हजेरी नोंदी,वेतन वाटप नोंदी, दैनंदिन कामाच्या नोंदी इ.) नोंदवही ठेवुन सदर नोंदी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्याकडून प्रमाणित करणे आवश्यक आहे, अशी तरतूद करारनाम्यातील अट क्र. 20 मध्ये करण्यात आली आहे. प्रमाणकांची तपासणी करतांना देयकामध्ये नमुद केलेल्या मजुरांच्या संख्येच्या पडताळणीसाठी पुरवठादाराने सादर केलेल्या दैनंदिन कामाच्या नोंदी, वेतन वाटपाच्या नोंदी लेखा परीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे सदर अभिलेख पडताळणी करुन लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

4) उद्यान विभागाने पुरवठादाराशी केलेल्या करारनाम्यातील अट क्र.29 व अट क्र.43 नुसार पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेच्या आत मजूरांचे वेतन अदा करणे बंधनकारक असून प्रत्येक मजूरास द्यावयाचे किमान वेतन महापालिकेने नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यासमोर अदा करावे व त्याबाबतच्या नोंदी नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. सदर अटीनुसार कार्यवाही करण्यात आल्याबाबत अथवा विभागाकडून पडताळणी करण्यात आल्याबाबत अभिलेख उपलब्ध झाला नाही. त्यामुळे पुरवठादाराकडून किती मजुरांना वेतन अदा करण्यात आले याची लेखा परीक्षणास खात्री करता आली नाही.

5) करारनाम्यातील अट क्र.5 नुसार पुरवठादाराने प्रत्येक महिन्यात कंत्राटी कामगारांच्या पी.एफ. च्या रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. मागील महिन्याचे इष्टांकात नमुद केलेल्या सर्व कामगारांच्या मागील महिन्याची पी.एफ.ची रक्कम भरल्याची प्रत पुरवठादाराने देयकासोबत जोडणे बंधनकारक आहे, अन्यथा पुरवठादारास देयक अदा केले जाणार नाही. परंतु पुरवठादाराने पी.एफ. भरणा केल्याची प्रत देयकासोबत लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे करारनाम्यातील अटीनुसार कंत्राटी कामगारांच्या पी.एफ.चा भरणा केल्याची प्रत देयकासोबत नसतांना देयक अदा केले आहे.

6) करारनाम्यातील अटी क्र. 30 नुसार इष्टांकाप्रमाणे मजूर पुरवठा न केल्यास प्रती मजूर प्रतीदिन रू.100/- याप्रमाणे दंडात्मक रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. कार्यादेश क्र.मनपा/अवि/154/2012-13 दि.07/07/2013 नुसार पुरवठादारास 25 मजूरांचा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परंतु माहे डिसे-12, जाने-13 व फेब्रु-13 महिन्यातील मजूर पुरवठा केलेल्या देयकांची पडताळणी करता पुरवठादाराने दैनंदिन कामासाठी प्रतिदिन 25 मजूरांपेक्षा कमी मजूरांचा पुरवठा केल्याचे दिसून येते. माहे डिसे-12 मधील 26 दिवसांसाठी प्रतीदिन 25 मजूर याप्रमाणे 650 ऐवजी 410 मंजूराचा, जाने-13 मध्ये 25 दिवसांसाठी प्रतिदिन 25 प्रमाणे 625 ऐवजी 379 मजूरांचा पुरवठा आहे. फेब्रु-13 मध्ये 23 दिवसांसाठी प्रतिदिन 25 मजूर याप्रमाणे 675 ऐवजी 357 मजूराचा पुरवठा केला आहे. त्यानुसार डिसेंबर महिन्यामध्ये 240 मजुरांच्या कमी पुरवठयासाठी रु.100/- प्रमाणे रु.24000/- जानेवारी-13 मध्ये 316 मजुरांच्या कमी पुरवठयासाठी रु.100/- प्रमाणे रु.31,600/- माहे फेब्रुवारी-13 मध्ये 318 मजुरांच्या कमी पुरवठयासाठी रु.100/- प्रमाणे रु.31,800/- याप्रमाणे एकूण रु.87,400/-

एवढी दंडात्मक रक्कम वसुल करण्यात आलेली नाही.

याबाबत विभागाने केलेल्या खुलाश्यामध्ये कित्येक वेळा कमी मजुरांची आवश्यकता भासल्याने आवश्यकतेनुसार मजुर पुरवठा करण्याबाबत सुचित केल्याने कमी मजुर पुरवठा करण्यात आला आहे. त्यामुळे दंडाची वसुली करण्यात आली नाही. असे नमुद केले आहे. परंतु याबाबत विभागाकडून पुरवठादारास दिलेले आदेश सादर केलेले नाहीत. त्यामुळे विभागाचा खुलासा मान्य करता येत नाही. तरी कमी मजुरांच्या पुरवठयाबाबत कार्यादेशातील अटीनुसार दंडाची रक्कम रु.87,400/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम :- मजुरांच्या कमी पुरवठयाची दंडाची रक्कम रु.87,400/-
आक्षेपाधिन रक्कम :- मजुर पुरवठयावरील एकुण खर्च रु.12,54,459/-
FDSANMM7201 (Ref No : 46, Hmm No : 87)

84 अतिक्रमण विभागास जे.सी.बी. (मशीन) पुरवठयासाठी केलेल्या खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 04

मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब
आक्षेपाधीन रक्कम रु. 124123.00/-

जे.सी.बी पुरवठयासाठी जाहिर निविदा मागवून पुरवठादार निश्चित न करता 2008-09 च्या दराने पुरवठादारास कार्यादेश देण्यात आले आहेत. पुरवठादाराने विलंबाने देयके सादर केल्यामुळे वर्ष 2011-12 मधील खर्चाचे प्रदान 2012-13 मधील अर्थसंकल्पीय तरतूदीतून करतांना त्यास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 102 अन्वये विहीत कार्यपध्दतीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाच्या वर्ष 2012-13 मधील खर्चाची पडताळणी करतांना मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांनी 2011-12 मध्ये अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाला अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याकरीता जे.सी.बी. पुरवठा करण्यासाठी विभागाकडील कार्यादेश क्र.मनपा/अवि/171/2011-12 दि.12/07/2011 अन्वये वर्ष 2008-09 मधील मंजूर दरकरारानुसार रू.758/- प्रती तास या दराने कार्यादेश देण्यात आले. त्यानुसार पुरवठादाराने जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर व नोव्हेंबर या कालावधीत (दि.12/07/2011 ते दि.30/11/2011) जे.सी.बी.च्या पुरवठयाचे देयक दि.30/05/2012 च्या पत्रान्वये अतिक्रमण विभागाकडे विलंबाने प्रदानार्थ सादर केले असून प्रमाणक क्र.994 दि.2 नोव्हेंबर 2012 अन्वये मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांना रू.1,24,123/- एवढया रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. यासाठी झालेला खर्च "जे.सी.बी./गॅस कटर्स/ट्रक निगा/भाडयाने घेणे" या लेखाशिर्षाखाली वर्ष 2012-

13 च्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून करण्यात आला आहे. सदर प्रमाणकांची व उप प्रमाणकांची तपासणी करता आढळून आलेल्या त्रुटींबाबत खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.88 दि.12/10/2015 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून दि.6/11/2015 रोजी प्राप्त झालेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील अनुसुची "ड" प्रकरण 5 कलम 2)(1) मधील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस 1093/(2635)/उद्योग-6 दि.16 जुलै 1993 मधील परि.3 नुसार रु.50,000/- किंवा त्यापेक्षा अधिक खर्चाच्या कामासाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतू अतिक्रमण विभागासाठी जे.सी.बी.पुरवठा करण्यासाठी जाहिर निविदा न मागविता वर्ष 2008-09 मधील मंजूर दरकरारान्वये पुरवठादारास कार्यादेश देण्यात आले आहेत. जाहिर निविदा न मागविता खर्च करण्यात आल्याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये 3 महिन्यापुर्वी आरोग्य विभागाने कार्यादेश दिलेल्या पुरवठादारास कार्यादेश दिलेला आहे. 2-3 महिने फार अल्प काळ असल्याने जे.सी.बी पुरवठा कामी नव्याने निविदा मागविण्यात आली नाही. सदर कार्यादेश देतेवेळी आरोग्य विभागाचा कार्यादेश विचारात घेतलेला आहे. असे नमुद केले आहे. सदर खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही. तरी खर्चाची रक्कम रू.1,24,123/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) वर्ष 2011-12 मध्ये दि.12/07/2011 ते दि.30/11/2011 या कालावधीतील जे.सी.बी. पुरवठयाच्या कामाचे देयक पुरवठादाराने त्याच वित्तीय वर्षात सादर न करता 2012-13 या वर्षात प्रदानार्थ सादर केले आहे. त्यामुळे वर्ष 2011-12 या वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूद व्यपगत झाली असून सदर खर्च वर्ष 2012-13 च्या अर्थसंकल्पयीय तरतूदीतून करण्यात आला आहे. सदर खर्च करण्यास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमातील कलम 102 अन्वये विहीत कार्यपध्दतीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

3) कार्यादेशात नमुद केल्यानुसार अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे निष्काशित करणेकामी येणाऱ्या खर्चाची चलने कनिष्ठ अभियंता व संबंधित प्रभाग अधिकारी यांचेकडून प्रमाणित करून विभाग प्रमुख अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त कालावधीतील खर्चाची प्रमाणित चलने लेखा परीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाहीत. त्यामुळे प्रमाणित चलनांची पडताळणी करुन झालेल्या खर्चाची लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

4) अतिक्रमण निष्कासनाच्या कामात जे.सी.बी. वापराबाबत अतिक्रमण निष्कासन पथकाच्या दि.12/07/2011 ते दि.30/11/2011 या कालावधीतील दैनंदिन कामाचा अहवाल देयकासोबत उपलब्ध झाला नाही. त्यामुळे केलेल्या कामाबाबत दैनंदिन अहवालाची लेखा परिक्षणास पडताळणी करता आली नाही.

आक्षेपाधिन रक्कम रू.1,24,123/-
FDSANMM7201 (Ref No : 47, Hmm No : 88)

85 अतिक्रमण व अनधिकृत बांधकामधारकांकडून वसूल केलेल्यारकमेच्या अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 1

लेखा शीर्ष :00 मनपा निधी
अनियमितता कलम : 9ब
आक्षेपाधीन रक्कम रु. 312300.00/-
वसूलपात्र रक्कम रु. 136000.00/-

महापालिकेच्या प्रभाग समितीच्या कार्यालयाकडून अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली होती व अतिक्रमणधारकाकडून दंडात्मक रक्कम वसूल केल्याचे कारवाई नोंदावाहीवरून दिसते परंतु सदर वसुलीबाबत आवश्यक अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध केला नाही. तसेच वसुलीच्या रकमांच्या नोंदी पेन्सिलने कच्च्या स्वरुपात घेण्यात आल्या असून त्या नोंदी प्रमाणित करण्यात आल्या नाहीत.

वित्तीय वर्ष 2012-2013 मधील प्रभाग समिती कार्यालय 6 मधील अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाच्या कारवाई नोंदवही क्रमांक 1 नुसार सदरच्या विभागाकडून खालीलप्रमाणे अतिक्रमण व अनधिकृत बांधकामाच्या विरोधात कार्यवाहीकरण्यात आली.

अ.क्र.	महिना	पत्रा शेड/ लोखंडी ग्रील झोपड्या	वीट बांधकाम खोली	कंपाउंडभिंत	वसूल केलेली रक्कम रुपये	वसूल न केलेले प्रकरण क्रमांक
1	एप्रिल	12	03	03	22000	5,6,8.
2	मे	1383	776	-	102800	11,13,14,16,21.
3	जून	06	06	-	41850	28,29.
4	जुलै	-	04	-	11250	32,33.
5	ऑगस्ट	-	05	01	15900	36.
6	सप्टें.	01	03	01	9200	43.
7	आक्टो.	08	10	02	4100	53.
8	नोव्हे.	32	03	07	37475	55,59.
9	डिसें.	-	25	24	31250	62.
10	जाने.	84	09	01	22475	69,71.
11	फेब्रु.	02	05	-	14000	75,79,8182,83,84.
12	मार्च	197	02	01	-	85,86,87,88,89,90,91,92.
		1725	851	39	312300	34 प्रकरणे

वरीलप्रमाणेवित्तीय वर्ष 2012-13 मध्ये अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही करण्यात आलेल्या प्रत्येक महिन्यात अतिक्रमणधारकाकडून वरीलप्रमाणे रक्कम वसूल करण्यात आली अशी नोंद कारवाई नोंद्वहीमध्ये पेन्सिलनेघेण्यात घेण्यात आली असून त्या नोंदी प्रभाग अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेल्या नाहीत.

त्याचप्रमाणे वसूल केलेल्यारकमांच्यापावत्या, चलने व अतिक्रमण धारकास देण्यात आलेली नोटीस इत्यादी अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आला नाही. वरील तक्त्यातील रकाना क्रमांक 7 मधील एकूण34 अतिक्रमण धारकांची अनधिकृत बांधकामे पाडण्यात आल्यानंतर क्षेत्रफळानुसार किती रक्कम वसूल करावयाची याबाबतपरिगणना संबधित अभियंत्याने केली नसून तशी नोंद कारवाई नोंदवहीत घेण्यात आली नाही. त्यामुळे अतिक्रमण पाडण्यासाठीलागणारी यंत्रसामग्री, मनुष्यबळ इत्यादींचा किमान 4000 दरानुसार वरील प्रकरणांतील अतिक्रमण धारकाकडून रुपये136000 वसूलहोणे आवश्यक आहे.त्याचप्रमाणे त्यांच्याकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील नियम 399 नुसार जो कोणी या अधिनियमातील कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याखालील कोणत्याही नियमाचे, उपविधीचे, विनियमाचे, स्थायी आदेशाचे किंवा त्यान्वये दिलेल्या कोणत्याही लायसन्सचे परवानगीचे किंवा नोटिशीचे उल्लंघन करील अशा प्रत्येक अपराधाबद्दल शंभर रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल. अशी दंडात्मक रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली याबाबतचा तपशील लेखापरीक्षणास देण्याबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 115 दि.30/10/2015अन्वये विचारणा केली असता वरीलप्रमाणे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आला नाही. .

DATPLKM7501 (Ref No : 69, Hmm No : 115)

86 सुवर्णजयंती योजनेच्या बँक खात्यामध्ये जमा झालेल्या व्याजाच्या रक्कमेचा विनीयोग न केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 1232851.00/-

केंद्र शासनाचे पत्र क्रं. K-14011 / 6/99 / UPA (USEP) दिनांक 17.03.199, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रं.सुजयो-1097/ प्र.क्र.119 / नवि.33 दिनांक 20 एप्रिल,1999, तदनंतर उपसंचालक नगरपरीषद प्रशासन संचालनालय, वरळी मुंबई यांचे पत्र क्रं. सुजयो / 2013 अन्वये सर्व महानगरपालिकांच्या निदर्शनास आणून देवूनही महानगरपालिकेकडून रु.1232851.00 चा विनीयोग केला गेला नाही.त्यामुळे लाभार्थींना योजनेच्या लाभापासून वंचीत राहावे लागले.

2012-2013 या वित्तिय वर्षाचे सुवर्णजयंती योजनेच्या जमा व खर्चाची तपासणी करतांना योजनेच्या बँक खात्यामध्ये रु.1232851.00 एवढी रक्कमेचे व्याज खाली नमूद केलेल्या वेगवेगळया तारखांना

प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्रं.	व्याज जमा झाल्याचा दिनांक	रक्कम रु.
1	31.07.2010	136153.00
2	31.01.2011	154031.00
3	31.07.2011	183520.00
4	31.01.2012	180750.00
5	31.07.2012	254325.00
6	31.01.2013	324072.00
	एकूण रु.	1232851.00

केंद्र शासनाचे पत्र क्रं.K-14011/6/99/UPA (USEP) दिनांक17.03.199 अन्वये व्याजाची रक्कम सर्व घटकामध्ये समांतर विभागीत करण्याबाबत स्वयंस्प्ष्ट सुचना निर्गमित करण्यात आल्या आहे. सदर सूचना महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी पत्र क्रं.सुजयो-1097/प्र.क्र.119/नवि.33 दिनांक 20एप्रिल,1999अन्वये सर्व महानगरपालिकांच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. तदनंतर उपसंचालक नगरपरीषद प्रशासन संचालनालय,वरळी मुंबई यांनी पत्र क्रं.सुजयो/2013 अन्वये पुन्हा सर्व महानगरपालिकांना सदर सूचनाबाबत कळविले आहे.तथापि मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या व्याज रु.1232851.00 एवढया रक्कमेचा लेखापरीक्षणाच्या दिनांकापर्यंत विनियोग करण्यात आलेला नाही.त्यामुळे लाभार्थींना योजनेच्या लाभापासून वंचीत रहावे लागले आहे.लेखापरीक्षणाच्या दिनांकापर्यंत व्याजाची रक्कम विभागनिहाय समांतर विभागणी करून त्याचा विनियोग करण्यात आलेला नाही.सदर अनियमिततेबाबबत अर्धसमास पत्र क्रं.85 दिनांक12.10.2015 निर्गमित करण्यात आले असता विभागाकडून दिनांक 26.10.215 रोजी प्राप्त झालेला खुलासा संयुक्तिक नाही.

DDDTKSM6801 (Ref No : 55, Hmm No : 85)

87 सुवर्ण जयंती रोजगार हमी योजनेंतर्गत मजुर कर्ज प्रकरणाची रक्कम बँकेकडे अनावश्यक गुंतून राहिल्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 03

शासन निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 6729.00/-

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत वर्ष 2010-11 मध्ये दि.31/3/2011 रोजी बँकेस शासन अनुदान वितरीत करण्यात आले. लाभार्थ्याला कर्ज मंजूर न करण्यात आल्यानंतर धनादेश मुदतबाहय झाल्यामुळे दि.31/3/2012 रोजी धनादेशाची मुदत वाढविण्यात आली. परंतू लाभार्थ्यांने कर्ज प्रकरणा संदर्भात आवश्यक बाबींची पुर्तता न केल्याने बँकेने धनाकर्षान्वये सदर रक्कम रु.50,000/-दि.19/3/2013 रोजी परत पाठविली. दरम्यान विभागाकडून बँकेकडे काहीही पाठपुरवठा करण्यात आला नाही. त्यामुळे सदर रक्कम अनावश्यक बँकेकडे गुंतून राहिल्याने तीचा विनियोग इतर पात्र लाभार्थीसाठी करता आला नाही. रक्कम 19 महिने बँकेकडे गुंतून राहिल्यामुळे सदर रकमेवरील व्याजाचे नुकसान झाले आहे.

मिरा भाईंदर मनपा कडून सुवर्ण जयंती शहरीरोजगार योजनेंतर्गत वर्ष 2010-11 मध्ये श्री.बाबुलाल अहिरे या दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांस देना बँक, भाईंदर (प) यांचे कडून मंजूर केलेल्या कर्ज प्रकरणास अनुसरुन शासन अनुदान रु.50,000/- धनादेश क्र.870966 दि.31/3/2011 अन्वये देना बँकेच्या नावे वितरीत करण्यात आले. परंतू बँकेडून संबंधित लाभार्थ्यास कर्ज मंजूर न करता पत्र क्र.DB/BMW/2012 दि.16/3/2012 अन्वये सदर धनादेशाची मुदत वाढवून देण्यासाठी महापालिकेकडे परत पाठविण्यात आला. महापालिकेकडून सदर धनादेशाची मुदत दि.31/3/2012 रोजी वाढवून देण्यात आली असून दि.14/4/2012 रोजी सदर रक्कम मनपाच्या बँक खात्यात खर्ची पडली आहे. तथापि, संबंधित अर्जदार कर्जप्रकरणासंदर्भात आवश्यक बाबींची पुर्तता करु शकला नसल्यामुळे देना बँकेने पत्र क्र.DB/BHAW/SGRY/2013 दि.30/9/2013 अन्वये शासन अनुदानाची रक्कम रु.50,000/- धनाकर्ष क्र.781215 दि.30/9/2013अन्वये महापालिकेस परत पाठविल्याचे उपलब्ध अभिलेख्यांची व रोखवहीची पडताळणी करता आढळून आले आहे. याबाबत लेखा परिक्षणास खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमास पत्र क्र.90 दि.13/10/2015 अन्वये कळविण्यात आले असता विभागाकडून जा.क्र.मनपा/सविवि/429/2015-16 दि.21/10/2015 रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) वर्ष 2010-11 मध्ये दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्याच्या कर्ज प्रकरणासाठी विभागाकडून दि.31/3/2011 रोजी संबंधित बँकेस शासन अनुदान वितरित करण्यात आले. परंतू बँकेकडून लाभार्थ्यास कर्ज मंजूर करण्यात आले नाही. त्यामुळे शासन अनुदानाचा धनादेश मुदतबाहय झाला. मुदतबाहय धनादेशाची वैधता वाढवून देण्यासाठी दि.16/3/2012 रोजी म्हणजे धनादेश निर्गमित करण्यात आल्यापासून 1 वर्षानंतर म्हणजे बँकेकडून

सदर धनादेश विभागास परत पाठविण्यात आला आहे. सदर 1 वर्षाच्या कालावधीत लाभार्थ्यास कर्ज मंजूर करण्यात आले अथवा कसे कर्ज मंजूर करण्यात आले नसल्यास त्याबाबतची कारणे याचा विभागाकडून संबंधीत बँकेकडे काहीही पाठपुरावा करण्यात आलेला नाही. यावरुन विभागाकडून संबधीत लाभार्थीच्या कर्ज प्रकरणासाठी संबधित बँकेस शासन अनुदान वितरीत करण्यात आल्यानंतर शासन अनुदानाच्या विनियोगाबाबत गांभीर्याने प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे शासन अनुदान बँकेकडे गुंतून राहिले आहे.

2) बँकेच्या विनंतीनुसार दि.31/3/2012 रोजी धनादेशाची वैधता वाढविण्यात आल्यानंतर सदर धनादेश दि.14/4/2012 रोजी मनपाच्या बँक खात्यात खर्ची पडला आहे. शासन अनुदानाची रक्कम बँकेस प्राप्त झाल्यानंतरही बँकेने लाभार्थीच्या कर्ज मंजूर करता येत नसल्याने शासन अनुदानाची रक्कम रु.50000/- धनाकर्ष क्र.781215 दि.30/9/2013 अन्वये दि.19/11/2013 रोजी पुन्हा महापालिकेकडे परत पाठविली आहे. बँकेने धनाकर्षान्वये शासन अनुदान परत पाठवितांना संबंधित लाभार्थीच्या कर्ज प्रकरणाच्या व्यवसायाच्या अनुषंगाने आवश्यक बाबींची पुर्तता करुन शकला नसल्याने कर्ज मंजूर करता येत नसल्याचे कळविले आहे. यावरुन विभागाकडून पात्र लाभार्थीच्या निवडतांना अर्जदाराची आवश्यक कागदपत्राची पडताळणी न करता कर्ज प्रकरण बँकेकडे मंजूरीस्तव सादर करण्यात आल्याचे दिसून येते.

3) सदर रक्कम बँकेने दि.19/11/2013 रोजी महापालिकेस परत पाठविल्यामुळे दि.14/4/2012 ते 19/11/2013 या कालावधीत विभागाच्या बँक लेख्याबाहेर राहिली आहे. सदर रक्कम बँकेकडे अनावश्यक गुंतून राहिल्यामुळे दि.14/4/2012 ते 19/11/2013 या 19 महिन्याच्या कालावधीसाठी रु.50,000/- या रकमेवर द.सा.द.शे.8.5 टक्के व्याज दर विचारात घेतल्यास रु.6729/- एवढया व्याजाचे नुकसान झाले आहे. तरी रु.6729/- एवढी रक्कम वसुल पात्र दर्शविण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.6729/-

FDSANMM7201 (Ref No : 93, Hmm No : 67)

88 परिवहन विभागातील JNNURM योजने अंतर्गत खर्चातील अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 1

लेखा शीर्ष :3220 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 10313010.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 500000.00/-

मीरा भाईंदर महापालिकेच्या परिवहन विभागास केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत बस खरेदीसाठी अनुदान प्राप्त झाले असून वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये प्राप्त अनुदानातून भाडे दर वाढ फरक, छपाई खर्च बसमध्ये एल इ डी, सी सी टी व्ही, कमेरे बसवणे. इत्यादी प्रकारचा खर्च करण्यात

आला असून शासनाकडून मिळालेल्या अनुदानातून बस खरेदी करण्यात आल्या नाहीत त्यामुळे बस खरेदीचा उद्देश साध्य झालेला दिसून येत नाही. त्याचप्रमाणे परिवहन उपक्रमाच्या बसेस ठेका पद्धतीने ज्या ठेकेदारास देण्यात आला त्या ठेकेदाराकडून रॉयल्टीची रक्कम रुपये 5000000 वसूल करण्यात आली नाही.

मीरा-भाईंदर महापालिकेच्या परिवहन विभागाला शासन निर्णय क्रमांक – एनयुआर-2011/प्र.क्र.187/नवी-33दिनांक31/03/2012 अन्वये JNNURM योजने अंतर्गत केंद्र शासनाने वितरीत केलेली रक्कम रुपये 16400000 व राज्य शासनाच्या हिश्याची रक्कम 7028000 परिवहन विभागास बस खरेदीसाठी वितरीत करणात आली वित्तीय वर्ष 2012-13 मधील परिवहन उपक्रमाच्या रोखवहीनुसार केंद्र शासनाची रक्कम रुपये 16400000 दिनांक 1/2/2012 रोजी प्राप्त झाली असून माहे एप्रिल 2012 ची प्रारंभीची शिल्लक रुपये 15237524 दर्शवण्यात आली आहे. सदरच्या रकमेतून खालीलप्रमाणे खर्च करण्यात आला आहे.

जमा बाजू		खर्च बाजू			
दिनांक	रक्कम रुपये	दिनांक	रक्कम रुपये	पार्टीचे नाव	खर्चाचा उद्देश
1/4/2012	15237524				
16/5/2012 जागा भाडे	605873	16/5/2012	4376905	मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रा	भाडे दर वाढ फरक अदा करणेकामी
18/5/2012 राज्य शासन अनुदान	7028000	16/5/2012	27300	मे.प्रेमकिशन प्रिंटर	छपाई खर्च
		5/6/2012	786520	अर्बन मास	सल्लागार फी.
		5/6/2012	674160	अर्बन मास	सल्लागार फी.
		6/6/2012	4448125	इंटरचैनसोल्युशन	बसमध्ये LED, CCTV, GPS बसविणेकामी
31/3/2013 अखेरची शिल्लक 12558335					

वरील शासन निर्णयानुसार केंद्र व राज्य शासन यांचे प्राप्त अनुदान बस खरेदीसाठी असताना त्यातून भाडे दर वाढ फरक,छपाई खर्च बसमध्ये एल इ डी, सी सी टी व्ही, कमेरे बसवणे. प्रकारचा खर्च करण्याबाबत केंद्र शासन किंवा राज्य शासन यांचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आले नाही.

दिनांक 3/9/2010 च्या मे. क्रिस्टल इन्फ्रा. या कंपनीसोबत करण्यात आलेल्या करारनाम्यातील अट क्रमांक 5 अन्वये वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये संबधित ठेकेदाराने प्रती किमी 1 रुपया या दराने रॉयल्टी रक्कम भरल्याबाबतच्या नोंदी रोखवहीत दिसून येत नाहीत. सदर वित्तीय वर्षात एकूण 51 बसेस धावत असून त्या बसेस वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये किती किलोमीटर धावल्या व त्या वित्तीय वर्षातील थकीत रॉयल्टीची रक्कम किती याबाबतचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आला नाहीत. सदरच्या रकमा ठेकेदाराने भरल्या किंवा कसे याबाबत साधार खुलासा लेखापरीक्षणास करण्यात आला नाही. त्याचप्रमाणे परिवहन उपक्रमाच्या रोखवहीतील नोंदी सक्षम प्राधीकाऱ्यांनी साक्षांकित केल्या नाहीत. त्याचप्रमाणे संबधित ठेकेदाराकडून वरील वित्तीय वर्षातील प्रवाशी कर व बाल पोषण भाराच्या रक्कम वसूल केल्याबाबतच्या नोंदी

रोखवहीत आढळून आल्या नाहीत. सदरच्या रकमा वसूल करून शासन खाती जमा करण्यात आल्या नाही. मार्च 2012 मध्ये परिवहन उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांचे वेतनापोटी संबधित ठेकेदाराने परफॉर्मंस सिक्युरिटीची बँक गॅरंटीची उचल म्हणून घेतलेली रक्कम रुपये 50,00,000 वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये परत केलेली दिसून येत नाही. सदरची रक्कम वसूल करण्यात आली किंवा कसे याबाबत खुलासा करण्यात आला नाही.

DATPLKM7501 (Ref No : 70, Hmm No : 106)

89 परवाना विभागाने परवानाव नुतनीकरण शुल्क न वसूल केलेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 1

लेखा शीर्ष :00 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

महापालिकेच्या उदासीन धोरणामुळे नवीन परवाने वितरण व नुतनीकरणापोटी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिकाअधिनियम 1949 चे 386 कलमान्व्ये महापालिकेच्या परवाना विभागामार्फतकारखाने दुकाने हॉटेल यासाठी प्रथम परवाना व नुतनीकरण परवाना दिनांक 11/10/2012 पासून पुस्तिकेतठेवण्यात येत असून सदर पुस्तीकेनुसारपरवाना विभागामार्फत दिनांक 31/3/2013 पर्यंत दुकान परवाने 392, कारखाने परवाने 405 व मांस, मासळी, चिकन, मटन परवाने 6 वितरीत करण्यात आले. 1/11/2012 पूर्वी वितरीत नवीन परवाने व नुतनीकरण परवान्याबाबत परवाना विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक 76 दि. 22/09/2015 अन्वये विचारणा केली असता पत्र क्रमांक मनपा उप-आयुक्त/परवाना/1442012-13 दिनांक 17/9/2012 अन्वये वरील दिनंकापुर्वीचे परवाने महापालिकेच्या प्रभागातील लिपिकांच्या स्वाक्षरीने वितरीत करण्यात येत होते.वरील दिनंकापुर्वीचे नुतनीकरणासाठी एकूण परवाने 2952 प्रलंबित असून महापालिकेच्या स्थायी समितीच्या ठराव क्र. 31, दिनांक 30/04/2012 नुसार परवाना नूतनीकरणाचा जागेच्या क्षेत्रफळानुसार न्यूनतम दर 250 नुसार परिगणना केली असता महापालिकेला परवाना नुतनीकरणापोटी रुपये738000 एवढी रक्कम उत्पन्नापोटी महापालिकेला मिळाली नाही. महापालिकेने वित्तीय वर्ष 2012-13 साठी नवीन परवाने व नुतनीकरण परवाने यासाठी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात 1.30 लक्ष महसुली जमा रकमेचे उद्दीष्ट ठेवले होते परंतु प्रत्यक्षात महापालिकेला 25 लक्ष एवढेच उत्पन्न मिळाले. महापालिका हद्दीतील परवानाधारकांचे परवाने नुतनिकरणाबाबत वरील वित्तीय वर्षात मागील आर्थिक वर्षात नोंदणीकृत परवानाधारकांना मागणी नोटीस पाठवून वसुलीबाबत तसेच मुंबई प्रांतिक म्हणागापालिका

अधिनियम 1949 मधील नियम 386 (3) परवाना नुतनीकरण रक्कम परवानाधारकाने विहित मुदतीत भरली नसल्यास परवाना रद्द करण्यात आली किंवा कसे? याबाबत कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यात आली याबाबत वरील अर्धसमासान्वये विचारणा केली असता मागील आर्थिक वर्षात नोंदणीकृत परवानाधारकांना मागणी नोटीस पाठवून वसुलीबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे केवळ महापालिकेच्या उदासीन धोरणामुळे महापालिकेला मोठ्या प्रमाणात नुकसान सोसावे लागत आहे.

DATPLKM7501 (Ref No : 71, Hmm No : 76)

90 महापालिकेसाठी आवश्यक असलेल्या सुरक्षा रक्षकांचा पुरवठा करण्यासाठी खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी नियुक्त करण्यात आल्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 12

मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 12094385.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 81100.00/-

महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा कामगार विभाग शासन निर्णय क्र. एस.जी.ए.1506/प्र.क्र.02/काम5 दि.08/11/2006 नुसार शासन मान्य सुरक्षा मंडळाकडून सुरक्षा रक्षकांची नियुक्ती न करता सुरक्षा रक्षकांचा पुरवठा करण्यासाठी 2009-10 मध्ये जाहिर निविदा मागवून खाजगी सुरक्षा एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे. पुरवठादाराशी करारनामा करतांना रु.100/- एवढया रकमेच्या मुद्रांक शुल्काच्या पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. खाजगी सुरक्षा रक्षक पुरवठादारास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली असून मुदतवाढीच्या कालावधीत करारनामा करण्यात आलेला नाही. कंत्राटी सुरक्षा रक्षकांचे हजेरीपट ठेवण्यात आलेले नाहीत. किमान वेतन कायद्यानुसार कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या वेतनातील प्रा.फंड / ग्रॅज्युएटी / बोनस / विमा / वैद्यकीय सुविधा इ.च्या रकमा संबंधित प्राधिकरणाकडे भरणा केल्याबाबतची चलने पुरवठादाराने सादर केलेली नसतांना सदर रकमांचे पुरवठादारास प्रदान करण्यात आले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे व महत्वाच्या वास्तुंचे संरक्षणार्थ ठेका पध्दतीने हत्यारी/ विनाहत्यारी सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याबाबतच्या सामान्य प्रशासन विभागाकडील निविदा नस्तीची तपासणी करता महापालिकेच्या विविध विभागांसाठी 361 सुरक्षा रक्षक पुरवठा करण्यासाठी वर्ष 2009-10 मध्ये जाहिर निविदा मागवुन स्थायी समिती ठराव क्र.26 दि.17/07/2009 अन्वये मान्यता दिल्यानुसार मे.सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी यांना कार्यादेश क्र.मनपा/आस्था/365/28/2009

दि.31/07/2009 अन्वये दि.01/08/2009 ते दि.31/07/2011 या 2 वर्षाच्या कालावधीसाठी कामाचे आदेश देण्यात आले. सदर कार्यादेशाचा कालावधी संपल्यानंतर स्थायी समिती ठराव क्र.41 दि.16/07/2011 अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार कार्यादेश क्र.मनपा/आस्था/592/2011-12 दि.30/07/2011 नुसार पूरवठादारास दि.01/08/2011 ते दि.31/07/2012 या 1 वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली. तद्नंतर कार्यादेश क्र.मनपा/आस्था/595/2012-13 दि.30/07/2012अन्वये दि.01/08/2012 ते दि.30/09/2012 दोन महिने, कार्यादेश क्र.मनपा/आस्था/823/2012-13 दि.01/10/2012 अन्वये दि.01/10/2012 ते दि.30/11/2012 दोन महिने, कार्यादेश क्र.मनपा/आस्था/1059/ 2012-13 दि.01/12/2013 अन्वये दि.01/12/2012 ते दि.31/01/2013 दोन महिने मुदतवाढ देण्यात आली. तसेच महासभा ठराव क्र.11 दि.14/12/2012 अन्वये पुढील 3 वर्षासाठी पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे.

लेखा विभागाकडील वर्ष 2012-13 च्या जमा खर्च विवरणपत्रानुसार सामान्य प्रशासन विभागांतर्गत "अस्थायी आस्थापना व सुरक्षा व्यवस्था" या लेखाशिषाखालील खर्चाची पडताळणी करीता वर्षे 2012-13 मध्ये मंजूर तरतूद रू. 125.00 लक्ष यामधुन रू.122.94 लक्ष एवढा खर्च करण्यात आला आहे. सुरक्षा रक्षक पुरवठादार मे.सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी यांना माहे मार्च 2013 मध्ये लेखा विभागाकडील प्रमाणक क्र.1974 दि.30/03/2013 अन्वये रू.1,20,94,385/- एवढे प्रदान करण्यात आले. प्रमाणकांची तपासणी केली असता आढळून आलेल्या अनियमिततांबाबत खुलासा करण्याबाबत विभागास अर्धसमासपत्र क्र.116 दि.03/11/2015 अन्वये कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून दि.09/12/2015 रोजी सादर केलेला खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखापरीक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र राज्यात खाजगी सुरक्षा रक्षकांच्या नोकरीचे नियमन करण्याच्या उद्देशाने महाराट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियमन 1981 लागु करण्यात आला असुन त्यानुसार ठाणे/पुणे/नाशिक/रायगड/औरंगाबाद व नागपुर जिल्हयासाठी शासनाने सुरक्षा मंडळे निर्माण केली आहेत.

महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा कामगार विभाग शासन निर्णय क्र.एस.जी.ए.1506/प्र.क्र.02/ काम5/दि.08/11/2006 नुसार सरकारी, निमसरकारी क्षेत्रे, उपक्रम, शासकीय मंडळे, महामंडळे, महानगरपालिका /स्थानिक स्वराज्य संस्था/सहकारी संख्या/शासकीय कार्यालये यांनी यापुढे खाजगी अभिकरणाकडून सुरक्षा अधिकारी/ सुरक्षा रक्षक यांची मागणी न करता शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षक अधिकारी / सुरक्षा रक्षक यांची मागणी करावी व त्यातुनच आपल्या आस्थापनामध्ये सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी असे आदेश देण्यात आले आहेत. तसेच ज्या संस्था / कार्यालये यापुढे शासनाच्या सुरक्षा मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेणार नाहीत, त्या संस्थांमधील संबंधित जबाबदार अधिकारी हा दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहिल असेही नमूद करण्यात आले आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने शासन नियुक्त सुरक्षा मंडळाकडे सुरक्षा रक्षकांच्या पुरवठयासाठी मागणी नोंदविणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही न करता वर्ष 2009-10 मध्ये जाहिर निविदा मागवुन नियमबाहयपणे मे.सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. या खाजगी सुरक्षा एजन्सीला सुरक्षा रक्षक पुरवठा करण्यास दोन वर्षासाठी कार्यादेश देण्यात आले.

पुरवठादारास वारंवार मुदतवाढ देण्यात येवून खाजगी सुरक्षा एजन्सीचे सुरक्षा रक्षक पुरवठ्याचे कंत्राट अद्यापही कार्यरत आहे. याबाबत विभागाने खुलासा करतांना सुरक्षा रक्षक मंडळ, भांडूप(प), मुंबई यांचे पत्र क्र.सुरमं/सचिव/2013-2006 दि. 5 एप्रील 2013 रोजीच्या पत्राचा संदर्भ देवून सदर पत्रान्वये सुरक्षा मंडळाने हत्यारी बिनहत्यारी रक्षक पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविलेली असल्याचे नमूद केले आहे. सदर पत्राची पडताळणी करता सुरक्षा मंडळाने पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे 350 सुरक्षा रक्षक एकाच वेळी वितरीत करणे मंडळास सध्या सोयीचे नसल्याने मंडळ टप्प्याटप्याने आपल्या मागणीनुसार सुरक्षा रक्षकांचे वितरण करेल असे कळविल्याचे दिसून येते. यावरुन सुरक्षा रक्षक मंडळाने पूर्णत: असमर्थता दर्शविलेली नाही. तसेच सदर पत्रव्यवहार हा वर्ष 2009-10 मध्ये निविदा प्रक्रीया राबवितांना केलेला नसून महापालिकेच्या दि.28/3/2013 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने केला आहे. यावरुन निविदा प्रक्रीया राबविण्यापुर्वी विभागाने सुरक्षा मंडळाकडे सुरक्षा रक्षकांची मागणी न नोंदविता निविदा प्रक्रीया केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे विभागाचा खुलासा आक्षेपाशी सुसंगत नसल्याने मान्य करता येत नाही. तरी उपरोक्त प्रमाणकान्वये केलेला खर्च रू.1,20,94,385/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

2) पुरवठादारास दिलेल्या कामाबाबत करारनामा करतांना मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार कामाच्या किंमतीच्या पहिल्या 10 लक्ष रक्कमेसाठी रू.100/- व त्या पुढील किंमतीच्या प्रत्येकी 1 लाखासाठी रू.100/- याप्रमाणे मुद्रांक शुल्काचा भरणा करून करारनामा करणे आवश्यक आहे.

मे. सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांना विभाग निहाय 361 सुरक्षा रक्षक पुरवठ्यासाठी कार्यादेश क्र.मनपा/आस्था/365/24/2009 दि.31/07/2009 अन्वये बिना हत्यारी सुरक्षा रक्षकांसाठी रू.6922/- प्रती महा दराने दि.01/08/2009 ते दि.31/07/2011 या 2 वर्षासाठी कामाचे आदेश देण्यात आले. त्यानुसार सदर कालावधीसाठी पहिल्या वर्षी सुरक्षा रक्षक पुरवठ्यासाठी रू.2,99,86,104/- व दुसऱ्या वर्षी सुरक्षा रक्षक पुरवठ्यासाठी रू.2,99,86,104/- असा एकूण रू.5,99,72,208/- एवढा खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार पुरवठादाराशी करारनामा करतांना रू.59,100/- एवढे मुद्रांक शुल्क भरणा करणे आवश्यक होते. परंतु दि.17 जुलै, 2009 रोजी पुरवठादाराशी रू.100/- एवढ्या मुद्रांक शुल्क रक्कमेच्या मुद्रांक पेपरवर करारनामा करण्यात आला आहे. त्यामुळे रु.59,000/- एवढी मुद्रांक शुल्क वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

3) स्थायी समिती ठराव क्र.41दि.16/07/2011 अन्वये पुरवठादारास दि.01/08/2011 ते दि.31/07/2012 या 1 वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली. सदर मुदतवाढीच्या कालावधीसाठी पुरवठादाराशी दि.01/08/2011 रोजी रू.1000/- एवढया मुदांक शुल्काच्या पेपरवर करारनामा करण्यात आला. कार्यादेश क्र.मनपा/आस्था/592/2011-12 दि.30/07/2011 अन्वये कामाचे आदेश देतांना किमान वेतन कायद्यानुसार प्रती सुरक्षा रक्षक प्रतीमाह रू.10462/- या दराने 361 सुरक्षा रक्षक पुरविण्यासाठी अपेक्षित खर्च रू.4,53,21,384/- अधिक 3 टक्के सेवाशुल्क (सर्विस चार्ज) रू.13,59,641/- एकूण रू.4,66,81,025/- यावरील 12.36 टक्के दराने सेवाआकार (सर्विस टॅक्स) रू.57,69,775/- असा एकूण रू.5,24,50,800/- एवढा खर्च अपेक्षित असल्याने मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार पुरवठादाराशी करारनामा करतांना रू.52,100/- एवढे मुद्रांक शुल्काचा भरणा करणे आवश्यक होते. परंतु दि.01/08/2011 ते 31/07/2012 या कालावधीसाठी पुरवठादाराशी दि.06 ऑगस्ट 2011 रोजी करारनामा करतांना रू.1,000/- एवढया मुदांक शुल्क पेपरवर करारनामा करण्यात आला.

तदनंतर दि.24/01/2013 रोजी प्रत्येकी रु.5000/- याप्रमाणे 5 मुद्रांक पेपर रु.30,000/- एवढे मुद्रांक शुल्क भरणा केल्याचे दिसून येते. यावरुन विहीत रक्कमेपेक्षा रु.22,100/- एवढे कमी मुदांक शुल्क भरणा केल्याचे दिसून येते.

याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये करार एकदा केल्यानंतर दरवर्षी फेरकरार करण्याबाबत आणि नव्याने मुद्रांक लावण्याबाबत कायद्यात तरतूद नाही. अशी या महानगरपालिकेची धारणा आहे. सदर धारणा कृपया पक्की करावी. म्हणजे अनुपालन करणे सुलभ होईल. असे नमूद केले आहे. तथापि, विभागाने दि.01/08/2009 ते दि.31/07/2011 या 2 वर्षासाठी कार्यादेश क्र.मनपा/आस्था/365/24/2009 दि.31/07/2009 अन्वये तसेच दि.01/08/2011 ते दि.31/07/2012 या कालावधीसाठी कार्यादेश क्र.मनपा/आस्था/592/2011-12 दि.30/07/2011 अन्वये स्वतंत्र कार्यादेश देण्यात आले असून कार्यादेशानुसार विहीत कालावधीसाठी स्वतंत्र करारनामा केल्याचे दिसून येते. त्यामुळे करारनाम्याच्या कालावधीतील कामाच्या किंमतीनुसार मुद्रांक शुल्क भरणा करणे क्रमप्राप्त आहे.

4) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट "ड" प्रकरण 5(1) नुसार कंत्राटदाराशी करारनामा करून कामाचे आदेश देणे तसेच अधिनियमातील कलम 1(अ) व 1(ब)(2) नुसार सदर करारनामा महापालिकेच्या मुद्रेनिशी मुद्रांकित करणे आवश्यक आहे. परंतु दि.01/08/2011 ते दि.31/07/2012 या 1 वर्ष कालावधीसाठी केलेला करारनामा महापालिकेच्या मुद्रेनिशी मुद्रांकित केलेला नाही. याबाबत विभागाने खुलासा सादर करतांना अधिनियमातील तरतूदीनुसार करारनामा मुद्रांकीत करण्यात आल्याचे नमूद केले आहे. तथापि, कार्यवाही करणेत आल्याचे लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

5) पुरवठादारास उपरोक्त कार्यादेशान्वये दिलेली 1 वर्षाची मुदतवाढ संपल्यानंतर कार्यादेश क्र.मनपा/आस्था/595/2012-13 दि.30/03/2012 अन्वये दि.01/08/2012 ते दि.30/09/2012 (2महिने), कार्यादेश क्र.मनपा/आस्था/823/2012-13 दि.01/10/2012 अन्वये दि.01/10/2012 ते दि.30/10/2012 (2महिने), कार्यादेश क्र.मनपा/आस्था/1059/2012-13 दि.01/12/2012 अन्वये दि.01/12/2012 ते दि.31/01/2013 (2 महिने) अशी मुदतवाढ देण्यात आली. तदनंतर महासभा ठराव क्र.11 दि.14/12/2012 अन्वये सदर पुरवठादारास पुढील 3 वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आली.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट "ड" प्रकरण 5(1) नुसार पुरवठादारस कामाचे आदेश देण्यापुर्वी करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रमाणे दि.01/08/2012 ते 31/02/2013 या कालावधीत तसेच महासभा ठराव क्र.11 दि.14/12/2012 अन्वये 3 वर्षे मुदतवाढ देतांना पुरवठादाराशी करारनामा करण्यात आलेला नसल्यामुळे मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार शासनास मुदांक शुल्कापोटी प्राप्त होणाऱ्या महसुलाचे नुकसान झाले आहे. सदर कालावधीतील कंत्राटाच्या किंमतीचा तपशिल लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नसल्याने कंत्राटाच्या किंमतीची परिगणना करता आली नाही. तरी कंत्राट कालावधीतील कामाच्या किंमतीची परिगणना करुन विहीत मुदांक शुल्काची रक्कम शासनास भरणा करण्यात यावी.

6) दि.01/08/2011 ते दि.31/07/2012 या कालावधीत पुरवठादाराशी केलेल्या करारनाम्यातील अट क्र.9 नुसार पुरवठादाराने सुरक्षा अनामत रक्कम रू.5.00 लक्ष बँक गॅरंटी स्वरूपात कार्यादेशापासुन 7

दिवसांच्या आत देणे आवश्यक आहे. पुरवठादाराने बँक गॅरंटी स्वरूपात सुरक्षा अनामत सादर केल्याबाबत व सदर बँक गॅरंटीची मुदत कंत्राटाच्या कालावधीत वेळोवेळी वाढवुन घेण्यात आल्याबाबत साधार पुर्तता करण्याबाबत विभागास कळविण्यात आले असता विभागाने बँक गॅरंटीची मुदत वाढवून घेण्यात आल्याचे खुलाश्यात नमूद केले आहे. परंतू त्याची साधार पुर्तता दर्शविण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर खुलासा मान्य करता येत नाही.

7) करारनामातील अट क्र.27 मध्ये सुरक्षा रक्षक ज्या ठिकाणी कार्यरत आहेत, तेथील अधिकारी यांनी सुरक्षा रक्षकांची हजेरी प्रमाणित केल्याप्रमाणे प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या दिवसाप्रमाणे वेतन अदा केले जाईल, अशी तरतूद आहे. तसेच "The Contract Lebour Act (Regulation and Abolition) Cetral Rules 1971" मधील नियम 78 मधील कंत्राटी कामगारासाठी वेतनपट नोंदवही, कपात नोंदवही, जादा कामाचे नोंदवहीचे नमुने विहीत करण्यात आले असुन सदर विहीत नमुन्यातील नोंदी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. अधिनियमातील Form XVII मधील विहीत नमुन्यात कंत्राटी कामगाराचे हजेरी पत्रक ठेवणे आवश्यक आहे. परंतु करारनाम्यातील अटीनुसार व उपरोक्त अधिनियमातील तरतूदीनुसार सुरक्षा रक्षकांच्या उपस्थितीबाबत प्रमाणित केलेली हजेरी पत्रके/हजेरीच्या नोंदी, खर्चाच्या प्रमाणकासोबत लेखा परीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे त्याची पडताळणी करुन लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविता आले नाहीत.

8) करारनाम्यातील अट क्र.23 सुरक्षा रक्षकास किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा करणे तसेच अट क्र.24 नुसार सुरक्षा रक्षकांच्या वेतनाची प्रा.फंड/ग्रॅज्युएटी/बोनस/विमा/ वैद्यकीय सुविधा इ. सुविधा देण्याची जबाबदारी पुरवठादाराची आहे. त्यानुसार पुरवठादाराने सदर रक्कमा संबंधित प्राधिकरणाकडे भरणा केल्याबाबतची चलन सादर केल्यानंतर सदर रक्कमा पुरवठादारास देय आहेत. तथापी उपरोक्त प्रमाणक क्र.1794 दि.30/03/2013 अन्वये डिसेंबर 2012 व जानेवारी 2013 या कालावधीचे प्रदान करताना माहे ऑक्टोबर 2012 अखेर प्रा. फंडाची रक्कम चलन दि.26/12/2012 अन्वये भरणा केल्याचे प्रमाणका सोबतच्या चलनावरून दिसुन येते. परंतु माहे नोव्हेंबर 2012 मधील प्रा.फंडाची रक्कम भरणा केल्याची चलन प्रमाणकासोबत उपलब्ध नाही. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलासामध्ये मागील महिन्याची चलने देयकासोबत जोडल्याचे नमूद केले आहे. परंतू देयकासोबत सदर चलने लेखा परिक्षणास आढळून आली नाहीत.

09) किमान वेतन कायद्यानुसार तसेच करारनाम्यातील अट क्र.24 नुसार सुरक्षा रक्षकांच्या मासिक वेतनातील 4.75 टक्के रक्कम राज्य कामगार विमा योजनेकडे (E.S.I.C.) भरणा करणे आवश्यक आहे. त्याबाबतचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत त्यामुळे महिनानिहाय पुरवठादारास केलेल्या प्रदानाची पडताळणी करुन प्रतिमहा 4.75 टक्के प्रमाणे राज्य कामगार विमा योजनेकडे भरणा केल्याची लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

10) किमान वेतन कायद्यानुसार तसेच करारनाम्यातील अट क्र.24 नुसार सुरक्षा रक्षकांच्या मासिक वेतनातील 4.00 टक्के ग्रॅज्युटीची रक्कम पुरवठादाराच्या प्रदानात समाविष्ठ आहे. त्यानुसार सदर योजनेचा लाभ कंत्राटी कामगाराना देण्यात आलेबाबत लेखा परीक्षणास साधार पूर्तता दर्शविण्यात आली नाही.

11) प्रमाणक क्र.1794 दि.30/03/2013 अन्वये डिसें-2012 ते जाने-2013 या कालावधीत प्रदान

करण्यात आलेले देयकासोबत जोडलेल्या चलन क्र.80111 दि.02/02/2013 अन्वये पुरवठादाराने माहे सप्टे-2012 अखेर सर्विस टॅक्स भरणा केला आहे. माहे ऑक्टो-2012 व नोव्हें-2012 मधील सर्विस टॅक्स शासन जमा केल्याबाबत चलन सादर केले नसतांना माहे डिसें-2012 व जाने-2013 या कालावधीच्या देयकात पुरवठादारास सर्विस टॅक्सचे प्रदान करण्यात आले आहे. माहे ऑक्टो-2012 व नोव्हें-2012 मधील सर्विस टॅक्स शासन जमा केल्याबाबत चलनाच्या छायांकीत प्रती खुलाश्या सोबत सादर केल्या आहेत. परंतू सदरची मुळ चलने लेखा परिक्षणास पडताळणीस उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे चलनांची पडताळणी करुन लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.81,100/-
आक्षेपाधिन रक्कम रू.1,20,94,385/-
FDSANMM7201 (Ref No : 99, Hmm No : 116)

91 विदतीय नोंद पध्दतीने लेखे ठेवणेसाठी सनदी लेखापालास महानगरपालिकेने केलेल्या प्रदानातील अनियमिततेबाबत.

लेखा विभाग

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 06

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

महापालिकेच्या लेखा विभागाने Accrual Based Double Entry Accounting System पध्दतीने लेखे ठेवण्यासाठी सनदी लेखापालाची नेमणूक केली आहे. अदयापपर्यंत मनपाचा अधिकारी / कर्मचारीवर्ग हे काम करीत नाही. म्हणजेच ठेकेदाराने करारनाम्यानुसार त्यांना प्रशिक्षण दिल्याचे दिसुन येत नाही. वित्तीय वर्ष 2008-09 चा दुहेरी नोंद पध्दतीचा वार्षिक अहवाल 18/06/2011 रोजी मुख्य लेखापरिक्षक यांच्याकडे तपासणीसाठी प्राप्त झाला असून दि.28/03/2012 रोजी मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून दिलेला आहे. सदर अहवाल उशिराने तयार करण्यात आलेला असून तो वर्ष संपल्यानंतर लवकरात लवकर करणे आवश्यक होते. दुहेरी नोंद पध्दतीचे लेखे राष्ट्रीय म्युन्सिपल लेखा पुस्तिकेनुसार ठेवण्यात आलेले नाहीत.

महापालिकेच्या लेखा विभागाने Accrual Based Double Entry Accounting System पध्दतीने लेखे ठेवण्यासाठी सनदी लेखापालाची नेमणूक केली आहे.
निविदा नोटीस 13-4-2009 महाराष्ट्र टाईम्स, दी टाईम्स ऑफ इंडीया.
निविदा मंजुरी M/s. AMN & Associates,Chartered Accountants,Bhandup (E), Mumbai -400042

स्थायी समिती मंजुरी - ठराव क्रमांक 11/10-6-2009
Acceptance letter No.MBMC/AAC/57/2009-10, dated 04-07-2009
Work Order No.MBMC/Lekha/90/2009-10 dated 23-07-2009
01/07/2009 to 31/03/2010 and 3 financial year i.e. 01-04-2010 to 31-03-2013 Succssful Commissioning Implementation of double Entry Accounting System Rs.1585000/- +Service tax
Facility Management Services Contract- Rs.350000/- + Service tax per year (For three year)
करार दि.10/07/2009
मनपाने ठेकेदारास लेखा परीक्षण काळात प्रमाणक क्र.370 दि.05 /07/2012 अन्वये रक्कम रु.4,37,068/- चे प्रदान केले आहे. एकुण प्रदानाची रक्कम रु.14,86,022/-

लेखा परीक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन क्र.55 दि.22/09/2015 अन्वये व्दिनोंदी पध्दतीचे लेखे ठेवणेबाबत खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र. निरंक दि. निरंक अन्वये केलेला खुलासा व अभिलेखे विचारात घेता याकामासंबंधी लेखा परीक्षणात पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) कामाच्या निविदा नोटीसमध्ये अट क्र.1,2 व काराराती‌ल अटी व शर्त 2 (क) अन्वये मनपाच्या अधिकारी/ कर्मचा-यांना 01/07/2009 ते 31/03/2010 या कालावधीमध्ये दुहेरी नोंद लेखा पध्दतीचे प्रशिक्षण ठेकेदाराने द्यायचे आहे. जेणेकरून ठेक्याचा कालावधी संपल्यावर मनपाचे स्वत:चे अधिकारी / कर्मचारी सदरचे काम सुरु शकतील. परंतु अदयापपर्यंत मनपाचा अधिकारी / कर्मचारीवर्ग हे काम करीत नाही. म्हणजेच ठेकेदाराने त्यांना कामाच्या टप्प्यानुसार प्रशिक्षण दिल्याचे दिसुन येत नाही.

2) वित्तीय वर्ष 2008-09 चा दुहेरी नोंद पध्दतीचा वार्षिक अहवाल 18/06/2011 रोजी मुख्य लेखापरिक्षक यांच्याकडे तपासणीसाठी प्राप्त झाला असून दि.28/03/2012 रोजी मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून दिलेला आहे. सदर अहवाल उशिराने तयार करण्यात आलेला असून तो मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 106(3) नुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर मागील वर्षाच्या लेख्यावरचा अहवाल/वार्षिक लेखे स्थायी समिती पुढे सादर करण्यासाठी वर्ष संपल्यानंतर लवकरात लवकर तयार करणे आवश्यक होते. याबाबत ठेकेदारांनी योग्य ती कार्यवाही वेळेत केली नाही.

3) 2012-13 या वित्तीय वर्षाचा वार्षिक अहवाल अदयाप तयार करण्यात आल्याचे दिसून येत नाही. अनुपालनामध्ये सादर केलेला दुहेरी नोंद पध्दतीचा अहवाल केवळ मुख्य लेखाधिकारी यांच्या स्वाक्षरीने सादर केलेला असून दुहेरी नोंद पध्दतीचे लेखे राष्ट्रीय म्युन्सिपल लेखा पुस्तिकेनुसार ठेवण्यात आलेले नाहीत.

4) एजन्सीने (CA) कामाच्या प्रगतीबाबतचे तक्ते करारनाम्यातील अट क्र.18 नुसार मुख्य लेखा अधिकारी यांच्याकडे दिल्याचे दिसून येत नाही.

5) देयक अदा करताना 40% निधी राखीव ठेवायचा असून (करारनाम्यातील अट क्र.11 नुसार) मुख्य लेखाधिकारी यांनी समाधानकारक काम केल्याचा दाखला दिल्यानंतर सदरची देय रक्कम अदा करावयाची आहे. परंतु त्याचप्रमाणे अदा देयकांच्याबाबत 40% निधी राखीव ठेवल्याचे दिसून येत नाही.

6) करारनाम्यातील अट क्र. 2 नुसार Staffing Pattern (दुहेरी नोंदपध्दतीनुसार) लेखा विभागासाठी सुचित करावयाचा आहे. त्यानुसार महानगरपालिकेस कर्मचारी आकृतीबंध सुचवल्याचे दिसून आले नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 103, Hmm No : 55)

कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

निरंक

भाग दोन

सर्वसाधारण अनियमितता

कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

92 उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाचे कामकाजातील अनियमिततांबाबत.

अभ्यास दौरा

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 04

लेखा शीर्ष :उद्यान व वृक्षप्र मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 630000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 630000.00/-

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 190(1) नुसर ठेवींची नोंदवही नमुना 147 मध्ये ठेवली नाही. वसुली पावती पुस्तकांचा हिशोब ठेवला नाही. वर्षभरात वृक्षप्राधिकरण समितीच्या केवळ 2 बैठका घेतल्या आहेत. अभ्यास दौऱ्या मुळे कामकाजात सुधारणा झाल्याचे सक्षम अधिकारी म्हणुन आयुक्त तथा सभापती वृक्षप्राधिकरण समिती यांनी प्रमाणित केले नाही.

उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाचे कामकाजातील अनियमिततांबाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.06 दि.13/08/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्याचा खुलासा पत्र क्र.344 दि.02/09/2015 रोजी केला असून, तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागामार्फत खाजगी जागेतील धोकादायक झाडांची छाटणी करण्यासाठी किंवा झाड काढून टाकणे अशा कामासाठी मनपाचे कर्मचारी ट्रॅक्टर व इतर साधन -सामुग्री वापरण्यात येते. झाडे लावण्यासाठी अर्जदाराकडून / विकासकाकडून प्रती झाड रु.2500/- अनामत घेण्याबाबत वृक्षप्राधिकरण ठराव क्र.69 दि.02/06/2007 अन्वये मंजुरी दिलेली आहे. लेखापरीक्षण कालावधीत उद्यान विभागाने अनामत रक्कम रु.35000/- जमा केल्याचे वसुली पावत्या व पोटकिर्दीवरुन दिसून येते. अशा अनामतीची नोंद घेणारे रजिस्टर उद्यान विभागाने ठेवले आहे. वृक्षप्राधिकरण समितीच्या ठरावानुसार अनामत जमा करुन संबंधिताने 1 वृक्ष काढल्याबद्दल - 2 वृक्ष लावुन ते जगवणे बंधनकारक आहे. अनामत जमा केल्याच्या तारखे पासून 1 वर्षा नंतर झाडे जिवंत असल्याची खात्री / चौकशी विभागाकडून केल्यानंतर अनामतीची रक्कम परत करावयाची आहे. तसेच जुने झाड तोडल्या नंतर 6 महिन्यानंतर 2 वृक्ष लावले नाही. तर अशा अर्जदाराची अनामत जप्त केली जाणार असल्याची तरतूद आहे. परंतू याबाबतचे अभिप्राय व कार्यवाही संबंधीत नोंदवहीत नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 190(1) नुसार सर्व ठेवींची नोंद नमुना 147 मध्ये घेतली पाहिजे. तसेच 190(2) नुसार वर्षाअखेर प्रत्येक ठेवींची अदत्त शिल्लक पुढील वर्षाच्या नोंदवहीत अग्रेषित

करावयाची आहे. तशी कारवाई विभागाने केली नाही. नियम 190(3) नुसार 03 वर्षापेक्षा जास्त मुदती पर्यंत मागणी न केल्यास अनामतीची रक्कम व्यापगत करुन निधीच्या खाती जमा केल्या पाहिजेत. तशी कारवाई विभागाने केली नाही. वृक्ष तोडणी डिपॉझीट नोंदवही नूसार2007-08 पासून2009-2010 पर्यंत एकुण शिल्लक अनामतीची रक्कम रु.5,95,000/- आहे. सदरची रक्कम व्यापगत करणे आवश्यक आहे किंवा विकासकाने विभागाच्या नियमानूसार झाडे लावली नाहीत, तर जप्त करणे आवश्यक आहे. विभागाने झाडे लावली किंवा नाही याबाबत विभागाने अभिलेखे ठेवले नाहीत. त्यामुळे सदर अनामतीची रक्कम जप्त करण्यात यावी.

2) उद्यान विभागाकडे अधिक्षकाची 2 पदे आहेत (भाईंदर व मिरा रोड) दोन्ही विभागांनी वृक्षतोड फी व अनामत वसुलीसाठी प्रत्येकी 3 पावती पुस्तके वापरली आहेत. या पावती पुस्तकांची साठा नोंदवही ठेवली नाही.

3) महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम1975 अन्वये वृक्षप्राधिकरण निधीची स्थापना केली आहे. तसेच वृक्षप्राधिकरण समिती अस्तित्वात आहे. लेखापरिक्षण कालावधीत (2012-13) वृक्षप्राधिकरण समितीच्या 02 बैठका(दि.11/02/2013,27/02/2013) झाल्याचे विभागाचे हजेरी नोंदवही नुसार दिसून येते. सदर बैठकीची इतिवृत्त उपलब्ध झाली नाहीत. इतिवृत्त नसल्याने विभागाने मंजूर केलेली कामे पडताळणी करता आली नाहीत. या अधिनियमातील नियम क्र.02 नुसार 45 दिवसांत किमान 1 बैठक अपेक्षित असताना, विभागाने वर्षभरात केवळ 2 बैठका घेतल्या आहेत. म्हणजे वर्षभरात 6 बैठका कमी घेतल्या आहेत.

4) वृक्षप्राधिकरण समिती सदस्य व अधिकारी यांच्या 5 दिवसांचा अभ्यास दौरा उदयान विभागाचे कामात सुधारणा करणेसाठी पश्चिम बंगाल व सिक्कीम या ठिकाणी माहे मार्च2013 मध्ये गेला होता. यासाठी वृक्षप्राधिकरण समिती ठराव क्र.04 दि.27/02/2013 अन्वये मंजुरी दिली आहे. यासाठी प्रमाणक क्र.1781 दि.30/03/2013 रु.630000/- मे.श्रीनिश टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स यांना मनपा फंडातून प्रधान केले आहे. वृक्षप्राधिकरणाचे 4 सदस्य व 3 अधिकारी अशा एकुण 7 जणांनी अभ्यास दौरा केला असून त्यासाठी 07Xरु.90000=रू.630000/- खर्च केल्याचे मे.श्रीनिश यांच्या पावतीवरून दिसून येते. म्हणजे 14 सदस्य असलेल्या समितीचे केवळ 4 सदस्यच अभ्यास दौऱ्यासाठी गेले होते. या कामासाठी स्थायी समितीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिमियमाचे कलम 5(2)(2) अन्वये ठराव क्र.57 दि.21/03/2013 अन्वये रु.11 लाख रक्कमेस मंजुरी दिली आहे. महाराष्ट्र(नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 नुसार अभ्यास दौऱ्याचे उद्दिष्ट - उदयान विभागाचे कामात सुधारणा करण्याचे होते. फलनिष्पत्ती अहवाल लेखा परीक्षणास उपलब्ध करून दिला नाही. मे.श्रीनिश टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स यांच्या पावतीवर तपशीलवार खर्चाचा उल्लेख नाही. अभ्यास दौरा झाल्यानंतर उद्यान विभागाच्या कामात सुधारणा अपेक्षित होती. त्यानुसार सुधारणा झाल्याचे सक्षम अधिकारी म्हणुन आयुक्त तथा सभापती, वृक्षप्राधिकरण समिती यांनी प्रमाणित केले नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु.630000/-

DATPMVM6001 (Ref No : 1, Hmm No : 06)

93 गुंतवणुका व त्यावर मिळालेल्या व्याजाबाबत.

मनपाने केलेल्या गुंतवणुका

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 12311334.00 /-

भविष्य निर्वाह निधी योजना निधीतुन कर्मचाऱ्यांना दिलेले व्याज व निधीच्या शिल्लकेवर बँकेकडून मिळालेले व्याज यात रक्कम रू.1566886/- ची तफावत आहे. ही तफावत दुर करण्यासाठी आस्थापना विभागाने प्रयत्न केला नाही. परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना निधीतुन कमचाऱ्यांना दिलेले व्याज व निधीच्या शिल्लकेवर बँकेकडून मिळालेले व्याज यात रक्कम रू.308558/- ची तफावत आहे. गुंतवणुक करतांना योग्य ती खबरदारी घेतली नाही व संबंधित कर्मचाऱ्यांना 2005-06 ते 2012-13 अखेर शिल्लक रक्कमेचे विवरणपत्र दिले नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने ठेवलेली गुंतवणुक नोंदवही नमुना क्र.142 मधील लेखा परीक्षण काळातील नोंदी तपासल्या दि.31/03/2013 पर्यंत असलेली गुंतवणुकीची स्थिती पुढील प्रमाणे.

अ.क्र.	पुष्ठ क्र.	निधीचे नांव	मुद्दल रू.	व्याज रू (2012-13)	नविन गुंतवणुक रू	एकूण रक्कम रु दि.31.03.13 अखेर
1	69	Pension Fund	146618186	16061337	-	162679523
2	73	Tree Fund	8022945	752968	-	8775913
3	74	Provident Fund	156688661	9519071	5000000	171207732
4	83	Defined Pension Fund	30855765	357214	-	31212979
5	79	Road Fund	162928	17072	-	180000
6	80	Salary Reserve Fund	57684164	5837491	-	63521655
7	84	Depreciation	14889433	1435104	-	16324537
8	86	General Fund	1352710	130983	-	1483693
9	87	Development	4721803	475343	-	5197146

		Fund				
10	88	Employee Welfare Fund	4596889	325573	-	4922462
11	89	Water Supply Reserve Fund	175052514	8066235	-	183118749
12	92	MMRDA Loan Repay Fund	904839882	12423888	35578230	138442000
13	95	JNNURM	562000	-		562000
14	97	Fire Fund	-	-	90000000	90000000
		TOTAL	691647880	55402279	130578230	877628389

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम 187 नुसार नमुना क्र.142 मध्ये गुंतवणुक नोंदवही ठेवली आहे. नोंदवहीतील नोंदी सक्षम अधिकाऱ्यांने साक्षांकित केल्या आहेत. दि.31/03/2013 अखेर शिल्लक रु.87,76,28,389/- इतकी आहे. गुंतवणुका बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.47 दि.15/09/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र.163/2015-16 दि.08/10/2015 अन्वये केला असुन, तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) भविष्य निर्वाह निधीच्या खात्यावर 8.8% दराने व्याज कर्मचाऱ्यांना दिले आहे. भारतीय स्टेट बँकेत 09 ते 11 वर्षापासून गुंतवणुक करताना व्याज 7.5%पासून ते 8.75% मिळाल्याचे दिसून येते. बँकांचा सर्वसाधरण व्याज दर सतत बदलत असतो. भविष्य निर्वाह निधीच्या खात्यावर गेल्या 09 ते 11 वर्षापासून बँकेचे व्याज कमी मिळाल्याने या योजनेवर (कर्मचा-यांना देय व्याज) करावा लागणारा खर्च म्हणजे द्यावे लागणारे व्याज जास्त आहे. त्यामुळे तफावत रक्कम रू.1566886/- दिसून येते. ही तफावत दुर करण्यासाठी आस्थापना विभागाने स्थायी समिती / महासभेकडे संदर्भाकित विषयाबाबतचा प्रस्ताव सादर केला नाही.

2) परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना - शासन निर्णय वित्त विभाग क्र. अंनियो 1005/126/सेवा.4 दि.31/10/2005 अन्वये दि.01/11/2005 पासुन लागु करण्यात आली त्यानुसार नोव्हेंबर 2005 पासून सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांचे मुळ वेतन + महागाई भत्ता कपात करुन, ती रक्कम परिभाषिक अंशदान निधीच्या खाती जमा करायची आहे. तसेच समतुल्य अंशदान मनपाने दयायचे आहे. या योजनेतील स्वतंत्र खाते ठेवले आहे. 2012-13 मध्ये या खात्यावर कर्मचारी वर्गणी + मनपा अंशदान म्हणुन एकुण रक्कम रु.12311334/- जमा केली आहे. योजनेतून कर्मचाऱ्यांना दिलेल व्याज व निधीच्या शिल्लकेवर बँकेकडून मिळालेले व्याज यात रू.308558/- ची तफावत आहे. तफावत दुर करण्यासाठी आस्थापना विभागाने स्थायी समिती / महासभेकडे संदर्भाकित विषयाबाबतचा प्रस्ताव सादर केला नाही. भविष्यात या योजनेचया निधीतून कमचाऱ्यास त्याच्या खाती असलेल्या व्याजासह प्रदान करावयाची असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 92(2) नुसार स्थायी समितीच्या मंजुरीने जास्तीत-जास्त व्याज देण्याऱ्या राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक / पूर्नगुंतवणुक करावी.

3) परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु झाल्यापासुन आस्थापना विभागाने संबंधित

कर्मचाऱ्यांना वर्ष अखेर त्यांच्या खाती शिल्लक असलेल्या रक्कमेचे 2005-06 ते 2012-13 पर्यंत विवरणपत्र दिलेले नाही. आस्थापना विभागाने शासन निर्णय दि.31/10/2005 नुसार उचित कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

DATPMVM6001 (Ref No : 8, Hmm No : 47)

94 रा.म.क्र.08 वरील काशिमिरा जनता नगर येथील कब्रस्तानमध्ये पाथवे तयार करणे कामातील अनियमितता.

अल्प संख्याक विकास

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग शासन निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 948628.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 931612.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 17016.00/-

महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तीका परिच्छेद क्र.150 नुसार स्विकृत निविदा 13.51% कमी दराने प्राप्त झाल्याने सुधारीत कपातीचे अंदाजपत्रक तयार केले नाही. स्वामित्व धनाची रक्कम रू.17016/- वसुल केल्याची खात्री करून प्रदान केले नाही. काम वेळीच न केल्याने अनुदानाची अखर्चित रक्कम रू.5.79 लक्ष असल्याचे दिसून येते.

रा.म.क्र.08 वरील काशिमिरा जनता नगर येथील कब्रस्तानमध्ये पाथवे तयार करणे.

प्राकलन :- रु.10 लाख

प्रशासकिय मंजूरी:-क्र.नियो/आस्थाविका/प्रभा/टे-1/55/12, दि.05/09/2012

तांत्रिक मंजुरी :- क्र.928, दि.31/03/2012

निविदा तारीख :- दि.26/04/2012, फ्रि-प्रेस जर्नल, नवशक्ती, वेबसाईट

एल-1 निविदा :- मे.राठोड ब्रदर्स, भाईंदर (प.), 13.51% कमी दराने

निविदा मंजुरी :- स्थायी समिती सभा ठराव क्र.25 दि.17/05/2012

करार :- दि.25/05/2012

कार्यादेश :- मनपा/सांबा/कार्या/91/2012-13 दि.16/05/2012

मुदत :- 02 महिने

काम पुर्ण : दि.01/08/2012 (विलंब दंड रु.17,000/- वसुल केला आहे.)

खर्च :- प्र.क्र.994 दि.02/11/2012. रु.9,48,628/- मोजमाप पु. क्र.641, पृष्ठ क्र.79 ते 82.

या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.70 दि.28/09/2015 रोजी निर्गमित केले

होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र. निरंक दि.08/10/2015 अन्वये केला असुन, तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) कामाची निविदा प्राकलन दराच्या 13.51% कमी दराची स्विकारली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.150 नुसार - स्विकृत निविदेचा दर प्राकलन दराचे 10% किंवा यापेक्षा कमी दराने प्राप्त झाल्याने, प्राप्त निविदा दराप्रमाणे सुधारीत प्राकलन + 5% आकस्मिक खर्चाच्या तरतुदीसह तयार केले नाही. मुळ अंदाजपत्रक रद्द करून कपातीचे अंदाजपत्रक तयार करून कामासाठी वापरले नाही.

2) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम - 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारे व उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, भुकटी, गोटे, बारीख खडी, मुरुम, वाळू यांवर स्वामित्व धनाची रक्कम प्रति ब्रास रु.200/- वसुल करुन शासन खाती (महसुल व वन) भरणा करायची आहे. परंतू या प्रकरणी गौण खनिजाची रक्कम वसुल केल्याचे दिसून येत नाही.

साहित्याचे नाव	परिमाण
Sand	33.38cmt.
Agg	77.25
Rubble	76.76
40 MM	53.41
Total :-	240.80

÷ 2.83 = 85.08 ब्रास X 200 = रु. 17,016/-

सबब रक्कम रु.17,016/- वसुलपात्र आहे.

3) अल्पसंख्यांक विकासाकरीता अनुदान रु.20 लाख प्राप्त झाले असून त्यापैकी महानगरपालिकेने केलेल्या एकूण दोन कामांवर एकूण खर्च रु.14.21 लाख केला आहे. म्हणजेच दि.31/03/2013 अखेर अनुदानापैकी रक्कम रु.5.79 लाख अखर्चित असल्याचे दिसून येते. विभागाने केलेल्या खुलाश्यानुसार अखर्चीत रक्कमेचे प्रदान पुढील वर्षात केल्याचे नमुद केले आहे. परंतु संबंधित अभिलेखे न दाखविल्याने लेखा परीक्षणाची खातरजमा करता आली नाही.

वसुलपात्र रक्कम रू. 17016/-

आक्षेपाधिन रक्कम रू. 931612/-

DATPMVM6001 (Ref No : 11, Hmm No : 70)

95 घोडबंदर रस्ता वर्सोवा नाका ते पुलापर्यंत पुन:पृष्टीकरण करणे कामातील अनियमितता.

नागरी दलित वस्ती

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग शासन निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 3104478.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3000280.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 104198.00/-

महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तीका परिच्छेद क्र.150 नुसार स्विकृत निविदा 16.03% कमी दराने प्राप्त झाल्याने सुधारीत कपातीचे अंदाजपत्रक तयार केले नाही. मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार - विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी कामास प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केल्याचा अहवाल प्राप्त झाला नाही. स्वामित्व धनाची रक्कम रू.104198/- वसुल केली नाही.

घोडबंदर रस्ता वर्सोवा नाका ते पुलापर्यंत पुन:पृष्टीकरण करणे.

प्राकलन :- रु.35 लाख

प्रशासकिय मंजूरी:-मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील आदेश क्रमांक 50/2012 दि.05/09/2012.

तांत्रिक मंजुरी :- श.अ. दि.26/04/2012

निविदा तारीख :- दि.26/04/2012, फ्रि-प्रेस जनरल, मनपा वेबसाईट

एल-1 निविदा :- मे. एम.ई. प्रोजेक्ट प्रा.लि., 16.03% कमी दराने

निविदा मंजुरी :- स्थायी समिती सभा ठराव क्र.24 दि.17/05/2012.

करार :- दि.19/06/2012

कार्यादेश :- मनपा/सांबा/कार्या/103/2012-13 दि.17/05/2012

मुदत :- चार महिने

काम पुर्ण : दि.03/12/2012 (विलंब दंड रु.10,500/- वसुल केला आहे.)

खर्च :- प्र.क्र.05 दि.30/03/2013. रु.31,04,478/- मोजमाप पु. क्र.686 पृष्ठ क्र.80 ते 85.

या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.71 दि.28/09/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र. निरंक दि.08/10/2015 अन्वये केला असुन, तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) कामाची निविदा प्राकलन दराच्या 16.03% कमी दराची स्विकारली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.150 नुसार - स्विकृत निविदेचा दर प्राकलन दराचे 10% किंवा यापेक्षा कमी दराने प्राप्त झाल्याने, प्राप्त निविदा दराप्रमाणे सुधारीत प्राकलन + 5% आकस्मिक खर्चाच्या तरतुदीसह तयार केले नाही. मुळ अंदाजपत्रक रद्द करून कपातीचे अंदाजपत्रक तयार करून कामासाठी वापरले नाही. या कामासाठी एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या

मे. एम. ई प्रोजेक्ट 16.03% कमी दराने

मे. आशापुरा कन्स्. कंपनी 14.40% कमी दराने

मे. गजानन कंपनी 7.30% कमी दराने

सदर कामासाठी 16.03% कमी दराची अनियमित निविदा मंजूर केली आहे.

2) मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील आदेश क्रमांक 50/2012 दि.05/09/2012 मधील अ.क्र. 06 नुसार विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी शासन निर्णयानुसार या कामास प्रत्यक्ष भेट देवून तपासणी करावयाची आहे. परंतू तपासणीचा अहवाल लेखा परीक्षणास उपलब्ध झाला नाही.

3) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम - 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारे व उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, भुकटी, गोटे, बारीख खडी, मुरुम, वाळू यांवर स्वामित्व धनाची रक्कम प्रति ब्रास रु.200/- वसुल करुन शासन खाती (महसुल व वन) भरणा करायची आहे. परंतू या प्रकरणी गौण खनिजाची रक्कम वसुल केल्याची खात्री करून प्रदान केल्याचे दिसून येत नाही.

साहित्याचे नाव	परिमाण
grit powder	554.64 cmt.
40 MM and above	919.77
Total :-	1474.41

÷ 2.83 = 520.99 ब्रास X 200 = रु.1,04,198/-

सबब रक्कम रु.1,04,198/- वसुलपात्र आहे.

वसुलपात्र रक्कम रू. 104198/-

आक्षेपाधिन रक्कम रू. 3000280/-

DATPMVM6001 (Ref No : 12, Hmm No : 71)

96 घोडबंदर येथील रेतीबंदर ते मॉडर्न पर्यंतचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

नागरी दलित वस्ती

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग शासन निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 4419264.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4280742.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 138522.00/-

महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तीका परिच्छेद क्र.150 नुसार स्विकृत निविदा 16.30% कमी दराने प्राप्त झाल्याने सुधारीत कपातीचे अंदाजपत्रक तयार केले नाही. मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार - विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी कामास प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केल्याचा अहवाल प्राप्त झाला नाही. स्वामित्व धनाची रक्कम रू.138522/- वसुल केली नाही.

घोडबंदर येथील रेतीबंदर ते मॉडर्न पर्यंतचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

प्राकलन :- रु.4999800/-

प्रशासकिय मंजूरी:-मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील आदेश क्रमांक 50/2012 दि.05/09/2012. व स्थायी समिती ठराव क्र.:-107 दि.01.02.2012

तांत्रिक मंजुरी :- श.अ. 48 / 2012-2013 दि.01.02.2012

निविदा तारीख :- दि.26/04/2012, फ्रि-प्रेस जनरल, मनपा वेबसाईट

एल-1 निविदा :- मे. एम.ई. प्रोजेक्ट प्रा.लि., 16.30% कमी दराने

निविदा मंजुरी :- स्थायी समिती सभा ठराव क्र.24 दि.17/05/2012.

करार :- दि.19/06/2012

कार्यादेश :- मनपा/सांबा/कार्या/104/2012-13 दि.17/05/2012

मुदत :- दोन महिने. पावसाळा असल्याने आयुक्तांनी मुदत वाढ दि.15/02/2013 पर्यंत दिली आहे.

काम पुर्ण : दि.15/02/2013

खर्च :- प्र.क्र.06 दि.30/03/2013. रु.4419264/- मोजमाप पु. क्र.831 पृष्ठ क्र.28 ते 33.

या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.72 दि.28/09/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र. निरंक दि.08/10/2015 अन्वये केला असुन, तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) कामाची निविदा प्राकलन दराच्या 16.30% कमी दराची स्विकारली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका परिच्छेद क्र.150 नुसार - स्विकृत निविदेचा दर प्राकलन दराचे 10% किंवा यापेक्षा कमी दराने प्राप्त झाल्याने, प्राप्त निविदा दराप्रमाणे सुधारीत प्राकलन + 5% आकस्मिक खर्चाच्या तरतुदीसह तयार केले नाही. मुळ अंदाजपत्रक रद्द करून कपातीचे अंदाजपत्रक तयार करून कामासाठी वापरले नाही. या कामासाठी एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या

मे. एम. ई प्रोजेक्ट 16.30% कमी दराने

मे. आशापुरा कन्स्. कंपनी 14.40% कमी दराने

मे. गजानन कंपनी 7.30% कमी दराने

सदर कामासाठी 16.30% कमी दराची अनियमित निविदा मंजूर केली आहे.

2) मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील आदेश क्रमांक 50/2012 दि.05/09/2012 मधील अ.क्र.06 नुसार विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी शासन निर्णयानुसार या कामास प्रत्यक्ष भेट देवून तपासणी करावयाची आहे. परंतू तपासणीचा अहवाल लेखा परीक्षणास उपलब्ध झाला नाही.

3) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम - 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारे व उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, भुकटी, गोटे, बारीख खडी, मुरुम, वाळू यांवर स्वामित्व धनाची रक्कम प्रति ब्रास रु.200/- वसुल करुन शासन खाती (महसुल व वन) भरणा करायची आहे. परंतू या प्रकरणी गौण खनिजाची रक्कम वसुल केल्याची खात्री करून प्रदान केल्याचे दिसून येत नाही.

साहित्याचे नाव	परिमाण
40 mm	735.82 cmt.
hard murum	239.23
40 mm	735.82
hard murum	249.23
Total :-	1960.10

÷ 2.83 = 692.61 ब्रास X 200 = रु.1,38,522/-

सबब रक्कम रु.1,38,522/- वसुलपात्र आहे.

वसुलपात्र रक्कम रू. 138522/-
आक्षेपाधिन रक्कम रू. 4280742/-
DATPMVM6001 (Ref No : 13, Hmm No : 72)

97 पल्स पोलिओ मोहिमेंतर्गत अदा केलेल्या अग्रिम रकमांचे समायोजन विलंबाने केल्या बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 01

लेखा शीर्ष :आरोग्य विभाग मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड

मिरा भाईदर मनपा वैद्यकिय विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या पल्स पोलिओ लसिकरण मोहिमेसाठी महानगरपालिका फंडातुन दि.23 ऑगस्ट, 2010 रोजी रु.1,57,830/- एवढे अग्रिम व दि.18 जुलै 2010 रोजी रु.1,56,090/- एवढे अग्रिम रक्कमेचे प्रदान करण्यात आले. सदर अग्रीम रकमांचे समायोजन अग्रीम मंजूरी पासून 90 दिवसाच्या आत समायोजित न करता 18 महिने विलंबाने समायोजन करण्यात आले आहे. अग्रिम रकमांचे समायोजन विहीत कालावधीत पूर्ण न करता विलंबाने करण्यात आले आहे.

मिरा भाईदर मनपा वैद्यकिय विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या पल्स पोलिओ लसिकरण मोहिमेसाठी महानगरपालिका फंडातुन दिलेल्या अग्रीम रकमांचे लेखापरीक्षण केले असता लेखापरीक्षणाचेवेळी अर्धसमास ज्ञापनपत्र क्रमांक 68 दिनांक 28/09/2015 अन्वये खुलासा विचारणेत आला होता. सदर अर्धसमास पत्रासंदर्भात महापालिकेने त्यांच्या पत्र क्रमांक 2267, दिनांक 7/10/2015 अन्वये केलेल्या खुलाशात सदर खर्चाचे समायोजन आरोग्य केंद्र स्तरावरून वेळेवर न झाल्याने अग्रीमाचे समायोजन विहित मुदतीत झाले नाही असे नमूद केले आहे. तरी लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

मिरा भाईदर मनपा वैद्यकिय विभागांतर्गत दि.23 ऑगस्ट, 2010 रोजी राबविण्यात आलेल्या पल्स पोलिओ लसिकरण मोहिमेसाठी महानगरपालिका फंडातुन रु.1,57,830/- एवढी अग्रिम रक्कमेचे प्रदान करण्यात आले. सदर अग्रिमातुन रु.1,56,450/- एवढा खर्च झाला असुन उर्वरित रक्कम रु.1380/- दि.19.04.2012 रोजी चलनाव्दारे मनपा फंडात भरणा करण्यात आली आहे. सदर अग्रिमाचे समायोजन प्रमाणक क्र.1648 दि.19.03.2013 अन्वये करण्यात आले. तसेच दि.18 जुलै 2010 रोजी राबविण्यात आलेल्या पल्स पोलिओ मोहिमेसाठी मनपा फंडातुन रु.1,56,090/- एवढी अग्रिम रक्कम

अदा करण्यात आली असुन सदर अग्रिम रक्कम समायोजन प्रामणक क्र.1649 दि.19.3.2013 अन्वये करण्यात आले आहे.

दि.23.08.2010 रोजी अदा केलेल्या अग्रिम रकमेपैकी शिल्लक रक्कम रु.1380/- तात्काळ मनपा फंडात भरणा न करता 1.6 वर्ष विलंबाने दि.19/04/2012 रोजी भरणा करण्यात आली. नगरपालिका लेखासंहितेच्या नियम 244 व 245 नुसार 90 दिवसांच्या आत अग्रिम रकमेचे समायोजन करणे आवश्यक आहे. तथापि, विभागाने उपरोक्त नगरपालिका लेखासंहितेच्या नियमांचे उल्लंघन करुन जूलै व ऑगस्ट -2010 मध्ये प्रदान केलेल्या अग्रिम रकमांचे अग्रिम मंजुरी पासुन 90 दिवसांच्या आत समायोजन न करता 18 महिने विलंबाने समायोजन करण्यात आले आहे. अग्रिम रकमांचे समायोजन विहीत कालावधीत पूर्ण न करता विलंबाने करण्यात आले आहे.

DATAMSM6401 (Ref No : 16, Hmm No : 68)

98 सार्व. आरोग्य विभागाच्या - पावतीसाठा नोंदवहीतील अनियमिततेबाबत.

पावतीसाठा नोंदवहीतील अनियमिततेबाबत
लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 03

लेखा शीर्ष :सार्व.आरोग्य विभाग मनपा निधी
अनियमितता कलम : 9ड

सार्व.आरोग्य विभागाच्या पावती पुस्तक साठा नोंदवहीतील नोंदी परिपुर्ण नाहीत. विशेष घनकचरा व्यवस्थापन फी म्हणुन वसुल करण्यात येणाऱ्या व्यवसायिकांची मागणी नोंदवही ठेवली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 332 नुसार बाजार कत्तलखाने, पशुअवजारे इ. दुकानावर भाडे आणि फी यांची आकारणी सुधारीत दराने करण्यासाठी प्रशासनाने स्थायी समिती/ महासभेकडे प्रस्ताव सादर केला नाही.

महापालिकेच्या भांडार विभागाकडून 2012-13 मध्ये आरोग्य विभागास किरकोळ वसुली करीता (सॅप्टीक टँक भाडे वसुली) व घनकचरा व्यवस्थापन फी (हॉटेल, हॉस्पीटल, नर्सिंग होम, मटन-चिकन दुकाने इ.) करीता मिळालेली पावती पुस्तके विभागाच्या साठा नोंदवहीत घेऊन त्यांचा विनियोग दाखविला. परंतु तारखेवार विनियोग दाखविला नाही. शिल्लक पावती पुस्तके नोंदवहीत नमुद नाहीत. या बाबत लेखा परीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.120 दि.30/11/2015 रोजी निर्गमित केले होते. विभागाने त्यांचा खुलासा पत्र क्र. निरंक दि.11/12/2015 अन्वये केला. तो विचारात घेऊन लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) विभागाने ठेवलेल्या नोंदवहीतील नोंदी परिपुर्ण नाहीत. म्हणजेच भाडांर विभागाकडून प्राप्त झालेली पुस्तके व त्यांचा विभागाने केलेला विनियोग तारखेवार दाखविला नाही. पुस्तक घेणाऱ्या व देणाऱ्या

कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी घेतली नाही. 2012-13 मध्ये किरकोळ / सामान्य पावती पुस्तके एकूण 27 वापरली आहेत. तसेच घनकचरा फी वसुलीसाठी 37 पुस्तके वापरली आहेत. परंतु त्यांच्या तारखेवार नोंदी घेतल्या नाहीत. वर्षाअखेर शिल्लक पावती पुस्तकांची तपासणी सक्षम अधिकाऱ्याने केली नाही.

2) महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेल, खाणावळी, हॉस्पीटल, नर्सिंग होम, मटन-चिकन दुकाने इ. व्यवसायीकाकडून महिन्याला रू.300/- प्रमाणे विशेष घनकचरा व्यवस्थापन फी वसुली केली आहे.वित्तिय वर्ष 2012-13 मध्ये विशेष स्वच्छता फी म्हणून रक्कम रु.6.27 लक्ष वसुल केली आहे. याबाबत महापालिकेच्या मंजूर ठरावाची प्रत उपलब्ध करून दिली नाही. सदरची फी प्रभागात असलेले स्वच्छता निरीक्षक वसुल करून चलनाने वसुलीची रक्कम विभागामार्फत लेखा शाखेकडे पाठविली जाते. परंतु प्रभागवार असे किती व्यवसायीक आहेत, त्यांची नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे एकत्रित मागणी समजु शकत नाही. मागणी नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे थकबाकी समजू शकत नाही. तसेच वसुली करतांना प्रभागात असलेले स्वच्छता निरीक्षक सदरची वसुली सुमारे तीन वर्षाच्या प्रदिर्घ कालावधीनंतर करतात. उदा :-

अ) पावती क्र.14606 दि.13/03/2013 रू.10800/- सिंगापुर हायस्कुल, दहिसर यांचेकडून घनकचरा व्यवस्थापन फी म्हणुन 2011-12 ते 2013-14 या एकूण 36 महिन्याच्या कालावधीची रू.300/- दराने वसुली केली आहे. मागणी नोंदवही न ठेवल्याने व संबंधितांस वेळीच बिल न पाठविल्याने विलंबाबाबत दंडात्मक व्याजाची आकारणी करून वसुली केली नाही.

ब) पावती क्र.624662 दि.18/03/2013 रू.10800/- मे. परमंन्ट मॅगनेट लि. यांच्याकडून घनकचरा व्यवस्थापन फी म्हणुन 2011-12 ते 2013-14 या एकूण 36 महिन्याच्या कालावधीची रू.300/- दराने वसुली केली आहे. मागणी नोंदवही न ठेवल्याने व संबंधितांस वेळीच बिल न पाठविल्याने विलंबाबाबत दंडात्मक व्याजाची आकारणी करून वसुली केली नाही.

याबाबत 2011-12 च्या लेखा परीक्षण अहवालात परिच्छेद क्र.115 नुसार आक्षेप घेऊनही विभागाने सुधारणा केल्याचे दिसुन येत नाही.

3) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 332 नुसार महानगरपालिकेला बाजार, कत्तलखाने, पशुअवजारे इ. दुकानावर भाडे आणि फी यांची आकारणी करता येते. महापालिका क्षेत्रातील अशा व्यवसायीकाकडून मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो व त्याची विल्हेवाट लावण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन खर्चही करावा लागतो. 2012-13 मध्ये महापालिकेने घनकचरा व्यवस्थापन या करीता रक्कम रू.3298 लक्ष खर्च केला आहे. याचा विचार करून स्थायी समितीच्या मान्यतेने अशा व्यवसायीकाकडून फी वसुली करतांना, सुधारीत दर ठरविण्यासाठी विभागाकडून आवश्यक तो प्रस्ताव पाठविल्याचे दिसुन येत नाही.

DATPMVM6001 (Ref No : 42, Hmm No : 120)

99 *अनधिकृत बांधकाम/अतिक्रमणे निष्काषित करणेकामी आलेल्या खर्चाच्या वसूलीबाबत.*

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013
No. of Irregularities: 02

मनपा निधी

अनियमितता कलम : 95

वसूलपात्र रक्कम रु. 80430.00/-

अतिक्रमणे निष्काषित करण्यासाठी केलेल्या कारवाई पोटी झालेल्या खर्चाची बिले संबधित विकासकाना पाठवूनही अद्याप महापालिकेकडे रु.80430/- चा भरणा झालेला नाही. तसेच निष्काषित करण्यासाठी कारवाईपोटी झालेल्या खर्चाची बिले उशिरा भरल्याचे दिसून येते.

2012-2013 या वित्तिय वर्षातील प्रभाग क्रं .1च्या अतंर्गत असलेले अनधिकृत बांधकामे /अतिक्रमणे निष्काषित करणेकामी आलेल्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1)खाली नमूद केलेल्या विकासकां ची अतिक्रमाणे निष्काषित करण्यासाठी केलेल्या कारवाईपोटी झालेल्या रु.80430/-खर्चाची वसूली मुबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील नियम क्रं.478(2) अन्वये महापालिकेने संबधित विकासकाकडून केली नाही.

अ.क्र.	दिनांक	विकासकाचे नांव	बिलाची रक्कम रु.
1	30.05.2012	श्री.दिलीप पोरवाल	2847.00
2	26.07.2012	मे.अनंत जीवन ॲग्रो कं.प्रा.लि.	3213.00
3	26.07.2012	प्रल्हाद बाबमराव ठाकूर	714.00
4	27.07.2012	वेलेरीयन रेजी रॉड्रिक्स्	3110.00
5	12.10.2012	मे.श्रीनाथ डेव्हलोपर्स	576.00
6	03.01.2013	अंकुश एंटरप्राईजेस	7375.00
7	03.01.2013	इमरान हसन शेख	5019.00
8	03.01.2013	श्री. डी. रामल	5019.00
9	04.01.2013	विजय चौधरी	8600.00
10	13.03.2013	अश्लेल मनवेल घर्शी	18578.00

11	30.03.2013	फुलचंद बस्तीमल सेठीया	25412.00
		एकूण रु.	80430.00

2)खाली नमूद केलेल्या विकासकांची अतिक्रमाणे निष्काषित करण्यासाठी केलेल्या कारवाईपोटी झालेल्या खर्चाचा रक्कमा भरणा त्यांनी महापालिकेच्या फंडात उशिरा केल्याचे दिसून आले आहे.

अ.क्र	दिनांक	बिलाची रक्कम	विकासकाचे नांव	भरणा केल्याचा दिनांक
1	08.02.2013	67999.00	श्री.अर्शद सिध्दीकी	08.04.2012
